
# दुरितांचे तिमिर जावो

लोक संवाद

दिवाळी अंक २०२४

www.loksanvad.com


दुरितांचे
तिमिर
जावो
लोक
संवाद
दिवाळी अंक २०२४
www.loksanvad.com

# लोकसंवाद

**दिवाळी अंक २०२४**

---

**मुख्य संपादक**

श्री नितीन राजवैद्य

**दिवाळी अंक संपादक**

श्री अशोक राणे

**मुखपृष्ठ संकल्पना**

तुषार कठाळे

**डिझाईन, मांडणी व मुद्रण**

मित्राय पब्लिकेशन, नागपूर

मो. ९६६५६६५८५११

**प्रकाशक**

लोकसंवाद मिडीया प्रा. लि.

संपर्क - ९८८१५६०१५५

ईमेल - sampadak.loksanvad@gmail.com

वेबसाइट - www.loksanvad.com

**मूल्य - २००/-**

लोकसंवाद चा दिवाळी अंक मुख्यसंपादक नितिन राजवैद्य यांनी मित्राय पब्लिकेशन, नागपूर
येथे छापून लोकसंवाद मीडिया प्रा. लि. अमरावती येथे प्रकाशित केला आहे.

---

टीप - या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्यानमधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक / संचालक सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग


१. **मनोगत (मुख्य संपादक).**
नितिन राजवैद्य.

२. **महाराष्ट्र तितुका मेळावावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा (संपादकीय).**
अशोक राणे.

३. **अष्टलक्ष्मी स्तोत्रम्.**
सर्वेश फडणवीस.

४. **मराठा उत्कर्षाचे शिल्पकार.**
आ.निरंजन डावखरे.

५. **रा.स्व.संघाच्या शतकोत्तर वाटचालीच्या निमित्ताने.**
सुनील किटकरू.

६. **“आर्थिक साक्षरता” प्रत्तेकासाठी महत्वाची आहे.**
शिशिर पेठकर.

७. **भारतीय लष्कर बलशाली होत आहे.**
कर्नल अभय बाळकृष्ण पटवर्धन (निवृत्त).

८. **दिवाळीचा फराळ आणि पोषक तत्व.**
सौ. प्रज्ञा योगेश बरालीया.

९. **भारताच्या विकासात सामाजिक संस्थांची भूमिका.**
श्रेयस पन्नासे.

१०. **हिंदू धर्मरक्षक छत्रपति शंभुराजे.**
रवींद्र गणेश सासमकर.

११. **ती तरुणी...**
मोहिनी हेडावू.

१२. **स्वा. सावरकरांचे स्वदेशी विचार, भूमिका आणि कार्य.**
अक्षय जोग.

१३. **जडलेला जीव.**
डॉ.रमा दत्तात्रय गर्गे.

१४. **वक्फ बोर्ड एक घातक कायदा ?**
ॲड. विजय भांबेरे.

१५. **“लेक”.**
संतोष कान्हेरकर.

१६. **सकल जीवांच्या ठाई राम.**
डॉ. वैशाली काळे – गलांडे (गीताग्रजा).

१७. **'गोमाता - राज्यमाता' - एक ऐतिहासिक निर्णय.**
डॉ. सुनील सूर्यवंशी.

१८. **ज्योतिष शास्त्र समजून घेतांना.**
डॉ. कल्पना गुंबळे.

१९ **“खेलो इंडिया” योजनेचे यश.**
प्रा. डॉ. निलेश डी. जोशी.

२०. **विवेकानंदांचे शैक्षणिक विचारधन.**
प्रा. अमोल श्रीकृष्ण अहिरे.

२१. **दिवाळी : अपरिग्रहाच्या वाटेवरची संधी !**
गौरी शेटे.

२२. **आपल्या निरामय जीवनाची खात्री - प्रदुषणमुक्त गावनदी.**
किशोर पौनीकर नर्मदापुरकर.

२३. **मराठी लोककलांची वैविध्यता व प्रारूप.**
प्रा. डॉ. श्रीकृष्ण काकडे.

२४. **उत्पलवर्णा.**
श्रेया अभिजित सरनाईक.

२५. **गर्व से कहो, हम हिंदू है..!**
अभिषेक म. पत्की.

## अंतरंग


**२६. कोकणातील बदलते पर्यावरण.**
अॅड.नकुल पार्सेकर.

**२७. राष्ट्रीय सौर दिनदर्शिका.**
नारायण पांडव.

**२८. भारतीय स्त्रीवाद.**
माधुरी साकुळकर.

**२९. माय मराठीची विजयी पताका.**
प्रा. डॉ. राजेश लेहकपुरे.

**३०. नेदरलँड्समधील दीपोत्सव...**
सौ. प्रणिता अद्वैत देशपांडे.

**३१. "नैतिकतेची ढासळती वीण, शाळा आणि विद्यार्थ्यांचे बदलते आयाम".**
पल्लवी चिकारे- पळसकर.

**३२. उद्योजकतेचे स्वप्न बघा.**
अभय खेडकर.

**३३. माती व पाणी आपल्या समृद्धीचा आधार.**
पवन मिश्रा.

**३४. निसर्ग समृद्ध अलिबाग... प्रवास वर्णन.**
निता प्रकाश.

**३५. लघुकथा - "ती".**
जयश्री दाणी.

**३६. धर्मनिष्ठा दाखवीत अहिल्यादेवींनी केला हिंदू सांस्कृतीचा जिर्णोद्धार.**
सौ.पल्लवी कुलकर्णी.

**३७. शेतकऱ्यांच्या चळवळी ला हवी नवी दिशा.**
डॉ. नीलेश पाटील.

**३८. पालखी महामार्ग, भक्तिमार्ग राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प.**
साभार - शैलेश घाटपांडे.

**कविता :-**

**१. दुबार पेरणी.**
दत्ता वालेकर.

**२. विरहाचा ढग फुटलेला (वृत्त – उद्धव).**
विजो (विजय जोशी).

**३. दिव्य दिपावली.**
शिल्पा म. वाघमारे.

# मनोगत.



" दुरितांचे तिमिर जावो... " ही ज्ञानेश्वर माऊलींनी केलेली विश्वकल्याणाची कामना कायम मनामध्ये ठेवत आपण कार्यरत असले पाहिजे असे समाजातील संत, सत्पुरुष, थोर – मोठी मंडळी आपल्याला सांगत असतात. आपण आपल्या कार्यक्षेत्रात काम करतांना " दुरितांचे तिमिर " दूर करण्याचा छोटासा प्रयत्न केला पाहिजे. जेणे करून आपला देश, आपला समाज हा समर्थ, बलशाली, स्वयंपूर्ण, विकसित होण्यास मदत होईल.

" लोकसंवाद डॉट कॉम " (www.loksanvad.com) हे राष्ट्रीय विचारांसाठी समर्पित संकेत स्थळ अनेक वर्षापासून लेखक, वाचकांना एक व्यासपीठ म्हणून समोर आले आहे. आपल्या लोकसंवाद चा दिवाळी अंक डिजिटल आणि प्रिंट स्वरुपात आपल्या असंख्य वाचकांसमोर आणतांना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

आपल्या देशात साहित्य हे नेहमीच समाजाला दिशादर्शक ठरले आहे. साहित्याच्या माध्यमातून अनेक लढाया झाल्या आणि अनेक लढाया मिटल्याचा इतिहास आहे. साहित्याच्या माध्यमातून अनेक आंदोलने उभी राहिलित. अनेक आंदोलनाला गती मिळाल्याचे भूतकाळ सांगतो. अगदी वैयक्तिक जीवनापासून ते सार्वजनिक जीवनासाठीचा उत्कर्ष गाठण्यासाठी साहित्याचा मोठा वाटा आहे. आपल्या महाराष्ट्राला तर साहित्याची मोठी परंपरा आहे. या साहित्यिकांच्या परंपरेने देशहिता करिता, समाज हिता करिता आपले योगदान दिल्याचे इतिहास सांगतो. ही नुसती साहित्य निर्मिती नसून याला ज्ञानेश्वर माऊलींनी " वाग्यज्ञ " असे म्हटले आहे. त्यामुळे साहित्यकारांची मोठी जबाबदारी या क्षेत्रात निर्माण झाली आहे. आज समाजात विविध माध्यमांद्वारे तथ्यहीन, काल्पनिक साहित्य निर्माण करून प्रसारित केल्या जात असल्याचे आपल्याला दिसते. जा मुळे समजात, घरा घरात तेढ निर्माण करेण. मना मनात, नात्या नात्यात विश कलविल्या जाणे असे पाहून मनाला दु:ख झाल्याशिवाय राहत नाही.

" लोकसंवाद " आपल्या राष्ट्रीय विचारांचा, मूल्यांचा आदर करत जा प्रकारे आपले काम करते, त्याच उद्देशाला अनुसरून " लोकसंवाद " चा दिवाळी अंक आपल्या सर्वांच्या समोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे हा दिवाळी अंक आपल्या सर्वांना नक्कीच आवडेल असा आम्हाला विश्वास आहे.

" लोकसंवाद डॉट कॉम " आपले सामाजिक आणि साहित्यिक भान जपत पुढे जात आहे. " लोकसंवाद डॉट कॉम " च्या असंख्य लेखक, वाचक, हितचिंतक, सहकारी यांच्या मोठ्या पाठबळामुळे हे शक्य होत आहे. जाहिरातदारांनी विश्वास दर्शविला आणि सहकार्य केले त्यामुळे दिवाळी अंकाचा मार्ग सुखकर झाला.

आपल्या प्रतिक्रिया, सूचनाचे आम्ही नेहमीच स्वागत करत आलो आहोत. कारण तुमच्या सूचना, प्रतिक्रिया ह्या आम्हाला अजून सक्षम आणि अधिक चांगले काम करण्यासाठी प्रेरणा देतात. आपण सारे मिळून आपापल्या क्षेत्रातील अंधार दूर करून प्रकाश वाटा निर्माण करण्याचा प्रयत्न करुयात.

सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा देतो आणि ईश्वरा चरणी प्रार्थना करतो की -

श्रीवर्चस्यमायुष्यमारोग्यमाविधात् पवमानं महियते ।
धनं धान्यं पशुं बहुपुत्रलाभं शतसंवत्सरं दीर्घमायुः ।।

**- नितिन राजवैद्य.**

मुख्यसंपादक लोकसंवाद डॉट कॉम. (www.loksanvad.com) Email-sampadak.lokasanvad@gmail.com.

*****

# महाराष्ट्र तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा (संपादकीय).



महाराष्ट्रातील साधुसंत व वीर महापुरुषांनी महाराष्ट्राला सतत समरस व एकतेच्या सूत्रात बांधून ठेवले आहे. सोबतच वैचारीक व सांस्कृतिक दृष्ट्या सुद्धा प्रगल्भ केले आहे. संत तुकाराम यांनी " भेदा भेद भ्रम अमंगळ " तथा " कोणाही जीवाचा न घडो मत्सर, वर्म सर्वेश्वर पुजनाचे "तथा संत ज्ञानेश्वर माऊली " विश्व ची माझे घर "हा विशाल विचार दिला आहे. छत्रपती शिवरायांचा, संभाजी राजे यांचा लढवय्या बाणा महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाच्या धमण्यातील वाहणाऱ्या रक्तात आजही कायम आहे. तसेच महाराष्ट्रातील टाटा उद्योग, किर्लोस्कर, नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या सारख्या उद्योजकांनी महाराष्ट्र आर्थिक दृष्ट्या समृध्द केले आहे. म.फुले ते कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाची गंगा सामान्य माणसा पर्यन्त आणली. यशवंतराव चव्हाण ते वसंतदादा पाटील यांची राजकीय परंपरा सुद्धा फार प्रगल्भ आहे. त्यामुळे सर्व क्षेत्रात समृध्द व लढवय्या असलेल्या महाराष्ट्राने अनेक वेळा देशाचं सर्वच क्षेत्रात नेतृत्व सुद्धा केल आहे. जेव्हा हिंदुस्तान इस्लामी सत्तेच्या जोखडात खितपत पडला होता, तेव्हा छत्रपती शिवाजी महाराज यांनी इस्लामी सत्तेला खिंडारे पाडून, इस्लामी सिंहासने उलथापालथ करून, स्वराज्याची अर्थात हिंदवी स्वराज्याची स्थापना करून, देशाला इस्लामी सत्तेच्या विरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. अटकेपार भगवे ध्वज फडकविणारे महाराष्ट्रातील मराठेच होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील इंग्रजांनी "लाल, बाल, पाल ' यांची धास्ती घेतली होती. त्यामधील बाळ गंगाधर टिळक महाराष्ट्राच्या मातीत जन्मले होते व त्यांनी इंग्रजां विरुद्ध लढा महाराष्ट्रामधून उभा केला होता. जेव्हा देशावर विदेशी सिमेपलेकडून आक्रमण झाली, तेव्हा " हिमालयाच्या मदतीला, सह्याद्री धाऊन गेला " असं म्हटल जाते. तसेच महाराष्ट्राच्या नावामध्येच राष्ट्र येत असून मराठा शब्द देश, देव, धर्मासाठी लढणारा शब्द आहे. त्यामुळेच देशाच्या राष्ट्रगीतामध्ये मराठा व सैन्यामध्ये मराठा रेजिमेंट शब्द अभिमानाने येतो. सेनापती बापट यांच्या " मराठा मेला तर महाराष्ट्र मेले " ही कवितेमधील अंगार लक्षात घेतली तर महाराष्ट्र व मराठा शब्दाला देशात किती मोठा सन्मान व किती मोठी परंपरा आहे, हे सहज लक्षात येते. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन आपला मान वाढविला आहे. परंतू दुर्दैवाने आज मराठा आरक्षणाच्या नावाखाली व अवास्तव मागण्या करून महाराष्ट्रात फार मोठी सामाजिक फूट पाडून सामाजिक वीण विस्कळीत करण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात केला जात आहे. सोबतच कोणी महाराष्ट्रात मणिपूर सारख्या घटना घडवण्याचे कारस्थान करण्याचा प्रयत्न करू पाहत आहे. त्यामुळे आता महाराष्ट्राचा मणिपूर, बंगाल, आसाम होऊ द्यायचा नसेल तर महाराष्ट्रातील सज्जन माणसाला राजकीय षडयंत्र लक्षात घेऊन महाराष्ट्राच्या भल्यासाठी, विकासासाठी महाराष्ट्रधर्म वाढवावा लागेल.

आपल्या देशात नाजिकच्या काळात आरक्षणाच्या मुद्द्यावर देशाच्या विविध राज्यात आंदोलने झालेली आहेत. गुजराथ मधील पटेल, हरियाणामध्ये जाट यांचे मोठे आंदोलने झालेली असून, त्याच बरोबर बिहार व राजस्थान मध्ये आंदोलने झालेली आहेत. कालांतराने शांत सुध्दा झाले आहेत. आपल्या देशात आपल्या हक्क व न्यायासाठी लढण्याचा, संघर्ष व आंदोलन करण्याचा प्रत्येक माणसाला भारतीय राज्य घटनेने अधिकार दिलेला असून, आंदोलन, संघर्ष करण्याचे लोकशाहीचे मार्गाचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. पण ही आंदोलने राजकीय हेतूने किंवा राजकीय हस्तक्षेपाने प्रेरित होती. आता महाराष्ट्रात मनोज जरांगे यांचे आरक्षण आंदोलन सुद्धा राजकीय हेतूने प्रेरीत आहे. उध्दव ठाकरे व शरद पवार यांचे मविआचे सरकार गेल्या बरोबर आंदोलन सुरू झाल्यामुळे शंका घेण्यास प्रचंड वाव आहे. तसेच दडपशाही व राजकीय हेतूने प्रेरीत असलेल्या आंदोलनामुळे समाजात कटुता व फूट निर्माण होत आहे. लोकशाही मार्ग आणि संवैधानिक, सनदशीर

मार्गाचे आयुध उपलब्ध असतांना आपल्या मागण्यासाठी दहशत निर्माण करणे, गांव बंदी कारणे, शिविगाळ करणे, कितपत योग्य आहे ? याचा अर्थ उपरोक्त प्रकार करणे म्हणजे लोकशाहीवर अविश्वास दाखवून सरळ सरळ लोकशाहीची हत्या करण्याचा प्रकार किंवा लोकशाहीची पायमल्ली करण्याचा प्रकार नाही का ? उध्दव ठाकरे व शरद पवार यांचे मविआ सरकार असताना असे प्रयोग का केले गेले नाहीत ? आताच प्रयोग का केले जात आहेत ? याचा अर्थ तुमच आंदोलन राजकीय हेतूने प्रेरीत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. नामदेवराव जाधव यांना काळे फासने , राजकीय नेत्यांना गांव बंदी करणे, क्षीरसागर परिवाराच्या घरांची जाळपोळ तसेच सरकारी वाहनाची मोडतोड करणे, सारख्या मार्गाने महाराष्ट्र अस्थिर करून महाराष्ट्रात अराजकता निर्माण करण्याचा जो प्रयत्न सुरू आहे, ते षडयंत्र कीवा कुटील डाव हाणून पाडला पहीजे. तसेच हे कारस्थान कोण रचत आहे. याचा सुध्दा तपास करणे आवश्यक आहे महाराष्ट्रामध्ये आज एक समाज दुसऱ्या समाजाच्या विरोधात उभे राहु शकतो. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे किंवा अशी परिस्थिती निर्माण केली जात आहे. निर्माण झालेल्या विदारक परिस्थितीवर सामाजिक संघटना व राजकीय पक्ष प्रमुखांनी सामाजिक एकता व सलोखा कायम राहण्यासाठी एकत्र येण्याची आणि महाराष्ट्र धर्म वाढविण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र धर्म वाढवावा - हिंदुस्थान इस्लामी सत्तेच्या गुलामीत असताना महाराष्ट्रातील साधूसंत यांनी महाराष्ट्राचे प्रबोधन केले तुकाराम महाराज यांनी. " भले तरी देऊ कासेची लंगोटी, नाठाळाच्या मस्तकी हाणू काठी " ची शिकवण दिली तर समर्थ रामदास यांनी " मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा " ही शिकवण देऊन अन्यायी इस्लामी सत्ते विरुद्ध सामान्य माणसाला लढण्याची प्रेरणा दिली. शिवरायांनी अठरा पगड जाती व बारा बलुतेदार यांना भगव्या ध्वजा खाली एकत्र करून लढा उभारला होता. साधुसंतांच्या प्रेरणेने महाराष्ट्र परकीय शक्ती विरुद्ध लढला. सोबतच सामाजिक सौहार्द टिकवून जातीय सलोखा कायम ठेवण्यात सुद्धा महत्वाची भूमिका निभावली आहे. पण गेल्या दोन वर्षा पासून जाती अंताची लढाई लढणारा पुरोगामी महाराष्ट्र, मराठा आरक्षण आंदोलनामुळे जातीय तीव्रतेने धगधगत आहे. गरजवंत मराठा समाजाला घटनेच्या चौकटतील आणि न्यायालयात टिकणारे आरक्षण मिळावे ही सर्व महाराष्ट्राची इच्छा आहे. महाराष्ट्र सरकार सुध्दा सकारात्मक व गंभीर आहे. कारण महाराष्ट्राच्या जडण घडण मध्ये मराठा समाजाचे मोठे योगदान आहे. ग्रामीण भागातील सामाजिक बांधिलकी व अर्थ व्यवस्था मराठा समाजाने जोपासली आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाला कोणाचाही विरोध होण्याचे कारण नाही. पण महाराष्ट्रातील गेल्या एक वर्षांचां मागोवा घेतल्यास मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षण आंदोलन व विद्वेषी भूमिकेमुळे महाराष्ट्र अशांतेच्या दिशेने जात असून, सामाजिक ऐक्याची वीण जाणीवपूर्वक विस्कळीत केली जात आहे. महाराष्ट्राचा मणिपूर करण्यासाठी मराठा विरुद्ध ओ.बी.सी नव्हे तर मराठा विरुद्ध मराठा असा सुध्दा जातीय संघर्ष उभा करण्याचा डाव सुरू असल्याची शक्यता आहे. तसेच महाराष्ट्राच्या संस्कृतीला न शोभणारी वक्तव्य केली जात आहे. महाराष्ट्राची सामाजिक ऐक्याची वीण विस्कळीत करण्याचा प्रयत्न सुद्धा मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास करून एक संघ ठेवायचा असल्यास सर्वांना आता महाराष्ट्र धर्म वाढवावा लागेल.

**- अशोक राणे,** अकोला.
संपादक लोकसंवाद दिवाळी अंक २०२४.
माजी सदस्य महा.राज्य.साहित्य आणि संस्कृती मंडळ महाराष्ट्र शासन.

*****

# अष्टलक्ष्मी स्तोत्रम्.

दिवाळी अगदीं जवळ आली आहे. दिवाळीची आवरा-सावर, फराळाची तयारी,सगळं कसं रीतसर लागतं. त्यात पाच दिवस अगदी आनंद आणि उत्साहाने भारलेले असतात. लक्ष्मीपूजन हा त्यातल्या त्यात मुख्य दिवस असं म्हणतात. लक्ष्मीच्या विविध रूपातून भारताच्या सर्वदूर भागात ती पूजल्या जाते. तिचा उत्साहाने केलेला उत्सव संपूर्ण जगाला कौतुकाने बघण्यास भाग पाडते. अशाच लक्ष्मीच्या अष्टलक्ष्मी स्तोत्रम् याविषयी आज काही चिंतन मांडण्याचा प्रयत्न करतोय..

अष्टलक्ष्मी स्तोत्रम् स्तोत्राने कानाभोवताली गुंजारव करत कधी मनाला रुंजी घातली कळलेच नाही.स्तोत्र फलदायी व्हायला ते आधी मनात रुजायला हवे. स्तुती करायला रचलेले काव्य म्हणजे स्तोत्र. त्या इष्ट देवतेच्या परिपूर्ण गुणांचे वर्णन म्हणजे स्तोत्र. अशाच अष्टलक्ष्मी स्तोत्राबद्दल ऐकतांना अर्थ जाणून घेण्याची इच्छा झाली आणि त्यातून एका एका श्लोकाचे चिंतन सुरू झाले आणि या माध्यमातून आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न करतोय. अष्टलक्ष्मी अर्थात आदि लक्ष्मी,धन लक्ष्मी,विद्या लक्ष्मी,धान्य लक्ष्मी,धैर्य लक्ष्मी,संतान लक्ष्मी,विजय लक्ष्मी,राज लक्ष्मी या आहेत. या सर्व प्रसन्न व्हाव्या यासाठी या स्तोत्राचे पठण अधिक लाभदायक आहे.

**आदिलक्ष्मी**

सुमनसवन्दित सुन्दरी माधवी चन्द्र सहोदरी हेममये ।
मुनिगणमण्डित मोक्षप्रदायिनी मन्जुळभाषिणी वेदनुते ।
पञ्कजवासिनी देवपूजित सद्गुणवर्षिणी शान्तियुते ।
जयजय हे मदुसूदन कामिनी आदिलक्ष्मी सदा पालय ते ॥ १ ॥

आपल्या मूळ स्त्रोताचे ज्ञान होणे, हीच 'आदि लक्ष्मी' होय. मग नारायण आपल्या नजीक असतात. ज्याला आपल्या स्त्रोताचे ज्ञान होते तो सर्व भयापासून,भीतीपासून मुक्त होतो आणि संतोष,आनंद प्राप्त करतो. हीच आदि लक्ष्मी होय. आदि लक्ष्मी निव्वळ ज्ञानी व्यक्तींजवळ असते आणि ज्याच्याजवळ आदि लक्ष्मी असते समजा कि त्याला ज्ञान प्राप्त झालेय.

**धान्यलक्ष्मी**

अयि कलिकल्मषनाशिनी कामिनी वैदिकरुपिणी वेदमये ।
क्षीरसमुद्भव मंगलरुपिणी मन्त्रनिवासिनी मन्त्रनुते ।
मन्गलदायिनी अम्बुजवासिनी देवगणाश्रित पादयुते ।
जयजय हे मधुसूदन कामिनी धान्यलक्ष्मी सदा पालय ते ॥ २ ॥

धन लक्ष्मी जवळ असली तरी धान्य लक्ष्मी 'आहे' असे म्हणू शकत नाही. धन आहे परंतु काही खाऊ शकत नाही. भाकरी, भात, साखर, मीठ खाऊ शकत नाही. याचाच अर्थ धन लक्ष्मी आहे पण धान्य लक्ष्मीचा अभाव आहे. ग्रामीण भागात मुबलक धान्य असते. तेथील लोक दोन चार दिवस कोणालाही खायला-प्यायला घालायला हयगय करत नाहीत.कारण धन नसले तरी धान्य आहे. तेथील लोक छानपैकी खातात. शहरी लोकांच्या तुलनेत तेथील लोकांच्या आहाराची गुणवत्ता आणि प्रमाण देखील जास्त असते. त्यांची पचन क्षमता देखील चांगली असते. धान्याचा वापर आणि सन्मान करणे म्हणजेच धान्य लक्ष्मी. जगात सर्वांना भोजन गरजेचे आहे. अन्न खराब करू नका, वाया घालवू नका. बहुतेकवेळा जेवढे अन्न बनते तेवढेच वाया जात असते, फेकून दिले जाते. इतरांना देत पण नाहीत. असे कदापि करू नका. अन्नाचा सन्मान करणे हीच धान्य लक्ष्मी होय.

**धैर्यलक्ष्मी**

जयवरवर्णिनी वैष्णवी भार्गवी मन्त्रस्वरुपिणि मन्त्रमये ।
सुरगणपूजित शीघ्रफलप्रद ज्ञानविकासिनी शास्त्रनुते ।
भवभयहारिणि पापविमोचनी साधुजनाश्रित पादयुते ।
जयजय हे मदुसूदन कामिनी धैर्यलक्ष्मी सदा पालय ते ॥ ३ ॥

घरी सर्व काही आहे-धन आहे, धान्य आहे, सारी संपन्नता आहे पण आपण भित्रे आहोत. श्रीमंत कुटुंबातील मुले बहुतेकवेळा भित्री असतात. हिम्मत म्हणजे धैर्य एक संपत्ती आहे. नोकरीतील लोक नेहमी आपल्या वरिष्ठांना घाबरून असतात. व्यापारी निरीक्षकांना घाबरून असतात. आम्ही नेहमी अधिकाऱ्यांना विचारतो कि तुम्हाला कसा सहाय्यक आवडेल – तुमच्या समोर नेहमी घाबरलेला कि धैर्याने जो तुमच्याशी संपर्क करेल? जो सतत तुमच्या समोर घाबरलेला असेल तो नेहमी खोटे बोलत राहील, खोट्या गोष्टी, सांगत राहील. अशा व्यक्तीसोबत तुम्ही काम करू शकणार नाही. तुम्ही असा सहाय्यक पसंत कराल जो धैर्याने काम करेल आणि इमानदारीने तुमच्याशी बोलेल. हे आपल्या आंतमध्ये अशी शक्ती आहे, दिव्य शक्ती आहे जी सतत आपल्या सोबत असते. हि धैर्य लक्ष्मी होय. धैर्य लक्ष्मी असली तरच जीवनात प्रगती होते. ज्या प्रमाणात धैर्य लक्ष्मी असेल त्या प्रमाणातच प्रगती होईल. व्यापार असो किंवा नोकरी, धैर्य लक्ष्मीची आवश्यकता असतेच.

**गजलक्ष्मी**

जयजय दुर्गतिनाशिनी कामिनी सर्वफलप्रदा शास्त्रमये ।
रथगज तुरगपदादि समावृत परिजनमण्डित लोकनुते ।
हरिहर ब्रह्म सुपूजित सेवित तापनिवारिणी पादयुते ।
जयजय हे मधुसूदन कामिनी गजलक्ष्मी सदा पालय ते ॥ ४ ॥

राज लक्ष्मी म्हणा किंवा भाग्य लक्ष्मी म्हणा दोन्ही एकच आहेत – सत्ता. एखादी व्यक्ती मंत्रिपद प्राप्त करून काहीही सांगायला, बोलायला लागला तरी त्याचे कोणीही ऐकत नाही. त्याची सत्ता कोणीही मान्य करत नाही. बऱ्याच कार्यालयात देखील असे दिसते. मालकाचे कोणीही ऐकत नाही पण क्लार्कचे ऐकतात. त्याचा हुकुम चालतो. एका ट्रेड युनियनच्या प्रमुखाजवळ जितकी राज अर्थात गजांत लक्ष्मी असते तेवढी शहरातील मिल मालकाकडे नसेल. शासन करण्याची क्षमता म्हणजे राज लक्ष्मी अर्थात गजांत लक्ष्मी आहे.

**सन्तानलक्ष्मी**

अयि खगवाहिनी मोहिनी चक्रिणी रागविवर्धिनी ज्ञानमये ।
गुणगणवारिधी लोकहितैषिणी स्वरसप्त भूषित गाननुते ।
सकल सुरासुर देवमुनीश्वर मानववन्दित पादयुते ।
जयजय हे मधुसूदन कामिनी सन्तानलक्ष्मी सदा पालय ते ॥ ५ ॥

अशी मुले जे प्रेम देणारे असतील, प्रेमाचे नाते  टिकवणारी असतील तर ती संतान लक्ष्मी होय. ज्या मुलांमुळे ताण तणाव येत नाही किंवा ताण कमी होतो ती संतान लक्ष्मी होय. ज्या मुलांमुळे सुख, समृद्धी, शांती मिळेल ती संतान लक्ष्मी होय. आणि ज्या मुलांमुळे भांडण, तणाव, त्रास, दुःख, पिडा होईल ती संतान लक्ष्मी नव्हे.

**विजयलक्ष्मी**

जय कमलासनी सद्गतिदायिनी ज्ञानविकासिनी गानमये ।
अनुदिनमर्चित कुंकुमधूसर भूषित वासित वाद्यनुते ।

कनकधरास्तुति वैभव वन्दित शन्कर देशिक मान्य पदे ।
जयजय हे मधुसूदन कामिनी विजयलक्ष्मी सदा पालय ते ॥ ६ ॥

काही व्यक्तींच्या कडे सर्व साधन सुविधा असतात तरीदेखील ते जे काही करतील त्यात त्यांना यश मिळत नाही. जे काम हातात घेतील ते काम बिघडले म्हणून समजा, काम होणारच नाही. म्हणजे विजय लक्ष्मीची कमी आहे. बाजारातून काहीतरी आणायला गेले तर ते मिळणार नाही, रिक्षात बसतील तर रिक्षा बिघडेल, टॅक्सीने बाजारात पोहोचले तर दुकाने बंद झाली असतील. तुम्हाला असे वाटेल कि मी स्वतः जाऊन काम केले असते तर बरे झाले असते. अगदी छोटे काम देखील करू शकणार नाहीत. येथे विजय लक्ष्मी कमी असते. परिस्थिती तरी विपरीत असेल किंवा काही कारणे तरी सांगतील. कोणत्याही कामात सफलता न मिळणे म्हणजे विजय लक्ष्मीची कमतरता असं म्हणता येईल.

**विद्यालक्ष्मी**

प्रणत सुरेश्वरी भारती भार्गवी शोकविनाशिनी रत्नमये ।
मणिमयभूषित कर्णविभूषण शान्तिसमावृत हास्यमुखे ।
नवनिधिदायिनी कलिमलहारिणी कामित फलप्रद हस्तयुते ।
जयजय हे मधुसूदन कामिनी विद्यालक्ष्मी सदा पालय ते ॥ ७ ॥

देवी लक्ष्मी आणि सरस्वतीचे चित्र पाहिले कि लक्षात येईल कि लक्ष्मी पाण्याच्या वर कमळामध्ये स्थित असते. पाणी अस्थिर असते म्हणून लक्ष्मी देखील पाण्याप्रमाणे चंचल आहे. मात्र विद्या लक्ष्मी सरस्वती पाषाणावर स्थिर आहे. विद्या, ज्ञान येते तेंव्हा जीवनात स्थिरता येते. आपल्या हातून विद्येचा देखील दुरुपयोग होऊ शकतो. शिकणे हा एकमेव उद्देश्य असेल तर ती विद्या लक्ष्मी होऊ शकत नाही. शिकणे आणि शिकल्यावर त्या शिक्षणाचा वापर कराल तेंव्हा ती विद्या लक्ष्मी होईल.

**धनलक्ष्मी**

धिमिधिमि धिन्धिमि धिन्धिमि धिन्धिमि दुन्दुभि नाद सुपूर्णमये ।
घुमघुम घुंघुम घुंघुम घुंघुम शन्खनिनाद सुवाद्यनुते ।
वेदपुराणेतिहास सुपूजित वैदिककमार्ग प्रदर्शयुते ।
जयजय हे मधुसूदन कामिनी धनलक्ष्मी सदा पालय ते ॥ ८ ॥

धन लक्ष्मी सर्वांना माहिती आहेच, धनाच्या इच्छेपोटी आणि अभावामुळे माणूस अधर्म करतो. हिंसा, चोरी, फसवणूक यासारखी चुकीची कामे करतो. परंतु डोळे उघडून पहात नाहीत कि आपल्याजवळ काय आहे. जोर जबरदस्तीने धन लक्ष्मी येत नाही, आली तरी सुख, आनंद देत नाही तर निव्वळ दुःखच देते. काही व्यक्ती धन म्हणजेच लक्ष्मी मानतात आणि तिला प्राप्त करणे हेच लक्ष्य बनवतात. मरेपर्यंत पैसे गोळा करतात, बँकेत ठेवतात आणि मरून जातात. ज्यांनी धन हेच लक्ष्य बनवले आहे ते दुःखीच होतात. काही व्यक्ती धनाला दोष देतात. पैसे नाहीत तेच ठीक आहे, पैसा चांगला नाही, पैशामुळे हे घडते-ते घडते, हा सर्व गैरसमज आहे. धनाचा सन्मान करा, सदुपयोग करा, मग धनलक्ष्मी स्थिर होईल. लक्ष्मीची पूजा करा. लक्ष्मी चंचल असते, म्हणजे ती सतत चालत राहते. चालत राहिली तरच तिचे मुल्य आहे नां. बंद राहिली तर तिचे काहीही मुल्य नाही. म्हणून धनाचा सन्मान आणि सदुपयोग करा.

खरंतर या आठ प्रकारची लक्ष्मी एक दुसऱ्याशी संलग्नित आहेत. प्रत्येक व्यक्तीकडे आठही धन कमी अधिक प्रमाणात असतात. आपण त्यांचा किती सन्मान करतो,वापर करतो ते आपल्यावर अवलंबून आहे. या आठ लक्ष्मींचे नसणे याला अष्ट दारिद्र्य म्हणतात. लक्ष्मी असो किंवा नसो - नारायण नक्की प्राप्त होतील. कारण नारायण दोन्हीत आहेत. लक्ष्मी नारायण आणि दरिद्री नारायण. दरिद्री नारायणाला भोजन दिले जाते तर लक्ष्मी नारायणाची पूजा केली जाते. साऱ्या


जीवनाचा प्रवाह हा दरिद्र नारायणाकडून लक्ष्मी नारायणाकडे, दुःखाकडून समृद्धीकडे आणि जीवनातील रुक्षपणाकडून अमृताकडे जात असतो आणि त्यामुळेच या अष्टलक्ष्मीची नियमित उपासना करणे इष्ट ठरेल असे वाटते. येणारी दिवाळी सुख,शांती,समृद्धी आणि भरभराटीची जावो हीच अष्टलक्ष्मीचरणी प्रार्थना आहे.

शुभ दीपावली..

**- सर्वेश फडणवीस,** नागपुर.

लेखक हे इतिहास, आध्यात्मिक विषयाचे अभ्यासक आहेत.

*****



# मराठा उत्कर्षाचे शिल्पकार
# स्व.अण्णासाहेब पाटील.

महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य आमदार अण्णासाहेब पांडुरंग पाटील यांनी मुंबई मधील विखुरलेल्या कामगारा एकत्र करून त्यांच्या उत्थान साठी भरीव कामगिरी केली आहे. म्हणून अण्णासाहेब पाटील यांना महाराष्ट्रात मराठा व माथाडी कामगारांच्या उत्कर्षाचे शिल्पकार म्हटले जाते. अण्णासाहेब पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा मावळा असलेला व महाराष्ट्रात राहणारा प्रत्येक माणूस मराठा आहे, अशी विशाल व साधी सोपी मराठ्यांची व्याख्या करून "माथाडी कामगार संघटना " तथा " अखिल भारतीय मराठा महासंघाची " स्थापन केली होती. स्व.अण्णासाहेब पाटील त्यांच मूळ गावं असलेल्या पाटण तालुक्यातील मंगरुळे या गांवा मधुन मुंबईत आले. तेव्हा कामगार म्हणूनच आपल्या जीवन कार्याला सुरुवात केली होती. त्यावेळेस मुंबई कामगारांची अवस्था अत्यंत बिकट होती. तसेच मुंबई मधील बहुतांश कामगार वर्ग मराठा होता. कामगारांचा आर्थिक  व सामाजिक उत्कर्ष झाला पाहिजे असे त्यांना नेहमी वाटू लागायचे. त्यांनी कामगारांचे प्रश्न व त्यांच्या समस्याचा अभ्यास केला. कामगारांना संघटीत करण्यास सुरुवात केली. त्यांच्या प्रयत्नांना यश सुध्दा येऊ लागले. कामगारांच्या प्रश्नावर त्यांनी सखोल अभ्यास करून संघटीत प्रयत्न करण्यासाठी माथाडी कामगार सघटना स्थापना केली. " महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट " आणि " जनरल कामगार युनियन (रजि.) " कष्टकरी कामगारांची मोठी संघटना उभी केली. त्यावेळी कामगार क्षेत्रात केवळ कम्युनिस्ट संघटना होत्या परंतू त्यांनी कम्युनिस्ट विचाराला मूठमाती देऊन, या मातीमधील सर्वकश विचार मांडून कामगार संघटना स्थापना केली होती. कामगार हितासाठी मोर्चे, आंदोलन सुरू झाले. सरकार दरबारी कामगारांच्या मागण्या सुध्दा मांडल्या जाऊ लागल्या. कामगारांना न्याय मिळवून देण्याच्या मागण्याचा सरकार दरबारी सकारात्मक विचार होऊ लागला होता. सोबतच आण्णासाहेब पाटील यांचे नेतृत्व उदयास येऊन ते कामगारांचे आराध्या दैवत ठरले आहे.



**कम्युनिस्ट नव्हे तर माती मधील विचार मान्य -**

अण्णासाहेब पाटील यांनी जेव्हा माथाडी कामगार संघटना उभी केली तेव्हा कामगारांच्या अनेक समस्या होत्या. श्रममुल्य,पुरेस वेतनाचा अभाव,आरोग्य सुविधा आणि हक्क अशा समस्या होत्या. कामगारांची प्रचंड शोषण व पिळवणूक होत होते. तसेच महाराष्ट्रात कम्युनिस्टाच्या लाल बावटा युनियनचा बोलबाला होता. परंतू अण्णासाहेब पाटील यांनी कम्युनिस्टाच्या लाल बावटा युनियन ची मदत न घेता प्रचंड मेहनत घेऊन या माती सोबत इमान राखणाऱ्या मराठी माणसांची कामगार संघटना उभी केली होत. त्यासाठी त्यांनी कामगारांच्या समस्या आणि हक्क याचा अभ्यास करून  कामगारांच्या

न्याय हक्का साठी लढा उभारला. माथाडी कामगार संघटनेची मुहूर्तमेढ रोवली. सरकार दरबारी माथाडी कामगारांच्या व्यथा मांडून त्यांच्या हक्का साठी जीवाचे रान केले. आण्णासाहेब पाटील यांचा जन रेटा इतका प्रभावी होता की तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या सरकारने त्यांच्या मागण्या पूर्ण करून माथाडी संघटनेला शासकीय दर्जा प्राप्त करून दिला होता. दि. ५ जुन १९६९ रोजी महाराष्ट्रामध्ये माथाडी कामगार कायदा अस्तित्वात आला. त्यामुळे माथाडी कामगारांच्या जीवनात आनंदाचे क्षण येऊ लागले. माथाडी कामगार कायदामुळे नवी मुंबई मध्ये माथाडी हॉस्पिटल, माथाडी ग्राहक सोसायटी,सिडको मार्फत घरे, उच्च शिक्षण, वैद्यकीय सेवा, पतपेढी अशा विविध सुविधामुळे कामगार व त्यांच्या परिवारांचे जीवनमान उंचावले गेले आहे माथाडी कामगारांच्या कल्याण मध्ये अण्णासाहेब पाटील यांचे योगदान महत्वाचे होते.

**मराठा आरक्षण मोर्चाचे जनक अण्णासाहेब -**

आज महाराष्ट्रात मराठा आरक्षण विषय मोठ्या प्रमाणात सुरू आहे. काही ठिकाणी मनोज जरांगे सारखे नेते आरक्षणाच्या नावा खाली अवास्तव मागण्या करून समाजात जातीभेद निर्माण करीत सामाजिक वीण विस्कळीत करण्याचा प्रयत्न सुध्दा करीत आहेत. परंतू मराठा आरक्षणाचे जनक स्व. अण्णासाहेब पाटील यांनी मराठा आरक्षणाची मागणी करतांना अवास्तव मागण्या किंवा सामाजिक वीण विस्कळीत होऊ दिली नव्हती. म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात आदरास प्राप्त आहेत. तसेच त्यांनी बहुतांश मराठा कामगार असलेल्या माथाडी कामगारांच्या कल्याणसाठी प्रचंड कष्ट घेतले होते. त्यांची प्रतिमा उभ्या महाराष्ट्रात  निर्माण झाली होती. तसेच त्यांनी बारा बलुतेदार व अठरा पगड जातींना एकत्र करून मराठ्यांचे संघटन उभे राहावे म्हणून त्यांनी अनेक संस्था संघटना,मंडळ यांना एकत्र आणल्या आणि अ.भा.मराठा महासंघाची स्थापना केली होती. अण्णासाहेब यांचे नेतृत्व लक्षात घेऊन तत्कालीन सरकारने त्यांना दि ८ जुलै १९८० रोजी विधान परिषदेचे सदस्य केले होते. त्यावेळेस मराठा समाजाला आर्थिक निकषावर आधारित आरक्षण मिळावे ही मागणी जोर धरू लागली तेव्हा त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा करू मराठा आरक्षण, आर्थिक निकषावर आरक्षण मिळावे म्हणून विधान सभेवर मोर्चा काढण्याचा निश्चय केला. कांग्रेस सरकार मध्ये आमदार असताना आण्णासाहेब पाटील व ॲड.शशिकांत पवार यांच्या नेतृत्वात आझाद मैदान येथून शिवरायांचा भगवा हातामध्ये घेऊन दि २२ मार्च १९८२ रोजी मोर्चा विधान सभेवर धडकला.

विराट मोर्चाचा जनसमुदाय मुंबईकरांचे लक्ष वेधून घेत होता. अण्णासाहेब पाटील यांनी तत्कालीन मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांना नऊ मागण्यांचे निवेदन सादर केले. आरक्षण मागणीचा विचार होणार नाही हे लक्षात येताच मराठा समाजाला न्याय न मिळाल्यास आपण उद्याचा सूर्योदय पाहणार नाही. असे ठणकावून सांगितले. आपल्या प्रतिज्ञे नुसार त्यांनी दि.२३ मार्च १९८२ रोजी जीवन यात्रा संपवून या जगाचा कायमचा निरोप घेतला होता.

**मराठा उत्कर्षाचे शिल्पकार -**

अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगारांच्या उत्कर्षसाठी प्रचंड मेहनत घेतली होती. त्यांच्या समस्या सरकार दरबारी मांडून कामगारांच्या जीवनात आनंदाचे क्षण निर्माण केले होते. तसेच मराठा समाजाला आर्थिक निकषावर आरक्षण मिळावे म्हणून त्यांच्या समस्यावर सरकार तथा सामान्य माणसाचे लक्ष वेधण्यासाठी पुढाकार घेतला, मोर्चा सुद्धा काढला होता. स्व.अण्णासाहेब पाटील यांच्या जीवन कार्याचा विचार केल्यास किंवा मागोवा घेतल्यास असे लक्षात येते की, त्यांचं संपूर्ण आयुष्य समाजासाठी संघर्ष करण्यात खर्ची झालेल असून खऱ्या अर्थाने ते मराठा आरक्षणाचे जनक होते. तथा मराठ्यांच्या उत्कर्षाचे शिल्पकार ठरतात स्व.अण्णासाहेब पाटील यांच्या पावन स्मृतीला विनम्र अभिवादन.

**- आ. निरंजन डावखरे, मुंबई.**

लेखक हे महाराष्ट्र विधान परिषद सदस्य आहेत.

*****

# रा. स्व. संघाच्या शतकोत्तर वाटचालीच्या निमित्ताने.

१९२५ साली विजयादशमीच्या दिवशी नागपुरात डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. अथक त्याग, कष्टावर उभ्या राहिलेल्या या स्वयंसेवी संघटनेला प्रचारकांची परंपरा लाभली. शताब्दी वर्षाच्या आरंभी संघकार्य आणि संघविचार पुढे नेणाऱ्या या कर्मयोगी मंडळींचे स्मरण...

आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सर्वव्यापी व सर्वस्पर्शी झाला आहे. राजकारण असो की समाजकारण- संघ हा चर्चेचा विषय ठरला आहे. इंग्रजांना दोष न देता 'आत्मविस्मृतीचा रोग हिंदू समाजाला झाला आहे. त्याचे निदान हिंदू संघटन' या निष्कर्षावर डॉ. हेडगेवार ठाम होते. आता संघ शताब्दीकडे वाटचाल करीत आहे. संघ कार्यपद्धती अभिनव आहे. संघ दैनंदिन संघ शाखांच्या माध्यमातून कार्यान्वित असतो. व्यायाम, गीत, बौद्धिक, चर्चा, प्रार्थना इत्यादींचा त्यात समावेश असतो. रोज चालणारे कार्य असा लौकिक असणारी स्वयंसेवी संघटना जगात क्वचितच असावी. संघ म्हणजे शाखा आणि शाखा म्हणजे कार्यक्रम. कार्यक्रमांतून संस्कारी कार्यकर्ता निर्मिती, असे हे सूत्र आहे. विद्यार्थी शिक्षण, कामगार, सहकार, जनजाती, धार्मिक अशा विविध क्षेत्रांत संघ प्रेरणेतून ३२ हून अधिक अखिल भारतीय संघटना आपापल्या क्षेत्रात अग्रेसर आहेत. 'भारत राष्ट्र परमं वैभवं' प्राप्त करण्याच्या उद्देशाने त्या कार्यरत आहेत. अनेक कार्यकर्त्यांचा अथक त्याग, कष्टावर त्या उभ्या झाल्या आहेत. तरी त्यांचा कणा प्रचारक हाच आहे. संघ प्रचारक हा घरदार सोडून केवळ संघ सांगेल तिथे व संघ म्हणेल त्या क्षेत्रात निर्लेप वृत्तीने कार्य करतो. तो अविवाहित असतो. जेव्हा संघकार्य विस्ताराची गरज भासली, तेव्हा समयदान देणारे कार्यकर्ते आवश्यक होते. डॉ. हेडगेवारांच्या चुंबकीय व्यक्तिमत्त्वामुळे अनेक तरुण संघकार्याकडे आकर्षित झाले. त्यांपैकी बाबासाहेब आपटे आणि दादाराव परमार्थ हे दोघे आद्य प्रचारक. अधिकृत प्रचारक पद्धती यांच्यापासून सुरू झाली. बाबासाहेब आपटेंचे वाचन दांडगे आणि चिंतन उत्तम होते. भारताची सांस्कृतिक परंपरा, इतिहास, थोर पुरुष अशा अनेक विषयांवर त्यांची पक्की पकड होती. त्यांनी हिंदू राष्ट्राच्या प्राचीन परंपरेशी संघाचे नाते परोपरीने स्पष्ट केले व स्वयंसेवकांत राष्ट्रासंबंधी गौरवाची भावना निर्माण होईल, अशा प्रकारे विषयांची मांडणी केली. ठिकठिकाणी अवघड क्षेत्रातही संघकार्याच्या पायाभरणीचे काम त्यांनी जिवापाड कष्ट घेऊन केले. ठिकठिकाणी गेलेल्या तरुण कार्यकर्त्यांना त्यांनी मोठा आधार दिला व त्यांचा मार्ग सुकर केला. इतिहास, संस्कृती, अमर हिंदू राष्ट्र, दशावतार आधारित राष्ट्रजीवनाच्या परंपरा, संजीवनी विद्या असे विपुल लेखन केले. इतिहास संकलन समितीचे, सरस्वती नदी शोध अभियानाचे कार्य त्यांच्या प्रेरणेने मोरोपंत पिंगळे यांनी प्रचारक असताना तडीस नेले. रामजन्मभूमी आंदोलन, गोरक्षण अशा अनेक विषयांचा सूत्रपात, रणनीती याच मोरोपंतांनी यशस्वी केली. पुढे त्यांचा कार्यभार अभियांत्रिकी शिक्षण प्राप्त केलेले, गर्भश्रीमंत असूनही पुढे आजीवन प्रचारक झालेले, राम मंदिर चळवळ हिंदू समाजाच्या अग्रस्थानी नेऊन ठेवणारे अशोक सिंघल यांनी सांभाळला.

**हेही वाचा – वेड्या दोस्तीतील शहाणीव.**

आद्य प्रचारकांपैकी 'अवधूत' अशी ख्याती असलेले दादाराव परमार्थ यांनी तमिळनाडू व आसाममध्ये संघकार्य पोहोचवले. लौकिक बंधनाच्या पलीकडे गेलेले असे हे व्यक्तिमत्त्व होते. अवधूताप्रमाणे सदैव कशाच्या तरी शोधात असलेले डोळे, हलणारी मान, विस्कटलेले केस असलेला चेहरा, धोतराच्या काठाला वारंवार चष्मा पुसण्याची त्यांची सवय, मधूनच नजरेला नजर देत ते शाखा चालवणाऱ्या कार्यवाहाला प्रश्न विचारत. एकदा त्यांनी कार्यवाहाला 'शाखेत उपस्थिती कमी का झाली?' असा प्रश्न केला तर उत्तर आले, 'पावसाळा' (रेनी सीजन). त्यावर ताबडतोब दादारावांनी केलेला 'उपस्थिती कमी होण्याचे रीझन सीझन होऊ शकत नाही' असा श्लेष आजही अनेकांच्या स्मरणात आहे. इंग्रजीवर प्रभुत्व असलेल्या दादारावांची गाडी भाषणात मराठी, हिंदीतून केव्हा इंग्रजीकडे वळे हे कळत नसे. ते देशाच्या फाळणीचे दिवस होते. एक काँग्रेसी नेता म्हणाला होता, 'विभाजन ही एक निश्चित वस्तुस्थिती आहे का?' याबाबत काही विद्यार्थ्यांनी दादारावांना

विचारले असता त्यावर ते 'विभाजन अमान्य केले तर नाही, मान्य केले तर आहे; तुम्हाला काय वाटते?', असे म्हणाले. अशी त्यांची निरुत्तर करणारी शैली होती. आज सर्वांनाच वारंवार प्रश्न पडतो, शेवटी संघ आहे तरी काय? एका शिबिरात हाच प्रश्न दादारावांना विचारला गेला. त्यावर त्यांनी पुढल्या क्षणी उत्तर दिले, 'संघ हा क्रमबद्ध उत्क्रांत होणाऱ्या हिंदू राष्ट्राचे जीवनध्येय होय.' आजपर्यंत ज्या पद्धतीने संघकार्य विकसित होते हे अनुभवल्यावर वरील वाक्य सार्थच ठरते.

सुरुवातीच्या काळात भैय्याजी दाणी १९२८ साली बनारसला गेले. पुढे ते 'प्रापंचिक प्रचारक' म्हणून प्रसिद्धीला आले. त्यांचे मोठे योगदान म्हणजे संघाचे द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजींना बनारसला असताना संघकार्यात आणणे हे होय. महात्मा गांधीजींपर्यंत पोहोच असलेले नि:स्वार्थ कार्यकर्ते म्हणजे वर्ध्याचे आप्पाजी जोशी. क्रांतिकारी, काँग्रेसमध्येही कार्य करून, तेथील अनेक संस्थांचे प्रमुख असलेले आप्पाजी शेवटी डॉ. हेडगेवार यांच्याशी एकरूप झाले. डॉक्टरांच्या आवडत्या शब्दात सांगायचे म्हणजे 'संघाचे 'भूत' त्याच्यावर स्वार झाले.' वरील दोघे प्रापंचिक होत, पण सुरुवातीच्या संघ विस्तारात त्यांचे भरीव योगदान होते. असे गृहस्थी (प्रापंचिक) प्रचारक आजही असतात पण अपवादात्मकच. १९३२ पासून प्रचारकांची नागपूरहून रवानगी संघकार्य विस्तारासाठी झाली. भाऊराव देवरस (लखनऊ), राजाभाऊ पातुरकर (लाहोर), वसंतराव ओक (लखनऊ), एकनाथजी रानडे (महाकौशल) ज्यांनी पुढे विवेकानंद केंद्र शिला स्मारक कन्याकुमारीला उभारले. माधवराव मुळे (कोकण, पंजाब). विभाजनाच्या वेळेस लाखो हिंदूंचे रक्षण, पुनर्वसनाचे महत्कार्य माधवरावांनी केले. ते उत्कृष्ट कवी, लेखक होते. याखेरीज जनार्दनपंत चिंचाळकर, नाथमामा काळे (तमिळनाडू). जनार्दनपंतांनी पुढे 'आदिम जाती सेवक संघा'चे प्रसिद्ध गांधीवादी ठक्करबाप्पांनी सुरू केलेले कार्य भारतभर पसरवले, नरहरी पारखी व बापूराव दिवाकर (बिहार), बाळासाहेब देवरस (बंगाल), यादवराव जोशी (कर्नाटक), अशी मालिका गुंफत गेली. पुढे चंद्रशेखर भिसीकर (कराची), बाबाजी देशपांडे (पंजाब), केशवराव गोरे (छत्तीसगड), मधुकरराव भागवत (गुजरात), दत्ताजी डिडोळकर (तमिळनाडू), बाबाजी कल्याणी (पंजाब), पांडुरंगपंत क्षीरसागर (बंगाल), मोरेश्वर मुंजे, (पंजाब), राजाभाऊ पातुरकर (पंजाब), बच्छराज व्यास (राजस्थान) अशी शेकडो प्रचारकांची फळी देशाच्या कानाकोपऱ्यात गेली. ही यादी मोठी आहे. १९५० पर्यंत नागपूर विदर्भातून ३२३ प्रचारक निघाले. १९३९ पर्यंत डॉक्टर हेडगेवारांच्या हयातीत नागपुरातील संघ शिक्षा वर्गात 'आज हिंदुराष्ट्राचे लघुस्वरूप पाहात आहे,' असे उद्गार त्यांनी काढले होेते. 'तेजोमय प्रतिबिंब तुम्हारा, स्वयंसिद्ध अगणित निकले' असेच डॉक्टरांबद्दल म्हणावे लागेल. साधेपणा, नम्रता, सोशीकता, शिक्षणात उत्तम प्रावीण्य प्राप्त केलेली, राष्ट्रोत्थानासाठी वेगवेगळे प्रयोग, प्रकल्प, संघटना उभी करणारी ही कर्मयोगी मंडळी होती. येशू ख्रिस्ताचे पहिले बारा शिष्य व परमहंस रामकृष्णांचे पहिले १६ शिष्य (त्यातील एक विवेकानंद), तसेच हे डॉक्टरांचे सहकारी होते. आज उपलब्ध होत असलेल्या साहित्यावरून त्यांच्या कामाचा आवाका लक्षात येतो. या सर्वांचे जीवन प्रेरणारूप आहे. कधी झाडाखाली तर कधी मंदिरात, कधी रस्त्याच्या कडेला झोपावे लागत होते. अनोळखी प्रदेश, माणसे, भाषा चालीरीती या प्रचारकांनी आत्मसात केल्या. मैलोन्मैल पायपीट केली. चणे-फुटाणे खात, पाणी पिऊन तर कधी उपाशी असे कष्टमय जीवन हिंदुराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी भोगले.

एके काळी प्रचारक राहिलेले सध्याचे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या 'ज्योती पुंज' पुस्तकाबद्दल म्हटले आहे, 'माझ्या या संस्कार यात्रेदरम्यान मला जगाच्या नजरेत अतिशय लहान, पण प्रत्यक्षात महान व्यक्तिमत्त्वांजवळ जाण्याची संधी मिळाली. त्यांचे प्रेम, त्यांचे सान्निध्य, माझ्यावरील संस्कार प्रेरणास्रोत ठरले.' खरे तर या नावांची यादी फार मोठी आहे. पण जागेची मर्यादा असल्याने काहींचे पुन:स्मरण करीत आहे. कोणतीही अपेक्षा न करता जीवन समर्पित करणाऱ्या उज्ज्वल परंपरेची फारच कमी लोकांना माहिती आहे. जीवनाचा प्रत्येक क्षण आणि शरीराचा प्रत्येक कण मातृभूमीच्या सेवेत अर्पण करणाऱ्या अशा समाज शिल्पकारांचे क्वचित स्मरण केले जाते. पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सुगंध आजही दरवळत आहे. कधी-कधी अशा प्रेरणास्रोताचे स्मरण ऊर्जास्रोत ठरतो. आणि म्हणून अंतर्मनाच्या

आनंदासाठी, सर्वांच्या सुखासाठी या समाज शिल्पकारांच्या जीवनातील सुगंधाला शब्दाच्या ओंजळीत साठवून अभिव्यक्त करण्याचा विनम्र प्रयत्न.

**हेही वाचा – मनोहर मालिका आणि...**

संघ शाखांद्वारे हिंदू संघटनेचे मूलभूत कार्य, मनुष्य निर्माणाचे कार्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने पहिल्या टप्प्यात केले. तर दुसऱ्या टप्प्यात रचनात्मक कार्य, जसे सेवाभारती, वनवासी कल्याण आश्रम, दीनदयाल शोध संस्थान, सहकार भारती याद्वारे शाळा, दवाखाने, विविध छोटे-मोठे समाजाच्या आवश्यकतेनुसार प्रकल्प उभे केले. तर राष्ट्र जागरणासाठी गंगायात्रा, एकात्मता मार्ग, राम मंदिर (अयोध्या) अभियान, काश्मीर बचाव, पूर्वोत्तर पंजाब, मीनाक्षीपूरम येथील धर्मांतरण घटनेत एकात्म हिंदू समाज ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न केला. चीन-भारत युद्ध असो, संघशक्ती एका सुरक्षा कवचाप्रमाणे धावून जाते हा सार्वत्रिक अनुभव आहे. संघाचा विरोध करणारे असू शकतात, पण संघ 'सर्वेषां अविरोधेन' भावनेने कार्य करतो. म्हणूनच बामसेफचे कार्यकर्तेदेखील त्यांच्या कार्यकर्त्यांना संबोधताना 'संघ प्रचारकासारखी ध्येयनिष्ठा असावी' हेच सांगतात. एखाद्या दुर्गम जंगलात चालणारे वसतिगृह असो किंवा ग्रामीण उद्योग केंद्र असो, त्यांच्यासाठी समर्पण भावनेने एखादा बिनचेहऱ्याचा प्रचारक कार्यरत असतो.

संघासारखी शिस्त, देशभक्तीपूर्ण समाज निर्माण व्हावा, संघ व समाज या अर्थाने एक व्हावा हीच संघाची इच्छा आहे. यासाठी आधीही या देशात अनेक साधू-संन्यासी झाले. गाडगेबाबांसारखे विरागी झाले. प्रचारक हे संघाने समाजाला दिलेले देणे आहे, असे प्रचारक राहिलेले शिवराय तेलंग म्हणतात. अरुणाचलात प्रचारक असताना रामकृष्ण मिशनचे स्वामी विश्वात्मानंद म्हणाले होते की, 'संघ प्रचारक पद्धती उत्तम आहे. सामान्य मनुष्य यातील काही वर्षे अथवा जीवन संघकार्याच्या माध्यमातून देऊ शकतो. एक स्वर्णिम आयुष्य अनुभवू शकतो, पण आमच्यासारख्या संन्याशांना मात्र वेशभूषा, नियमांमुळे लोकांमध्ये प्रचारकांप्रमाणे मिसळता येत नाही. स्वयंसेवक हे संघाचे समाजाला देणे आहे.' तर प्रभुदत्त ब्रह्मचारी यांनी म्हटले आहे की, 'रूढार्थाने प्रचारक संन्यासी नसतो, पण संन्याशापेक्षा कमीही नसतो.'

आज सर्वत्र प्रचारकांसाठी कार्यालये आहेत. अनुकूलता आहे. राजकीय क्षेत्रात सहविचारक प्रभावी होत आहेत. अशावेळी प्रचारकांनी अहंकारशून्य पद, अभिनिवेशमुक्त राहणे त्याची कसोटी आहे. आजही संघात आयआयटीमधील उच्चविद्याविभूषित प्रचारक मोठ्या संख्येत आहेत. विद्यमान सरसंघचालक मोहनजी भागवत म्हणतात, ''आजच्या पिढीसकट आणखी दोन पिढ्या संघाला असेच जोमाने कार्य करावे लागेल. राष्ट्राला सामर्थ्यवान विकसित भारतासाठी झिजावे लागेल. त्यासाठी दीपस्तंभासारखी प्रचारकाची भूमिका महत्त्वाची राहील.''

संघ आज शाखा पातळीवर पर्यावरण, समरसता, कुटुंब प्रबोधनाचे परिस्थितीनुसार व्यापक कार्य करीत आहे. शेवटी समाजासमोरील आदर्श असेल तर तो सरसावतो. त्याची अट एकच आहे- 'संघ किरण घर घर देने को, अगणित नंदादीप जले, मौन तपस्वी साधक बनकर हिमगिरि से चुपचाप गले.'

**- सुनील किटकरू,** नागपूर.

लेखक हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी प्रचारक (अरुणाचल प्रदेश) आहेत.

*****

# ‘आर्थिक साक्षरता’ प्रत्येकासाठी महत्वाची आहे.

दिवाळी ते मे महिना कसली नि कसली शिबिरे चालू असतात. व्यक्तिमत्व विकास शिबीर, क्रिकेट शिबीर, टेनिस शिबीर, तबला, पेटी, नृत्य, गायन ह्याचा रतीब चालूच असतो. म्हणजे पर्यायाने खेळ, गायन, पाककृती कलादालन (मीपवारही अर्थ दालन असावे असे वाटते.) वगैरे बरेच काही विषय पैसे देऊन हाताळले जातात. बरे पालक पण किती चोखंदळ असतात देव जाणे, कारण शेजारचा जातो म्हणून माझा जातो इथपासून ते "आहो तेवढाच आम्हाला मोकळा वेळ मिळतो !" पर्यंतची मुक्ताफळे मी पालकांकडून ऐकत आलो आहे. म्हणजे कुठलीही कला येणे, खेळ येणे वाईट नाही पण आयुष्यात अनेक महत्वाचे जे संस्कार आहेत, त्यातही आर्थिक साक्षरता हि मुलांना माहीतच नसते ह्याचे अतीव दुख होते.

६३ वर्षाचे माझे एक क्लायंट मला सांगतात "अरे मुलाला वेळच नाही त्याची सगळी गुंतवणूक / करविषयक बाबींकडे मला आणि त्याची मुले माझ्या हिला सांभाळावी लागतात." (आजी आजोबांचे प्रेम वगैरे ठीक आहे रे पण आम्ही मोकळे होणार कधी ?) आणि कहर असा कि सुनेची गुंतवणूक विषयक आणि करविषयक व्यवस्था तिचे वडील पाहतात जे माझेच क्लायंट आहेत. हे पाहून खूप त्रास होतो. बरे दोन्ही कुटुंबे सु-शिक्षित आहेत. आर्थिक दृष्ट्या सक्षम आहेत. पण तरीही खूपशा गोष्टी जेव्हा माझ्याबरोबर शेअर होतात, तेव्हा वेदना होतात, कारण दोष कुणाचा हे कळते पण सांगणे कठीण जाते.

माझे आईवडील फारसे शिकलेले नव्हते. त्यांनी उरापोटावर मेहनत करून आणि आपल्या आवडीनिवडी बाजूला सारून (हे कर्म कठीण असते असा माझा वैयक्तिक अनुभव आहे) आम्हाला शिकवले, कारण त्यांना शिक्षणाचे महत्व कळले होते. आजच्या पिढीकडे शिक्षण आणि पैसा दोन्ही आहे मग त्यांनी मुलांना काय आणि कोणत्या वयात दिले पाहिजे (वयावरून आठवले लैंगिक शिक्षणाचादेखील उहापोह चालूच असतो सर्व माध्यमातून ! ) असा प्रश्न तुम्हालाही पडतो का ?

आर्थिक साक्षरता हा एक महत्वाचा भाग आहे आणि तो संस्कारक्षम वयातच शिकवला पाहिजे. तसं पाहिलं तर शैक्षणीक जीवनातच या ज्ञानाचा अंतर्भाव असावा. पण आपल्या शिक्षण व्यवस्थेत पीटी, नागरीकशास्त्र वगैरे विषयांना जो सन्मान मिळतो ते बघुन अर्थसाक्षरता घरातुनच सुरु झाली तर बरं असं वाटतं. जसे दसऱ्याला पाटीवर सरस्वतीपूजन आपण करतो तसेच लक्ष्मीपूजनाचे महत्त्व आपण मुलांना शिकवायला हवे. चेक बुक, पे in स्लीप, घराचे बजेट, शाळेसाठी, वाढदिवसासाठी केलेला खर्चाचे टिपण मुलांनि ठेवायला सुरुवात केलीतर त्यात हळूहळू त्यांना गोडी निर्माण होते असे मी पहिले आहे. बँकिंग चालते कसे? पैसे येतात कसे? नोकरीच केलीतर पैसे येतात कि आणखीहि काही मार्ग आहेत. त्यातले वैध आणि अवैध कोणते ते कसे ओळखायचे त्याबाबतीत काय कायदे आहेत. तुम्ही कंपनीत जॉब करता त्याचा ओनर कुठे नोकरी करतो ? एक ना हजार भरपूर प्रश्न लहान मुले विचारतात आणि आपल्याला आपली पातळी दाखवून देतात. बाबा तुम्ही बिल गेट का नाही? तुम्ही हि सोफ्टवेरच बनवता ना?

मुलांनी कुठले प्रश्न विचारावेत हे आपण च्येनालैझ करू शकतो जर टी.वी आणि अवांतर मधून आपण बाहेर पडलो आणि मुलांकडे, त्यांचे फोकस तयार करण्याकडे लक्क्ष देऊ लागलो तर.

सर्व इतर क्षेत्रांप्रमाणे अर्थक्षेत्र हे हि एक उपयुक्त क्षेत्र आहे. त्यातहि क्रिएटिव्ह, happening असे भरपूर काही आहे. पण दुर्दैवाने दुर्लक्षित आहे. वयाच्या तिशीला माझा मुलगा आणि परक्याकडे जाणारी माझी मुलगी आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आणि साक्षर व्हावेत हे एकच ध्येय असावे कि , दुसरा काही ऑप्शन आहे ?

हे सर्व लिहिण्यामागचे कारण एवढेच कि जे माझ्या आजूबाजूला आहे तेच तुमच्या आजूबाजूला आहे का?

**- शिशिर पेठकर, पुणे.**

लेखक हे अर्थ व शेअर गुंतवणूक या विषयाचे तज्ञ आहेत.

*****

# भारतीय लष्कर बलशाली होत आहे.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताने १९४७, ६२, ६५, ७१ आणि ९९ मधे एकूण पांच सर्वकष युद्ध केली. या दरम्यान आपल्या सैन्याने गंभीर चकमकी केल्या आहेत. स्वातंत्र्य मिळाले त्या वेळी  जेमतेम पाचलाख संख्या असलेल भारतीय लष्कर २०२४ मधे साडेचौदा लाखांवर गेल्याची माहिती आहे. वर उल्लेखलेल्या युद्ध/ चकमकींमधे, भारताला केवळ एकच युद्धात पराभवाचा सामना करावा लागला. या व्यतिरिक्त १९५३ मधे कोरियात पाठवलेल्या शांती सेनेपासून २०२४ पर्यंत भारताने ५२ देशांमधे शांतीसेना पाठवून संयुक्त राष्ट्रसंघाची मदत केली आहे. २०१४ पर्यंत भारतीय लष्कर बलशाली होतं पण त्यानंतर ते सर्वार्थाने बलशाली बनत आहे. आपण जागतिक पातळीवर लष्कराच्या बाबतीत जागतिक चौथ्या क्रमकावर आहोत. मोदी सरकारने लष्कराच्या आधुनिकीकरण्यासाठी मोठी पाऊलं उचलली आहेत.

लष्कर म्हणजे स्थलसेना,नौसेना आणि वायुसेना. संरक्षण सज्जता म्हणजे देशाची स्वतःचा बचाव करण्याची किंवा युद्ध लढण्याची क्षमता आणि त्याला प्रत्यक्षात उतरवण्यासाठी जी कार्यक्षमता व कार्यकुशलता लागते ती म्हणजे लष्करी तयारी होय. लष्करी तयारीच उद्दिष्ट हे सुनिश्चित करत की,  लष्कर  कोणत्याही वेळी दिलेल कार्य पूर्ण करण्यासाठी आणि देशासमोरील सामरिक आव्हानांना तोंड देण्यासाठी सुसज्ज, प्रशिक्षित आणि संघटित असून युद्धासाठी आणि दिलेल्या जबाबदारीसाठी तयार आहे.

**संरक्षण खर्चाची तरतूद  -**

केंद्र सरकारच्या एकूण खर्चाच्या टक्केवारीच्या रूपात संरक्षण खर्च भारतात, १९६२ सोडता, नेहमीच सकल घरेलू उत्पादनाच्या (जीडीपी) दोन टक्क्यांपेक्षाही कमीच असतो. नरेंद्र मोदी सत्तेत आले त्या वर्षी २०१४-१५ मधे तो ०१ पूर्णांक ३ टक्के आणि सन २०२४-२५ मधे १ पूर्णांक ६९ टक्के आहे. सध्याच्या भौगोलिक राजकीय परिस्थितीत भारताला संरक्षण सज्जतेबाबत ही आत्म संतुष्टता परवडणारी नाही. सांप्रत स्थितीतील गरजा आणि भविष्यातील विस्तार आणि आधुनिकीकरणाच्या योजना या दोन्हीं प्राप्त करण्यासाठी, यापुढे दरवर्षी संरक्षण सज्जतेसाठी जीडीपीच्या किमान सहा टक्के आर्थिक अनुदान मिळायला हवे.

**संरक्षण आत्मनिर्भरता -**

जगातील देशांपैकी सर्वात जास्त संरक्षण संसाधन आणि सेवा निर्यात करणारा भारत देश आहे. या आधी एकूण संरक्षण उत्पादनापैकी ४० टक्के उत्पादन स्वदेश निर्मित आणि ६० टक्के आयात केल जात असे. लष्करी संसाधनांसाठी, परदेशी पुरवठादारांवर अवलंबून राहिल्यामुळे संरक्षण उपकरणांच्या आयातीवर मोठा खर्च होत असे. संरक्षण क्षेत्रातील स्वदेशीकरण (देशांतर्गत उत्पादन) पातळी अतिशय संथ होती. आजमितीला संरक्षण उत्पादन धोरणाच्या उद्दिष्टानुसार सन २०२५ पर्यंत भारत १३ संरक्षण उत्पादन क्षेत्रांत स्वावलंबी बनवून जगातील पहिल्या पाच संरक्षण उत्पादकांपैकी एक बनला पाहिजे. त्या करता  मसुदा धोरणात नमूद केलेल्या आत्मनिर्भरतेची पातळी गाठण्यासाठी प्रभावी देखरेखीसह रोड मॅप तयार केल्या गेला आहे. संरक्षण संसाधन आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि संरक्षण प्लॅटफॉर्म आणि हार्डवेअरमध्ये स्थानिक सामग्रीचा वापर वृद्धिंगत करण्यासाठी सरकारने तात्काळ पुढाकार घेतलेला दिसून पडतो.

ऑर्डनन्स फॅक्टरी बोर्ड:२०१८ पर्यंत देशातील ४१ ऑर्डनन्स फॅक्टऱ्या; कॅलिबर शस्त्रे, बॉम्ब, व्हिजन इक्विपमेंट इत्यादी लष्करी संसाधनांची निर्मिती करत असत. तेंव्हा या फॅक्टऱ्या, ऑर्डनन्स फॅक्टरी बोर्ड अंतर्गत कार्यरत होत्या. त्यांना आता पाच पब्लिक अंडरटेकिंग युनिटकडे हस्तांतरित करण्यात आल आहे.

भविष्यात भारताला पाकिस्तान आणि चीनसोबत दोन आघाड्यांवर युद्ध कराव लागेल असे वारंवार घडणार्य घतांनावरून आपल्याला लक्षात येईल. सर्व क्षेत्रांमधील संसाधन वृद्धीद्वारे भारतीय सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेला

आव्हान निर्माण झालं आहे. हे आव्हान पेलण्यासाठी भारताला, लष्करातील लढाऊ घटकांच्या आधुनिकीकरणाबरोबरच संघटनात्मक संरचना, युद्ध पद्धती आणि या आव्हानांवर एकत्रितपणे मात करण्याच्या मार्गांकडे लक्ष द्यावे लागेल.

सक्षम व बलाढ्य संरक्षण यंत्रणा - भारत युद्धाचे सर्वसमावेशक पैलू बदलतो आहे. 4 पश्चिम सीमा आणि ७५०० किलोमीटरच्या सागरी सीमेच्या रक्षणार्थ लक्ष केंद्रित करण आवश्यक होत. त्यासाठी थिएटर कमांड संकल्पना अमलांत आणल्या जाते आहे. या आधी लष्कर स्थलसेना, नौसेना आणि वायुसेनेतील परस्पर सहकार्यानी युद्ध लढत असे. ही पद्धत अंगीकारून आपण पांचपैकी चार युद्धांमधे विजयी झालो होतो तरी त्यात लष्कर, लढाऊ दलांच्या इष्टतम क्षमतेचा वापर झाला नाही, असे वरिष्ठ लष्करी अधिकारी आणि संरक्षणतज्ञांच मत होत. यांना भारतानी युद्ध लढण्यासाठी एक आधुनिक सामरिक मॉडेल अंगिकारण अपेक्षित होत ज्याअंतर्गत स्थलसेना, नौसेना आणि वायुसेनेचे सर्व घटक एकाच कमांडरच्या हाताखाली एकत्रपणे (सिंगल थिएटर अंडर वन कमांडर) लढू शकतील. त्यांच्यानुसार चीन आणि पाकिस्तानशी एकत्र लढा देण्यासाठी (टू फ्रंट वॉर) थिएटरायझेशन ही काळाची गरज आहे. त्यामुळे सरकार उत्तर व पश्चिम सीमेसाठी दोन भूमी थिएटर्स,सागरी रक्षणासाठी एक थिएटर,आण्विक शस्त्रास्त्र, सायबर वॉर, हवाई,अंतराळ संरक्षण आणि स्पेशल ऑपरेशन्सकरता प्रत्येकी एक कमांड स्ट्रक्चर तयार करण्याच्या मार्गावर आहे.

सायबर वॉरफेअर - या मधे राष्ट्र/राज्य किंवा आंतरराष्ट्रीय संस्थेद्वारे संगणकीय आक्रमण करून शत्रू देशाच्या संगणक किंवा माहिती नेटवर्कच नुकसान करण्याचा प्रयत्न समाविष्ट आहे, उदाहरणार्थ, संगणक व्हायरस किंवा संगणक सेवा नाकारणे. आजमितीला भारत; सायबर युद्धाच अत्याधुनिक युद्ध तंत्राद्वारे, शत्रूंना अप्रत्यक्षपणे/ युद्धभूमीवर न जाता नष्ट करण्याच्या प्रक्रियेचा सराव/अवलंबन करतो आहे.

भारताची सागरी क्षमता - चीन आपल्या युद्धनौकांची संख्या वाढवतोच आहे. त्याच्याकडे सध्या ७८० युद्धनौका,चार विमानवाहू जहाज आणि ४१ पाणबुड्या आहेत. २०४० पर्यंत ही संख्या अनुक्रमे ९००, सहा आणि ७५ होईल असे तज्ञ सांगतात. चीनकडे भक्कम नौसेना संसाधन,उपकरण असली तरी ती, तैवान, हाँगकाँग आणि दक्षिण चीन/हिंद महासागरासह अनेक देशांमधे विखुरली आहेत. क्वाड सागरी संरक्षण करारातील सहभाग आणि इतर देशांसोबतचे चांगले संबंध यामुळे चीन, अनेक आघाड्यांवर आपली संसाधन विभाजित करण्यास बाध्य होईल. यावर मात करण्यासाठी, भारताला वेग आणि क्षमता या दोन्ही बाबतीत पाणबुड्या, विमानवाहू जहाज इत्यादींच मोठ उत्पादन करून, नौसेनेच्या मदतीला जमिनीवर आधारित संसाधनांचा वापर करावा लागेल. इतर देशांवर अवलंबून न राहता भारताला परंपरागत बचावात्मक पद्धतीतून अपारंपरिक आक्षेपार्ह पद्धत अंगिकारून चीनच्या जमीनी आणि सागरी आव्हानांना तोंड देता येईल.

लष्करी तयारी - अलीकडच्या काळात भारतीय लष्कर आपली तयारी वृद्धिंगत करत आहे. २०२३ हे “लष्करी परिवर्तन वर्ष” होतं ज्यामधे, कार्यात्मक प्रक्रियांना पुनर्राकार देऊन पुनर्रचना करण्यासाठी अनेक प्रकल्प सुरु करण्यात आलेत. यामुळे संरक्षण क्षमतेमधे “क्वांटम जंप" मिळाली आहे. सन २०२० मध्ये पूर्व लडाखमधे भारत-चीन संघर्ष सुरू झाल्यापासून , लष्करानी भारतीय स्टार्टअप्स सोबत टेहळणी आणि भार वाहून नेण्यासाठी छोट्या ड्रोन उत्पादनांचा करार केला असून निर्मिती व पुरवठाही सुरु झाला आहे. लॉजिस्टिक आणि नॅनो ड्रोन, काउंटर-ड्रोन्स, लोइटर युद्धसामग्री, स्वार्म ड्रोन सारख विशिष्ट तंत्रज्ञान,अचूक-मार्गदर्शित क्षेपणास्त्र आणि स्वयंचलित स्पेक्ट्रम मॉनिटरिंग सिस्टम सारख्या जटिल प्रणालींना स्वदेश निर्मिती क्षेत्रात चालना मिळाली आहे. “आत्मनिर्भर भारत” या विशाल दृष्टीकोनाशी संरेखित करून लष्कर, विविध प्रकार/ पद्धतींद्वारे स्वदेशीकरणासह आधुनिकीकरण साध्य करत आहे, याच्याच जोडीला; 'मेक' प्रकल्प , संरक्षण उत्कृष्टतेसाठी नवकल्पना (iDEX), आणि आर्मी सेलची स्थापना यासारखे दूरगामी कार्यक्रमनाच्या संशोधन विकासाला (रिसर्च अँड डेव्हलपमेंट) प्रोत्साहन देणाऱ्या संस्था सैन्याच्या गरजा पूर्ण करतात.

लष्करी सज्जता - लष्करी सज्जतेसाठी संरक्षण उपकरणांच्या देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्यासाठी भारताने छगले उपक्रम सुरु केले आहेत. संरक्षण औद्योगिक कॉरिडॉर, ऑर्डनन्स फॅक्टरी, बोर्डांचे कॉर्पोरेटायझेशन, डिफेन्स इंडिया, स्टार्टअप चॅलेंज, नवीन संरक्षण उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहन धोरण सन २०२०, मिशन रक्षा ज्ञान शक्ती, भारतीय नौदल स्वदेशीकरण योजना (INIP) २०१५-२०३० आणि नेव्हल इनोव्हेशन अँड इंडिजनायझेशन ऑर्गनायझेशन. यामुळे लष्करी सज्जतेला चालना मिळत आहे.

संरक्षण धोरण - राष्ट्र रक्षण हा राष्ट्रीय शक्तीचा प्रमुख घटक आणि संरक्षण धोरण हा राष्ट्रीय सुरक्षा धोरणांच अविभाज्य अंग आहे. कोणत्याही बाह्य किंवा अंतर्गत धोक्यांविरुद्ध प्रतिकार,युद्ध पुकारून, स्वअस्तित्व आणि राजकीय स्वातंत्र्याच्या मूलभूत मूल्यांच जतन करण ही लष्कराची भूमिका आहे. लष्कर त्याचा धर्म निरपेक्ष पाळत असतो. मागील काही वर्षांत भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा व्यवस्थेत संरक्षण व्यवस्थापनाला अधिक महत्त्व प्राप्त झाल आहे. भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा धोरणांमध्ये संरक्षणाचे महत्त्व प्रामुख्याने सतत आणि वाढणाऱ्या बाह्य धोक्यांमुळे उजागर होत आहे. कारगिल पुनरावलोकन समिती अहवाल आणि राष्ट्रीय सुरक्षेवरील मंत्री गटाच्या अहवालात, राष्ट्रीय सुरक्षा व्यवस्थेतील बदल आणि उत्तम संरक्षण आणि धोरणात्मक व्यवस्थापनावर भर देण्यात आला आहे. दोन्ही अहवाल, बदलत्या सुरक्षा वातावरणाची गंभीर दखल घेतात. या अहवालांनुसार गेल्या दशकात, दोन्ही सीमांवरील शीतयुद्ध, काश्मिरमधील छद्म युद्ध (प्रॉक्सी वॉर), जिहादी दहशतवाद इत्यादि मध्ये भारताच्या सुरक्षेच्या परिस्थितीत आमूलाग्र बदल झाला आहे.देशाच्या अनेक भागांमधे परदेशीय विघटनकारी चालना, दंगेधोपे, क्रांतीची गुहार आणि शेजारी देशांच अणुकरण यामुळे, राष्ट्रीय सुरक्षा धोरणातील बाह्य धोक्यांच महत्त्व आणि संरक्षण धोरणाच्या विश्वासार्ह स्वरूपाची आवश्यकता अधोरेखित होते. भारताकडे काळाच्या कसोटीवर उतरणार आणि भविष्यातील गरज प्रति करणार, संपूर्ण सुव्यवस्थित संरक्षण धोरण आहे.

संरक्षण क्षेत्र स्वदेशीकरण - संरक्षण क्षेत्रातील तांत्रिक प्रगतीसाठी “ मेक इन इंडिया ”; संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेसाठी आत्मनिर्भर भारत अभियान आणि पृथ्वी (भूपृष्ठापासून पृष्ठभागावर मारा करण्यासाठी पृथ्वी क्षेपणास्त्र, आकाश हवेतून जमीनीवर मारा करण्यासाठी आकाश क्षेत्नास्त्र, हवा-ते-पृष्ठभाग) त्रिशूल नौसेनेसाठी, पृथ्वी समतुल्य त्रिशूल, रणगाडा विरोधी नाग क्षेपणास्त्र आणि अग्नी १,२,३,४,५ श्रेणींची बॅलिस्टिक क्षेपणास्त्र या पाच क्षेपणास्त्र प्रणाली तयार करण्यासाठी एकात्मिक मार्गदर्शित क्षेपणास्त्र विकास कार्यक्रम सुरु आहेत. संरक्षण क्षेत्राच्या स्वदेशीकरणासाठी नवीन लष्करी संसाधन खरेदी धोरण राबवल्या जात आहे. अत्यन्त जरुरीच्या शस्त्रास्त्र खरेदीसाठी "फास्ट-ट्रॅक" संपादन प्रक्रिया सुरु आहे.

संरक्षण स्वदेशीकरणातील आव्हान - संरक्षण उत्पादनात गुंतलेल्या संस्थांकडे वैज्ञानिक आणि तांत्रिक कौशल्य किंवा प्रशिक्षित कर्मचारी यासारख्या आवश्यक कौशल्याची कमतरता असल्यास स्वदेशीकरणाच्या धोरणांची अंमलबजावणी करण आव्हानात्मक असेल.संरक्षण उद्योगाच्या प्रभावी स्वदेशीकरणासाठी,योग्य संसाधन वाटप आणि योजना निश्चितीसाठी व्यापक नियोजन आवश्यक आहे. प्रभावी नियोजनाच्या अभावामुळे अकार्यक्षमता, विलंब आणि अपेक्षित परिणाम साध्य करण्यात अपयश येऊ शकत. संरक्षण स्वदेशीकरणात;योग्य पायाभूत सुविधा, वाहतुकीचे पर्याय,अविश्वासार्ह पुरवठा साखळी यामुळे,संरक्षण उपकरणांच वक्तशीर उत्पादन आणि वितरण अडथळा येऊ शकतो.पण भारतीय लष्कर यावर निश्चितच मात करेल.

जागतिक फायरपॉवर रँकिंग या संघटनेच्या, २०२४ साठी जाहीर झालेल्या ग्लोबल फायरपॉवर इंडेक्समधील यादीनुसार, भारतानी जागतिक स्तरावर चौथ्या क्रमांकाच मजबूत व बलवान लष्कर म्हणून आपल स्थान कायम राखल असून ते भविष्यातील सर्व सुरक्षा आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार आहे. पूर्व लडाखमधे चीनसोबत सुरू असलेल्या

सीमावादात लष्कर अनन्य ऑपरेशनल आव्हानांना तोंड देत आहे.अशा धोक्यांसाठी तयार राहण्यासाठी मोदी सरकार लष्कराला, अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी सुसज्ज करण्याच्या मार्गावर आहे. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता वाढवण्यासाठी स्वदेशी बनावटीच्या लष्करी हार्डवेअरला लष्करात सामील केल्या जात आहे कारण भू राजकीय परिदृश्य वेगानी बदलत आहे आणि तंत्रज्ञान अतिशय वेगानी विकसित होत आहे.त्या अनुषंगानी, लष्करही परिवर्तनाच्या मार्गावर असून संरक्षणात आत्मनिर्भर होत आहे. स्वदेशी युद्ध संसाधन आणि उपकरणांद्वारे लष्कर, संघर्षाच्या पूर्ण स्पेक्ट्रममधे युद्धासाठी सज्ज आहे ही खात्री आहे.

**- कर्नल अभय बाळकृष्ण पटवर्धन (निवृत्त),** नागपूर.

लेखक निवृत्त कर्नल असून, सुरक्षा विषयाचे तज्ञ आहेत.
ऑपरेशन मिशन कारगिल सारख्या अनेक मिशन मध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिलेला आहे.
तसेच सुरक्षा विषयक अनेक पुस्तकांचे लेखन केले आहे.

*****



# दिवाळीचा फराळ आणि पोषक तत्व.

दिवाळी हा भारतीयासाठी खुप मोठा सण आहे. दिवाळी म्हणजे सगळीकडे दिवे, रांगोळी, सजावट त्यासोबतच नवीन खरेदी होत असते संस्कृतिक, धार्मिक, पारंपारिक दृष्ट्या दिवाळी हे प्रत्येकासाठी खुप आनंददायी पर्व आहे. आपण पाहतोच सगळीकडे कीती छान चैतन्यमय वातावरण असत.

दिवाळी म्हणजे खाण्यापिण्याची मज्जा , दिवाळी मधे वसुबारस, धनतेरस, नरक चर्तूदशी, लक्ष्मीपुजन, पाडवा, भाऊभीज हे पाच महत्वाचे दिवस आणि तीतकाच महत्वाचा सर्वांना आवडणारा हा दिवाळीचा फराळ .

दिवाळीचा पहिला दिवस म्हणजे वसु बारस यादिवशी बाजरीच्या भाकरीचा नैवद्य सर्वप्रथम गौमातेला अपर्ण करतात या दिवशी वरण, भात, भाजी सोबतच बाजरीच्या भाकरीला विशेष महत्व आहे. बाजरीमध्ये प्रोटीन, कैल्शीयम, आयरन, फायबर, व्हिटॅमीन-ए आणि फॉस्फोरस भरपुर प्रमाणात असत, त्यामुळे बाजरीची भाकरी पौष्टीक मामली जाते.

नरक चर्तूदशीला बऱ्याच घरी मिश्र डाळीचे किंवा उडीदाचे वडे करायची पद्धत असते सगळ्यात डाळीमध्ये प्रोटीन भरपुर प्रमाणात असतात उडीदाच्या डाळीत प्रोटीन्स सोबत कॅल्शीयम, फॉस्फोरस, आयरन, कॅरोटीन, थायमीन, नियासीन देखील मुबलक प्रमाणात असत. धनतेरस, लक्ष्मीपुजन, पाडवाच्या जेवणाची मजा तर काही औरच, पण भाऊबीजेला मात्र कढी खीचडी असतेच कारण 2 ते 3 दिवस रोज खुप हेवी जेवण झाल्यामुळे कढी आणि खीचडी पचायला हलके असतात . कढी खीचडी करण्यामागे अजुन एक पौराणिक कारण आहे पण ते नंतर कधी बघू.

दिवाळी मधे सर्वात महत्वाचे म्हणजे दिवाळीचा फराळ ज्यामध्ये विविध प्रकारचे खारे, गोड, तीखट असे पदार्थ बनवले जातात. आजकाल बाजारात सगळे पदार्थ तयार मिळतात पण त्या पदार्थामधे पोषण मुल्यांचा अभाव असतो. बाजारातून आणलेले तळलेले पदार्थ खुपच निम्न दर्जाच्या तेलामध्ये तळलेले असण्याची शक्यता असते. एकदा तळणासाठी वापरलेले तेलात वारंवार तळणामुळे त्यात ट्रान्सफॅट निर्माण होतात ज्यामुळे हृदय रोग व लीव्हरचे आजार होतात. नव्वद टक्क पदार्थ हे रिफाईन्ड मैदयापासुन बनलेले असतात. प्रत्येक रिफाईन्ड पदार्थ हा शरीरासाठी हानिकारकच असतो. त्यामुळे बाहेरचे डझनभर पदार्थ विकत आणण्यापेक्षा घरी कमी पण पौष्टीक व पोषण मुल्य युक्त पदार्थ करावे. दिवाळीतील सर्वाचा आवडता पदार्थ म्हणजे चकली, भाजणीच्या चकलीमध्ये तांदुळ, चनादाळ, मुगदाळ, उडीददाळ धूवून भाजले जातात, ज्यामुळे चकलीच्या पोषणमुल्यात वाढ होते व चकली पचायला हलकी होते, चकलीमध्ये प्रोटीन सोबत कॅल्शीयम, आयरन, व्हिटमीन-ए व रिबोफलेवीन, थायमीन व नियासीन अशी पोषण मुल्ये असतात, त्यामुळे घरी फिल्टड तेलात तळलेली चकली कधीही चांगली .

दुसरा आवडीया पदार्थ म्हणजे शंकरपाळे, आजच्या पीढी ने जर त्यांच्या आजी किंवा पणजीला विचारले तर त्या तुम्हाला नक्की हेच सांगतील की आमच्या लहानपणी शंकरपाळे हे कणीक व गुळापासुन तयार केले जायचे व ते साजुक तूपात तळले जायचे. ऐकुन आश्चर्य वाटेल, पण हेच शंकरपाळे अतीशय पौष्टीक आणि हिमोग्लोबीन वाढवणारे आहे. मैदा आणि साखरेच्या शंकरपाळ्या ऐवजी कणीक व गुळापासुन तयार केलेले शंकरपाळेच बनवावे. पारंपरिक पद्धतीने तयार केलेले अनारसे देखील खुप पोषकतत्व युक्त असतात. मुख्यतः जेव्हा अनारस्याचे पीठ फरमेंट होतं त्या मुळे त्यात व्हिटॅमीन B12 व आतंड्यामध्ये गुड बॅक्टेरिया तयार होतात .

त्याचप्रमाणे करंजी शिवाय दिवाळीचा फराळ अपूर्ण आहे. करंजी हि पीठी प्रमाणेच तीळाची, ओल्या नारळाच्या खोबऱ्याची सुद्धा करतात. तीळामध्ये कॅलशीयम, झींक मुबलक प्रमाणात आहे. त्यामुळे तीळाची करंजी बेस्ट .

नंतर नंबर येतो तो घरचा भाजक्या पोह्यांचा चीवडा आणि बेसनाचे लाडू, चीवड्यामध्ये आयरन, प्रोटीन, कैल्शीयम आहे तर बेसन लाडवांमध्ये व्हिटमीन-ए आणी प्रोटीन आहे.

दिवाळीत घरी तयार केलेल्या फराळामध्ये म्हणजेच चीवडा, बेसन लाडू, शंकरपाळे, करंजी, अनारसे या मधून प्रामुख्याने प्रोटीन, कॅल्शीयम, आयरन, व्हिटॅमीन-ए आणि बाकी व्हिटमीन व मीनरलस्ची आपुर्ती शरीरास होते. दिवाळी अश्वीन व कार्तिक महिन्यात येते जेव्हा हिवाळा हा रुतू अर्थात थंडी पडायला सुरुवात होते. दिवाळीच्या दहा ते बारा दिवसात जो फराळ आपण खातो त्यातील सर्व पोषक तत्वाची आपल्या शरीराला आवश्यकता असते. जेणे करून थंडीच्या दिवसात आपण सुदृढ राहू. त्यामुळे या दिवाळी पासुन फराळ घरीच बनवा व आपले आरोग्य निरामय करा.

दिवाळीच्या फराळात मैदा, रिफाईन्ड तेल, वापरू नये. असे पदार्थ वापरल्यास शरीरास हानी पोहचते. मुख्यतः हृदय व पोटाचे आजार जास्त प्रमाणात संभवतात. तसेच रेडी टू इट व इंस्टंट तयार होणाऱ्या पदार्था मध्ये अन्न दीर्घकाळ टिकवण्यासाठी त्यामध्ये टाकले जाणारे रासायनिक पदार्थांमुळे लीव्हर, आतडे आणि पोटाचे आजार, त्वचेचे आजार होण्याची संभावना अधिक असते. त्यामुळे तुम्ही बाजारातून दिवाळीत फराळ घरी आणताय की वीवीध आजार याचा एकदा विचार नक्की करा .

शुभ दीपावली..!

**- सौ. प्रज्ञा योगेश बरालीया,** अकोला.

गोल्ड मेडलीस्ट आहारतज्ञ आहेत.

*****



# भारताच्या विकासात सामाजिक संस्थांची भूमिका.

भारत, एक विशाल आणि विविधतेने नटलेला देश, आपल्या विकासासाठी अनेक आघाड्यांवर लढत आहे. या विकास प्रक्रियेत केवळ आर्थिक धोरणे किंवा औद्योगिक प्रगती महत्त्वाची नाही, तर सामाजिक परिवर्तन, शैक्षणिक सुधारणा आणि नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणाऱ्या घटकांची भूमिका देखील तितकीच आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर सामाजिक संस्थांचा महत्त्वाचा वाटा ठरतो. सामाजिक संस्था (Non-Governmental Organizations - NGOs) समाजातील विविध समस्यांवर काम करतात आणि शासनाच्या प्रयत्नांना पूरक ठरतात.

सामाजिक संस्था या शासनाच्या बाहेर कार्यरत असलेल्या स्वतंत्र संघटना असतात, ज्यांचे उद्दिष्ट समाजाच्या विविध समस्या सोडवणे आणि नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा करणे असते. या संस्था समाजाच्या वेगवेगळ्या थरांमध्ये आणि विविध क्षेत्रांत कार्यरत असतात. या लेखात आपण भारताच्या विकासात सामाजिक संस्थांची भूमिका कशी महत्त्वाची ठरली आहे हे विविध उदाहरणांच्या माध्यमातून समजून घेऊ.

**सामाजिक संस्थांची परिभाषा आणि उदय**

सामाजिक संस्था म्हणजे अशा संघटना, ज्यांचा उद्देश समाजातील वंचित, दुर्बल, आणि मागासलेल्या घटकांच्या समस्यांवर काम करणे हा असतो. यांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरणीय क्षेत्रात विशेष प्रभाव असतो. भारतात सामाजिक संस्थांचा इतिहास दीर्घ आहे, आणि त्यांनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात, महात्मा गांधी यांच्यासारख्या समाजसेवकांनी सामाजिक संस्थांचे महत्त्व ओळखून त्यांच्या माध्यमातून लोकांना एकत्र आणले आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रयत्न केले. स्वातंत्र्यानंतर, भारताच्या विकासात सामाजिक संस्थांनी सरकारी धोरणांची पूर्तता करण्यास मदत केली आणि नागरिकांच्या समस्या सोडवण्याचे प्रयत्न केले.

**सामाजिक संस्थांचे कार्यक्षेत्र**

सामाजिक संस्थांचे कार्यक्षेत्र अत्यंत व्यापक आहे. या संस्था समाजातील वेगवेगळ्या स्तरांवर काम करतात. त्या शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, पर्यावरण, ग्रामीण विकास आणि इतर अनेक क्षेत्रांत कार्यरत असतात. भारतातील काही महत्त्वाच्या सामाजिक संस्थांची आणि त्यांच्या कार्यक्षेत्रांची सखोल तपासणी करूया.

**१. शिक्षण क्षेत्रातील सामाजिक संस्थांची भूमिका**

शिक्षण हा कोणत्याही देशाच्या प्रगतीचा पाया असतो. विशेषतः ग्रामीण आणि दुर्बल भागातील मुलांना शिक्षण मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतातील शिक्षण व्यवस्थेमध्ये अनेक समस्यांचा सामना करावा लागतो, जसे की शिक्षकांची कमतरता, शाळेतील सुविधा अपुरी असणे, मुलांचे शिक्षणात नसणे इत्यादी.

'रयत शिक्षण संस्था, श्री. शिवाजी शिक्षण संस्था' सारख्या सामाजिक संस्थांनी शिक्षणाच्या क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. ग्रामीण आणि गरीब मुलांना शिक्षण मिळवून देण्याचे कार्य या संस्थांनी प्रामुख्याने केले आहे. त्याचबरोबर शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा घडवण्यासाठी विविध उपक्रम राबवले गेले आहेत. या संस्थांनी मुलांमध्ये वाचन-लेखन क्षमतेचा विकास करण्यासाठी अनेक शाळांमध्ये काम केले आहे, ज्यामुळे मुलांची शैक्षणिक प्रगती झपाट्याने वाढली आहे.

**२. आरोग्य सेवा**

आरोग्य सेवा हा भारतातील एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. ग्रामीण भागात आरोग्य सेवांची स्थिती सुधारण्यासाठी सामाजिक संस्थांनी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. भारतातील गरीब आणि वंचित वर्गासाठी आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हे

एक मोठे आव्हान आहे.

'टाटा ट्रस्ट' सारख्या संस्थांनी आरोग्यसेवा क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. या संस्थांनी ग्रामीण भागात आरोग्य शिबिरे आयोजित केली आणि लोकांना मोफत तपासणी, औषधोपचार, आणि वैद्यकीय सेवा पुरवली. तसेच, कर्करोग, गर्भवती महिलांना सुरक्षित प्रसुती सेवा, बालकांसाठी लसीकरण, आणि स्त्रियांना आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे कार्य या संस्थेने केले आहे.

स्त्री आरोग्य आणि मासिक पाळी स्वच्छतेच्या बाबतीतही काही सामाजिक संस्थांनी विशेष प्रयत्न केले आहेत. 'गूंज' या संस्थेने महिलांच्या मासिक पाळीच्या काळातील स्वच्छतेबाबत जनजागृती अभियान राबवले आहे आणि ग्रामीण भागातील महिलांना स्वच्छता साहित्य उपलब्ध करून दिले आहे. यामुळे महिलांच्या आरोग्याच्या स्थितीत सुधारणा झाली आहे आणि त्यांच्यात जागरूकता निर्माण झाली आहे.

**३. पर्यावरण संरक्षण**

पर्यावरणाचे संरक्षण करणे हे आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतात औद्योगिकीकरण आणि नागरीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात झाला आहे. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी विविध सामाजिक संस्थांनी पुढाकार घेतला आहे.

'चिपको आंदोलन' हे सामाजिक चळवळीचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. या आंदोलनाने झाडे कापण्याविरुद्ध जनतेला एकत्र आणले आणि जंगलतोड रोखण्यासाठी प्रयत्न केले. या चळवळीने निसर्गावर होणाऱ्या आघाताविरुद्ध एक सशक्त आवाज दिला.

तसेच, 'गंगा एक्शन प्लॅन' सारख्या उपक्रमांमध्ये सामाजिक संस्थांनी नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी योगदान दिले आहे. या योजनांमध्ये गंगा नदी स्वच्छ ठेवण्यासाठी लोकसहभाग वाढवण्याचे काम केले गेले. पर्यावरणीय चळवळीमध्ये अशा सामाजिक संस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**४. महिला सक्षमीकरण**

महिला सक्षमीकरण हा भारताच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. महिलांना शैक्षणिक, आर्थिक, आणि सामाजिक दृष्ट्या सक्षम बनविणे हे देशाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. या क्षेत्रात सामाजिक संस्थांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे.

'सेल्फ-एम्प्लॉइड वूमेन्स असोसिएशन' (SEWA) ही महिला सक्षमीकरण क्षेत्रातील एक अग्रगण्य संस्था आहे. ही संस्था असंघटित क्षेत्रातील महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देते. त्याचबरोबर महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी कौशल्यविकासाचे कार्यक्रम राबवते. SEWA च्या माध्यमातून हजारो महिलांना रोजगार मिळाला आहे, ज्यामुळे त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या आहेत.

अशा प्रकारे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध सामाजिक संस्थांनी आपले योगदान दिले आहे, ज्यामुळे समाजातील महिलांचा दर्जा उंचावला गेला आहे.

**५. ग्रामीण विकास**

ग्रामीण भागातील विकास हा भारताच्या आर्थिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येच्या मोठा भाग ग्रामीण भागात राहतो, त्यामुळे तेथील विकास हा देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक आहे. सामाजिक संस्थांनी ग्रामीण विकासासाठी अनेक उपक्रम राबवले आहेत.

'बी जे एस' ही संस्था ग्रामीण विकास क्षेत्रातील एक महत्त्वाची संस्था आहे. तिने शेतकऱ्यांना नवीन शेती तंत्रज्ञान शिकवून त्यांची उत्पादकता वाढवण्याचे कार्य केले आहे. तसेच, जलसंपत्ती व्यवस्थापन, सिंचन व्यवस्था आणि शेतीच्या सुधारित पद्धती यांचा अवलंब करून शेतकऱ्यांना सशक्त केले आहे.

इतर संस्थांनीही ग्रामीण भागात शाळा, आरोग्य केंद्रे, आणि पाणीपुरवठा सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. यामुळे गावांमध्ये शैक्षणिक आणि सामाजिक स्थितीत सुधारणा झाली आहे.

**६. आदिवासी विकास**

भारताच्या आदिवासी लोकसंख्येचे बहुसंख्य लोक दुर्गम आणि जंगलमय भागांत राहतात. आदिवासी समुदायांचे मुख्य व्यवसाय हे शेती, शिकार, जंगलातून मिळणारे साधनसंपत्ती, आणि हस्तकलेशी निगडीत आहेत. मात्र, शैक्षणिक मागासलेपण, आर्थिक दुर्बलता, आणि सामाजिक भेदभाव यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास कायमच अव्यवस्थित राहिला आहे.

'अरण्य फाऊंडेशन' संस्था ही भारतातील एक महत्त्वपूर्ण सामाजिक संस्था आहे, जी मुख्यत्वे आदिवासी विकासावर काम करते. या संस्थेने जंगलामध्ये राहणाऱ्या आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. अरण्य संस्थेचे उद्दिष्ट आदिवासी समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी कार्य करणे हे आहे.

**सामाजिक संस्थांचे आव्हाने**

सामाजिक संस्थांना त्यांच्या कार्यात अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे आर्थिक पाठबळाचा अभाव. बर्याच संस्थांना त्यांच्या उपक्रमांसाठी पुरेसा निधी मिळत नाही, ज्यामुळे त्यांचे कार्य अपूर्ण राहते.

तसेच, प्रशासनाशी समन्वयाची कमतरता हे आणखी एक मोठे आव्हान आहे. काही वेळा सरकारी धोरणे आणि सामाजिक संस्थांच्या उद्दिष्टांमध्ये विसंगती असते, ज्यामुळे संस्थांना त्यांचे कार्य योग्य पद्धतीने करता येत नाही. याशिवाय, भ्रष्टाचार, संसाधनांचा अपुरेपणा, आणि स्थानिक लोकांचे सहकार्य न मिळणे यामुळेही त्यांच्या कार्यक्षमता कमी होते.

**पुढील वाटचाल**

सामाजिक संस्थांनी भारताच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. मात्र, अजूनही अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. यासाठी शासनाने सामाजिक संस्थांना अधिक पाठबळ द्यावे, त्यांचे कार्य सुलभ करण्यासाठी धोरणे सुसंगत करावी, आणि जनतेमध्ये अधिक जागरूकता निर्माण करावी. सामाजिक संस्था आणि शासनाच्या एकत्रित प्रयत्नांमुळे भारताचा सर्वांगीण विकास साधता येईल, अशी अपेक्षा आहे.

**- श्रेयस पन्नासे, अमरावती.**

लेखक हे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स.

(TISS) चे माजी विद्यार्थी असून विश्व संवाद केंद्र, मुंबई येथे वरिष्ठ संशोधक आहेत.

*****

# हिंदु धर्मरक्षक छत्रपती शंभुराजे.

एखाद्या समाजाला स्वत्वहीन करायचे असेल तर त्या समाजाचा इतिहास नष्ट केला जातो. काही समाजाचा इतिहास नष्ट करता येत नाही म्हणून इतिहास विकृत केला जातो.सध्या महाराष्ट्रातही असा प्रयोग विविध समाजविघातक शक्तींच्या माध्यमातुन सुरु आहे. त्यासाठी एक संघटीत षडयंत्रच सुरु असल्याची शंका यावी एवढे पध्दतशीर प्रयत्न महाराष्ट्रात सुरु आहेत. अशा प्रयत्नांना राजकीय स्वार्थासाठी काही लोक पाठबळ देत असतात. छत्रपति शंभुराजे हे धर्मवीर नाहीत तर स्वराज्यरक्षक आहेत अशी मांडणी केली जाते.वास्तविक धर्मवीर हा शब्द स्वराज्यरक्षक या शब्दाचा विरुध्दार्थी शब्द नाही. ते जसे स्वराज्यरक्षक होते तसे धर्मवीरही होते,ही महाराष्ट्राची श्रध्दा आहे आणि त्या श्रध्देला सबळ कागदपत्रांचा आधार आहे. पण शिवछत्रपतिच्या इतिहासातुन हिंदुत्व वजा करण्याचाच एककलमी कार्यक्रम काही मंडळीनी सुरु केल्याचे दिसुन येते. या मंडळीच्या मांडणीत खरच तथ्य आहे का? याचा विचार करण्याची गरज आहे.

मराठा सेवा संघाच्या माध्यमातुन महाराष्ट्रात तथाकथित शिवधर्माची स्थापना झाली.या शिवधर्माचा छत्रपति शिवरायांशी कोणताही संबंध नव्हता. किंबहुना शिवचरित्रातुन हिंदुत्व वजा करण्यासाठीच हा प्रयोग झाला असावा,पण महाराष्ट्राच्या सुजाण समाजाने हा प्रयोग हाणून पाडलेला आहे. इतिहासातील विकृतीकरणावर आता समाज प्रश्न विचारु लागला आहे.ब्रिगेड,बामसेफची मांडणी आता समाज स्वीकारत नाही. कारण द्वेषावर आधारित विचार कधीही टिकत नसतो,त्यामुळे अशा वक्तव्यांच्या माध्यमातुन अशा माध्यमातुन समाज धुमसत ठेवण्याचा प्रयोग होतो.

समकालीन पुरावे काय सांगतात?

छत्रपती शंभुराजे हे हिंदूधर्मरक्षक नव्हते तर फक्त स्वराज्यरक्षकच असल्याची मांडणी केली जाते , पण हे वास्तव आहे का? शंभुराजे स्वराज्यरक्षक होते हे सत्यच आहे परंतु ते हिंदू धर्मरक्षक नव्हते हे म्हणणे असत्य आहे. विशिष्ट पक्ष आणि नेत्यांना खुश करण्यासाठी केलेला हा खटाटोप आहे. छत्रपति शिवाजीमहाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचा आणि हिंदुधर्माचा संबंध नाकारणे ही इतिहासाची प्रतारणा आहे. आपण समकालीन साधनातील उल्लेख पाहिले तर हिंदवी स्वराज्य आणि हिंदुधर्माचा संबंध आपल्याला स्पष्ट होईल. इंग्रजांच्या राजापुर वखारीचा प्रमुख हेन्री रिव्हिंग्टन याने दि. १३ फेब्रुवारी १६६० रोजी शिवाजीमहाराजांना जे पत्र लिहीलय, त्यात महाराजांना उद्देशून Generall of the Hindu Forces अर्थात "हिंदुसेनाधिपती" असा उल्लेख करण्यात आला आहे. (फॅक्टरी रेकॉर्ड राजापुर ) महाराजांच्या शत्रुंचाही त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन काय होता हे स्पष्ट आहे.

मराठा,महाराष्ट्रधर्म ,स्वराज्यधर्म हे शब्द हिंदुधर्माच्या विपरीत नाही.देशातील विविध राजवटींचा राजपुत,मराठा, साळुव,तुळुव राज्ये असा उल्लेख होत असला तरी त्यांचा अर्थ हिंदुराज्यच होतो, कारण त्या हिंदुच्याच राजसत्ता होत्या हे ऐतिहासिक सत्य कसे नाकारता येईल? जसे महाराष्ट्र हा भारताचा भाग आहे,तसा मराठा हा हिंदुधर्माचाच भाग आहे. छत्रपति शिवाजीमहाराज आणि छत्रपति शंभूराजे यांनी आपल्या कारकीर्दीत हिंदुत्वाच्या रक्षणार्थ संघर्ष केला आहे. छत्रपति शिवाजीमहाराज यांनी दक्षिणेत तिरुवन्नमलाई येथे मुस्लिम आक्रमकांनी उध्वस्त केलेल्या मंदिरांचे पुनर्निर्माण केले.गोव्यात सप्तकोटीश्वर मंदिराचा जिर्णोध्दार केला. शंभुराजांच्या मराठा आधिकार्यांनी नवलगुंदच्या मोकादमास पत्र लिहुन तेथील ग्रामदैवताचे मंदिर पुन्हा बांधले. त्या पत्रात मराठा आधिकारी ही 'हिंदुकीची गोष्ट' आहे असे सांगावयास विसरलेले नाहीत. छत्रपति शंभुराजांनी अनेक साधुसंताना,मंदिरांना दान दिले आहे. शंभुराजे हे संस्कृत भाषेचे जाणकार होते. त्यांनी बुधभूषण नावाचा राजनीतीपर ग्रंथ लिहीला. त्याची सुरुवातच श्रीगणेशाला वंदन करुन केली आहे, पुढे ते श्रीशिवपार्वती,श्रीभवानीमाता, महिषासुरमर्दीनी, श्रीराम आणि श्रीकृष्णांनाही वंदन करतात. छत्रपति शंभूराजे बुधभूषणच्या पहिल्या अध्यायातील नवव्या श्लोकात लिहीतात,की धर्माला कलिकालरुपी भुजंगाने वेढा घातला तेव्हा जगदीश्वरांच्या

अंशरुपाने श्रीशिवाजीराजे अवतीर्ण झाले!! इथे कोणता धर्म त्यांना अभिप्रेत आहे हे कोणालाही सहज समजेल. यावरुन छत्रपती शंभूराजांना 'धर्मवीर' म्हटले जाते.ते अतिशय समर्पक आहे,हे आपल्या लक्षात येईल. शंभुराजांनी राजा रामसिंग याला लिहीलेल्या संस्कृत पत्रात (नोव्हेंबर ,१६८२) शंभुराजांचा जाज्वल्य धर्माभिमान व्यक्त झाला आहे. शंभुराजे लिहीतात " त्या यवनाधमाला (औरंगजेबाला) सांप्रत असे वाटू लागले आहे की,आम्ही हिंदु सत्वशून्य आहोत.आम्हाला धर्माचा काहीही अभिमान राहिलेला नाही.बादशहाची वागणुक यापुढे आम्हाला सहन होणार नाही" पुढे शंभूराजे या पत्रात लिहीतात " आता अशी वेळ आली आहे की त्या यवनाधमाला (औरंगजेबाला) पकडून कारागृहात घालणे शक्य होईल.मग आपल्या देवतांची पुन्हा स्थापना करुन धर्मकर्मे निर्विघ्नपणे पार पडतील,अशी व्यवस्था करता येईल.हे सारे लवकर करावयाचे आम्ही ठरविले आहे याची आपण खात्री बाळगावी." या पत्रातुन शंभुराजांचा हिंदुधर्माभिमान ,देशधर्मासाठी सर्वस्व पणाला लावण्याचा निर्धार आणि खुद्द औरंगजेब बादशाहाला कारागृहात टाकण्याची महत्वाकांक्षा यांचे दर्शन होते. शंभुराजांनी फोंड्याचा देशाधिकारी धर्माजी नागनाथ याला दि. २२ मार्च १६८८ ला कळविले की अंत्रुज येथे यवनी राज्यात अंगभाडे कर घेत नव्हते त्यावेळी लोक सुखी होते. आता हिंदूराज्य झाल्यावर तो कर चालु आहे तरी तो बंद करावा. याचा एक शिलालेख हळकोळण (अंत्रुज) येथे आहे. इथे छत्रपती शंभूराजांच्या राज्याला 'हिंदुराज्य' म्हटलेले आहे. छत्रपति शिवाजीमहाराज यांनी जबरदस्तीने मुसलमान केलेल्या नेतोजी पालकरांना पुन्हा हिंदु करुन घेतले तोच वारसा छत्रपति शंभुराजांनीही चालवला. हरसुलच्या गंगाधर कुलकर्णीला जबरदस्तीने मुसलमान केले होते,त्याला शंभुराजांनी पुन्हा हिंदु करुन घेतले.देशाच्या ज्या भागात हिंदू अल्पसंख्य होतो, त्या भागात राष्ट्रविरोधी कारवाया सुरु होतात, त्यामुळे हिंदुचे धर्मांतरण रोखणे आवश्यक आहे, याची जाणीव छत्रपती शंभूराजांना होती. मुंबईच्या गव्हर्नरने पाठविलेल्या कॅप्टन हेन्री गॅरी आणि थॉमस विलकिन्स यांनी शंभुराजांशी १६८४ साली तह केला, त्या तहात एक कलम असे होते 'That the English shall buy none of my people belonging to my dominion, to make them slaves or Christians" अर्थात "इंग्रजांनी माझ्या प्रदेशातून माणसे खरेदी करु नयेत आणि त्यांना गुलाम अथवा ख्रिश्चन करु नये" तशी अटच शंभुराजांनी इंग्रजांना घातली होती.

शंभुराजे स्वत: लिहीतात,

जीवितं मृतकं मन्ये देहिनां धर्मवर्जितम् । मृतो धर्मेण संयुक्ती दीर्घिजीवी भविष्यति ॥ ६११ ॥

धर्मवीर शंभूछत्रपती विरचित बुधभूषणम् - अध्याय २ श्लोक ६११

अर्थः जो माणूस जीवंतपणी धर्म विरहित आचरण करतो तो जीवंत असूनही मेल्यासारखा असतो. आणि धर्मासाठी मरतो तो चिरंजीव, दीर्घजीवी असतो.

बाकरेशास्त्री यांना दिलेल्या दानपत्रात शंभुराजे आपल्या आजोबांचा म्हणजेच शहाजीराजांचा उल्लेख 'हिंदुधर्मजिर्णोध्दारक' असा करतात. वरील समकालीन संदर्भ आणि पुराव्यावरुन शिवराय,शंभूराजे यांचा हिंदुत्वाशी किती प्रगाढ संबंध होता,हे लक्षात येईल.

शाहु-फुले -आंबेडकर आणि हिंदु.

महाराष्ट्रातील ढोंगी पुरोगामी स्वत:च्या स्वार्थासाठी नेहमी शाहु,फुले आणि आंबेडकरांचा जप करत असतात. फुले आणि आंबेडकरांनी छत्रपति शिवरायांचा हिंदुधर्माशी असलेला संबंध ठळकपणे मांडला आहे. आणि शिवरायांचाच विचार शंभुराजे पुढे चालवत होते कारण त्यांनीच म्हटले आहे "आबासाहेबांचे संकल्पित तेच करणे आम्हास अगत्य!" मग ते हिंदू धर्मरक्षक कसे ठरत नाहीत? भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डा ॅ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीत दि. २५ नोव्हेंबर १९४९ रोजी भाषण दिले होते. घटनासमितीतील त्यांचे हे शेवटचे भाषण आहे. त्यात बाबासाहेब म्हणतात

"शिवाजीमहाराज हिंदुच्या मुक्ततेसाठी लढत होते." थोर समाजसुधारक महात्मा फुले यांनी शिवरायांवर प्रदीर्घ पोवाडा लिहिला. महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या समग्र वाङ्मयात हा पोवाडा छापलेला आहे. महात्मा फुले लिहीतात "युक्तीने सर केला किल्ला तोरण्याचा l रोविला झेंडा हिंदुचा " स्वत: महात्मा फुले स्वत: शिवरायांनी हिंदुचा झेंडा रोवला असे लिहितात मग अजित पवार आणि सावंतांना हिंदु शब्दाची ऍलर्जी का आहे ?

कोल्हापूर पॅलेसजवळ राजर्षी शाहूमहाराजांचा पुतळा आहे,त्यावरील ताम्रपटावर ' हिंदुपदपातशाह ' असे लिहीलेले आहे. करवीर छत्रपति आपल्या कोटावर जरीकामातील राजचिन्ह धारण करत त्यावरही 'हिंदुपदपातशाह' असाच उल्लेख आहे. या राजचिन्हाचा फोटो राजर्षी शाहु स्मारक ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या ११३३ व्या पानावर डाॅ.जयसिंगराव पवारांनी छापला आहे. करवीर छत्रपति स्वत:ला हिंदुपदपातशाह म्हणवतात ही बाब दुर्लक्ष करण्यासारखी नाही.

**मराठेशाहीच हिंदुत्व -**

ज्यांनी देशभर मराठेशाहीची दुंदुभी वाजवली, अटक ते कटक हिंदवी साम्राज्याचा विस्तार केला, त्या मराठेशाहीच्या शिलेदारांची उक्ती आणि कृती काय होती? पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी देशभरातील असंख्य हिंदु मंदिरांचा जिर्णोध्दार केला. ओरिसातील बंद पडलेली जगन्नाथ रथात्रा मराठ्यांनी पुन्हा सुरु केली,ही कृती काय सांगते? मराठा राज्यकर्त्यांनी संपूर्ण देशभरात हिंदुधर्माचा जिर्णोध्दार केला आहे,हा इतिहास आहे. महाराजा यशवंतराव होळकर यांचे एक पत्र ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग - १५ मध्ये छापलेले आहे या पत्रात यशवंतराव होळकर लिहितात "आजपर्यंत हिंदू राज्य सर्वत्रांनी एकदिल राहून चालविले. अलीकडे ज्याचे त्याचे दौलतीत घरकलह होऊन राज्य विपर्यास पडोन हिंदूधर्म नाहीसा होण्यास मूळ जाहले. त्याचे छेदन करण्यास सर्वांनी एकदिल झाले पाहिजे. तरच मुळाचे छेदन होऊन स्वधर्माचार पूर्ववत चालून हिंदूची कायमी राहील." मराठ्यांच्या डोळ्यासमोर कोणता धर्म होता,याचे उत्तर या पत्रात स्पष्ट आहे.त्यामुळे अजित पवार आणि सावंत यांचा मुद्दाच निकाली निघतो. छत्रपति शंभुराजांचे धीरोदात्त बलिदान एवढ्याच कारणाने त्यांना धर्मवीर म्हटले जात नाही तर त्यांनी त्यांच्या नऊ वर्षाच्या कारकीर्दीत जी धार्मिक सत्कृत्ये केली ,त्याचा गौरव म्हणूनही त्यांना धर्मवीर म्हटले जाते. त्यांना धर्मवीर म्हटल्याने त्यांच्या स्वराज्यरक्षक या प्रतिमेला कुठलाही तडा जात नाही,किंबहुना स्वराज्यरक्षण हे राजा म्हणून त्यांचे कर्तव्यच होते आणि प्रसंगी प्राणाचेही मोल देऊन त्यांनी त्या कर्तव्याचे पालन केले.

आम्ही मार्ग चालु सईच्या सुताचे.

राजकारणी त्यांच्या नेतृत्वाला खुश करण्यासाठी आणि मतांच्या लाचारीसाठी सतत विकृत मांडणी करत असतात इतिहासकारांनी नेत्याच्या अथवा पक्षाच्या सोयीची मांडणी न करता इतिहासाशीच प्रामाणिक राहिले पाहिजे. कितीही खोटी मांडणी केली तरी खरा इतिहास कधीही झाकोळला जात नाही.समाजात छत्रपती संभाजीमहाराजांची प्रतिमा ही 'हिंदू धर्मरक्षक' किंवा 'धर्मवीर' अशीच आहे. स्वराज्यरक्षणासह त्यांची धार्मिक सत्कृत्ये पाहता त्यांची ही उपाधी किती सार्थ आहे हे आपल्या लक्षात येईल.असत्याच्या अंधाराने सत्याचा सूर्य झाकला जाणार नाही. छत्रपति शंभुराजे हे धर्मवीरच होते आणि यावच्चंद्रदिवाकरौ म्हणजे चंद्रसूर्य असेपर्यंत त्यांची ही उपाधी कायम हिंदु समाजाला प्रेरणा देत राहील यात शंका नाही. देव,देश आणि धर्माच्या रक्षणासाठी आणि समाजाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी त्यांनी जी वाट दाखवली आहे, तोच आमचा मार्ग आहे. आपल्याला त्याच मार्गाने वाटचाल करायची आहे......परमवैभवाच्या दिशेने!

**- रवींद्र गणेश सासमकर.**

लेखक डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ चे सिनेट सदस्य आहेत.
इतिहासाचे अभ्यासक आहेत आणि महाराष्ट्र शासनाच्या
छत्रपती शिवाजी महाराज चरित्र साधने आणि प्रकाशन समितीचे विशेष निमंत्रित सदस्य आहेत.

*****

# ती तरूणी...

एका आयटी कंपनीचा मोठा पुरस्कार वितरण सोहळा ! कंपनीत समीर तयार होऊन गेलेला.. कारण आज पुरस्कार वितरण होणार असतं. एक सॉफ्टवेअर बनवायचं असतं आणि त्यामध्ये स्पर्धा असते. तीन लोकांना पुरस्कार दिलेले असतात. तिसरा पुरस्कार समीर कुलकर्णी, दुसरा पुरस्कार नेहा घाटे आणि प्रथम पुरस्कार हा लक्ष्मी प्रधान !

पुरस्कार घेतांना त्याला लक्ष्मी आवडली .

लव एट फर्स्ट साईट म्हणतात ना तशी ! सुंदर डोळे.. लांब केस आणि चेहऱ्यावरचे भाव !

दुसऱ्या दिवशीपासून काम सुरू होतं आणि अचानक त्याला त्याच्या टीम मध्ये ती दिसते. हो तीच लक्ष्मी ! आपली एकटीच लॅपटॉप घेऊन काम करत असलेली ! तो तिच्याकडे बघत राहतो. लंच टाइम होतो पण ती जागेवरून उठत नाही.बाकी टीम मेंबर्स सगळे जेवत असताना हास्य कल्लोळ सुरू असतं. काही कॅन्टीन मध्ये जाऊन जेवत असतात. ही आपली जागेवर बसलेली, कोणाशी न बोलता ! आठवडाभर हा तीचे निरीक्षण करतो. ती सतत कामात व्यग्र, अबोल आणि एकटीच राहणारी. याला वाटतं, असंतात काही अंतर्मुख तर मग नसेल आवडत बोलायला.

हा याच्या केबिनच्या काचेतून निरीक्षण करत असतोकायम ! ती नवीन असूनही तिच्याकडे टीम मेंबर्स जातात. मग त्याच्या लक्षात येतं की सगळ्यांचे ती प्रॉब्लेम्स पटापटा सॉल्व करते आणि त्याच्या मनात तिच्याबद्दल एक आदर वाटायला लागतो. आवडली तर त्याला ती पहिल्याच दिवशी असते. पण तिच्या डोळ्यातले भाव मात्र. निर्विकार असतात. याला समोर बघितलं की ती स्माईल देते गुड मॉर्निंग म्हणते आणि निघून जाते. त्याला वाटतं तिच्या मनात कोणी दुसरा असेल का ? किंवा इतर काही ? ब्रेकअप वगैरे झाला असेल का ?

पण तो हा विचार मनातून काढून टाकतो. आज काल प्रेम होणे, ब्रेकअप होणं हे देखील नेहमीच आहे. त्याला ती फार आवडली असते. त्यामुळे तो तिचा आपली पार्टनर म्हणून विचार करत राहतो. एक जीवनाची साथीदार म्हणून!

त्याला तिच्या स्वभावाचा फारसा अंदाज येत नाही .पण ती शांत आहे आणि लोकांना मदत करणारी आहे. असं तिच्या एकंदरीत वागण्यामुळे जणवतं. एकदा अशीच ती काम करत असताना हा तिला कॉफीसाठी विचारतो. ' हो , नाही म्हणू 'या विचारात असतानाच हा म्हणतो "बघ; जबरदस्ती नाही..यायचं असेल तर... ये "या वाक्यांशी ती " सॉरी , असं काही नाही .

मी जरा कामात होते ना म्हणून ..,"आणि लगेच ती तिचा टेबल आवरून त्याच्यामागे कॉफीसाठी येते.

आज कॉफी, उद्या हॉटेल असं सुरू असतं. एका संध्याकाळी मस्त ते एका हॉटेलमध्ये जातात.. तिथे डान्स फ्लोअरवर काही कपल्स नाचत असतात. आणि याला वाटतं आपणही जावं तिथं..म्हणून तो तिच्यापुढे आपला हात करतो. तर ती एका पायावर तयार.. आणि दोघही डान्स फ्लोअर कडे जातात. "दिल की गिरह खल दो ," या गाण्यावर नाच करत असताना तिचा हात त्याच्या खांद्यावर तर त्याचा हात तिच्या कमरेवर ..अतिशय डौलदार पणे ती नाचत असते. तिचे त्याच्याकडे लक्ष नसतं. फक्त नृत्यांमध्ये ती आनंद घेत असते आणि हा तिच्याकडे बघत असतो. तिचा निकटचा स्पर्श होत असतो. तिने मारलेला निशिगंधाचा सौम्य सुगंध पण त्याच्या नाकात भरत जातो.. आणि एका क्षणी याला वाटतं नाही,! हीच तीच..!! आपण शोध घेत होतो..! आणि याचं मन स्थिर होतं आणि हा परत डान्स करू लागतो. अशे अनेक दिवस जातात. याला वाटतं आता प्रपोज करायची वेळ आली. आज उद्या करता करता तो तिला प्रपोज करतो आणि तीही छान असून "हो "म्हणते..

याच्या खुशीला आता पारावर नसतो .पण लगेच मार्च असल्यामुळे कामाची धावपळ ..दोघेही कामात खूप !!

एकमेकांकडे बघायला फुरसत नाही आणि अशातच एका बिझनेस मिटींगला जायचं असतं. हा तिला विचारतो ,"चलतेस," तीही ,"हो ",म्हणते..

नेमकी ड्रायव्हरला सुट्टी असते आणि हाच कार चालवत असतो. पाहतो तर समोरून एक मोठा ट्रक येत असतो ..काही क्षणाच्या आतच ट्रक त्यांच्या कारवर आदळतो.. क्षणभरच स्टेरिंग चा ताबा सुटतो..हा त्याच्या हा कारच्या बाहेर फेकला जातो .

तीही कारच्या बाहेर फेकल्या जाते.. थोडं भानावर आल्यावर हा स्वतः हळूहळू उठायचा प्रयत्न करतो. मार तर फार लागला नसतो. एक मुका मार असावा.. थोडं खरचटलेलं असतं.. हातावर त्यातून रक्त येत असतं.. आतलं हाडही दिसत असतं आणि तो कळवळून आपला एक हात दुसऱ्या हातावर ठेवतो.

आणि हळूहळू उठतो आणि तिचा शोध घेतो..चालत असताना ती त्याला कुठेतरी दूर सापडते.. पाहतो तर तिचा मुंडके दुसरीकडे आणि शरीर दुसरीकडे असतं आणि मुंडक आणि धड याला जोडलेली इलेक्ट्रॉनिक वायरची तार ही त्याला स्पष्ट दिसते आणि त्याच्या लक्षात येतं ... तरी आपण एका रोबोवर आर्टिफिशिल इंटेलिजन्स वर प्रेम केलं तर...आणि तो गळून मटकन खाली बसतो..

**- मोहिनी हेडावू,** नागपुर.

लेखिका ह्या सहाय्यक राज्यकर आयुक्त आहेत तसेच त्या ललित लेखन करतात.
“मनातलं” हा ललित लेख संग्रह प्रसिद्ध आहे.

*****

# स्वा. सावरकरांचे स्वदेशी विचार, भुमिका आणि कार्य.

स्वातंत्र्यवीर सावरकर हे नाव जरी उच्चारल तरी जाज्वल्य देशभक्तीने उर भरून येतो. एक महान देशभक्त,

क्रांतिकारकांचे मुकूटमणी, महाकवी, लेखक, कादंबरीकार, इतिहासमीमांसक, निबंधकार, नाटककार, तत्त्वज्ञ, समाजक्रांतिकारक, हिंदुत्वाचे उद्गाते, भाषाशुद्धी, लिपीशुद्धी, सैनिकीकरणाचे पुरस्कर्ते, उपयुक्ततावादी, बुद्धीवादी, विज्ञाननिष्ठ आणि मानवतावादी असे शतपैलू व्यक्तीमत्व असणारे सावरकर स्वदेशीचे पुरस्कर्तेही होते.

चापेकर बंधूंच्या हौतात्म्याने पेटून उठलेल्या सावरकरांनी भारताच्या स्वातंत्र्याची शपथ घेऊन स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली. सावरकर नाशिकला असताना १८९८ मध्ये म्हणजे वयाच्या १५-१६ व्या वर्षी त्यांनी " स्वदेशीचा फटका " (फटका हा एक काव्यप्रकार आहे) लिहिला होता. हा फटका पुण्याच्या " जगदहितेच्छू " पत्रांत प्रसिद्धही झाला होता. म्हणजे लहानपणापासूनच सावरकरांच्या मनात स्वदेशीची कल्पना होती आणि ह्या कल्पनेला पुण्यात आल्यावर कृतीची जोड मिळाली. सावरकर महाविद्यालयीन शिक्षणासाठी भगूर- नाशिकवरून पुण्याला आले व त्यांनी फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेतला. पुण्यात आल्यावर त्यांचे दोन गुरू म्हणजे काळकर्ते शि. म. परांजपे आणि लोकमान्य टिळकांची भेट झाल्यावर त्यांना अजून प्रेरणा मिळाली.

परदेशी मालावर बहिष्कार ह्या चळवळीला जोर मिळावा ह्यासाठी सावरकरांनी पुण्यात ७ ऑक्टोबर १९०५ ला विदेशी कपड्यांची होळी केली. ह्या होळीची धग लंडनपर्यंत पोहोचली. त्याचवेळी सावरकरांचे थोरले बंधू गणेश उपाख्य बाबाराव सावरकरांनीही नाशिकमध्ये अशाच प्रकारची विदेशी कपड्यांची होळी केली होती.

नंतर लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी केली आणि लाल-बाल-पाल ह्या त्रयीच्या पुढाकाराने वंगभंग चळवळ सुरू झाली. ह्या चळवळीला स्वदेशी व ब्रिटिश मालावरील बहिष्काराची जोड मिळाली. लोकमान्य टिळकांनी पुरस्कारिलेली स्वराज्याची चतु:सूत्री म्हणजे स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार ह्याचा प्रभाव दादाभाई नवरोजींच्या १९०६ च्या कोलकाता (तेव्हाचे कलकत्ता) काँग्रेसच्या अधिवेशनातील त्यांच्या अध्यक्षीय भाषणावरही पडलेला दिसून येतो.

सावरकरांनी दिनांक ९ मार्च १९०६ ला पंडित शामजी कृष्णवर्मांकडे शिष्यवृत्तीसाठी जो अर्ज केला होता, त्या अर्जात विशेष पात्रता म्हणून त्यांनी अनेक गोष्टींचा उल्लेख केला होता, त्यात स्वदेशी आंदोलनामधील त्यांच्या कार्याचाही उल्लेख केला होता. इतकेच काय सावरकरांना प्रशस्तीपत्र देताना लोकमान्य टिळकांनीही दिनांक १६ मार्च १९०६ च्या पत्रातही सावरकरांच्या स्वदेशीच्या कार्याचा उल्लेख केला होता.

सावरकर रत्नागिरीमध्ये असताना रत्नागिरी हिंदुसभेच्या मेळ्यासाठी त्यांनी "दीपावलीचे लक्ष्मीपूजन" (१९२५ ) हे स्वदेशीचा पुरस्कार करणारे आणि परदेशी वस्तूंवर बहिष्कार घालण्याचा उपदेश करणारे काव्यही रचले होते.

त्यातील एक कडवे :

देशी तेले, देशी साबू, देशी वस्त्राने
देशी साखर, देशी अस्त्रे, देशी शस्त्राने
स्वदेशलक्ष्मी पूजूं साधुनि जरि मंगल वेळ
गजांतलक्ष्मी हिंदुहिंदुच्या दारीं डोलेल !

सावरकर स्वदेशी वस्तु वापरण्यासंबंधी आग्रह धरीत असत. सावरकरांनी तळेगावच्या पैसा फंड कारखान्यातून देशी बांगड्या रत्नागिरीला मिळविण्याची व्यवस्थाही केली होती. (मी पाहिलेले सावरकर, संकलकः रा. स. भट, वीर गौरव समिती प्रकाशन, १९९०, पृष्ठ ४०)

सावरकरांच्या प्रेरणेवरुनच रत्नागिरीला सावरकर स्थानबद्ध असताना प्राथमिक शाळेत सौ. ताई दातार ह्यांनी &#३९;स्वदेशी भांडार&#३९; चालविले होते. भांडारासाठी खात्रीच्या स्वदेशी वस्तु सावरकरच खटपट करून त्यांना मिळवून देत असत. स्वदेशी भांडाराच्या उलाढालीत त्या चालकांना एका महिन्यास तर केवळ दोन रुपये नफा मिळाला. ह्यामुळे अर्थात ते निराश झाले आणि हे त्यांनी सावरकरांना जाऊन सांगितले, त्यांचा निराशपणा सावरकरांच्या लक्षात आला, सावरकर त्यांना म्हणाले, "तुम्ही इतका स्वदेशीसाठी आटापिटा केला नसता तर हे दोन रुपये सुद्धा परकीयांनाच मिळाले असते. त्याऐवजी तेवढे दोन रुपयेच कां असेनात पण ते तुम्ही आपल्यातच ठेवलेत हेही काही कमी नाही." (सावरकर यांच्या आठवणी, संकलन: राजाराम लक्ष्मण रेणावीकर, अधिकारी प्रकाशन, १९६२, पृष्ठ ३९) म्हणजे देशकार्यातील खारीचा वाटाही कितीही मौल्यवान आणि महत्त्वाचा आहे हे सावरकरांनी त्यांना पटवून दिले होते.

केसरीचे तेव्हाचे सहसंपादक वा. कृ. भावे १९२९ ला महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसतर्फे रत्नागिरी जिल्ह्यांत “ स्वदेशी ” या

विषयावर व्याख्यानासाठी गेले होते. वाटेत त्यांची सावरकरांशी भेट झाली आणि सावरकर त्यांना स्वदेशी मालाच्या दुकानात घेऊन गेले आणि स्वदेशीचे प्रात्यक्षिक दाखविले, त्यांचे कार्य पाहून भावे थक्कच झाले, असे त्यांनी स्वतःच सावरकरांच्या आठवणी सांगताना लिहून ठेवले आहे. (सावरकर यांच्या आठवणी, संकलन: राजाराम लक्ष्मण रेणावीकर, अधिकारी प्रकाशन, १९६२, पृष्ठ ४९)

स्वदेशीचा पुरस्कार व परदेशी वस्तूंवर बहिष्कार ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कारण स्वदेशीचा पुरस्कार करायचा असेल तर स्वदेशी वस्तू आधी आपण वापरायला हव्यात आणि त्यासाठी आधी परदेशी मालावर बहिष्कार घालायला हवा किंवा स्वदेशी वस्तूंना प्राधान्य द्यायला हवे. तसेच नुसता परदेशी वस्तूंवर बहिष्कार घालून उपयोग नाही, कारण हा बहिष्कार घालताना त्याच्या समांतरपणे त्या बहिष्कार घातलेल्या वस्तू भारतात उत्पादित करणे आणि त्यास पाठिंबा देणे आवश्यक आहे. यासाठी आधुनिक तंत्रज्ञान व यंत्राचे स्वागत करणे अत्यंत आवश्यक होते. कारण आधुनिक तंत्रज्ञान व यंत्राचा उपयोग केल्यामुळे कमी वेळात जास्त उत्पादन होते व उत्पादनमूल्यही (production cost) कमी असल्याने वस्तू मुबलक प्रमाणात व स्वस्त दरात उपलब्ध होतात. अर्थातच ह्यामुळे स्वदेशी वस्तू परदेशी वस्तूंशी गुणवत्ता, मूल्य आणि उपलब्धता ह्यामध्ये सहज स्पर्धा करू शकतील. कवी मनाचे सावरकर हे व्यावहारीक आणि वास्तववादी होते. त्यांनी केवळ भावनेच्या भरात स्वदेशीचा पुरस्कार केला नव्हता. त्यासाठी त्यांनी वैचारिक आणि प्रत्यक्ष कृती अशा दोन्हीप्रकारे कार्य केले होते. सावरकरांनी त्या युगाला यंत्रयुग असे संबोधून त्याचे आनंदाने स्वागत केले होते आणि 'यंत्राने बेकारी वाढते का?', 'यंत्र शाप की वरदान?' असे लेख लिहून यंत्र, त्याचे फायदे, रोजगारनिर्मिती ह्याचे सखोल विवेचन करून यंत्राचा जोरदार पुरस्कार केला होता. तसेच सावरकरांनी रत्नागिरीमध्ये स्वदेशी भांडारं सुरू केली होती. लोकांनी स्वदेशी वस्तूंचा वापर करावा म्हणून सावरकर स्वत: हातगाडीवर स्वदेशी वस्तू विकायला बाहेर पडत, जेणेकरून लोकांना ह्याचे महत्त्व लक्षात यावे आणि त्यांनी स्वदेशी वस्तूंचा वापर करावा. सावरकर एक कृतीशील विचारवंत होते, त्यामुळे त्यांनी स्वतःच्या कृतीतून आदर्श घालून दिला होता. मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत ह्याची मुहूर्तमेढ वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक आणि स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांनी रोवली होती. त्यांच्या कार्याचा अभ्यास केल्यास ठिकठिकाणी त्याचे दाखले दिसून येतात. त्यांच्या ह्या स्वदेशीच्या कार्यास पुढे नेऊन त्यांच्या स्वप्नातील आत्मनिर्भर भारत घडवूया !

**- अक्षय जोग, पुणे.**

लेखक हे स्वा.सावरकर अभ्यासक असून, स्वा.सावरकर : आक्षेप आणि वास्तव, दुर्लक्षित हिंदुहितवादी, सावरकर परिचित अपरिचित या पुस्तकांचे लेखक आहेत.

*****

# जडलेला जीव.

एकदा बादशहाने दरबारात गहन प्रश्न विचारला,'' मनुष्याला सगळ्यात प्रिय काय ? " एक हजरजबाबी सरदाराने थोडा वेळ मागून घेतला. नंतर त्याने एके दिवशी प्रयोगासाठी सर्वांना आमंत्रित केले. बादशहा मानकरी प्रजासन सारेच प्रयोग बघण्यासाठी उत्सुक होते. एका मोठ्या रिकाम्या हौदात एका माकडीणीला सोडण्यात आले आणि तिचे पिल्लू देखील तिच्यासोबतच त्यात सोडले गेले. हळूहळू त्या हौदात पाणी भरण्यास नोकरांना सांगण्यात आले. तो सरदार नेमके काय करतो आहे इकडे सर्वांचे लक्ष लागले. हौदातील पाणी जसे जसे वाढू लागले तसे माकडीण तिच्या पिलाला वर धरू लागली. पण अखेरीस जेव्हा पाणी माकडीणीच्या नाकातोंडात जाऊ लागले तेव्हा तिने पिलाला पायाखाली घेतले आणि स्वतः वर येऊन मोकळा श्वास घेतला.सर्वांनी तो आश्चर्यकारक प्रयोग श्वास रोखून पाहिला. नंतर सरदारने या प्रयोगाचे तात्पर्य सर्वांना समजावून सांगितले की, 'मनुष्याला सर्वात जास्त प्रिय असतो तो स्वतःचा प्राणच ' साक्षात प्रयोग समोर झालेला होता. सगळेजण माना डोलावीत आणि सरदाराच्या बुद्धिमत्तेचे कौतुक करीत घरी गेले.बादशहाने सरदाराला मोत्यांचा हार दिला। त्यावेळी प्रजाजनांमध्ये शुभ्र वस्त्र धारण केलेली एक प्रौढ स्त्री बसलेली होती. जी एकटक सरदाराकडे बघत होती. सरदार त्या नजरेने कावराबावरा झाला. ते डोळे त्याला कुठेतरी ओळखीचे वाटले. पिंगट मधाच्या मिश्र रंगाचे असे ते डोळे. त्या तेजस्वी डोळ्यांमध्ये उदासीनता विषण्णता होती. त्या डोळ्यांनी सरदाराचा वेध घेतला. त्या प्रौढ स्त्रीने सरदाराकडे बघून मान नकारार्थी हलवली आणि ती प्रयोग स्थळावरून उठून निघून गेली.

सरदार अस्वस्थ होऊन घरी आला. सारे जण त्याचे कौतुक करत होते. आजवर असा प्रयोग आणि प्रयोगातून उत्तर कोणीच दिलेले नव्हते. मात्र राहून राहून त्या अनोळखी स्त्रीच्या, ओळखीच्या भासणाऱ्या नजरेमधील भाषा आणि भाव सरदाराला शब्दांशिवाय बरेच काही सांगून जात होते. तितक्यात पहारेकऱ्याने सरदाराला सांगितले की एक तरुण चित्रकार तुमची भेट घेऊ इच्छितो. सरदाराने त्याला आत बोलावले. तो चित्रकार आत आला. त्याच्याकडे बघितल्याबरोबर सरदार आपल्या आसनावरून एकदम उठून उभा राहिला. तेच ते पिंगट मधाच्या रंगाचे मिश्ररंगी डोळे. मात्र या डोळ्यांमध्ये भविष्याची चमक आणि उल्हास होता. तरुणाने आपल्या जवळचे एक चित्र सरदाराला दिले. चित्रावरचा आच्छादन दूर केल्याबरोबर सरदार एकदम स्तंभित झाला. त्यामध्ये एक लहानसा मुलगा एका घरामध्ये एका निळ्या सश्याला घेऊन बसलेला होता. ससा अर्धा निळा आणि अर्धा शुभ्र कापसासारखा होता. मुलाच्या डोळ्यांमध्ये पाणी होते आणि कवटाळून त्या सशाला धरून तो बसला होता आजूबाजूची मोठी माणसे त्याला समजावून सांगत होते. सगळीकडे वेल पाने जडीबुटी असे सामान पसरलेले होते. सरदाराच्या डोळ्यातून घळाघळा पाणी वाहू लागले. तो त्या चित्रकाराला त्याबाबतीत काही विचारणार एवढ्यात त्याच्या लक्षात आले की चित्रकार चित्र देऊन निघून गेलेला आहे. आपल्या पहारेकऱ्यांना हाका मारून सरदाराने ताबडतोब त्या तरुण चित्रकाराचा शोध घ्या आणि त्याचे घर कुठे आहे ते शोधून ठेवा असे सांगितले.तेथे असलेल्या प्रत्येक नोकराला एकेका रस्त्यावर पाठवले.ते चित्र घेऊन तो आपल्या शयन कक्षात आला.

त्याच्या प्रयोगाच्या सगळ्या दुबळ्या कडीवर या चित्राने आघात केलेला होता. तो विचार करू लागला,' प्रयोग करताना हे काय माझ्या लक्षात आले नव्हते. बरेच वेळा मूळ प्रश्नाला सोडून वेगळेच उत्तर पटवून घेणे माणसाला सहज जमते. देव आहे का या प्रश्नाला उत्तर देताना कोणीही सोम्या गोम्या म्हणतो,' हे जग काय उगाच चालते ? एवढा पसारा घेऊन पृथ्वी भोवऱ्यासारखी फिरत राहते तेव्हा तिला फिरवणारा असणारच की !' आता यावेळी देव या संकल्पनेच्या तळाला कुणीच जात नाही. देव हा शब्द आहे मूर्ती आहे की सृष्टी आहे हे न पाहणारे देखील देव शब्दाचा सर्रास वापर करतात. मुळात ज्याचे अस्तित्व जाणवलेच नाही त्या शब्दातून कोणता अर्थ प्रतीत होणार ? पण मानवाची ही सहज प्रवृत्ती आहे. त्यामुळेच

तो मूळ प्रश्नाला बगल देऊन वाटेल ते उत्तर पटवून घेऊ शकतो.' सरदार विचार करीत असतानाच त्याच्या पहारेकऱ्याने आत येऊन सांगितले की त्या तरुण चित्रकाराचे घर आपल्या एका नोकराने पाहून ठेवले आहे. गावाच्या अगदी शेवटी कुंभार गल्लीच्या जवळ एका झोपडीत तो आपल्या आई सोबत राहतो. सरदारने सर्व नोकरांना काही दिनार बक्षीस म्हणून दिल्या आणि कोणीही त्या चित्रकाराकडे जाऊ नये, केवळ आज रात्री घर दाखवण्यासाठी एकाने माझ्यासोबत यावे, असे सक्त आदेश दिला. त्याला ते चित्र पुन:पुन्हा हाका मारू लागले. प्रौढ वयाचा तो सरदार आपल्या बालपणात पोहोचला.त्याचे आजोबा अवंती राज्याचे राजवैद्य होते, तसेच ते वनौषधींचे संशोधन करण्यामध्ये देखील अग्रेसर असत. त्यांच्या घरामध्ये सतत पाले, वेली मुळी जडीबुटी वेगवेगळ्या खनिजांच्या आणि धातूंच्या वस्तू,काढे करण्यासाठी मोठमोठ्या पाहिल्या भट्ट्या आणि काहिली, अनेक नोकर चाकर असायचे. सतत प्रयोगामध्येच मग्न असलेले आजोबा अनेकदा प्राण्यांवर प्रयोग करायचे. नवीन वनौषधी अभ्यासण्यासाठी घरी मोर, ससे काही गुरे पाळलेली असत. अनेकदा प्रयोगात त्या प्राण्यांना जायबंदी व्हावे लागत असे किंवा मृत्यू त्यांची सुटका करीत असे. परंतु त्यातूनच नवीन औषधीचा,नवीन कल्पाचा शोध लागून पुढील काळात मनुष्याला वाचवण्यासाठी त्याचा उपयोग होई. या आनंदात प्रयोगातील सर्व मदतनीस उत्साहाने काम करीत असत. मनुष्याने स्वतःला एवढे महत्त्व द्यावे असे त्याच्यात काय आहे हेच त्या बालकाला तेव्हाही उमगत नव्हते. एकदा वैद्यराजांनी हिमाचल प्रदेशातून आणवलेल्या निल वनस्पतीची चाचणी करण्याचे ठरवले. त्यांनी त्यासाठी एका सशाला आठ दिवस विशिष्ट प्रकारचे औषधे देऊन चाचणीसाठी तयार केले. तोवर नातवाला या सशाला अशा काही प्रयोगासाठी तयार केले जात आहे हे माहितीच नव्हते. तो लहानसा शुभ्र ससा त्याला जीव की प्राण होता.ज्या दिवशी नील वनस्पतीचे चाटण त्या सशाला द्यायचे ठरले, त्या दिवशी हा नातू हट्ट करून बसला हे चाटण मला द्या.ससा मरेल, म्हणून तो सशाला कवटाळून बसला. राजवैद्यांच्या घरी या प्रयोगासाठी हा प्रयोग बघण्यासाठी राजघराण्यातली बडी मंडळी जमली होती. राजवैद्यांच्या घराचे राजघराण्याशी जिव्हाळ्याचे संबंध असल्याने स्वतः राजकन्या आणि राणीसाहेब देखील या प्रयोगासाठी आल्या होत्या. साऱ्यांनी त्या छोट्या मुलाला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. राजकन्येने पण जवळ घेऊन बालकाला समजून सांगितले. परंतु तो सश्याला सोडण्यास तयारच नव्हता. शेवटी त्याला एका खोलीत कोंडून घातले व नील वनस्पतीचे चाटण सशाला देण्यात आले. दोन तासांत हळूहळू ससा निळा पडू लागला. लहानगा नातू कसाबसा सुटुन त्या चेहऱ्याकडून निळा पाठीमागे पांढरा अशा सश्याला घेऊन बसला. आठ दिवस तो सतत रडत होता. त्याच्याच हातांवर त्या सशाने प्राण सोडला आणि ह्याने खाणे पिणे बंद केले. आजारी झालेल्या या नातवाला खूप मोठा मानसिक धक्का बसला आहे हे आजोबांनी ओळखले आणि येथील वातावरणातून त्याला बाहेर नेल्याशिवाय तो त्याची प्रकृती सुधारणार नाही हे त्यांच्या लक्षात आले. सरते शेवटी बालकाच्या आईने मन घट्ट केले आणि आपल्या बहिणीच्या घरी शेजारच्या राज्यात त्याला ती पोहोचवून आली. बालपणातल्या ह्या सगळ्या घटना हळूहळू मागे पडल्या आणि तो नवीन घरामध्ये रुळु लागला. आपल्या राज्यातील काही घडामोडी त्याच्या कानावर पडत होत्या. राजकन्येच्या बाबतीत एक वेगळीच कहाणी त्याच्या कानावर पडली. परंतु आता तसा काही संबंध नसल्याने ती कहाणी मनातील तळघरात जाऊन पडली. तो या ठिकाणीच आपले मन रमवु लागला. मावशीच्या घरात पुत्र नसल्याने तो तेथेच दत्तकही गेला आणि नंतर दरबारात सरदार म्हणून बादशहाचा उजवा हात होऊन राहिला.

रात्री सरदाराने एका विश्वासू नोकराला सोबत घेतले आणि त्या चित्रकाराचे घर गाठले.आपल्या भूतकाळाविषयी इतकी साद्यन्त माहिती असणाऱ्या त्या कुटूंबाला त्याला भेटायचे होते.

तो त्या झोपडी समोरच्या अंगणात आला,तशी ती प्रौढा बाहेर आली आणि खाटेवर त्याला बसण्यासाठी सांगून स्वतः एका चौरंगावर बसली।

"मला माहित होतं तू नक्की येशील राजरत्न !!"आपले लहानपणी चे ते आपुलकी चे नाव ऐकून तो आणखी विस्मयचकित झाला. मिश्ररंगी ओळखीचे डोळे, या अनोळखी प्रौढेच्या चेहऱ्यावर आहेत. ही कोण आहे ? ही मला इतके आतून कसे ओळखते ?

ती त्याच्याकडे पहात असतांना, त्याला एकदम ओळखीची खूण पटली. पण त्या व्यक्तीला या असल्या स्थानी भेटणे त्याला कल्पनातीत वाटले. तरीही तो पुटपुटला, "राजकन्या मधुमती देवी !! आपण ? इथे ? आणि तो कुमार आपला पुत्र ? " तिने मान डोलावली,आणि हसून म्हणाली,"येईलच तो इतक्यात. मातीची खेळणी विकायला शेजारच्या खेड्यात गेला आहे."

सरदाराला आठवले,आपल्या मावशीच्या घरी वडील आले होते, तेव्हा राजकन्येच्या विषयी दबक्या आवाजातील बोलणी. एका कलाकाराशी तिचे आलेले सबंध,त्याच्या सुटकेसाठी तिने आपल्या जीवाची पर्वा न करता,'मी राज्याच्या कायद्यानुसार माझे मस्तक अर्पण करण्यासाठी तयार आहे,' असे भर राजसभेत म्हणणे ! आणि त्या प्रियकराने तिथेच आपल्या प्रेमाच्या अंकुराची शपथ घालून तिला थांबवणे. अखेरीस त्याला मृत्युदंड देण्यात आला. राजकन्येला तिच्या गर्भातील अंकुरासह नष्ट करा, असे राजवैद्याना सांगितले गेले. पण त्यांनी तिला वेषांतर करवून या राज्यात आणून सोडले. सरदाराला सगळे लख्ख आठवले!!

त्याने तिचे चरण पकडले आणि तो ओक्साबोक्शी रडू लागला ।

मधुमती गंभीरपणे म्हणाली, '' प्राण्यांच्या प्रयोगातून माणसाची वृत्ती दाखवावी असे तुला वाटलेच कसे राजरत्न ? सशाला वाचवण्यासाठी स्वतःचा जीव देऊ केलेला तू, माझ्या गर्भातील लेकराला वाचवण्यासाठी स्वतःचे प्राण अर्पण करणारा माझ्या चित्रसेनाचा पिता आणि त्याच्यासाठी माझे मस्तक घ्या म्हणणारी मी, आपण सगळेच जाणतो , स्वतःच्या जिवापेक्षाही मनुष्याला बरेच काही प्रिय असू शकते.  एखाद्या क्षणाला स्वतःच्या प्राणांकडे त्र्यस्थपणे पाहण्याची आणि ते दुख जुगारून देण्याची शक्ती मनुष्यात असतेच आत्मसमर्पण हे मनुष्याची खरी ओळख आहे. एका प्राण्याच्या प्रयोगावरून सगळ्या मानव जातीसाठी तू चुकीचा नियम सांगितलास आणि मला माझी ओळख लपवता आली नाही. दुर्दैवी मुला, म्हणूनच तुझ्या सशाला मी पुन्हा तुझ्याकडे पोहोचवले. आता मात्र इथून पुढे आपण एकमेकांना ओळखत नाही, हे ध्यानात ठेव. तेवढ्यात तेथे चित्रसेन आला. सरदाराने त्याला घट्ट मिठी मारली आणि तो त्या अंगणातून पाठ फिरवून आपल्या घराकडे चालू लागला. त्याच्या पायाखालची माती मनाशी विचार करू लागली," माझ्याच उदरामध्ये जन्मणाऱ्या सोने नावाच्या धातूला खूप महत्त्व देणाऱ्या आणि मला मातीमोल म्हणून हिणवणाऱ्या मनुष्याला मी धान्य का देत असेन बरे ? "पण स्वभावाप्रमाणे ती हळूहळू शांत झाली।

**- डॉ. रमा दत्तात्रय गर्गे,** कोल्हापूर.

लेखिका ह्या वैचारिक, साहित्य, इतिहास विषयाच्या अभ्यासिका आहेत.
तसेच कालिदास विद्यापीठ विस्तार मंडळाच्या समन्वयक असून
महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक धोरण पुनर्विलोकन समितीच्या सदस्य आहेत.

*****

# वक्फ बोर्ड एक घातक कायदा ?

वक्फ बोर्ड म्हणजे काय ?

भारत स्वतंत्र झाल्या नंतर भरतात हा कायदा आणला गेला. सन १९५४ साली काँग्रेस सरकारच्या काळात वक्फ चा कायदा आणला गेला. आणि त्या आधारे विविध राज्यांमध्ये वक्फ बोर्डची स्थापना केली गेली. महाराष्ट्रात १९६० साली या कायद्यानुसार वक्फ बोर्डची निर्मिती झाली. इस्लामिक शरिया कायद्याप्रमाणे एकदा वक्फ झालेली जमीन कोणत्याही परस्थितीत परत त्या देशाच्या सरकारकडे जात नाही. ती संपत्ती कायमस्वरूपी इस्लामची आहे. त्यावर कोणताही भारतीय कायदा लागू होत नाही. देशातील सर्व 'वक्फ' बोर्डकडे आठ लाख एकरपेक्षा जास्त जमिनीवर पसरलेल्या एकूण ८ लाख, ५४ हजार, ५०९ मालमत्ता आहेत. महाराष्ट्रात मागील ६४ वर्षात वक्फ बोर्डकडे एकूण ९२ हजार एकर जमीन जमा झाली आहे. याचाच दुसरा अर्थ दरवर्षी वक्फ बोर्डकडे १५०० एकर जमीन नवीन नावावर होते. याचा अर्थ भारतात इस्लामिक राष्ट्राची पेरणी होत आहे का ? असा प्रश्न उभा राहतो.

भारत-पाकिस्तान फाळणी झाल्यानंतर दोन्ही देशातील लोकांच्या संपत्तीचे काय ? असा प्रश्न निर्माण झाला. त्या वेळी पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान लियाकत अली व भारताचे तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्यात एक करार झाला व त्यानुसार विस्थापित लोकांची संपत्तीचे काय करायचे हा अधिकार त्यांनाच (लोकांना) देण्यात आला. असे असूनही पाकिस्तानातील हिंदूची (विस्थापित) संपत्ती तेथील लोकांनी आणि सरकारने ताब्यात घेतली. परंतु भारतातून पाकिस्तानात गेलेल्या लोकांची संपत्ती पुढे वक्फ कौन्सिल तयार करण्यात आली व ती जमीन वक्फची म्हणजेच अल्लाह / इस्लामला दान केली असे ठरवून वक्फ करण्यात आली. म्हणजे या मोठ्या जमिनीवर भारताचा किंवा भारत सरकारचा काहीही अधिकार उरला नाही. याचसाठी पुढे केंद्रीय वक्फ परिषद निर्माण करण्यात आली.

हिंदूंच्या मालमत्तेवर वक्फची नजर ?

**मनात प्रश्न उपस्थित करणार्या काही घटना -**

गुहा, अहिल्यानगरः संत कानिफनाथ समाधीवर बेकायदेशीर अतिक्रमण अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथील ४०० वर्षे जुन्या संत कानिफनाथ समाधी मंदिराच्या ४० एकर जागेवर वक्फ बोर्डने बेकायदेशीरपणे अतिक्रमण करून त्याला पीराचा दर्गा म्हणून नवीन नामकरण केले आहे. त्यांनी केवळ जमीन बळकावली नाही तर कागदपत्रांमधून कानिफनाथ समाधी मंदिराचा उल्लेख काढून टाकला. या ठिकाणी १३ नोव्हेंबर रोजी दीप अमावस्येच्या मुहूर्तावर हिंदू पुजारी आणि हिंदू भाविकांना इस्लामवाद्यांनी मारहाण केली होती. हिंदूंनी पारंपरिक पद्धतीप्रमाणे धार्मिक स्थळी कीर्तन-भजन आणि भंडारा आयोजित केला होता. सकाळी ८.३० ते ९.०० च्या दरम्यान ३५ ते ४० मुस्लिम गुंड आत घुसले व उपस्थित संतांना व भक्तांना मारहाण केली. यामध्ये राजू दगू शेख, रज्जाक दगू शेख, सत्तार बशीर शेख, नासिर फतू शेख, इब्राहिम इस्माईल इ. सहभागी होते.

कोल्हापूरः  छत्रपती शाहू महाराजांची मालमत्ता बळकावण्याची प्रक्रिया सुरू छत्रपती शाहू महाराजांनी मुसलमान तथा अन्य समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी कोल्हापूर येथे स्थापन केलेल्या 'द मोहामेडन एज्युकेशन सोसायटी ची कोट्यवधी रुपयांची संपत्ती बळकावण्याची प्रक्रिया वक्फ बोर्डने चालू केली आहे. अलीकडे एक प्रकाशित झालेल्या बातमीनुसार, राजर्षी शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या मोहम्मदन एज्युकेशन सोसायटीच्या ३५०० कोटी रुपयांच्या मालमत्तेवर वक्फनी दावा केला आहे.

'द मोहामेडन एज्युकेशन सोसायटी'ची (मुस्लिम बोर्डिंगची) मूळ कागदपत्रे सादर करा, असा आदेश 'वक्फ बोर्ड'ने

धर्मादाय आयुक्तांना दिला आहे. त्यामुळे 'मुस्लिम बोर्डिंग'ची कोट्यवधी रुपयांची मालमत्ता आता वक्फ मंडळाच्या नियंत्रणाखाली येणार असल्याचे समोर आले, या सोसायटीची नोंदणी 'मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०' अनुसार आहे. त्यामुळे सदरच्या मालमत्ता वक्फची असल्याचे मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.बी. ताशिलदार यांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे. या संदर्भात 'महाराष्ट्र वक्फ लिबरेशन प्रोटेक्शन टास्क फोर्स'चे संस्थापक सलीम मुल्ला म्हणाले, "मुस्लिम बोर्डिंगने संचालकांचा कालावधी संपूनही निवडणूक घेतली नाही, मृत सभासदांची नावे कागदपत्रांवरून वगळली नाहीत, समाजातील गरजू-विधवा महिलांना लाभ दिलेले नाहीत. वास्तविक सोसायटीच्या मालमत्तांचे हस्तांतरण वक्फ बोर्डकडे यापूर्वीच होणे अपेक्षित होते; मात्र सोसायटीने अशी पावले उचलली नाहीत. सोसायटीने स्थापनेच्या मूळ उद्देशाला तिलांजली दिली असून अनेक नियमबाह्य गोष्टी केल्या आहेत. त्यामुळे 'मुस्लिम बोर्डिंग'ची कायदेशीर नोंदणी 'वक्फ बोर्ड 'कडे झाली आहे."

वर्ष १९०६ मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी मुसलमान समाजाच्या शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीसाठी दसरा चौक येथे 'मुस्लिम बोर्डिंग'ची स्थापना केली. याच्या उत्पन्न वाढीसाठी रुकडी, कसबा बावडा परिसरात त्यांना जमिनी देण्यात आल्या होत्या. या उत्पन्नामधून मिळणाऱ्या पैशांचा मुसलमान, तसेच अन्य समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी वापर करावा, असे आदेश शाहू महाराजांनी दिला होता.

जळगावः ऐतिहासिक पांडववाडा वास्तूवर वक्फचा दावा जळगाव जिल्ह्यातील एरंडोल येथे 'पांडववाडा' नावाने शहराच्या मध्यवर्ती असलेल्या ठिकाणावर ऐतिहासिक वास्तू आहे. ही ऐतिहासिक वास्तू प्राचीन काळापासून हिंदू आणि जैन समाजाच्या ताब्यात होती. या इमारतीत हिंदू आणि जैन समाजाचे लोक पूजा आणि धार्मिक विधी करीत असत आणि अजूनही करतात. पण मुस्लिम समुदायाने ही जागा बळकावून वक्फ बोर्डकडे हस्तांतरित केली व जागेवर ताबा सांगितला आहे. या जागेत पूर्वी अस्तित्वात नसलेल्या थडग्याचीही निर्मिती करण्यात आली आहे व याच ठिकाणी मदरसाही सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे पांडववाडा संघर्ष समितीकडून ही वास्तू सरकारच्या मालकीची व पुरातत्त्व खात्याच्या अंतर्गत असून त्याचा ताबा सरकारकडे घ्यावा अशी मागणी केली आहे. याच ठिकाणी इतिहासात पांडव येऊन गेले असल्याची माहिती स्थानिक सांगतात. तसेच १३व्या शतकाच्या अगोदर येथे जैन मंदिर असल्याचे पुरावे आहेत. पूर्वापार येथे जैनांची बस्ती व ५२ मंदिरे (जिनालय) होती आणि ५२ जिनालयांपैकी 'पांडववाडा' नावाचे दिगंबर जैन मंदिर म्हणून हे ठिकाण प्रसिद्ध आहे.

छत्रपती सांभाजीनगरः जालना रोडवरील मालमत्तेवर वक्फचा दावा ऑगस्ट २०१४मध्ये, वक्फ बोर्डने औरंगाबाद महानगरपालिकेला (AMC) नोटिस पाठवून जालना रस्त्यालगतच्या एका वादग्रस्त जागेच्या मालकीचा दावा केला आणि रस्ता रुंदीकरणासाठी दुसऱ्या पक्षाकडून जमीन मिळविण्याची प्रक्रिया थांबवण्याची विनंती केली. एएमसीच्या नगर नियोजन विभागाने विकास आराखड्यातील रस्त्याच्या बांधकामासाठी जमीन संपादित करण्यासाठी अन्य पक्षाला १.८ कोटी रुपये देण्याची शिफारस केली. १९ जुलै रोजी नागरी स्थायी समितीच्या सद यांनीही चुकीचे कारण देत या प्रस्तावाला विरोध केला होता. काँग्रेसचे नगरसेवक मीर हिदायत अली यांनी सांगितले की, महापालिका चुकीच्या कारणांसाठी आराखड्याला प्राधान्य देत आहे.

मुंबई: अंबानींच्या घरावर वक्फचा दावा ? अरविंद केजरीवाल यांनी मध्यंतरी असा दावा केला होता की, भारतीय उद्योगपती मुकेश अंबानी यांचे मुंबईतील घर बक्फ बोर्डच्या जमिनीवर बांधले आहे. वृत्तानी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डने नोव्हेंबर २०१७ मध्ये घोषित केले की २००४-०५ च्या आसपास झालेल्या जमिनीची विक्री बेकायदेशीर होती. कारण ती वक्फ मालमत्ता होती. दरम्यानच्या काळात आणि त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयात अनेक खटले दाखल करण्यात आले. त्याच महिन्यात, नोव्हेंबर २०१७मध्ये, राज्य वक्फ बोर्डने प्रतिज्ञापत्र दाखल केले. वक्फ बोर्डच्या सीईओने

प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, जमीन हस्तांतरण बेकायदेशीर आहे कारण ती वक्फची मालमत्ता आहे.

मालेगावः खोट्या कागदपत्राआधारे जमिनी लाटल्या मालेगावमध्ये लॅण्ड जिहादचा विषय जोर धरू लागला आहे. दसाने, मौजे धाणे, चिखल आहोळ, वडगाव येथे बनावट दस्तऐवज आधारे अयोग्य नोंदी करून जमिनीची कागदपत्रे तयार करण्यात आली.

सोलापूरः साखर पेठ परिसरातील हिंदूंच्या जमिनी बळकावल्या भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी विधान परिषदेत बोलताना सांगितले की, सोलापूर महापालिका हद्दीतील साखर पेठ परिसरात सीटी सर्व्हे क्रमांक ९९/८० येथे दीडशे वर्षांपासून मोठ्या संख्येत हिंदू लोक राहत आहेत. या ठिकाणी वक्फ बोर्डकडून स्थानिकांना वारंवार नोटिस देऊन भूमी बळकावण्याचा प्रयत्न होत आहे. याविरोधात स्थानिकांनी अनेक मोर्चे काढले. येथील रहिवासी महापालिकेत अनेक वर्षांपासून कर भरतात, त्यांच्याकडे प्रॉपर्टी कार्ड आहे, तरी अद्याप ७/१२ वर नावे लागू शकली नाहीत. एका विशिष्ट समाजाचे लोक त्यांना वारंवार त्रास देत आहेत, घर सोडून जाण्यासाठी धमक्या दिल्या जात आहेत.

नारायण राणे यांनी केलेल्या व्यक्तव्यानुसार सोलापूरच्या सिद्धेश्वर मंदिराच्या जागेवर सुद्धा वक्फ बोर्डने दावा सांगितला आहे.

छत्रपती संभाजीनगरः खंडोबा मंदिराचे थडग्यात रूपांतर करण्याचा डाव छत्रपती संभाजीनगरच्या शेजारी सातारा गाव आहे. गावाच्या दक्षिण बाजूस कडेपठार नावाचा भला थोरला डोंगर आहे. त्या डोंगरावर खंडोबाचं प्राचीन मंदिर आहे. मंदिर जवळपास उद्ध्वस्त अवस्थेत आहे. खंडोबा मंदिराच्या साधारण पश्चिमेला साधारण ३०० मीटर अंतरावर, प्राचीन दगडी बांधकामातील एक ओटा आहे. त्यावर दीपस्तंभाच्या तुटलेल्या भागाचा एक खांब आजही उभा आहे. त्यासाठी वापरलेला दगड हा मंदिराचाच घडीव आहे. त्यावर पुसट मूर्तीही दिसतात, पण, मागच्या साधारण पाच-सहा वर्षांपासून ती जागा बाळकवण्याचा प्रयत्न सुरू आहे. तिथल्या सर्व घडीव दगडांना पण चुना मारून त्यावर लोखंडी पाइप वेल्डिंग करून पत्र्याचे पक्के शेड बनवलेले आहे. यापूर्वी देखील हे शेड काही खंडेराय भक्तांनी वारंवार काढल्याची माहिती मिळाली. पण वारंवार त्यावर प्रतीक उभारून हे बाळकवण्याचा प्रयत्न आहे.

भारताच्या अस्मितेला, अखंडतेला आणि सुरक्षेला धोकादायक अशा घातक कायदा हद्दपार झाला पाहिजे.

**- ॲड. विजय भांबेरे,** अकोला.

लेखक सामाजिक कार्यकर्ते असून कायद्याचे व इतिहासाचे अभ्यासक आहेत.

*****

# लेक.

अहो ऐकल का ? , आज आठवडी बाजार आहे. दिवाळी जवळ येत आहे, आपलं नेहमीचच आहे. चिऊला एखादा फ्रॉक  आणा म्हणते मी, असे म्हणत पदराला बांधलेले पैसे सावित्रीने, चिऊच्या बाबाला दिले. माया... मनातलं बोललीस तु, मी पन तोच विचार करत आहे. आपल्या अंगणात खेळणाऱ्या पोरीकडे पाहत रामराव सावित्रीला बोलला. चिऊ ये चिऊताई चल बाजारात जाऊ आपण, तुला खाऊ देतो घेऊन... असे म्हणत सावित्रीकडे पहात हीला पण नेतोय सोबत हिच्या मापाचा घेता येईल. बापाचा आवाज ऐकून लेक दुडुदुडू आली. रामरावची तयारी होई पर्यन्त सावित्रीने लेकीला जेऊ घातले व बाजारात बापाचा हात सोदायचा नाही, असे बजावून सांगितले. तिने पण मान हलवली. थोडया वेळात, चिऊ झालं काय ? सायकलची चेन लावत रामरावनी घरात आवाज दिला,  बापाचा आवाज ऐकून, आईकडे पहात आपल्या बोबड्या आवाजात.. आई माये खाऊचे पैसे दे, मी बाजारात चाल्ली,  किती दिऊ माझ्या बाळाला, चिऊ ने दोन बोट दाखवत म्हटल दोन पैसे , ( तिला फक्त पैसे माहीत होते पण त्याचे मुल्य माहीत नव्हते )तीचे बोबडे बोल ऐकून तिच्या दोन हाती दहा दहा पैशयाचे दोन नाणी दीले, ते घेत बापलेक बाजारा निघाले. रमतगमत बाजारात पोचले, रामरावनी लेकीकडे पाहत म्हटले, चिऊ आपण पयले बाजार घेऊ, अन तुला खाऊ, अन छान फ्रॉक घेऊन अन घरी जाऊ. अस ऐकून लेकीने आनंदाने मान डोलवली. लेकीचा समजूतदार पणा पाहून रामराव गहिवरला. स्व:ताला सावरत बाजार आटोपून लेकीसाठी खाऊ घेत, कपड्यांच्या दुकानात शिरला.  रामराम भाऊ,  माया तिन वर्षाच्या लेकीसाठी (चिऊ ला पुढे करत) चांगला फ्रॉक दाखवा. दुकानदारांनी तिन चार प्रकारचे फ्रॉक दाखवून त्या पैकी एक चिऊच्या अंगाला लावत दुकानदाराकडून भाव करून लेकीला विचारले आवडला तुला. तिने आनंदाने आपल्या मुठीतल्या पैश्याकडे पहात मान डोलवली रामराव ने फ्रॉकचे पैसे देऊन निघणार.. तेच

चिऊ परत त्या कापडाच्या दुकानात गेली,  आणि आपल्या बोबड्या भाषेत काका काका दुकानदार काय गं मुली काय पाहिजे तुला आता,  काका काका मलं किनई मला किनई , दोन्ही हात पुढे करत......

माया बाबाले एक कुर्त अन, अन मायले एक साडी, लय फटले हो कपडे तेयचे अस मनत घरून बांधलेल्या मुठा दुकानदारा पुढे मोकळ्या केल्या. दुकानदारांनी ते पैसे पाहून, पोरी एवढ्यास पैसात एवढे कपडे येत नाही. अधिक पैसे पाहिजात. हे ऐकून चिऊ हिरमुसली व रडक्या स्वरात म्हणाली,  काका आता माया कडे नाहीत मले खाऊ चे पैसे भेटले की आणुन दिन. हा सर्व प्रकार तिचे वडील पहात होते त्यांना ऐवढे गहिवरून आले की धावत जाऊन चिऊ ला गच्च मिठी मारली की जणु बापलेकीची खुप वर्षानी भेट झाली. स्व:ताला सावरत चिऊ आज खुप मोठी झाली गं तु चल आपण नंतर आई व माझ्या साठी कपडे घेऊ व तिला सायकलवर बसण्यासाठी कडे वर घेतले. पण तिचे सारे लक्ष दुकानातल्या कपडयाकडेच. हा सर्व प्रकार दुकानदार स्तब्ध होऊन पहात होता. बापलेकीचे प्रेम पाहून तो पण गहिवरला,  डोळे पुसत चिऊ ला आवाज दिला, ऐ पोरी,  ईकडे ये,  बापाच्या कडे वरून उतरत धावत गेली तिला आशा होती दुकानदार काका काहीतरी करतील, दुकानदार मुली दे ते पैसे लय मोठे आहेत हे या कपडयापेक्षा अन तिच्या हाती मायबापासाठी कपडे दिले. चिऊ कपडे घेत आनंदाने बापाकडे धावत पळत गेली, अन बापाले कपडे दाखवून विचारले बाबा छान आहेत न कपडे....असे म्हणत बापाने पुन्हा तिला आंनदाने मिठीत घेतले अन सायकलवर बसत गावाच्या दिशेने निघाले अन बापलेकीला दुकानदार दिसेनासे होई पर्यंत स्तब्धपणे पहातच राहीला, पहातच राहीला...

**- संतोष कान्हेरकर,** **अमरावती.**

लेखक विविध प्रसार माध्यमांमध्ये ललित विषयात कथा, कविता लेखन करतता.

*****

# सकल जीवांच्या ठाई राम.

भारत भूमीला हजारो वर्षांची परंपरा आहे. मानवी जीवनाचा हा प्रचंड प्रवाह समृद्ध होत पुढे जात आहे. बुद्धी आणि भावना यांचा सुंदर मिलाफ आपल्या भारतीय संस्कृतीत आहे. राम, कृष्ण हे आपल्या संस्कृतीचे प्रमुख नायक. हे आपल्याला कशाप्रकारे जगात जगावे हे सांगतात. जेव्हा आदर्शांचा विचार येतो तेव्हा प्रत्येक आईला वाटते आपला मुलगा रामा सारखा असावा. भावाला भाऊ, पत्नीला  पती, मित्राला मित्र, गुरुला शिष्य आणि भक्ताला पूजनीय ,जनतेला शासक रामच असावा असे वाटते.

म्हणूनच प्रत्येकाच्या जीवनात राम एकरूप झाला आहे. त्याने समाजाच्या सर्व अंगांना सामावून घेतले आहे .त्यांच्यातील सदगुणांना स्वभावाच्या वैशिष्ट्यांना फुलवून ,खुलवून त्यांच्यात खऱ्या अर्थाने राम भरला आहे. तो प्रत्येकाच्या घरात राम म्हणून जन्म घेतो आणि मरतानाही राम म्हणतो. विचार, विकार आणि व्यवहार यात  कोठेही मर्यादा न सोडण्याची शिकवण राम देतो. जीवनाच्या प्रत्येक पायरीवर राम एकरूप आहे .ॆराम रखे ऐसे रहो ॅ ही म्हण आहे .यात रामाप्रती समर्पण भावना आहे.

राम हा शब्द संस्कृत रम धातूपासून झाला आहे. रम म्हणजे रममाण होणे .सर्व प्राणीमात्रांच्या हृदयात रममाण होणारा तो राम. हा प्रत्येकाचा राम कसा आहे ते आपण या लेखात पाहू.

वाल्मिकीचा राम - रत्नाकर नावाचा डाकू ,ज्याला वाल्या कोळी म्हणतात. ज्याला लुटमार करणेच फक्त माहीत होते .कुटुंबासाठी कसेही पैसे मिळवणे एवढेच त्याच्या जीवनाचे ध्येय होते .भुकेसाठी, हव्यासासाठी काहीही करणारा म्हणजे वाल्या. आजच्या भौतिकवादी युगात तर वाल्यावृतीचे लोक तुम्हाला सर्वत्र दिसतात .त्यांच्यासाठी राम समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. ज्याला नारदाने जागे केले, राम म्हणताना म्हणताही येत नव्हते, ज्ञान म्हणजे काय याचा गंधही नव्हता, असा वाल्या रामनामाने वाल्मिकी ऋषी झाला .वाल्यानेही नारद मुलींवर पूर्ण विश्वास ठेवून रामनाम

स्वीकारले. वाल्यामध्ये परिवर्तन झाले. माणसालाही मारताना न द्रवणारा वाल्या क्रौंच पक्षाच्या जोडीतील एकाला मारल्यावर द्रवतो, दुःखी होतो .विध्वंसापेक्षा सृजनशीलता महत्त्वाची वाटू लागल्याने, त्याचा वाल्मिकी ऋषी झाला. या वाल्मिकी ऋषींनी भारतीय संस्कृतीच्या धमन्यांमध्ये वाहणारे युगायुगात टिकणारे आर्ष काव्य रामायण निर्मिले.

कौसल्येचा राम- कौसल्येचा राम लोभस आहे .थोडा हट्टी आहे .चंद्राची मागणी करणारा आहे. तिच्या मृदुल वात्सल्याला मूर्त रूप देणारा आहे. चार भावंडात खेळणारा सुकुमार सावळा बालक आहे .त्याच्या बाललीलात विध्वंस नाही ,मृदुलता आहे .आज्ञा पालन आहे .विश्वामित्र ऋषींनी बोलवल्यावर त्यांच्याबरोबर जाण्याची नम्रता आहे. शिकण्यासाठी असलेली उत्सुकता आहे .त्यामुळे प्रत्येक आईला रामा सारखा पुत्र असावा असे वाटते.

विश्वामित्रांचा शिष्य राम- विश्वामित्र म्हणजे मूर्तीमंत ज्ञान आणि ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव आहेत. यज्ञाच्या संरक्षणासाठी ते दशरथा कडून  रामास घेऊन जातात. विश्वामित्रांचा राम एकीकडे यज्ञासारख्या पवित्र कामात विघ्न आणणाऱ्या त्राटिका नावाच्या दुष्ट स्त्रीचा वध करतो तर दुसरीकडे शापित अहिल्या शिळा मुक्त करतो .असा मारक आणि तारकही राम आहे. विश्वामित्राच्या सानिध्यात श्रीरामाची प्रगती झाली. अनेक शस्त्रास्त्रे रामाला मिळाली. शंका न घेता केलेल्या कृतीमुळे जनक राजाचा पण जिंकता आला. सीतेची प्राप्ती झाली .असा शिष्याची उत्तम लक्षणे सांगणारा राम आहे.

दशरथ पुत्र राम - रामाचा राज्याभिषेक करावयाचा ठरविला आणि कैकयीने तिच्या दोन वरांची आठवण दशरथाला करून दिली. येथे श्रीरामाचे रामत्व सर्वार्थाने दिसते .राज्याचा राजा होण्याची पात्रता ज्याचे ठिकाणी आहे, ज्याचा उद्या

राज्याभिषेक होणार आहे असा राम, दशरथाने वनवासात जायचे असे सांगितल्यावर विचलित होत नाही. भरजरी वस्त्रांचा, आभूषणांचा त्याग करून ,वल्कले परिधान करून वनात जातो. कैकयीला दुषणे देत नाही की दशरथाला प्रश्न विचारत नाही .कौसल्येकडे नाराजी दाखवत नाही .सीता बरोबर येण्यास तयार होते .तिला नाकारत नाही. लक्ष्मण तर त्याचा पाठीराखा ,त्यालाही येण्यापासून परावृत्त करत नाही .प्रत्येकाला त्याच्या वृत्तीनुसार वागण्याची परवानगी देतो आणि मार्गक्रमण करतो. आदर्श जीवनाचा मार्ग दाखवतो. भरत सेनेसह रामास आणावयास येतो तेव्हाही त्याला समजावून राम परत पाठवतो .भरत पादुका ठेवून राज्य कारभार करतो म्हटल्यावर त्यालाही राम मान्यता देतो .ज्याचा जसा स्वभाव आहे तसे तो वागेल, आपण आपल्याला योग्य असेल ते करावे. आपल्या कामात मग ते कोणतेही असो रममाण व्हावे. ही गोष्ट राम शिकवतो. कोणतीही गोष्ट धर्मसंमत केली तर ती चिरकाल टिकते हे राम शिकवतो.

शबरीचा राम - जंगलामध्ये मातंग ऋषींची सेवा करणारी वृद्धा शबरी. मातंग ऋषींच्या सांगण्यानुसारच रामाची वाट पाहणारी शबरी म्हणजे मूर्तिमंत भक्ती. ज्ञान आणि तपस्या यांचे एकत्रिकरण म्हणजे शबरी. रामासाठी रानमेवा गोळा करणारी पारखून ,निरखून रामाला देणारी शबरी येथे समजते.कसलीही अपेक्षा न ठेवता रामालाच सुग्रीवाकडे जाण्याचा सल्ला देणारी शबरी जाणवते.येथे चक्रधारी राजाला आपल्या भक्तीने स्वतःच्या घरी खेचून आणणारी शबरी जाणवते.तिच्या भक्तीचा तेवढाच आदर करणारा श्रीराम ,श्रद्धा आणि भक्ती असेल तेथे राम आहे हे दाखवून देतो. श्रीराम शबरीची उष्टी फळे खातात .तिला मातेच्या रूपात, भक्ताच्या रूपातही स्विकारतात. त्यामुळेच रामसेनेस पुढे जाऊन निषाधाबरोबर भिल्ल योद्धा मिळाले .असा राम शबरीचा आहे,निषाद आणि केवटचा पण आहे .

सुग्रीवाचा राम - राम सुग्रीवास मित्र बनवितो. वास्तविक वालीला मारल्यानंतर किश्किंदा श्रीरामाची होते .पण राम त्यावर हक्क सांगत नाही .सुग्रीवास राजा करतो. राज्य त्याचे त्याला परत देतो. राम दुष्टांचा विनाश करतो. येथे रामास हनुमंत भेटतो. येथे श्रीराम मित्रतेची व्याप्ती सांगतात .एकमेकांच्या सुखदुःखात एकरूप कसे व्हावे याची शिकवण देतात. सुग्रीवाचे बलपुर्वक घेतलेले राज्य व पत्नी त्यास मिळवून देतात .सीतेच्या शोधात रावणाबरोबर लढण्यास सुग्रीवाची मदत घेतात.

हनुमंताच्या ह्रदयी राम - रामभक्त हनुमान म्हणजे भक्तीचे सर्वोच्च शिखर .भक्त कसा असावा हे हनुमंताकडून कळते. शौर्य ,ताकद ,बुद्धी यांचे सुंदर मिश्रण हनुमानात दिसते. अशोक वनात सीता भेटल्यानंतर तिला आश्वस्थ करून लंकादहनाचे कार्य हनुमान करतो .त्यास त्याच्या मर्यादा चांगल्या ठाऊक आहेत. त्यामुळे तो उत्तम प्रकारे दिलेले कार्य करतो .द्रोणागिरी पर्वत उचलून औषधी देण्याचे काम हनुमान करतो. प्रत्येक ठिकाणी आपल्या मर्यादित राहून काम करतो. मरुताचा पुत्र हनुमान श्रीरामाचा श्वास आहे .असे आपल्याला जाणवते.

बिभीषणाचा राम- बिभीषण हा सत्याच्या मार्गाने जाणारा आहे. त्याची रावणाबरोबर घुसमट होते .रावणास तो अनेक सत्याचे सल्ले देतो .ज्या राज्यात मंत्री, सल्लागार, बंधू योग्य सल्ला देऊ शकत नाहीत. राजाचे भयाने त्यास आवडेल तसा सल्ला देतात, ते राज्य संपुष्टात येते .पर स्त्रीकडे पाहण्याचा सुद्धा विचार घातक आहे .रावण बिभीषणाची निर्भत्सना करतो. त्यास राज्यातून घालवून देतो .तेथे राम त्यास अभय देतो .लंकेचे राज्य त्यास प्राप्त करून देतो . जेथे जेथे अन्याय आहे तेथे तेथे राम आहे. सुष्ट आणि दुष्ट शक्ती कशा कार्यरत असतात. हे रामाच्या चरित्रावरून समजून येते .विनम्रता ,शांती, विवेक हे सद्गुण अंगी बाणवावेत. अहंकार आणि दुसऱ्याला कमी लेखण्याची वृत्ती असेल तर त्याचा विनाश होतो .अत्यंत श्रीमंत आणि बलशाली रावणास रामाने वानरसेनेच्या साह्याने हरविले.

सुस्थिती ,समृद्धी , समाधान, कर्तव्यपूर्ती, नात्यातील बांधिलकी , प्रेम,आदर ,जे ज्याचे आहे त्यास देणे ,माझे नाही त्यावर अधिकार न सांगणे हे भारतीय संस्कृतीचे संस्कार रामचरित्रातून आले आहेत. असे स्पष्ट होते .अंगद ,जांबुवंत यांच्यासारख्या पाठिंबा देणाऱ्या बलशाली ,विवेकी व्यक्ती रामाने पारखल्या. आपल्याबरोबर असलेल्या सर्वांना आपल्या

कामांमध्ये समाविष्ट करून घेण्याची नेतृत्वकला रामा मध्ये होती .छोट्याशा खारीपासून बलशाली हनुमाना पर्यंत सर्वच जणांना आपल्या मध्ये सामावून घेणारा राम भारतीय संस्कृतीतील आदर्शांचा आदर्श आहे . आजचे युग कृत्रिम बुद्धिमत्तेचे आहे . त्यामध्ये पॅटर्न ॲनालिसिसकरून आपणास त्याचा उपयोग कार्यामध्ये करण्याचे सांगितले जाते .यामध्ये मशीन लर्निंग आणि डेटा सायन्स हे एकमेकांशी जोडलेले असतात.आपण जर आपल्या बुद्धीला डेटा साठवणारी समजले व शरीर,मन,चित्ताला मशीन लर्निंग प्रक्रिया मानले तर रामायणाच्या पात्रांना घेऊन आपण आपले कितीतरी प्रश्न सोडवू शकतो. कितीतरी समस्यांना पर्याय शोधू शकतो.कृत्रिम बुद्धिमत्तेची पद्धत श्रीरामाच्या चरित्रात आपण पाहू शकतो. जनमानसातील विविध वृत्तींचा आदर्श रामायणातील विविध पात्रांना घालून दिला आहे. म्हणजेच मानवी वृत्तींचे नमुना विश्लेषण केले आहे.म्हणजे श्रीराम हा आजच्या युगाचे सुद्धा प्रतिनिधित्व करतो ,हे वरील उदाहरणांवरून स्पष्ट होईल .

सगळ्यात शेवटी राम ही आपल्यातील जाणीव आहे .राम तत्व चराचरात रममाण झालेले सृजनत्व आहे. असे म्हणता येईल.

**- डॉ. वैशाली काळे - गलांडे (गीताग्रजा),** कोल्हापूर.

लेखिका आयुर्वेद सल्लागार असून शास्वत विकास या संकल्पनेच्या अभ्यासक आहेत.
अनेक नियतकालिक व दिवाळी अंकात नियमित लेखन करतात.

*****



# ‘गोमाता-राज्यमाता’ एक ऐतिहासिक निर्णय.

भारतीय संस्कृतीमध्ये गायीला महत्त्वपूर्ण स्थान आहे. धार्मिक, वैद्यकीय तसेच कृषी क्षेत्रामध्ये गायीचे योगदान अनन्यसाधारण आहे.

महाराष्ट्रात २०१४ साली संपूर्ण गोवंशहत्या बंदीचा कायदा करण्यात आला, परंतु योग्य अंमलबजावणी अभावी प्रभावी परिणाम मिळू शकले नाहीत. एप्रिल २०२३ मध्ये महाराष्ट्रात प्रथमच गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली. ज्यात पशूंचे संवर्धन, संरक्षण तसेच कल्याण करणे व त्यासाठी कार्यरत असणाऱ्यांचे पर्यवेक्षण करणे हे प्रमुख उद्दिष्ट होते. गो सदन, गोशाळा, पांजरपोळ व गोरक्षण संस्थांची नोंदणी करून अस्तित्वात असलेल्या कायद्यांद्वारे पशूंच्या संरक्षणाची सविस्तिती करण्याचे काम गोसेवा आयोगामार्फत केले जात आहे. यातून अनेक दशकांच्या गो सेवकांच्या अथक परिश्रमांना आलेले यश म्हणजे महाराष्ट्र राज्यात देशी गाईंना राज्य माता - गोमाता म्हणून घोषित करण्यात आले.

वैदिक काळापासून गाईचे धार्मिक, वैज्ञानिक तसेच आर्थिक महत्त्व लक्षात घेऊन त्यांना कामधेनु म्हणून संबोधण्यात येते. महाराष्ट्र राज्याचा विचार केल्यास मराठवाडा विभागात देवणी, लाल कंधारी, विदर्भात गवळाऊ, उत्तर महाराष्ट्रात डांगी तर पश्चिम महाराष्ट्रामध्ये खिल्लार या देशी गाईंच्या विविध प्रजाती आढळतात. २०१९ ला केलेल्या २० व्या पशुगणनेनुसार देशी गाईंची संख्या १९ व्या गणनेपेक्षा २० टक्क्यांनी कमी झाली आहे. दुर्दैवाने या संख्येत दिवसेंदिवस आणखी मोठ्या प्रमाणात घट होताना दिसत आहे. देशी गायींच्या चिंताजनक पार्श्वभूमीचा विचार घेऊन पशुपालकांना देशी गायींचे पालन पोषण करण्यास प्रेरित करण्याच्या उद्देशाने देशी गायीस राज्यमाता गोमाता घोषित करण्याची आवश्यकता होती.

देशी गाईच्या दुधात मानवी आहारात आवश्यक असणारे पौष्टिक मूल्य अधिक आहे. मानवी शरीराच्या पोषणासाठी अत्यावश्यक असणारे अन्नघटक मुबलक उपलब्ध असल्याने देशी गायीच्या दुधाला पूर्ण अन्न म्हटले जाते. देशी गायीच्या दुधाची मानवी आहारातील उपयुक्तता, आयुर्वेद चिकित्सा पद्धती, पंचगव्य उपचार पद्धती तसेच देशी गायींच्या शेण व गोमुत्राचे सेंद्रिय शेती पद्धतीत अनन्यसाधारण महत्त्व आहे. या सर्व मुद्द्यांना त्याचप्रमाणे देशी गायींच्या भारतीय संस्कृती त वैदिक काळापासून असलेल्या स्थानाला असलेले महत्त्व लक्षात घेऊन देशी गायींना राज्यमाता -गोमाता म्हणून घोषित करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला.

राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू झाल्यानंतर वाचलेल्या भाकडगायी सांभाळण्याचे मोठे आव्हान व्यवस्थेसमोर होते. गोशाळा पालक व गोसेवक आपापल्या परीने पोटाला चिमटा घेऊन भाकडगायी सांभाळण्याचे शिवधनुष्य इतके वर्ष पेलत आले आहे. परंतु देशी गोवंशांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असल्याने शासकीय मदतीची अत्यंत आवश्यकता होती,ज्याची मागणी सातत्याने गोसेवकांकडून केली जात होती. या धर्तीवर आता गो शाळांना देखील अनुदान देण्याची योजना सरकारने जाहीर केली आहे, जी तमाम गोमाता भक्तांना दिलासा देणारी ऐतिहासिक घटना आहे.

राज्यात गोवंश हत्याबंदी कायदे आल्यानंतर अनुत्पादक व भाकड पशुंचा सांभाळ करणे शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना मोठ्या प्रमाणावर कठीण जात होते. त्यामुळे काही परिस्थितीत अशी भाकड जनावरे मोकाट सोडली जातात किंवा लपून छपून कत्तलखान्यात विकली जातात. बरेचदा जागरूक नागरिकांतर्फे ही जनावरे गोशाळेत पाठवली जातात परंतु त्यांनाही जनावरे सांभाळणे आता अवघड होत असल्याने अनुदान प्राप्तीची योजना ही देशी गायींच्या संवर्धनसाठी वरदान ठरणार आहे.

एकात्मिक पाहणी योजनेच्या २०१८-१९ च्या अहवालानुसार देशी गाईंचे प्रतिदिन प्रति दूध उत्पादन साडेतीन लिटर आहे. हे उत्पादन व्यावसायिक दृष्ट्या संकरित गाईंच्या तुलनेत कमी असल्याने देशी गोवंशांकडे नकारात्मक दृष्टीने बघण्यात येत होते. ज्यातून मोठ्या प्रमाणात गोवंशय पशुधनाची संख्यात्मक पातळी घसरली होती. याकरिता गोशाळांना

आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे अत्यंत महत्त्वाचे होते.

राज्यातील गोशाळांना परिपोषण योजनेमार्फत प्रतिदिन प्रति गाय ५० रुपये अनुदान देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. अंदाजे दीड लाखापेक्षा अधिक पशुधन असणाऱ्या राज्यात ८२८ नोंदणीकृत गोशाळा आहेत. या गोशाळांनी देशी गायीचे संवर्धन करण्यासाठी परिपोषण आवश्यक असल्याची मागणी केली होती. या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे संस्थेची नोंदणी असणे अत्यावश्यक आहे तसेच सर्व जनावरांचे भारत पशुधन प्रणालीवर इयर टॅगींग करणे अनिवार्य आहे; हे महत्त्वाचे निकष यात देण्यात आले असून गोसेवा आयोगाकडून ऑनलाइन अर्ज योजनेसाठी मागवले जाणार आहेत.

देशी गोवंशांच्या रक्षणाकरिता १० G धोरण आवश्यक आहे.ते पुढील प्रमाणे : गो संगोपन, गोसंवर्धन,गो संरक्षण ,गो मय मूल्यवर्धन, गो शाळा ,गो रक्षक ,गो पालक ,गो आधारित शेती, गो साक्षरता व गो पर्यटन;ज्यांकरीता गोसेवा आयोगाचे सदस्य,गोसेवक अनेक वर्षांपासून प्रयत्नरत आहेत.

महाराष्ट्र हे गोमातेला राज्यमाता - गोमाता म्हणून दर्जा देणारे पहिलेच राज्य ठरले असून प्रत्येक सामान्यांच्या जनमनाचा विचार करून घेतलेला हा ऐतिहासिक निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतीय गोवंशाचे संवर्धन व संगोपन करणाऱ्या सर्व गो प्रेमींचे मनःपूर्वक अभिनंदन!

**- डॉ. सुनील सूर्यवंशी,** अमरावती.

लेखक महाराष्ट्र शासनच्या गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेचे राज्यस्तरीय सदस्य आहे.
देशी गाईच्या पंचगव्य चे आर्थिक व सामाजिक महत्व या विषयात आचार्य पदवी प्राप्त.
पंचगव्य चे आर्थिक महत्व या विषयावर Ph.D. करणारे ते महाराष्ट्र मधील पाहिले संशोधक आहेत.

*****



# ज्योतिष शास्त्र समजून घेतांना.

आजच्या या डिजिटल युगात तंत्रज्ञानामुळे सर्वच प्रकारची माहिती मिळविणे सहज सोपे झालेले आहे. मोबाईल मुळे तर केव्हाही कुठे सर्व माहिती ज्ञान मिळविता येते. डिजिटल क्रिएटर यांचा तर एवढा सुळसुळाट झाला आहे. ज्योतिषशास्त्र या विषयावरची माहिती बघायला गेले की असे वाटते आपण शास्त्र सोडून परत भीती, शंका- कुशंका, अंधश्रद्धा यांच्या जाळ्यात अडकत चाललो की काय असे बघायला मिळते. मोठमोठ्या शहरांमध्ये तरुण पिढी डोळसपणे विचार न करता या सर्व गोष्टीत अडकत चाललेली आहे. याचा परिणाम असा दिसतो की ज्योतिषशास्त्र विषयी समज गैरसमज खूप होत आहेत. शास्त्राला नेमके काय सांगायचे हे बाजूला राहून, खूप जास्त कर्मकांड परत उदयाला येत आहे असे दिसते आहे. असो...ज्योतिष्यशास्त्र हे अध्यात्म व विज्ञान यांची सांगड घालून भूत, भविष्य, वर्तमान विषयक मार्गदर्शन करणारे ऊर्जा शास्त्र आहे. ज्योतिष्य शास्त्राला वेदांचे चक्षु म्हटले जाते. नारद पुराणात म्हटले आहे की,

वेदस्य निर्मलं चक्षु: ज्योतिशास्त्रमकल्मषम ।
विनैतदखिलं श्रोतस्मार्त कर्म न सिध्यति तस्माजज्जगाद्धितायेदं ब्रह्मणा रचितं पुरा ।।

अर्थातच तुम्ही कल्पना करू शकता की चक्षु म्हणजे डोळे हे असे महत्त्वपूर्ण इंद्रिय आहे. ज्यामुळे आपण सृष्टी बघू शकतो. भूत, भविष्य, वर्तमान ओळखले जाणारे शास्त्र किती महत्त्वपूर्ण असेल. आध्यात्मिक वैज्ञानिक दृष्टिकोनातून तयार झालेले संवेदनशील असे शास्त्र. ब्रम्हांडात असलेल्या ग्रहताऱ्यांच्या अभ्यासातून मानवी जीवनावर यांचा काय परिणाम होतो, याविषयी शास्त्रशुद्ध पद्धतीने सांगितले आहे. आपण ज्या पृथ्वी नावाच्या ग्रहावर राहतो, जी पृथ्वी सूर्याभोवती इतर ग्रहाप्रमाणे फिरते, जिच्यावर जीवसृष्टी आहे. इतर ग्रहावर आहे की नाही हे विज्ञानाने अजून सिद्ध केले नाही परंतु आमच्या ऋषीमुनींनी जे थोर शास्त्रज्ञ होते त्यांनी मात्र सप्त लोकांची संकल्पना आपल्या शोध निबंधांमध्ये म्हणजेच उपनिषद, रामायण, महाभारत, पुराण इत्यादींमध्ये मांडली आहे. आपल्याला फक्त पंधरा अंशाच्या आकाश पट्ट्यात म्हणजे आपल्या आकाशगंगेत असलेले ग्रह, तारे म्हणजे सूर्य, चंद्र, मंगल, बुध इत्यादी ग्रह दिसतात. परंतु अशा हजारो आकाशगंगा आहेत व कोटी सूर्य कोटी चंद्र आहे. असे आमचे ऋषिमुनी सांगून गेले. आम्हाला ते मान्य आहे कारण त्यांच्या दिव्यदृष्टीने जे बघितले ते ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करताना वारंवार अनुभवास येते. ज्योतिष्यशास्त्राचे मूलभूत नियम स्वयंसिद्ध आहेत हा पाया सिद्ध करण्यासाठी आणखी इतर शास्त्रांची कुबडी लागत नाही. अशा या स्वयंसिद्ध शास्त्राचा वर्तमान परिस्थितीनुसार या डिजिटल युगानुसार मार्गदर्शक म्हणून विचार करतो तेव्हा आपण " भद्रम नो अपि वातय मन " आमची मने कल्याणकडे जावोत. म्हणून या शास्त्राचे मार्गदर्शन घेत आहोत ? की , भौतिक सुख साधनांच्या मागे धावण्यासाठी अर्थातच केवळ पद, पैसा, प्रतिष्ठा कसा मिळवता येईल म्हणून याचे मार्गदर्शन घ्यावे ? ग्रह तारे यांचा परिणाम कसा होतो ? आजच्या घडीला कोणत्या ग्रहांची ऊर्जा आपणास मिळत आहे ? कोणत्या ग्रहांची नाही ? त्यांचा आमच्या भवितव्यावर काय परिणाम होतो आहे ? आमची जीवनशैली कोणत्या ग्रहांचे बळ वाढवीत आहे ? त्यामुळे आम्हाला कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.? आपण जेव्हा ज्योतिषीतज्ञाकडे जातो तेव्हा तो आपल्या जन्मतारीख, जन्म वेळ, जन्मस्थळानुसार आपल्या जन्माच्या वेळीची कुंडली मांडतो. बारा चौकोनात ग्रह, राशी मांडून काढलेला नकाशा म्हणजे आपली कुंडली यामध्ये पूर्व क्षितिजावर उदित होणारी राशी म्हणजे लग्न राशी. पृथ्वी स्वत:भोवती चोवीस तासात एक फेरा पूर्ण करते त्यावेळी ती बारा राशी 24 तासात पूर्ण करते. जाताकाच्या जन्माच्यावेळी पूर्व क्षितिजा वर दोन तासासाठी जी राशी उदीत असेल तिला लग्न म्हटले आणि जन्माच्या वेळी चंद्र ज्या राशी असेल त्याला चंद्र राशी असे म्हटले आहे. अशीही लग्न कुंडली, चंद्रकुंडली ग्रह, तारे, राशी, चलाएमान असल्यामुळे म्हणजे सूर्याभोवती पृथ्वी व इतर ग्रह सतत फिरत असल्यामुळे एक चलित कुंडली तयार होते. म्हणजेच ग्रह एका राशीत दिसत असला तरी तो दोन्ही राशीच्या सीमारेषेवर असू शकतो अशावेळी तयार होणारी कुंडली

चलित कुंडली असते. इतरही सूक्ष्म रूपाने 16 प्रकारच्या कुंडली आहेत. उदा. नवमांश, सप्तमांश, दशांश.... इत्यादी या सर्वांमध्ये मुख्य नवग्रह, सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनी, राहू, केतू व त्याचबरोबर हर्षल, नेपच्यून, प्लुटो. कोणत्या राशीत, कोणत्या स्थानात आहे. शत्रू स्थान कि मित्र स्थान. स्वगृही अशुभ स्थान की शुभ स्थान त्रिकोण की त्रिकस्थान , केंद्रस्थान कोणत्या योगात बली की निर्वली अवस्था. इत्यादी बाबी विषयी ज्योतिषशास्त्राचा पायाभूत अभ्यासक्रम आवश्यक आहे. पंचांगज्ञान असणे आवश्यक आहे. ज्योतिषशास्त्रात पंचांगाचे पाच अंग आहेत, तिथी, वार, नक्षत्र, योग, करण ,चंद्र महिन्यानुसार बघितले जाते. दिनमान यांचे पाच प्रहर केल्या जाते. प्रात:, संगव, माध्यन्ह, अपरान्ह व सायंकाळ असे पाच प्रहर. सूर्योदय ते सूर्यास्त कालावधीला दिनमान म्हणतात. या कालावधीला पाच ने भागले असता येणारा तेवढा कालावधी म्हणजे पहिला दुसरा तिसरा असे प्रहर. या प्रत्येक प्रहराचा नेमका उपयोग कसा घ्यायचा म्हणजेच थोडक्यात आपली दिनचर्या कशी असावी असे सांगितले. पहिला प्रहर प्रातःकाल सकाळची अतिनील किरणांचा उत्सर्ग करणारा कालावधी ईशान्य दिशेच्या कोपऱ्यातून उगवणारा सूर्याची अतिनील किरणे संपूर्ण सृष्टीवर पडतात. ती अतिनिल किरणे म्हणजे पोषक किरणे जे आपल्या शरीराला निरोगी सुदृढ बनवितात, मेंदूला सक्षम बनवितात म्हणूनच आपल्या संस्कृतीत ब्रह्म मुहूर्तावर जागे व्हा. असे सांगितले. जर ते शक्य नसेल तर किमान सूर्योदयाच्या वेळी उठा व सूर्याची किरणे अंगावर घ्या. परंतु आज असे दिसत नाही. उशिरा उठणे त्यामुळे सकाळच्या सूर्यप्रकाशाचा संपर्क येतच नाही. परिणामी त्वचा विकार, मानसिक विकार, सहनशीलता कमी होणे, सारासार विवेक बुद्धी नसणे, असे दिसून येते. या सर्व गोष्टीमुळे जे योग्य नाही तेच घटित होते. म्हणून प्रातःकाल किती महत्त्वाचा आहे. हा काळ देवांचा काळ सांगितला. म्हणजेच याकाळात जर का पूजा पाठ कराल तर दिवसभर सकारात्मक ऊर्जा तुमच्या भोवती असेल. असाच दिनमानाचा पाचवा प्रहर ज्याला सायंकाळ असे म्हटले. ह्या काळात अपोषक जीव, जंतू जास्त प्रमाणात निर्माण होतात. सायंकाळी जास्त डास असतात, तामसिक किरणांचा प्रभाव, नकारात्मक तरंग निर्माण करतात. अशा ह्या नकारात्मक तरंगांमध्ये म्हणा किंवा नकारात्मक उर्जेमध्ये म्हणा आपण जवळजवळ सर्वच भौतिक सुख साधने म्हणजे शॉपिंग हॉटेलिंग फिरणे इत्यादी गोष्टी करतो. अशा नकारात्मक तरंगांमध्ये केलेली शॉपिंग, हॉटेलिंग आपल्याला संतुष्टी देत नाही. म्हणूनच आपल्याकडे बहुतेक सुख साधनांची रेलचेल असली तरीही समाधान मिळत नाही. खाण्यामुळे सात्विक आचार, विचार न होता संतापी, सहनशीलता नसलेला आचार विचार होतो. यावर विस्तृतपणे लिहिता येईल परंतु शब्द मर्यादा भान ठेवून पुढील विषय बघू. ज्योतिष शास्त्रामध्ये १२ राशी मेष, वृषभ, मिथुन, कर्क,सिंह,कन्या, तुला,वृचिक, धनु,मकर कुंभ, मीन.

बाराभाव प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ इत्यादी असे बाराभाव आहेत.

बारा ग्रह सूर्य, चंद्र, मंगल, बुध, गुरु, शुक्र, शनी, राहू, केतू, हर्षल, नेपच्यून, पलूटो.

२७ नक्षत्र अश्विनी ते रेवती. २७ योग शुभ, शुद्ध, वैधृती विषकुंभ इत्यादी.

करण बव ते विष्टी चरकरण व शकुनी ते किस्तूंघन स्थिर करण.

कुंडलीत होणारे ग्रहयोग उदाहरणार्थ गजकेसरी, लक्ष्मीनारायण योग,पारिजात योग,चांडाल योग,कालसर्पयोग, मंगल दोष पितृदोष इत्यादी विषयी माहिती google वर youtube वर मिळते ह्या योगाचे काय परिणाम होतात, आणि त्यासाठी काय उपाययोजना करावी याचा भडिमार, अशा व्हिडिओ मधून होतो. म्हणून ते इथे लिहिणार नाही मुळात ज्योतिषशास्त्र हे मार्गदर्शन करणारे शास्त्र आहे. तुम्ही कोणते कर्म करावे, कोणते विचार करावे,तुम्ही सध्या कसे आहात ? पुढे काय होऊ शकते ? याविषयी मार्गदर्शन केले जाते. तुमचे भाग्य बदलविणारे किंवा तुम्हाला हवा तसा बदल किंवा किंवा हवे असलेल्या गोष्टी प्राप्त करून देणारे शास्त्र नाही. जर तुम्ही शास्त्राने दिलेल्या गाईडलाईन्स मार्गदर्शक नियमांचे योग्य पालन केले तर भाग्योदय निश्चित होऊ शकतो. परंतु शोकांतिका ही आहे की आम्ही गाईडलाईन्स पाळणे ऐवजी रात्रीत श्रीमंत

कसे होऊ ? म्हणजेच पद, पैसा, प्रतिष्ठा कशी मिळविता येईल ? त्याकरीता कोणते उपाय करावे ? कोणते रत्न धारण करावे ? कोणती पूजा करावी ? इत्यादी इत्यादी गोष्टी आम्ही मात्र नियमित करण्याचा प्रयत्न करतो. आणि त्यासाठीच आम्ही अनेक ज्योतिषी तज्ञांचे मार्गदर्शन घेतो. आम्हाला कर्मकांड, पूजा, ग्रहशांती, रत्न धारण करणे वगैरे सांगतात. हे उपाय केल्याने परिणाम होतो परंतु समस्यचे मूळ कारण मात्र नष्ट होत नाही. असे आहे की या सर्व गोष्टींचा आपण मुळात जे ग्रह, तारे आहे, जे नक्षत्र आहे, जे राशी आहे, त्यांचा मूळ स्वभाव गुणधर्म काय आहे ? ते कोणत्या गोष्टीसाठी कारक आहेत. ते कोणत्या घटनासाठी कारक आहे. ग्रहस्थितीमुळे किंवा गोचर भ्रमणामुळे किंवा त्यांच्या त्या ग्रहदशेमुळे आपल्या मानवी जीवनावर काय परिणाम होतो ? त्याचा विचार आपण करत नाही. आपल्या जीवनावर परिणाम होण्यासाठी आपले कोणते कर्म कारणीभूत आहेत का ? आपण कोण्या पद्धतीची जीवनशैली जगतो आहे ? या सर्व गोष्टीचा विचार आपण मुळातच करत नाही. आणि म्हणूनच बऱ्याच समस्यांना सामोरे जावे लागते. ज्योतिषशास्त्रामध्ये ग्रहताऱ्यांचे मंडळ आहे. म्हणजे त्यांना त्यांना त्यांचे त्यांचे विभाग दिलेले आहे. जसं सूर्याला आपण राजा म्हटलेले, चंद्राला राणी म्हटले आहे, गुरु आणि शुक्राला आपण प्रधान, बुधाला युवराज, शनिला नोकर म्हटले आहे. आणि राहू केतू वगैरे जे इतर ग्रह आहे हे पदस्थ नसले तरी कार्यकारी ग्रह. हे सर्व ग्रह त्यांच्या कारकत्वप्रमाणे काम करतात. सूर्याला वडील म्हटलेलं आहे तर सुर्य हा प्रकाशाचा कारक आहे आणि प्रकाश हा आपल्या जीवनात जर का नसेल तर काय होईल ? यावरून तुम्ही समजून जा म्हणूनच वडील किती महत्त्वपूर्ण आहे आणि वडिलांशी आपले संबंध कसे असावे. जर का तुम्ही तुमच्या घरामध्ये त्यांच्याशी नातेसंबंध चांगले ठेवत असाल आदर करीत असाल, सन्मान करत असाल तर तुम्हाला यश हे नक्की मिळणारच.



वर्तमान काळामध्ये आई-वडिलांशी वागणे चांगले नाही.  रात्री उशिरा झोपणे, जागरण करने, सकाळी उशिरा उठणे या सर्व जीवनशैलीमुळे आपण चंद्रालाही बिघडवतो आहे. वेळाने उठून सूर्यालाही बिघडवतो आहे. चंद्र हा आईचा कारक आहे. आई म्हणजे सुख जिच्या पदराखाली आपल्याला वात्सल्य, प्रेम,समाधान मिळते ती म्हणजे आई आणि आईशी संबंध चांगले नसेल तर चंद्राला बिघडवणे. म्हणजेच आपल्याला आपल्या जीवनात सुख मिळणे कठीण. ह्या ग्रहाला बिघडवणे आणि वर्तमान काळामध्ये आपल्या आई-वडिलांशी असलेले संबंध, त्यांच्याशी वागण्याची आपली पद्धत. तसेच सूर्याचे पण आहे आपण आपल्या वडिलांना काही समजत नाही. आपल्याला वाटते यांना काहीच ज्ञान नाही आहे.आपण जे पाहतो आहे किंवा आपण ज्या पद्धतीने जगतोय तेच योग्य आहे. या अशा वागण्यामुळेच तर आपल्याला यश मिळणं कठीण जाते. सूर्य म्हणजे यश जीवनातला प्रकाश आणि आपण काय करतो तर उशिरा उठतो. प्रकाशाला  महत्व देत नाही आणि त्यामुळे सहजच आहे की, सुख आणि यश हे आपल्याला मिळणं कठीण होऊन जाते. या ग्रहांच्या बिघडण्यामुळे आपली लाईफस्टाइल बरोबर नाही. या दोन्ही पद्धतीने म्हणून आपण आपले आपल्याला कठीण चाललेला आहे. कितीही टर्म एमपीएससी, यूपीएससीच्या परीक्षा दिल्या तरी आपल्याला यश मिळत नाही. त्यानंतर आपण जरी काही कुठल्या घरामध्ये सुख सुविधा ऐश्वर्य संपन्न गोष्टी जरी आणला तरी आपल्याला त्यामधनं सुख मिळत नाही. कारण आपण त्या पद्धतीने आपल्या आई वडिलांशी चांगले राहत नाही किंवा आपले लाईफस्टाईल पण त्या पद्धतीचं नाही आहे.  गुरुचा सुद्धा सन्मान आदर करीत नाही. परिणामी आपला गुरु बिघडतो आणि आपल्याला योग्य ते मार्गदर्शन मिळणे अथवा आपण मार्गदर्शन घेतच नाही आणि योग्य ते मार्गदर्शन न मिळाल्यामुळे आपण भरकटतो. शुक्र पण या कॅटेगिरीत येतो. शुक्र हा लक्झरी, ऐश्वर्यसंपन्न अशा गोष्टींचा कारक आहे परंतु आपण ऐश्वर्यासंपन्न गोष्टीचा  उपभोग घेत असलो तरी त्यामध्ये जो एक कौटुंबिक जिव्हाळा म्हणजे आपल्याकडे आहेत. त्या भौतिक सुखसाधनांमध्ये सर्वांना सामील करण्याची वृत्ती नाही. घरातल्या घरातच आपल्याच कोषात म्हणजे खोलीबंद असल्यासारखा राहतो आणि त्याच्यामुळे आपल्याला शुक्राचे जे सुख मिळायला पाहिजे ते सुख पण मिळत नाही. शनि हा कर्म प्रधान ग्रह आहे. त्याला खूप कर्म करायला आवडतं त्याला आळस म्हणजे तुम्ही जर का देव देव करत बसाल किंवा खूप जास्त पूजा पाठ कर्मकांड कराल तर ते शनीला आवडत नाही. शनी म्हणतोय की माझी साडेसाती आली आहे तुम्ही कायम कर्म करत रहा तुम्हाला कुठलाही त्रास होणार नाही. पण तेच जर का तुम्ही म्हटले की मी कर्म सोडून देव देव करत बसतो. साडेसातीला घाबरून साडेसात वर्ष कोणत्याही महत्वाच्या कामाला सुरुवातच करीत नाही तर अशाने शनी प्रसन्न होणे नाही. शनी हा कर्म प्रधान ग्रह आहे. एक सेवक ग्रह आहे. याला फक्त आणि फक्त कामच आवडतं आणि म्हणूनच जो व्यक्ती सतत कामात स्वतःला व्यस्त ठेवतो गुंतवून ठेवतो त्या व्यक्तीला शनीचा त्रास होने नाही.  शनि हा प्रामाणिक ग्रह आहे. न्यायाधीश आहे. जर का शनीचा शुभ संबंध इतर ग्रहां सोबत नसेल तर तुम्ही कर्तृत्व च गाजवू शकत नाही.शनी तुमच्या कुंडलीमध्ये चांगला नसेल तर तुम्हाला इतर ग्रह किती पावरफुल असले तरी तुम्ही त्याचा उपयोग घेऊ शकत नाही किंवा तुम्हाला त्याचा फायदा होऊ शकत नाही. कारण असे आहे की, शनी हा कर्म प्रधान ग्रह आहे आणि प्रत्येकाला कर्माची साथ पाहिजे. साधे जेवण जरी घेत असले तरी आपल्याला जेवणासाठीचे कर्म करावे लागते. प्रत्येक गोष्टीत कर्म हे आले म्हणून शनि हा महत्त्वपूर्ण आहे. जेव्हा तुमच्या जन्मपत्रिकेमध्ये शनि चांगला राहतो आपोआपच तुमच्याकडून कर्म चांगले घडतात, पण आता वर्तमान काळात काय झालेले आहे की,  आपल्याला शॉर्टकट्सने पैसे पाहिजे आहेत. कमी श्रमात आपल्याला जास्त पैसे कमवायचे असतात . राहू सारख्या शातीर, चतुर, चालाक ग्रहाची अनैतिक, अविधायक शक्ती वाढवीत आहे. त्यामुळे नको त्या गोष्टीच्या मोहात पडून स्वतःचे नुकसान करून घेत आहोत. राहू एक छायाग्रह आहे. म्हणजेच पृथ्वीचे सूर्याभोवती फिरणे आणि चंद्राचे पृथ्वीभोवती फिरणे, याच्यातून होणारे जे छेदनबिंदू आहे. त्याला राहू - केतू म्हटले आहे. डोक्यावर पडणाऱ्या छेदन बिंदूला राहू संबोधले. अर्थातच तुम्ही बघू शकता की आपल्या डोक्यावर म्हणजे पृथ्वीच्या उत्तरेला होणारा जो छेदन बिंदू आहे तो राहू. जर आपण म्हटलं की राहू हा आजच्या काळामध्ये

आपली जी लाईफस्टाइल आहे आपण ज्या साधनांचा वापर करतो आहे. आपल्या आयुष्यामध्ये त्या सर्वांमध्ये राहुलच प्राबल्य जास्त वाढत आहे. आणि राहुला ज्योतिष्य शास्त्रामध्ये बुद्धीला भरकटवणारा, पैशाची हाव निर्माण करणारा, बुद्धीला भ्रष्ट करणारा, जिथे योग्य नाही आहे तिथेही तुमच्या मनाला धाव घ्यायला लावणारा, सतत पैशाच्या मागे धावायला लावणारा मग त्यासाठी कुठलेही मार्गाने जरी अवलंबावे लागले तरी चालतील. हे नकारात्मक राहुचे दोष आहे. राहुने आपले संपूर्ण जीवन व्यापून टाकले आहे.या ग्रहाच्याच प्रभावाखाली आपल्या घरामध्ये असलेली काचेची भांडी,प्लास्टिक, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, सगळीकडे असलेले भौतिक सुखसाधने, अँटिक वस्तू कुठून कुठून जमा केलेले वस्तू, आपल्या घरी असलेल्या अनावश्यक चपला जोड्यांचा खच, कपड्यानी भरलेली कपाटे महिन्यातून एखाद्या वेळेस म्हणा किंवा चार सहा महिन्यातून एखाद्या वेळेस उपयोग घेतो तरीही त्या वस्तू आपल्या घरात सारख्या पडून राहतात आणि तरी आपल्याला त्या गोष्टींचा हव्यास असतो. यामध्ये राहूचे वास्तव्य असते. हा राहू स्वार्थीपणा मुळे दुसऱ्यांना त्याचा उपयोगही घेऊ देत नाही. हल्ली बहीणभावंड सुद्धा आपल्या वस्तू एकमेकांना देत नाही. बुद्धीला वश करून घेतो, आपण त्याला वश पण होतो आणि त्याच्यातून आपलं वागणं गुन्हेगारीवृत्तीचे होते. राहूच काय स्थान आहे ? कुंडली मध्ये कुठे आहे ? कोणत्या घरात आहे ? कोणत्या राशीत आहे ? कोणत्या नक्षत्रात आहे ? हे जर का तुम्हाला थोडंस कळलं तर त्यानुसार तुम्ही त्या समोरच्या व्यक्तीला मार्गदर्शन करू शकता. थोडक्यात कुंडली म्हणजे आपल्या कर्माचा, प्रारबद्धाचा लेखाजोखा म्हणूनच चांगले कर्म, समाधान, नितीने वागणे, आपल्या सुखासाधनात इतरांनाही सामील करणे. सर्वात महत्वाचे आई वडीलांचा मानसन्मान करणे, त्यांच्या होता होईल त्या इच्छा पूर्ण करणे, सेवा करणे. ईश्वर साक्षीने सर्व कार्य करणे, हे ज्या दिवशी आपल्याला सहजशक्य होईल त्यादिवशी आपल्या कुंडलीतील राहू सह सर्व अशुभ योगातील ग्रहांचा शुभ परिणाम दिसून येईल. आणि आपले संपूर्ण जीवन सुखी समृद्ध होईल.

ॐ सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखभाग्भवेत् ॥
॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

**- डॉ. कल्पना गुंबळे,** अमरावती.

लेखिका ज्योतीष्यशास्त्रात आचार्य पदवी प्राप्त असून, ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासक व ख्यातनाम मार्गदर्शक आहेत. मोबा - 73505 51381.

*****

# ‘खेलो इंडिया’ योजनेचे यश.

मानवी आयुष्यात खेळ आणि फिटनेसचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. खेळ खेळल्याने सांघिक भावना विकसित होते, धोरणात्मक आणि विश्लेषणात्मक विचार, नेतृत्व कौशल्ये, ध्येय निश्चित करणे आणि जोखीम घेणे अशा प्रकारच्या क्षमतांचा विकास होतो. मुख्य म्हणजे एक सुदृढ व निरोगी व्यक्ती हा निरोगी समाज आणि पर्यायाने सशक्त राष्ट्र निर्मितीत भरीव योगदान देत असतो.

आपल्या देशाच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. गेल्या काही वर्षांत भारताने क्रीडा क्षेत्रात सातत्याने प्रगती केली आहे आणि त्या प्रगतीत मैलाचा दगड ठरली आहे खेलो इंडिया योजना. नुकत्याच पार पडलेल्या पॅरिस ऑलिम्पिक (२०२४) स्पर्धेतील भारताच्या एकंदर निकालाने भारतीय खेळाडूंच्या चांगल्या कामगिरीवर शिक्कामोर्तब झाले आहे. एकूण सहा पदकांच्या व्यतिरिक्त आपले आठ खेळाडू हे चौथ्या स्थानी राहिले आणि अत्यंत कमी फरकाने त्यांची पदके हुकली. या आठ खेळाडूंपैकी पाच खेळाडूंनी पहिल्यांदाच ऑलिम्पिकमध्ये भाग घेतला होता हे विशेष. तसेच तब्बल पंधरा खेळाडूंनी आपापल्या स्पर्धांमध्ये उपांत्यपूर्व फेरी गाठली होती. अशा कामगिरीची देखील भारतासाठी ही पहिलीच वेळ होती.

ही कामगिरी म्हणजे नव्या भारताचे असे रूप आहे, जे क्रीडा क्षेत्रातही आपले वर्चस्व प्रस्थापित करू पहात आहे. या स्पर्धेसाठी निवड झालेल्या भारतीय चमूत ११७ पैकी खेलो इंडिया योजनेद्वारे निवडण्यात आलेल्या तब्बल २८ खेळाडूंचा समावेश होता. आपला सर्वात तरुण ऑलिम्पिक पदक विजेता खेळाडू अमन सेहरावत हा देखील खेलो इंडिया योजनेचे फलित आहे असे म्हणल्यास अतिशयोक्ती होणार नाही. एवढेच नाही तर पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेसाठी निवड झालेल्या ८४ पैकी २५ खेळाडूंचा खेलो इंडिया योजनेत अंतर्भाव आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये, भारताने क्रीडा प्रतिभा शोध आणि संगोपन करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत, ज्यामध्ये खेलो इंडिया योजनेचे खूप मोठ्या प्रमाणात योगदान आहे. २०१८ साली सुरुवात झालेली ही योजना भारताच्या क्रीडा क्षेत्रासाठी गेम चेंजर ठरली आहे. कारण या योजनेच्या माध्यमातून भविष्यातील ऑलिम्पिक विजेते घडवण्याच्या प्रक्रियेसाठी एक चांगली फीडर सिस्टीम तयार झाली आहे. मनू भाकर ही २०१८ साली झालेल्या पहिल्या खेलो इंडिया स्कूल गेम्सपासून सहभागी होत असून तिने २०२२ साली झालेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये अनेक पदके जिंकली आहेत. अमन सेहरावत हा देखील २०१९ पासून खेलो इंडिया शिष्यवृत्ती योजनेचा एक भाग आहे.

२०१८ पासून आयोजित करण्यात आलेल्या एकूण पंधरा विविध स्पर्धांची खेलो इंडिया योजनेत महत्त्वपूर्ण भूमिका आहे. ज्यामध्ये ६ खेलो इंडिया युथ गेम्स, ४ खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स, ४ खेलो इंडिया विंटर गेम्स आणि १ खेलो इंडिया पॅरा गेम्स यांचा अंतर्भाव आहे. या सर्व स्पर्धांमधून हजारपेक्षा जास्त प्रतिभावान खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. तसेच, एकूण ३०२ मान्यताप्राप्त अकादमी, १०००+ खेलो इंडिया सेंटर्स, ३२ खेलो इंडिया स्टेट सेंटर ऑफ एक्सलन्स अशा विविध प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमांतून देशातील तळागाळातील खेळाडूंना भविष्यातील चॅम्पियन बनवण्यासाठी संभाव्य पायाभूत सुविधा तयार करण्यात येत आहेत. भारत सरकारने या योजनेत आतापर्यंत सुमारे ३६०० कोटींपेक्षा जास्त रुपये गुंतवले आहेत, ज्याद्वारे तळागाळात क्रीडा सुविधांचा विकास करण्याच्या सरकारच्या दूरदृष्टीची जाणीव होत आहे. हा भरीव निधी क्रीडा विकासाच्या विविध पैलूंमध्ये विभाजित करण्यात आला आहे; ज्यात खेळाडूंच्या सुविधा, पायाभूत सुविधांचा विकास आणि विशेष प्रशिक्षण केंद्रांची स्थापना यांचा समावेश आहे.

खेलो इंडिया योजनेची सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे तरुणांमधील क्रीडा प्रतिभेचा घेतला जाणारा शोध आणि त्यांचे केले जाणारे सुयोग्य संगोपन. यूथ गेम्स, युनिव्हर्सिटी गेम्स, विंटर गेम्स आणि पॅरा गेम्स यांसारख्या वार्षिक स्पर्धांद्वारे

हजारो उदयोन्मुख खेळाडूंचा शोध घेतला जात आहे. अडीच हजारपेक्षा जास्त खेळाडूंना एकूण १.२० लाख रुपये वार्षिक शिष्यवृत्ती देण्यात येते आणि सोबतच ते प्रशिक्षण घेत असलेल्या खेलो इंडिया मान्यताप्राप्त अकादमीमध्ये विविध प्रशिक्षण सुविधा दिल्या जातात. खेलो इंडिया योजनेची व्याप्ती ही केवळ खेळाडू तयार करण्यापुरती मर्यादित नसून, याद्वारे तळागाळात क्रीडा क्रांती घडवून आणली आहे. भारतातील तरुणांमध्ये क्रीडा संस्कृती रुजवली आहे आणि त्यांच्या खेळातील सहभागाला सातत्याने प्रोत्साहन दिले आहे. या योजनेद्वारे स्वदेशी आणि पारंपारिक खेळांवर भर देण्यात आल्याने भारताचा समृद्ध क्रीडा वारसा सर्वांपर्यंत पोहोचवून त्यात रुची निर्माण होण्यास मदत झाली आहे. या योजनेचा दृष्टीकोन अतिशय व्यापक असून त्यात केवळ प्रशिक्षणच नाही तर पोषण, मानसिक आरोग्य आणि डोपिंग प्रतिबंधक शिक्षण देखील समाविष्ट आहे. यातून एक बाब लक्षात येते, ती म्हणजे असे शास्त्रोक्त पद्धतीने तयार झालेले खेळाडू हे उच्चस्तरीय स्पर्धांमधील दबाव हाताळण्यास सक्षम होणार आहेत.

आताच्या घडीला ७४७ जिल्ह्यांसह ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकूण १०५९ खेलो इंडिया सेंटर्स कार्यरत आहेत. ही सर्व केंद्रे स्थानिक क्रीडा प्रतिभेचा शोध आणि संगोपन करण्यासाठी काम करतात. तसेच केवळ भौगोलिक स्थान किंवा आर्थिक पार्श्वभूमी यांचा विचार करून कोणत्याही चांगल्या खेळाडूकडे दुर्लक्ष होणार नाही याची काळजी घेतात. विशेष म्हणजे या केंद्रांद्वारे माजी विजेत्या खेळाडूंना उपजीविकेचा शाश्वत स्त्रोत प्रदान करून दिला जातो. या योजनेच्या अंतर्गत ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकूण ३२ खेलो इंडिया स्टेट सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन केले आहेत. येथील अत्याधुनिक सुविधांच्या माध्यमातून खेळाडूंना विशेष प्रशिक्षण दिले जाते, ज्यामुळे खेळाडूंना जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षण प्राप्त होते. या केंद्रांमधील क्रीडा प्रकारांसाठी क्रीडा विज्ञान आणि तंत्रज्ञानाची अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.

नुकताच सुरू करण्यात आलेला, खेलो इंडिया रायझिंग टॅलेंट आयडेंटिफिकेशन (KIRTI) हा उपक्रम तळागाळातील क्रीडा प्रतिभा शोधण्यात लक्षणीय प्रगती करत आहे. हा उपक्रम ९ ते १८ वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांमधील प्रतिभा शोधण्यासाठी राबविला जात असून, तळागाळातील क्रीडा प्रतिभा शोधण्याची संपूर्ण प्रक्रिया ही एकाच प्रणालीद्वारे नियोजित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या अंतर्गत संपूर्ण देशभरात आतापर्यंत जवळपास ९३ ठिकाणी दहा क्रीडा प्रकारांसाठी सुमारे एक लाख तरुणांची यशस्वीरित्या चाचणी घेण्यात आलेली आहे.



त्याच प्रमाणे विशेषत्वाने महिलांसाठी नियोजित, अचिव्हिंग स्पोर्ट्स माईलस्टोन बाय इंस्पयारींग वूमन थ्रू ॲक्शन (ASMITA) ही महिला लीग ही देखील विविध खेळांमध्ये महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी एक प्रेरक शक्ती म्हणून कार्यरत आहे. या लीगच्या माध्यमातून हजारो प्रतिभावान महिला खेळाडू विभागीय आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये आपले कौशल्य दाखवत आहेत. २०२१ पासून आजपर्यंत ASMITA लीगचे चार हंगाम आयोजित केले गेले आहेत. ज्यामध्ये ३५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील २० खेळांमध्ये एकूण ८० हजारपेक्षा जास्त महिलांनी सहभाग घेतला आहे. आगामी विविध उपक्रम आणि वाढत्या सहभागासह, या लीग भारतातील महिलांसाठी उज्ज्वल क्रीडा भविष्याचा मार्ग प्रशस्त करत आहेत.

खेलो इंडिया योजनेच्या माध्यमातून भारतीय क्रीडा क्षेत्राचा रचलेला पाया अत्यंत आश्वासक असून; याच्या माध्यमातून आपले युवा खेळाडू वैयक्तिक आणि सोबतच जागतिक क्रमवारीत देखील प्रगती करत असल्याने, भविष्यातील ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये भारताच्या कामगिरीत लक्षणीय सुधारणा पाहायला मिळण्याची शक्यता बळावली आहे. खेलो इंडिया योजना ही भारतीय क्रीडा भविष्याचा आधारस्तंभ म्हणून उदयास आली आहे. तळागाळातील सहभागापासून ते उच्च स्तरीय कामगिरीपर्यंत तरुण खेळाडूंसाठी एक सुयोग्य मार्ग उपलब्ध करून देत, या योजनेच्या माध्यमातून भविष्यातील ऑलिम्पिक विजेत्यांचे संगोपन केले जात आहे. याच योजनेच्या बळावर आपण लवकरच ऑलिम्पिक स्पर्धेत दुहेरी पदक संख्या गाठू असा विश्वास वाटतो.

**- प्रा. डॉ. निलेश डी. जोशी, छ. संभाजीनगर.**

लेखक हे एरोबिक जिम्नॅस्टिक्सचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक आहेत.
राष्ट्रकुल स्पर्धा आणि भारत या विषयावर मराठी भाषेतून लेखन तसेच ह.व्या.प्र.मं.च्या
फिजिकल एज्युकेशन कॉलेज, अमरावती येथे सहा.प्रा.आहेत.

*****

# विवेकानंदांचे शैक्षणिक विचारधन.

भारत भ्रमण यात्रेत देशाचे विकलांग स्वरूप पाहून विवेकानंद व्यथित झाले होते. त्यामुळे त्याचे मिशन हे माणूस घडवणे (मॅन मेकिंग) हे होते. मनुष्य निर्माणातूनच राष्ट्राचे पुनरुत्थान, राष्ट्र निर्माण होऊ शकते यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. आधुनिकता आणि वेदांताची आध्यात्मिक बैठक यांचा अपूर्व मिलाफ त्यांच्या शिकवणुकीत होता. विवेकानंदाच्या मते शिक्षणाचा मुलभूत हेतू हा माणूस घडविणे हाच आहे. अद्वैत तत्वाप्रमाणे मन, शरीर आणि आत्मा यांचा सुसंवादी विकास म्हणजे माणूस घडविणे होय. "मनुष्यात असलेल्या परीपूर्णतेचे प्रकटीकरण म्हणजे शिक्षण." (एज्युकेशन इज द मॅनीफेस्टेशन ऑफ परफेक्शन ऑलरेडी इन द मॅन) तो माणूस घडवायला शिक्षकाने फक्त सहाय्य करायचे आहे. न पचविलेल्या माहितीची मेंदूतील सरमिसळ म्हणजे शिक्षण नव्हे. (एज्युकेशन इज नॉट द अमाउंट ऑफ इन्फर्मेशन दॅट इज पूट इंटू ब्रेन अँड रन्स राइट देअर अनडाय जेस्टेड) तर शिक्षण म्हणजे अशी प्रक्रिया की ज्यामुळे चारित्र्य घडते, मन:शक्ती वाढते, बुद्धिमत्ता धारदार होते आणि ज्यामुळे माणूस स्वत:च्या पायावर उभा राहू शकतो. अशा शिक्षण पध्दतीची युवकांनी कास धरावी.

नरेंद्र ते विवेकानंद परिवर्तन जे घडले त्यासाठी कारणीभूत घडलेला एक प्रसंग म्हणजे स्वामी विवेकानंद कोलकाता येथे महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना प्राध्यापक हेस्टी नावाचे गृहस्थ स्वामी विवेकानंद यांना वर्डस्वर्थ ची इस्करशन ही कविता शिकवत होते. या कवितेमध्ये वर्णन केलेली रानावनातील शांतता अशा प्रकारची आहे की ती शांतता म्हणजे परमेश्वर आहे का? असा प्रश्न स्वामी विवेकानंद यांच्या मनामध्ये आला. विवेकानंदयांनी या जगात ईश्वर आहे का? असा प्रश्न त्यांच्या प्राध्यापकांना विचारला . सरांनी उत्तर दिले.मी देव आहे असे मानतो परंतु मी तो देव पाहिलेला नाही. त्यामुळे मी तुझ्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकत नाही. जर या प्रश्नांची उत्तरे हवे असतील तर तू रामकृष्ण परमहंस या साधकांची भेट घे.असा सल्ला प्राध्यापकांनी स्वामी विवेकानंद यांना दिला. ज्यावेळी स्वामी विवेकानंद रामकृष्ण परमहंस यांना भेटले. त्या दोघामध्ये जो आध्यात्मिक संवाद झाला त्यातून विवेकानंदांनी रामकृष्णांना गुरुस्थान दिले. राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी शिक्षणाचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. विवेकानंदांच्या मते

'समस्त ज्ञान मानवी मनातच अंतर्निहित असते'

तात्पर्य, ज्ञान मग ते ऐहिक असो किंवा आध्यात्मिक असो, मानवी मनातच विद्यमान असते. बहुतेकांच्या बाबतीत ते ज्ञात न होता पडद्याने झाकलेले असते; जेव्हा हे पटल सावकाश दूर होते तेव्हा आपण म्हणतो की आपण शिकत आहोत, आणि ज्ञानाची प्रगती ह्या पडदा दूर सरण्याच्या क्रियेतच आहे. ज्या मनुष्याच्या बाबतीत हा पडदा थोडा जास्त दूर होतो तो अधिक ज्ञानी, ज्याच्यावर हे पटल दाट तो अज्ञानी आणि ज्याच्या बाबतीत हे पटल पूर्णपणे दूर झालेले असते तो पूर्ण ज्ञानी, सर्वज्ञ. गारगोटीतील सुप्त अग्निस्फुलिंगाप्रमाणे ज्ञान मनात दडलेले असते. निमित्तरूप घर्षण त्याला व्यक्त करते. सर्व ज्ञान, साऱ्या शक्ती अंत:स्थित असतात. ज्याला आपण बल, शक्ती, प्रकृतीची गूढे म्हणतो ती सारी अंत:स्थितच असतात. सारे ज्ञान मानवी आत्म्यातूनच उद्भूत होत असते. चिरकाल स्वत:त निहित असलेल्या ज्ञानाचीच अभिव्यक्ती, त्याचेच अनावरण मनुष्य करीत असतो.

**विवेकानंदप्रणित शिक्षणपद्धती -**

विवेकानंदांच्या मते एकाग्रता ही ज्ञानसाधनेची गुरुकिल्ली आहे, प्रयोगशाळेत काम करणारा वैज्ञानिक, योग साधना करणारा योगी, ग्रह-ताऱ्यांचा अभ्यास करणारा खगोलशास्त्रज्ञ, ज्ञान प्राप्तीसाठी झटणारा विद्यार्थी, या सर्वांच्या नवनिर्मितीच्या मुळाशी एकाग्रता आढळते. एकाग्रता जेवढी अधिक तेवढे ज्ञानसंपादन अधिक होईल. कोणत्याही क्षेत्रातील यश हे एकाग्रतेचाच परिणाम असतो. कला, संगीत, इत्यादी बाबतीतील यश हे एकाग्रतेचेच फळ आहे. केवळ माहिती गोळा

करणे म्हणजे शिक्षण नाही, तर शिक्षणाचे सार मनाच्या एकाग्रतेत आहे. एकाग्रता ही चिंतनातून विकसित होते. मनाच्या एकाग्रतेसाठी इंद्रियनिग्रही वृत्ती गरजेची असते. ज्ञानप्राप्तीसाठी एकाग्रतेबरोबरच श्रद्धाही आवश्यक आहे. श्रद्धा हेच विकासाचे मूळ आहे. मनुष्याच्या विकासात श्रद्धेचे स्थान महत्त्वाचे आहे. या श्रद्धेनेच माणूस बलवान अथवा दुर्बल बनतो. श्रद्धेचे पुनरुज्जीवन झाल्यास आपल्या पुढील प्रश्न आपण सहज सोडवू असे विवेकानंद म्हणतात. एकाग्रता आणि श्रद्धा दोन शक्तींच्या जोरावर मानवाने आपला विकास केला आहे.

**शिक्षणाचे ध्येय -**

श्रद्धेचा किंवा खऱ्या विश्वासाचा प्रचार हेच माझ्या जीवनाचे ध्येय. मनुष्याचा विकास हेच शिक्षणाचे ध्येय असते अर्थात यामध्ये श्रद्धा आणि विश्वासाचे स्थान महत्त्वपूर्ण असतेच असते. मनुष्याचे शील आणि चरित्र्य निर्माण हे शिक्षणाचे महत्त्वाचे तत्त्व होय. मनुष्याच्या प्रवृत्ती आणि संस्कार मनुष्याच्या चारित्र्य निर्मितीसाठी अत्यावश्यक असतात. त्याच्या प्रवृत्ती आणि संस्कार त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या सवयी आणि स्वभाव बनतात. शिक्षणाद्वारे मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वात अशा प्रवृत्ती आणि संस्कार अनायास निर्माण झाल्या पाहिजेत, असे स्वामी विवेकानंदांचे आग्रही प्रतिपादन आहे. अशा सर्व प्रवृत्ती आणि संस्कारामधून मानवी जीवनाचे कल्याण साध्य करण्याची इच्छाशक्ती प्रबळ असणे हे शिक्षणाचे सर्वार्थाने ध्येय होय. स्वामीजी म्हणतात, आम्हाला आज भारतीय वेदांत आणि पाश्चिमात्य विज्ञान यांचा समन्वय हवा आहे. आधुनिक शिक्षणाचा प्रचार, प्रसार ज्ञानाची वाढ या साऱ्या गोष्टी झाल्याखेरीज देशाची उन्नती होणार कशी? सर्वसामान्य लोकांपर्यंत आणि स्त्रियांपर्यंत जोवर शिक्षणाचा प्रसार होत नाही, तोवर काहीही साधने शक्य नाही. सर्व शिक्षणाचा हेतू माणसाचे व्यक्तिमत्व घडविणे हाच असायला पाहिजे. त्यांना पुराण, इतिहास, गृहकृत्य, कला, कौटुंबिक जीवनातील कर्तव्य व आदर्श, चारित्र्य घडवायला सहाय्य असणारे नितीनियम आधुनिक विज्ञानाच्या मदतीने शिकवावयास हवे. त्यांच्या मते शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या क्षमतांचे विकसन होणे होय, असे म्हणता येईल. प्रेरणा निर्माण करणे; योग्य त्या दिशेने, कार्यक्षमतेने काम करता येईल, असे मनोबल व्यक्तीच्या ठिकाणी निर्माण करणे म्हणजे शिक्षण होय, असे मला वाटते. अशा शिक्षणातून संघमित्रा, लीलावती, जिजाऊ, अहिल्यादेवी, राणी लक्ष्मीबाई आणि मिराबाई यांची परंपरा चालविणा-या "तेजस्विनी" निर्माण होऊ शकतात. 'स्त्री-शिक्षणाचे महत्त्व विशद करताना स्वामींनी हे स्पष्ट केले आहे की स्त्रियांचे जीवन विषादमय असेल, तर कोणत्याही कुटुंबांची वा देशाची उन्नती होण्याची आशाच नको,' स्त्री जाती पुढील अनेक गंभीर प्रश्न शिक्षणाने सहज सुटू शकतील, असा स्वामींचा विश्वास आहे. सर्वसाधारण समाजाचे शिक्षण आवश्यक आहे, याकडे दुर्लक्ष हेच आपले राष्ट्रीय पातक असून घोर अध:पतनाचे मूळ कारण आहे, अशी अवस्था पाहून स्वामी विवेकानंदांच्या अंतकरणाला कसा पीळ पडतो हे त्यांनी आवर्जून नमूद केले आहे. अशा शिक्षण विचाराच्या तात्त्विक विवेचनात स्वामी विवेकानंदांनी संदेशाच्या स्वरुपात म्हटले आहे. 'आपले चारित्र्य बनवा, आपले ज्योतिर्मय, स्वयंप्रकाश, नित्य शुद्ध, वास्तविक स्वरुप प्रकट होऊ द्या.'

**शिक्षकाची भूमिका -**

शिक्षकाची मुख्य भूमिका ही विद्यार्थ्यास शिकण्यास साहाय्य करणे ही आहे. मूल स्वतःहून शिकत असते. ते शिकत असताना त्याच्या शिकण्याच्या प्रक्रियेतील सर्व प्रकारचे अडथळे दूर करणे, हे शिक्षकाचे मुख्य काम आहे. त्यांच्यातील जिज्ञासा जागृत करणे महत्त्वाचे आहे. वनस्पतीची वाढ ही नैसर्गिकरीत्या होत असते. शिक्षकाची भूमिका ही बागेतील माळ्यासारखी असावी. माळी हा बागेतील रोपे वाढण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करतो. केवळ माहिती गोळा करणे आणि ती मुलाच्या मेंदूत कोंबणे हे शिक्षकाचे काम नाही, तर शिकण्यास अनुकूल स्थिती निर्माण करणे हे शिक्षकाचे काम आहे. स्वामीजी म्हणतात, आपल्याला जीवन घडविणारे, मनुष्य निर्माण करणारे, चारित्र्य घडवणारे व चांगले विचार आत्मसात करविणारे शिक्षण हवे आहे. युवकांनी जर चार-पाच चांगले विचार आत्मसात करून आपल्या जीवनात व आचरणात उतरविले तर अवघे ग्रंथालय मोफत करणाऱ्या व्यक्ती पेक्षाही तुमचे शिक्षण सरसच ठरेल. विविध माध्यमांतून

विद्यार्थी माहिती मिळवत असतात. शिक्षकांनी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेच्या दरम्यान विद्यार्थ्यास शिकण्यास मदत करणे, साहाय्य करणे, दिशा दाखवणे आणि प्रोत्साहन देणे, विवेकानंदांना अपेक्षित होते. प्रत्येक मूल वेगळे आहे. त्यांच्या क्षमता आणि गरजा भिन्न आहेत. विद्यार्थ्यांच्या गरजांनुसार शिक्षकांनी त्यांच्या अध्यापन पद्धतींत बदल केला पाहिजे.

शिक्षकाकडे केवळ ज्ञान असून चालणार नाही, तर ते ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोहोचवायचे हेही महत्वाचे आहे. अध्यापन करताना विद्यार्थ्याची पातळी लक्षात घेऊन, त्या पातळीवर जाऊन शिक्षकाला शिकवता येणे महत्त्वाचे आहे. आधुनिक शिक्षणपद्धतीत या बदलत्या पार्श्वभूमीवर शिक्षक आणि विद्यार्थी संबंध कसे असावेत याविषयी विवेकानंद म्हणतात, भारतीय शिक्षणाची कोणतीही समस्या सोडवण्यासाठी अत्यंत आवश्यक गोष्ट जर कोणती असेल तर ती म्हणजे शिक्षकाच्या दैनिक सामान्य कार्याचा अनुभव आणि यासाठी एक सगळ्यात मोठा आणि अत्यंत आवश्यक गुण शिक्षकाच्या अंगी असणे जरुरीचे आहे. तो म्हणजे शिष्याच्या दृष्टीतून जगाकडे पाहण्याची शक्ती. शिक्षणशास्त्राच्या प्रत्येक सिद्धांतातून हेच सत्य प्रतिपादित केले गेले आहे. शिष्याच्या आकांक्षांचा विरोधी शिक्षण देणे म्हणजे यशाऐवजी अपयशच पदरी घेणे होय. शिक्षकास त्याच्या विद्यार्थ्यांबद्दल अपार प्रेम, जिव्हाळा आणि सहानुभूती असावी. केवळ पैसा, नावलौकिक आणि प्रसिद्धी हा त्याचा हेतू असता कामा नये. शिक्षकास धर्मशास्त्रांचे ज्ञान अवगत असावे. ते ज्ञान सहज आणि सोप्या भाषेत मांडण्याचे कौशल्य त्याच्याकडे असावे. शिक्षक हा चारित्र्यसंपन्न असावा, तर विद्यार्थी हा विनयशील असावा. विद्यार्थ्यांला शिक्षकांबद्दल आदर असावा. त्याच्याकडे कष्ट करण्याची तयारी असावी. तो संयमी आणि सहनशील असावा. ज्ञानाची तीव्र लालसा आणि आत्मसंयमन हे गुण विद्यार्थ्यांच्या अंगी असावेत.

विवेकानंदांच्या मते, "माणूस परिपूर्ण घडवणे हे फार हळुवार चालणारे, सातत्यपूर्ण व शांतपणे करावयाचे काम आहे, त्यासाठी फार मोठा संयम, चिकाटी, नियमितता व सातत्य आवश्यक आहे. या कामात घाई करून चालणार नाही. यश मिळवण्यासाठी चिकाटी हवी, मनोबल हवे, आत्मविश्वास हवा व प्रचंड इच्छाशक्ती हवी. मनाच्या शक्तीचे सामर्थ्य ओळखून एकाग्रतेसाठी प्राणायामसुद्धा करायला हवा. इच्छाशक्तीचा उपयोग करीत राहा, म्हणजे तीच तुम्हाला उन्नतीपथावर अग्रेसर ठेवेल. मनाचे सामर्थ्य आणि शक्ती एकात्मतेतून वाढतात."

**सर्वांना शिक्षण हाच एकमेव उपाय -**

सर्वसाधारण जनतेच्या बौद्धिक दर्ज्याची वाढ आणि त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार या गोष्टींवरच राष्ट्राची प्रगती अवलंबून असते. काही मूठभर लोकांनी साऱ्या देशातील बुद्धीचा व शिक्षणाचा मक्ता घेतल्याकारणानेच भारताचे अधःपतन झाले. भारताचे पुनरुत्थान घडवून आणावयाचे असल्यास आपणाला सर्वसामान्य लोकांत शिक्षणाचा प्रसार करावा लागेल. सामान्य जनतेने हरवलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची पुनःप्राप्ती आणि विकास करण्याचे शिक्षण त्यांना देऊनच आपण त्यांची सेवा करू शकू. शिक्षणातून त्यांच्यात निरनिराळ्या ध्येयांचा प्रसार करावयास हवा. त्यांच्या भोवतालच्या जगात घडणाऱ्या नानाविध घडामोडींचे ज्ञान एकदा त्यांना करून दिले म्हणजे स्वतःच्या उद्धाराचा मार्ग ते स्वतःच चोखाळतील. प्रत्येक देशाने, प्रत्येक माणसाने, प्रत्येक स्त्रीने आपल्या उद्धाराचा मार्ग स्वतःच चोखाळला पाहिजे. त्यांना विचार आणि कल्पनाच फक्त पुरवा. एवढीच मदत त्यांना हवी आहे. बाकी साऱ्या गोष्टी परिणामरूपाने आपोआपच घडतील. 'निरनिराळी रासायनिक द्रावणे एकत्र ठेवणे एवढेच आपले काम; त्यांच्यात स्फटिकीभवन निसर्गनियमानुसार आपोआपच घडून येईल.'

युवा स्यात् साधु युवाध्यायकः। आशिष्ठो दृढिष्ठो बलिष्ठः॥

अर्थात तरुण हा साधू म्हणजे सरळ, निष्कपटी, निर्मळ आणि खिलाडू वृत्तीचा असला पाहिजे. गर्वाने झुकून न जाता यशाचा तसेच कोणतीही सबब न सांगता अपयशाचा त्याला मोठ्या मनाने स्विकार करता आला पाहिजे. युवकांना मार्गदर्शन करताना विवेकानंद म्हणतात तेहतीस कोटी देवदेवतांवर तुमचा विश्वास असेल पण तुमचा स्वतःवर विश्वास नसेल तर तुम्ही

नास्तिक आहात असे मी मानतो, म्हणून प्रचंड आत्मविश्वास वाढवा, निर्भय व्हा. युवकांनी पवित्र्याचे भाव ठेवून स्वतःशी पूर्णपणे प्रामाणिक रहा, आपल्या भवितव्यावर पूर्ण श्रद्धा ठेवा, स्वतःचे भविष्य घडवा, आजपावेतो जे झाले ते होऊन गेले त्याबद्दल खंत करीत बसू नका, "वाहिली ती गंगा राहिले ते तीर्थ" या उक्तीनुसार भविष्याचा वेध घेत मार्गक्रमण करा. भावी काळ तुमच्यापुढे विस्तारलेला आहे. तुमचा प्रत्येक शब्द, प्रत्येक विचार, प्रत्येक कृती, तुमच्या गंगाजळीत संचित राहील. ते तुमचे रक्षण करण्यास सदासर्वदा सज्ज आहे. आपला भारत देश हा जगातील सर्वात तरुण युवकांचा देश म्हणून ओळखला जात आहे कारण आपल्या देशातील युवकांची संख्या जगातील इतर देशांच्या तुलनेत सर्वाधिक आहे कदाचित याच आत्मविश्वासाच्या जोरावर माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी भारत महासत्ता होण्याचे एक आशादायी स्वप्न पहिले होते. ते स्वप्न प्रत्यक्षात साकारण्यासाठी विवेकानंदांच्या विचारांचे पाईक होऊ या.

**- प्रा. अमोल श्रीकृष्ण अहिरे,** नाशिक.

लेखक हे जी. वाय. पाटील कनिष्ठ महाविद्यालय, जळगाव निंबायती.
ता. मालेगाव, जि. नाशिक. येथे कार्यरत आहेत.
तसेच माजी नगरप्रमुख विवेकानंद केंद्र कन्याकुमारी शाखा नाशिक.

*****



**Arise, awake and stop not until the goal is reached.**

- Swami Vivekananda

# दिवाळी : अपरिग्रहाच्या वाटेवरची संधी !

मोनिका - हॅलो.

रश्मी- हॅलो...बोल गं.

मोनिका - बरं बाई आज तरी फोन उचललास. अगं कुठे पत्ता तुझा ? काल पण मी फोन केला होता. तू उचलला नाहीस की नंतर कॉल बॅक पण केला नाहीस. बिझी बिझी ?

रश्मी- कसली बिझी ? छे गं. हा काय.. घरातला पसारा आवरण्यातच फोन कधी वाजला ते कळालं नाही आणि नंतर निवांत फोन करू म्हटलं तर विसरूनच गेले. आज तर पहाटेपासूनच भिडले आहे कामाला.

मोनिका - बापरे, पहाटेपासून.. एवढं काम तरी काय काढलंस ?

रश्मी - अगं दिवाळीची साफसफाई नको करायला ? आत्ता पितृपंधरवड्यातच करायला हवी ना. आमच्या गावी या दिवसात घरातील प्रत्येक वस्तू स्वच्छ करतात. प्रत्येक कपडा अन् कपडा धुवून काढतात. नवरात्र बसायच्या आत हे सगळं करायला हवं ना ! दसऱ्यानंतर रोजची कामं सांभाळून दिवाळीची खरेदी, फराळ करणं हे सगळं अगदी अति होतं गं.. आत्ताच बघ...मन्याचं कपड्यांचं कपाट लवकर होईल आवरून असं वाटलं. म्हणून तिथून सुरुवात करू म्हटलं तर त्यानं ते किती अस्ताव्यस्त ठेवलंय. दार उघडताच धपकन कितीतरी कपडे खाली पडले.

मोनिका - आमच्याकडे काही वेगळी परिस्थिती नाहीये गं.

आणि हा पसारा आवरायचा तरी कसा गं? आमच्याकडे तर कपाटं कमी पडताहेत. यांना म्हटलं जरा इंटिरिअरवाल्याला बोलवून काही कपाटं आणि सोयी करून घेऊ तर हे म्हणतात दोनच तर वर्षं झाली सगळा खर्च करून. आता परत नको. आहे त्यात भागवा.

रश्मी - यांना काय जातं भागवा म्हणायला! इथे सामान ठेवायचं कुठं आणि कसं हे आपल्यालाच बघावं लागतं ना! माझा तर आवराआवर आणि साफसफाई करून जीव अगदी मेटाकुटीला आलाय. बरं अशा वेळेला घरातील सगळी मंडळी बरोबर आपापल्या वाटा शोधून बाहेर पळतात. मी मात्र एकटीच सापडते कचाट्यात. एकल सफाई कामगार. दरवर्षीचच आहे हे. बरं ते जाऊ दे... तू फोन कशासाठी केला होतास ? सहज ना?

मोनिका - अगं शांत हो. शांत हो. आणि नीट ऐक. आज दुपारी ४ वाजता आपण सगळ्याजणी मस्त शॉपिंग ला जायचंय. राजेश्वरी चा खास दिवाळी सेल लागलाय. खास ५०%डिस्काऊंट देताहेत. खूप सुंदर सुंदर handcrafted साड्या आहेत गं त्यांच्याकडे.

रश्मी - काय सांगतेस! ए माझ्याकडे नाहीये एकही राजेश्वरीची साडी. मला हवीच आहे. पण काय गं... आता किती वाजले.. मी तर आख्खं कपाट खाली काढलंय. हे सगळं आवरून ४ पर्यंत कसं आवरून येणार मी?

मोनिका - अगं दे पटापट तसंच ठेवून कपाटात. नाहीतर कोंब सरळ. नंतर बस निवांत आवरत. चल पटकन आवर. ४ ला तिथेच भेटणार आहेत सगळ्या. .... आणि चालल्या मैत्रिणी पुन्हा खरेदी करायला! पुन्हा घरातील सामानाची 'अडगळ' वाढवायला! खरंच त्या वस्तूची गरज आपल्याला आहे की नाही यावर विचारविनिमय करण्यासाठी वेळ आहे कोणाकडे? शिवाय हल्ली कंपन्यांचे मार्केटिंग हे ग्राहकांच्या मानसिकतेचा व्यवस्थित अभ्यास करूनच केलं जातं. उत्कृष्ट तंत्रज्ञानाचा वापर करत अशा काही प्रभावी आणि आकर्षक जाहिराती तयार केल्या जातात की ग्राहकांना क्षणात भुरळ पडेल. नव्हे, नव्हे..त्या वस्तूची गरजच ग्राहकांच्या मनात निर्माण केली जाते! त्या वस्तूवाचून आपलं आयुष्यच अडलंय वा त्या वस्तुमुळेच फक्त माझं जीवन सुकर होणार आहे किंवा त्या वस्तूंमुळेच फक्त माझ्या आयुष्यात 'आनंद' येणार आहे!!! त्यामुळे तो

आनंद मला मिळवलाच पाहिजे... आत्ताच्या आत्ता खरेदी करून.  शिवाय जोडीला आकर्षक पण 'टाईम-बाऊंड' ऑफर्स पण असतात. कधी खास सणवाराचा डिस्काउंट म्हणून तर कधी कोणकोणत्या स्पेशल डेज निमित्ताने शॉपिंग ऑफर्स, तर कधी समर, विंटर, रेनी सिझन सेल... सेल ! सेल! सेल!!! आणि मुख्य म्हणजे हे सगळं खरेदी करण्यासाठी ठरवून, कष्ट घेऊन कुठे जावं लागत नाहीच ना. घर बसल्या क्षणार्धात हव्या त्या वस्तूंची ऑनलाईन खरेदी होते. त्यामुळे ग्राहक अगदी अलगद जाळ्यात अडकतो!

बरं या नवीन खरेदीचा आनंद टिकतो तरी किती काळ? गेल्याच वर्षी घेतलेला मोबाईल आज जुना वाटतो. तोपर्यंत बाजारात नव-नवीन फिचर्ससह, आकर्षक ऑफर्ससह विविध कंपन्यांच्या मोबाईल्सनी अवतार घेतलेलाच असतो. जो आपल्याला खुणावत असतो. त्याचं गुणगान, त्याची किर्ती सोशल मीडियावर हा हा म्हणता पसरते. मित्र परिवारातील एकाचं बघून चढाओढ लागल्यागत दुसरा खरेदी करतो. इतरही अनेक इलेक्ट्रॉनिक वस्तू जसे की विविध साईजेस चे राईस कुकर, इंडक्शन, शेगड्या, मिक्सर, हॅण्ड मिक्सर/ ब्लेंडर, इयरफोन, अशा अनेक इलेक्ट्रॉनिक वस्तू आपण हौसेने घेतो. पण त्यांचा वापर मात्र क्वचितच करतो. अनेकदा या वस्तू बराच काळ न वापरल्यामुळेही लवकर बिघडतात. मग पुन्हा खरेदी. हे सगळं अगदी unending आहे.

शिवाय, हल्ली घरं दिवसेंदिवस लहान लहान होत चालली आहेत आणि घरातील वस्तूंची संख्या मात्र वाढत चालली आहे. घरात मोकळेपणाने वावरताही येत नाही. घरात जास्त पसारा असेल तर पाहुण्यांना बोलावण्याची अनेकांना लाज वाटते. खूप आधी प्लॅन करून, आवराआवर करून बोलवावं लागतं. पूर्वी तर गावाकडचे पाहुणे अगदी अचानक यायचे. थेट रहायलाच. पण त्यांचं घराघरांत आनंदानें, प्रेमानं, उत्साहानं स्वागत व्हायचं. वस्तू कमी असल्याने घरात आणि सोशल मीडिया नसल्याने मनात भरपूर जागा असायची.  आता छोट्या घरांमुळे तसं चित्र विरळाच. 'अचानक कोणी आलं तर?' या भितीने तर अनेक घराचा फक्त दर्शनीय भाग आवरलेला व सुंदर डेकोरेट केलेला असतो. आणि आतील खोल्यांत? किंवा कपाटांच्या आत? सामानाची कोंबाकोंबी. म्हणूनच कुठं थांबायचं हे कळायला हवं. लहानांपासून थोरांपर्यंत, महिला असो वा पुरुष, आपण सगळेच थोड्याफार फरकाने या मोहजालात अडकत चाललोय.  या मोहजालाला काही अंत नाही. आपण भानावर येत  'शहाणं' व्हायला हवं हेच खरं.

भारतीय संस्कृतीत अगदी पुरातन काळापासून साधी जीवनशैली अंगीकारण्यावर भर असे. याबाबत भारतीय संस्कृतीने एक महत्त्वाचा शब्द दिला आहे तो म्हणजे अपरिग्रह. भगवान श्रीकृष्णांनी श्रीमद्भगवद्गीतेतील ६ व्या अध्यायात 'आत्मसंयमयोग' सांगितला आहे. त्यातील खास करून १० व्या श्लोकात या 'अपरिग्रहाचं' महत्व सांगितले आहे.

योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थित: ।

एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रह: ॥ ६/१०॥

'परिग्रह' म्हणजे संचय.

आणि 'अपरिग्रह' म्हणजे स्वामित्व किंवा संग्रहाच्या भावनेपासून मुक्त असलेला.

संचयी वृत्तीचा अभाव पाहिजे. संचय.. मग तो वस्तूंचा असू दे वा विचारांचा तो फक्त अडगळ निर्माण करतो, गोंधळ निर्माण करतो. म्हणूनच आपल्या गरजा कमीतकमी ठेवण्याकडे पूर्वजांचा कल असे.  अगदी पातंजल मुनींनीही अपरिग्रह वृत्तीने जीवन जगण्याचे महत्व सांगितले आहे. आणि अशी जीवनशैली असेल तेव्हाच तर मनावरचं ओझं कमी होऊन, शांतपणे विचार करता येतो. आध्यात्मिक प्रगतीही साधू शकते. याची कित्येक उदाहरणे आहेत.

आपल्या पूर्वजांनी आयुष्य साधेपणाने पण समृद्धपणे कसे जगावं याचे धडे दिले. स्वतः त्याप्रमाणे जगून समाजासमोर आदर्श ठेवले. अगदी श्रीराम, श्रीकृष्ण यांची चरित्रे जरी नीट अभ्यासली तरी  कितीतरी उदाहरणे सापडतील.

त्याकाळी विद्यार्जन करत असताना ऋषी मुनींच्या आश्रमात अगदी सर्व राजकुमार देखील इतरांच्या बरोबरीनेच, अगदी साधेपणाने रहात. आणि पुढे राजा झाल्यावर तेही वैयक्तिक जीवनात विलासी न रहाता प्रजाहीतदक्ष रहातील यावर गुरू जनांची नजर असे.

हल्ली हल्ली तर जगभरात Minimalist Lifestyle चा trend आलाय. आणि तो योग्यही आहे. जीवन सुटसुटीत जगता आलं पाहिजे इतक्याच वस्तू आपल्या घरात यायला हव्यात. नाहीतर त्या वस्तू 'वस्तू' न रहाता निव्वळ 'कचरा' वा 'अडगळ' बनून रहातात. शिवाय असं प्रचंड वस्तूंनी गच्च भरलेलं घर एक प्रकारे मनात ओझं मनात निर्माण करतं. आणि नीट काही सुचत नाही. शिवाय इतकी गर्दी झाल्यावर हवी ती वस्तू वेळेवर सापडतही नाही. मग उपयोग काय त्यांचा? अनेकदा काही वस्तू तर एकूणच  वस्तूंच्याच भाऊगर्दीमुळे दृष्टीपल्याड जातात. मग एखादी वस्तू आपल्याकडे आहे हे आपल्या लक्षातही रहात नाही वा हवी त्याक्षणी सापडतही नाही. मग, परत बाजारातून तशीच दुसरी वस्तू घरी येऊन बसते. वेळ, पैसा आणि जागा सगळ्यांचाच अपव्यय?!!

याचा अर्थ असा नाही की खरेदीच करू नये. जरूर करावी. पण ती सजगतेने व आवश्यकतेनुसारच करावी. खरेदी करताना त्या वस्तूची उपयुक्तता तपासून घेऊनच करावी.

आणि अधेमधे काही काळाने घरातील कुठल्या वस्तूंचे decluttering आवश्यक आहे का, हेही लक्षात घ्यावे लागते.  जर एखादी वस्तू/कपडे इ. कोणत्याही कारणाने तुम्ही वापरत नसाल तर ती तुमच्या घरात पडून रहाण्यापेक्षा दान करा. चांगल्या रितीने दान करा. ती वस्तू सुस्थितीत असतानाच दान करा. दुसऱ्या कोणाला तरी त्याचा उपयोग होईल. याबाबत जगभरात फेमस झालेली जपानची कन्सल्टंट मारी कोंदो Marie Kondo (konmari) हिचे विचार जाणून घेण्यासारखे आहेत.  ती म्हणते तुम्ही फक्त 'declutering' वर लक्ष केंद्रित करू नका तर याउलट, अशा वस्तू घरात ठेवण्यावर लक्ष केंद्रित करा ज्या वस्तू तुम्हाला खरोखरीच उपयुक्त आहेत, ज्या तुम्ही नेहमी वापरता आणि सर्वात मुख्य म्हणजे ज्या वस्तूंमुळे तुम्हाला आनंद मिळतो... फक्त त्यांच वस्तू संग्रहात ठेवा.

घर आवरण्याची तिची पद्धतीही वाखाणण्याजोगी आहे. तिच्या प्रत्येक क्लायंट कडे गेल्यावर घर आवरायला सुरुवात करताना ती सर्वप्रथम घरातील सर्वांना एकत्रित बसायला सांगते. डोळे मिटून त्यांच्या वास्तूप्रती कृतज्ञता व्यक्त करायला सांगते. मग ते घर लहान असो वा मोठं, स्वतःचं असो वा भाड्याचं. ही जी कृतज्ञशीलता आहे ही वृत्तीच महत्वाची. आणि भारतीय संस्कृतीत तर ही पुरातन काळापासून चालत आलेली आहे. मारी कोंदोनेही आपल्या कृतीतून जापनीज कल्चरच तर मांडलं आहे. ती म्हणते घरातील प्रत्येक वस्तूला तिची स्वतःची अशी 'designated space' हवी! कामाला सुरुवात करताना ती क्लायंट ला प्रत्येक वस्तू हातात घेऊन फील करायला सांगते. ती वस्तू जर उपयुक्त नसेल वा आनंद देत नसेल तर donate करण्याचा सल्ला देते. जेणेकरून त्या वस्तूचा उपयोग दुसऱ्या कोणाला तरी होईल. असं करताना ती एक प्रकारे त्या वस्तूलाच विचारते "Do you want to stay or do you want to go?"  आणि ती सांगते 'Let it go happily. It may give happiness to someone else!'

खरंच, मारी कोंदो जरी आज जापनीज कल्चर जगभरात अभिमानाने मांडत असली तरी हाच विचार भारतीय संस्कृतीतही कित्येक शतकांपासून चालत आलाय.

अगदी इयत्ता दहावीच्या पाठ्यपुस्तकातही असलेल्या संस्कारक्षम कवितेत कवी द.भा.धामणस्कर म्हणतात -

वस्तूंना जीव नसेलही कदाचित, पण

जीव नसल्यासारखे वागवू नये त्यांना.

वस्तूंना मनही नसेल कदाचित, पण ते

असल्यासारखे वागवलं तर वस्तू

प्रचंड सुखावतात.

आपण भारतीयांनी आता हे विचार प्रत्यक्षात उतरवण्याची गरज आहे. ठरवलं तर तसं आपण नक्कीच करू शकू.

आपल्या प्रत्येकाचं घर कसं सुटसुटीत तरीही परिपूर्ण, सुखद व उबदार आणि मन:शांती प्रदान करणारं असेल.

चला तर मग, दिवाळीच्या निमित्ताने आपण decluttering and deep cleaning करतोच, तर ते करत असताना आपण आता अपरिग्रहाकडे वाटचाल करू या. समृद्ध होऊ या.

शुभ दीपावली.

**- गौरी शेटे, पुणे.**

लेखिका ह्या समीक्षक म्हणून सुपरिचित असून
१९९९ पासून इतिहास प्रेमी मंडळाच्या संस्थापक सदस्या आहेत.
सध्या त्या स्वतः शेफ असून उद्योजिका आहेत.

*****



# आपल्या निरामय जीवनाची खात्री प्रदुषणमुक्त गावनदी.

मी सुरक्षित तर माझे भवितव्य सुरक्षित, असे आपण वारंवार म्हणत असतो. त्यामुळे वर्तमाला सुरक्षित करत आपण भविष्यकाळाचीही सोय करण्याचा प्रयत्न करत असतो.

वर्तमानाची सोय म्हणजे आपल्या गरजा पूर्ण व्हाव्यात यासाठी प्रयत्न. भविष्यकालीन सोय म्हणजे या गरजा सतत पूर्ण करता येतील, येवढे आर्थिक पाठबळ राखणे.

परिवाराची सोयही आपण अशीच बघतो. आपल्या मुलाला अत्त्युत्तम शाळेत प्रवेश मिळावा. त्याला ट्युशन्स व अदर ॲक्टिव्हिटीज उपलब्ध करून द्याव्यात, जेणेकरून जगाच्या गतीसोबत चालण्याची त्याची तयारी साऱ्यांयेवढीच असेल. मुलगी असली तर तिच्या लग्नासाठी पैसे बाजूला टाकणे सुरू राहते. येनकेनप्रकारेण आपण व आपले प्रियजन सुखी, निरोगी व आनंदी राहू शकू, अशी उपाय योजना करण्यात आपण गुंतलेले असतो. पण सुख, निरोगत्व व आनंद हे आजकाल व्यक्तिगत राहिले नाहीत. समाजासोबत तडजोड करतच ते घ्यावे लागते. आर्थिक तडजोड आपण समाजासोबत सहजच करू शकतो. पण निरोगत्त्व हे आज तितकेसे सोपी राहिले नाही. याचे कारण आम्ही ज्या भागात राहतो त्याभागातच तयार झालेले अन्नधान्य आपल्या हिताचे असते, त्या भागातलेच पाणी आपल्या हिताचे आहे, हेच आपण विसरलोय. कुठूनतरी बाहेरून आलेले धान्य आपण खातो व कुठूनतरी आलेले पॅकबंद पाणी आपण पितो. कारण वाढत्या शहरीकरणाने व शहरालगतच्या औद्योगिकरणाने न शेती उपयोगी जमीन उरली आहे, न जमिनीतील पाणी पिण्या लायक राहीले आहे. सिमेंटीकरण हाच विकासाचा आधार समजल्या जात असल्याने जमिनीत पावसाचे पाणी मुरायलाही जागा उरली नाही.

आपल्या निरोगी भवितव्याला पहिला झटका पडतो तो इथेच. निरोगी अन्न नाही, निरोगी पाणी नाही व निरोगी हवाही नाही. विकासाच्या संकल्पनेत आपण आपलीच मुळं खोदून टाकली. मग जीवन बहरणार कसे.

नदीला आपल्याकडे संस्कृतीकारक समजले जाते. प्रत्येक गावची संस्कृती बदलते, कारण त्या त्या गावची नदी अलग असे. पण ज्या नद्या पुर्वी स्वच्छ व खनिजयुक्त पाणी घेऊन वाहत होत्या, त्या आता शहरातील व कारखान्यांमधील कचरा घेऊन वाहत आहेत. याचा परिणाम केवळ नदी वा पर्यावरणावर नाही झाला तर तो आमच्या संस्कृतीवरही झाला. अगोदर कधीही जगली गेली नसेल, इतकी आत्मघातकी व टाकाऊ संस्कृती आपण जगत आहोत. त्यामुळे न शरीराचे आरोग्य चांगले आहे, न मनाचे आरोग्य सुदृढ आहे. सामाजिक संस्कृती म्हणाल तर आम्ही समाज म्हणून जगणे केंव्हाच बंद केलेले आहे. समुहात राहतांनाही, प्रत्येकजण स्वतःला एकटा समजत आहे. आपल्या भविष्यकालीन पिढीसाठी आपण काय ठेवून जाणार आहोत? मास्कयुक्त हवा ? फिल्टरचे पाणी ?

विकासाच्या नावाखाली आजवर केवळ पाश्चात्य विचारच वापरले. याचे तोटे दिसणे व ते उबजणे आता सुरू झालेले आहे. वेळीच हे पाश्चात्य विचार व आचार आवरले नाहीत तर आत्यंतिक उपभोगातून सृष्टीकडून येणारा प्रलयंकारी फटका आपण पचवू शकणार नाही. आजवर स्वतःला संतुलित ठेवायला सृष्टीने बरेच प्रयत्न केलेत. एखादा प्रयत्न मानवाच्या घाताचाही असू शकेल.

यावर उपाय काय?

आपली जीवनपद्धती बदलणे. मी सृष्टीचाच एक भाग आहे, हे लक्षात घेत आपण स्वतःला जसे निटनेटके व सुरक्षित ठेवतो, तसेच सृष्टीलाही निट नेटके व सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करणे.

सामुहिक चुकांमधून प्रदुषित झालेल्या नद्या केवळ माझ्या आचरणशुद्धीने कशा सुधारणा ? ही शंका घेत बसण्या पेक्षा आपण किमान आपले आचरण सुधरवू शकतो, तर ते का करू नये ? असे मनाला निक्षून सांगायला हवे. हळूहळू आपल्या सारखे इतरांनाही वाटू शकते.

आपण पृथ्वी, पाणी, वायू, अग्नी व आकाश यांना पंचमहाभूतं म्हणतो व त्यांना देव समजत त्यांची पुजा करतो. याचा अर्थ नदी ही केवळ पाणी वाहून नेणारी यंत्रणा नाही तर ते चैतन्य आहे. त्यामुळे ही चेतना शुद्ध राहील व किमान माझ्या तर्फे पुन्हा प्रदुषित होणार नाही, असे सारे प्रयत्न आपण करायला हवे.

नदी विषयी आपण काय काय काळजी घेवू शकतो ?

१) सकाळी अगदी पहिले काम आपण करतो, ते म्हणजे ब्रशवर केमिकल पेस्ट घेत ती तोंडात कोंबतो व ब्रश करून चुळभरून बाकी कामाला लागतो. आपल्या बेसिन मधून ही पेस्ट नदीत जाते. आपल्या दृष्टीने शुल्लक असलेली घटना एकत्रित फार मोठी घडलेली असते. ती कशी ते बघू.... आपण ब्रशवर अंदाजे ३ ग्राम पेस्ट घेतो. एका माणसाला तीन ग्राम तर एक लाख लोकांना किती, हे त्रैराशिक सोडवून विचार करा. हे उत्तर ३०० किलो येवढे येते. म्हणजे जितकी जास्त लोकसंख्या तितके जास्त टुथपेस्ट प्रदुषण.

२) आंघोळीचे व कपड्यांचे साबण - बाजारात उपलब्ध बहुतेक सारेच साबण केमिकलयुक्त आहेत. आपल्या त्वचा आरोग्यासाठी केमिकल साबण तितकेसे योग्य नसते. यांचे केमिकल त्वचेला रुक्ष बनवतात. तरीही केवळ जाहिरात बघत आपण रोज साबण वापरत त्वचेला जास्तीत जास्त रुक्ष बनवत असतो.

आंघोळीचे वा कपड्यांचे साबण रोजच वापरणे गरजेचे नसते. त्या ऐवजी आपण घरगुती उटण्या सारखे इतर पर्यायही वापरू शकतो. त्यामुळे केमिकला त्वचेलाही लागत नाही व नदीतही वाहत नाही.

गावनदी खराब होते ती आपल्या घरून वाहणाऱ्या त्याज्य पदार्थांमुळे. अगदी संडासची व बाथरुमचे केमिकल सांडपाणी तिच्यातच वाहत जाते. आपल्या घरुनच जर गावनदी भ्रष्ट होतेय तर आपले आचरण व सवयी बदलवत आपण तिला स्वच्छ ठेवू शकतो.

३) आपल्या घरी फळांची सालं व भाजीचे तुकडे नित्य निघत असतात. यातून आपण बायो एंझाईम नावाचे नदीपुरक मिश्रण तयार करु शकतो.

एक भाग भाजीचे तुकडे वा फळांचे सालं. तेवढाच भाग गुळ व तिप्पट ताक व १० पट पाणी हे मिश्रण एका बंद प्लॅस्टिक च्या बाटलीत तयार करावे व यात तयार होणारा गॅस निघून जायला हे मिश्रण रोज ढवळावे. ४५ दिवसांनी हे अत्त्युकृष्ठ बायो एंझाईम बनले असते.

फरशी पुसण्याच्या पाण्यात हे थोड्या प्रमाणात टाकले व फरशी पुसली तर ती अगदी फ्लोर क्लिनर सारखीच चमकते व निर्जंतुकही होते.

या मिश्रणाने संडास सिट व बाथरुमची फरशीही घासता येते. या मिश्रणाला आपण बेसिन मधून प्रवाहीत केले तर ते पाईपमध्ये अडकलेला कचरा साफ करत नदी पर्यंत जाते व नदी ही स्वच्छ करते. एक लिटर बायो एंझाईम नदीतील १०००० (दहा हजार) लिटर पाणी स्वच्छ करते. आपण नदीकाठावर जाऊनही हे बायो एंझाईम नदीत टाकू शकतो. यातून नदीतील जलचरही वाढतात.

४) सामुहिक स्तरावर प्रयत्न करून आपण शहरातील सांडपाणी प्रक्रिया झाल्याशिवाय नदीत जाणार नाही, याची काळजी घेऊ शकतो.

स्वतःच्या आरोग्या विषयी जागृत व्यक्ती म्हणून आपण हे सारे प्रयोग सहज करू शकतो. नदी स्वच्छ झाली की तिच्यामुळे हवाही शुद्ध होणे सुरू होते व वायुप्रदुषणाचा इंडेक्सही कमी होतो.

यातुनच आपले वर्तमान सुरक्षित राहणे सुरू होणार आहे. पुढे आपल्या भविष्यकालीन पिढीला आपण स्वस्थ पर्यावरण व निरामय जीवन प्रदान करू शकू.

गरज आहे ती आपण स्वतः आत्मविश्वासाने कामाला लागण्याची, तसेच या साध्या सोपी तंत्राचा प्रचार करत पर्यावरण सुरक्षित करण्याची!

**- किशोर पौनीकर नर्मदापुरकर,** नागपूर.

लेखक सामाजिक विषयाचे अभ्यासक आहेत.

*****



# मराठी लोककलांची वैविध्यता व प्रारूप.

महाराष्ट्राच्या जनमानसाने लोककलांचे संचित हजारो वर्षापासून जपलेले आहे. चांद्यापासून बांद्यापर्यंत पसरलेल्या या भूमीत अनेक लोककला खोलवर रुजल्या आहेत. मराठमोळ्या लोककलांना शेकडो वर्षाची समृद्ध परंपरा आहे. वर्षानुवर्षे या लोककलांनी मानवी मनाचे निखळ मनोरंजन केले आहे. या कलांची व्याप्ती सर्वदूर ग्रामीण, शहरी तसेच आदिवासी क्षेत्रांपर्यत पसरलेली आहे. महाराष्ट्रात प्रामुख्याने तमाशा, खडी-गंमत, दंडार, दशावतार, जागरण, गोंधळ, ललित, भराड, डाक (डहाका), बोहाडा, कलापथक, खम्म, लप्पक, भजनी सोंगे आणि लोकरामायण यासारख्या लोककला अधिक लोकप्रिय होत्या. सोबतच गोंधळी, पोतराज, गोसावी, वासुदेव, स्मशानजोगी, हरबोला, नाचा, ठाकर, भोपा, जोगती-जोगतिनी, वाघ्या-मुरळी असे कलावंत स्वतंत्रपणे आपली कला सादर करीत असत.पूर्वी लोककलांचा लोकमानसावर खूप मोठा पगडा होता. मनोरंजनाचे तेच प्रमुख साधन होत्या. काही कलांना धार्मिक अधिष्ठान होते. त्यावेळी जनमनात देव-धर्म, रूढी-परंपरा, विधी-अनुष्ठान, सदाचार, पाप-पुण्य यासारख्या भावभावना अधिक तीव्र होत्या. कृषी संस्कृतीवर आधारित जीवन पद्धतीमध्ये लोककलांचे प्रदर्शन आणि सादरीकरण अलुतेदार-बलुतेदार लोक करीत असत.दरवर्षी कृषीचा हंगाम सुरू झाला की लोककलांना सुगीचे दिवस येत असत. गावोगावी भरणाऱ्या जत्रा-यात्रा, उत्सव, उरूस लोककलांसाठी महत्त्वाचे असत.कित्येक वर्षापासून या लोककलावंतांच्या अनेक पिढ्यांनी विविध कलांचा वारसा मोठ्या निष्ठेने जपलेला होता. ज्यांना कित्येक शतकांची समृद्ध परंपरा होती. सातवाहन काळात रतिनाट्या सारख्या लोककला प्रचलित होत्या असे संदर्भ 'गाथा सप्तशती' या ग्रंथात आढळतात. त्यानंतर चालुक्य, राष्ट्रकूट आणि यादवांच्या काळातही कला, संगीत, नृत्य आणि मौखिक परंपरेची बरीच प्रगती झाली होती. बाराव्या शतकातील ज्ञानेश्वरांच्या काळात प्रचलित असलेले नट, नाचे, नाटकी, नटी, सोंगे असे प्राकृत शब्द ज्ञानेश्वरीत आले आहेत. यावरून तत्कालीन समाजात या लोककला रूढ असाव्यात असा निष्कर्ष काढता येतो. तेराव्या शतकाच्या पुढे निर्माण झालेल्या संतांच्या अभंगातही लोककलांचे अनेक संदर्भ आहेत. एकनाथांच्या अभंगामध्ये भालदार-चोपदार, जोशी, जोगवा, भांड, बहुरूपी, वासुदेव, पोतराज, गोंधळ, भराडी, डोंबारी इ. रचना आहेत. ज्या तत्कालीन सामाजिक जीवनावर प्रकाश टाकतात. सोळाव्या शतकात समर्थ रामदासांच्या दासबोधात कळसूत्री बाहुल्या, छायानाट्य आणि दशावतार यांचा उल्लेख आहेत. संत तुकारामांच्या अभंगात लोककलांचे वर्णन आढळते. पेशव्यांच्या काळात निर्माण झालेल्या पंडिती आणि शाहिरी काव्यातही लोककलांचा उल्लेख आढळतो. किंबहुना या काळातच मराठी लोककलांना सुगीचे दिवस होते. अनेक कलांना राजाश्रय मिळाल्याने या कला बहरल्या होत्या. त्यात पोवाडा, लावणी प्रमुख होत्या. मराठा राजवटीत पोवाडा, तमाशा, बहुरूपी, गोंधळी अशा लोककलांचे सादरीकरण करणाऱ्या कलाकारांना मोठे संरक्षण होते. त्यावेळी मराठ्यांनी अनेक कलावंताना इनाम, वतने व जहागिऱ्या प्रदान केल्या होत्या. भारतात इंग्रजी सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर मात्र येथील पारंपरिक जीवनात बऱ्याच प्रमाणात बदल व्हायला सुरुवात झाली.औद्योगिकतेचे वारे वाहू लागले. शिक्षणाचा प्रचार प्रसार वाढला तरीही ग्रामीण भागात पारंपरिक लोकजीवनाचा ढाच्या कायम होता, त्यामुळे लोककलांची श्रृंखला अबाधित राहिली. गावोगाव फिरून लोकांचे मनोरंजन करणारे तमाशा, लावण्या, खडीगंमत इंग्रजी काळातही बहरली होती.

अनेक लोककलांना धार्मिक अधिष्ठान असल्याने कलावंतांना सन्मानाची वागणूक मिळत होती. बहुतांश लोक गाव-खेड्यात राहत होते. गावे स्वयंपूर्ण होती. प्रत्येक जातीची कामे व कर्तव्य ठरलेली होती. त्यामुळे गावगाड्याच्या आत व बाहेर अशी लोककलावंतांची विभागणी केल्या गेली होती. काही जातीचे लोक गावात राहून तर अनेक भटके-विमुक्त गावोगाव फिरून आपली कला सादर करीत असत. कलावंतांच्या कित्येक पिढ्या कलेवर जगत होत्या. आपल्या कित्येक पिढ्यांचा वारसा जपत होत्या. प्रत्येक कलेचा वेगळा रंग आणि ढंग होता. प्रदेश निहाय त्यात वैविध्यता होती. धार्मिक

अधिष्ठानाशी संबंधित लोककला अधिक पवित्र मानल्या जात. संपूर्ण मानवी जीवनाला या कलांनी व्यापलेले होते. जन्मापासून मृत्यूपर्यंत होणारे जीवन संस्कार कलांच्या माध्यमातूनच संपन्न होत असत. जागरण, गोंधळातून आदिशक्तीची उपासना केल्या जात होती. जोगती-जोगतीनी,भोपी, आराधी गावोगाव फिरून देवीच्या नावाने भिक्षा धर्म मागत होते. माता रेणुका, भवानी, महालक्ष्मी, सप्तश्रृंगीची आराधना करीत होत्या. पोतराज मळवट भरून देवीच्या नावाने भिक्षा मागत होते. भराडी आपल्या जागरणात डमरू वाजवून शिव भक्तीची आराधना करीत होते. सरोदी, कुडमुडे व मेढंगे जोशी गावागावात फिरून लोकांना भविष्य सांगत असत. अडीअडचण व संकटाच्या काळात लोकांचे मनोधैर्य यामुळे वाढत होते. जनमानसाचे आत्मबल वाढत होते. त्याला जगण्याची नवी प्रेरणा मिळत होती. या कला दारिद्रय, गरिबी यासारख्या समस्यांनी त्रस्त जनमानसाला जगण्याची नवी उमेद प्राप्त करून देत होत्या. गावोगावी फिरून कुळ-गोत्राचा पट व कुळाची परंपरा सांगणारे भाट सामाजिक व्यवस्थेचा अविभाज्य घटक होते. ज्यांच्याकडे बाराव्या शतकापासून कुळगोत्राच्या नोंदी असणाऱ्या भूर्जपत्राच्या वह्या होत्या. ज्यात मनाक्षरी लिपी वापरल्या जात असे. स्मशानात राहून स्मशानजोगी गावोगाव फिरून भूत-प्रेत, पिशाच्च, जादू-टोणा, भानामती सारख्या अपायकारक बाबींचा बंदोबस्त करीत होते. वासुदेव, हरबोला लोक रामायण, महाभारतासारखी पौराणिक आख्याने गाऊन कुळाचा उद्धार करीत असत. शिवकाळात घडलेल्या घटनांचे प्रत्यक्ष साक्षीदार असणारे शाहीर आपल्या पोवाड्यातून समाजात चेतना जागृत करण्याचे कार्य करीत होते. शाहिरांचे पूर्वज ज्या घटनांचे साक्षीदार होते त्यांचे सादरीकरण ते प्रत्यक्ष पोवाड्यातून करीत असत. अनेक शाहिरांनी त्या काळात मराठी सत्तेला गुप्तवार्ता व शत्रूची इत्यंभूत माहिती पुरवल्याची ही दाखले सापडतात. मौखिक परंपरेत अनेक सामाजिक ऐतिहासिक घटनांची उकल होत होती. याच धर्तीवर हरबोला एका हातात तुंबडी व दुसऱ्या हातात करताल घेऊन अनेक ऐतिहासिक आख्याने गात होते. कलंदर, डोंबारी अनेक कसरती दाखवून उदरनिर्वाह करीत होते. कोल्हाटी तमाशात नृत्य, नाट्य व अभिनयाद्वारे लोकांचे मनोरंजन करीत होते. ग्रामदेवतांच्या जत्रांमध्ये कित्येक दिवस संपूर्ण रात्रभर कलांचे सादरीकरण केल्या जात असे. बहुरूपी लोकांचे जत्थे गावागावात लोकरामायण सादर करीत.चित्रकथी कळसुत्री बाहुल्या, चित्रांच्या पोथ्या व छायानाट्य दाखवून लोकांना खेळवून ठेवत होते. प्रत्येक कलावंताची सादरीकरणाची पद्धत वेगळी असायची. गीते म्हणण्याचा ढंग, लय, ताल,पध्दत वेगळी असायचा.आपल्या पूर्वजांकडून मौखिक परंपरेने मिळालेली गीते, आख्याने व कथा लोकरंजनासाठी वापरल्या जात असत. जवळपास सर्व कलावंतांना कलेचा हा वारसा आपल्या पूर्वजाकडूनच प्राप्त झालेला होता. कळत नकळत अनपेक्षित पणे पूर्वजांच्या मौखिक परंपरा, लोकवाद्य, सादरीकरणाची पद्धत नंतरच्या पिढ्या आपोआपच आत्मसात करीत होत्या आणि पुढे चालवत होत्या. भारतीय ज्ञानपरंपरेची श्रृंखला अबाधित ठेवण्याचे कार्य या कलांच्या माध्यमातून होत होते.

ग्रामीण भागातील लोकांचा लोककलांशी आत्मीयतेचा संबंध होता. लोक कलावंतांवर जीवापाड प्रेम करायचे, त्यांना भरभरून दान द्यायचे. पाहूणचार, नवे कपडे व गृहपयोगी वस्तू द्यायचे. त्यामुळे कलावंतांचा आणि लोकांचा कनिष्ठ संबंध प्रस्थापित व्हायचा. दरवर्षी आपल्या हक्काच्या गावात जाऊन कलाकार आपली कला सादर करीत असत. धार्मिक अनुष्ठाने करून भिक्षाधर्म प्राप्त करीत असत. एखाद्या वर्षी जर कोणी कलावंत त्या गावात गेला नाही तर तेथील लोक हळहळ व्यक्त करीत असत. लोककलांचे प्रदर्शन व सादरीकरण त्या त्या समाजातील अनेक कुळे रूढी-परंपरेने करीत होते. शिवपूर्वकाळापासूनच अशा अनेक कलावंतांच्या कुळांना वतनाची जावे दिल्या जात होती. आपल्या वाट्याला असणारी वतनाची गावे सोडून इतरत्र उदरनिर्वाहासाठी फिरणे निषिद्ध मानल्या जात होते. जर अशा पद्धतीचे कार्य कोणी केले तर जातपंचायतीचे लोक त्यांना दंड करीत असत. वयोवृद्ध कलावंत आपल्या वारसांना आपली गावे विभागून देत असत. कित्येक भाट आपल्या मुलींना वतनाच्या वह्या हुंड्यात देत. समाजाच्या गरजेनुसार कलावंतांनी आपल्या वाटायला आलेले कार्य सत्यनिष्ठेने सांभाळले होते. कलांची निष्ठेने जपवणूक केलेली होती.

लोककलांचा हा वारसा एकोणिसाव्या शतकातील शेवटच्या दशकापर्यंत निष्ठेने सांभाळल्या गेला. मात्र एकविसाव्या शतकात सुरू झालेल्या जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणाच्या युगात मात्र लोककलांसमोर मोठी आव्हाने निर्माण झाली. मनोरंजनाची अनेक साधने उपलब्ध झाल्याने लोककलांचा लोकाश्रय संपल्यात जमा झाला. ग्रामीण भागात अभूतपूर्व बदल वेगाने घडून आले. खेड्यातून शेतीकेंद्रित जीवनपद्धती लोप पावू लागली. शहरीकरणामुळे भौतिक गोष्टींचे आकर्षण वाढले. पंचायत राज व्यवस्था लागू झाल्यानंतर गावांमध्ये राजकारण शिरले. गटातटात समाज विभागला गेला. प्रत्येक गोष्टीत माणसं राजकारण करू लागली. शिक्षणाचा प्रसार झपाट्याने झाला. त्यामुळे नवीन पिढीत नवमुल्यांची जोपासना होऊ लागली. लोककलावंताना मात्र पारंपरिक व्यवसायावर उदरनिर्वाह करणे कठीण होऊ लागले.त्यामुळे नवीन पिढ्या आपल्या पारंपरिक कलेपासून तुटत गेल्या.अनेक वयोवृद्ध कलावंत काळाच्या पडद्याआड गेले. त्यांच्या नव्या पिढीने कलेची कदर केली नाही, त्यामुळे कलांचे सर्वाधिक नुकसान झाले. राजाश्रय व लोकाश्रयाच्या अभावामुळे अनेक लोककला लुप्त झाल्या. ज्या काही शिल्लक आहेत, त्या सुद्धा शेवटची घटका मोजत आहेत. समाजाचा कलावंतांप्रती असलेला जिव्हाळा, प्रेम आणि संवाद संपल्यात जमा आहे. रात्री राजाच्या भूमिकेत दिसणारा अभिनेता दिवसा रोजंदारी मजूर म्हणून काम करतो आहे. समाजाची कलेकडे बघण्याची दृष्टी दिवसेंदिवस बदलत चालली आहे. अनेक कलाकारांना चोर समजून बदडल्या जात आहे. अनेक लोकांचा तर यात जीव सुद्धा केला आहे. त्यामुळे लोककलांसमोर मोठी आव्हाने निर्माण झाली आहेत. हजारो वर्षापासून चालू असलेला लोककलांचा हा अनमोल वारसा जपणे अगत्याचे बनले आहे.

**- प्रा. डॉ. श्रीकृष्ण काकडे,** अकोला.
लेखक लोकसंस्कृती व बोलीभाषांचे अभ्यासक आहेत.

*****

# उत्पलवर्णा.

उत्पलवर्णा श्रावस्ती नगराच्या कोषाध्यक्षाची एकुलती एक पुत्री. तिच्या आईचे नाव सुलक्षणा. उत्पलवर्णा ही दिसायला अत्यंत सुंदर होती. तिचे स्वयंवर ठरवले तर रक्तपात होईल अशी भीती तिच्या वडिलांना वाटू लागली. राजे, मंत्रीपुत्र, श्रेष्ठीपुत्र तिला स्वतःहून मागणी घालत. तिच्यावर सोन्याच्या नाण्यांची बोली लावत. तिच्या सौंदर्याचे वर्णन करणारी अनेक पत्रे तिच्या पित्याला म्हणजे अहिंसकाला मिळत. ती पत्रे वाचून उत्पलवर्णेला लाजल्यासारखे होई. भयंकर संकोच वाटे. आपले सौंदर्य म्हणजे मात्यापित्यासाठी शापच ठरला आहे हे तिच्या लक्षात आले. तिच्या वडिलांनी नगरपंचायतीला मदत मागायची ठरवले . नगरपंचायत मधील पंच सुद्धा पुरुषच होते. ते सुद्धा तिच्या सौंदर्यावर भाळले. आपल्या मुलीला नगरवधू म्हणून घोषित केल्या जाणार आहे हे कळल्यावर अहिंसकाच्या पायाखालची जमीन सरकली. नगरवधू म्हणजे एक प्रकारची गणिका किंवा वेश्या.

उत्पलवर्णेने निर्णय घेतला . तिला गौतम बुद्धांकडे जाऊन संन्यास हवा असतो.

तिघे जेतवनात पोचले.

ध्यान आटोपल्यावर बुद्धांनी डोळे उघडले. उपालीने अहिंसकाच्या आगमनाविषयी सांगितले. उत्पलवर्णा गौतमांच्या समोर उभी राहिली. इतर सर्व शिष्यांना बुद्धांनी माध्यान्ह भोजनासाठी पाठवले. अहिंसकाने गौतमांना सर्व हकीगत सांगितली.

उत्पलवर्णाने शिष्या म्हणून बुद्धांनी तिचा स्वीकार करावा, व भिख्खुणी होण्याविषयीची तिची आंतरिक इच्छा बोलून दाखवली.

गौतमांनी तिची विचारपूस केली. एवढ्या मायेने, ममतेने बोलणारे तिला आयुष्यात पहिल्यांदाच कोणीतरी भेटले होते. " शिष्या होणे सोपे नसते उत्पलवर्णा. तुला या क्षणापूर्वीचे सर्व आयुष्य विसरावे लागेल. अगदी स्वत:चे नाव सुद्धा विसरावे लागेल. हे अलंकार तुला त्यागावे लागतील. रेशमी वस्त्रांऐवजी चीवर घालावे लागेल. भिक्षापात्र घेऊन फक्त पाच घरी एकेक मूठधान्य मागावे लागेल. वर्षाकाळात चार महिने विहारात रहावे लागेल. भिख्खुणींचा वेगळा मठ आहे. त्यात तुला रहावे लागेल. इथे रोजच पूजा असते. पण ती मनाची. मनच पूजापात्र, मनच धूप, मनच फुल... मनच देवता. पुन्हा या मार्गावरून तुला परत फिरता येणार नाही. बऱ्याचदा राना-वनातून हिंडत प्रवास करावा लागतो. आनापानसति म्हणजेच श्वास नियंत्रणाची योग्य पद्धत तुला ज्येष्ठ महिला शिकवतील.

माझी शिष्या होणे म्हणजे शेवटच्या क्षणापर्यंतचे व्रत होय. वासना, असूया, अहंकार यांचे नियमन म्हणजे हे व्रत. कुविचारांचे निर्मुलन करावे लागते.

क्रोध, दुष्टबुद्धि, द्वेष, मत्सर, लोभ, ढोंग, कपट, उद्धटपणा, गर्व, सुस्तपणा हे सर्व अकुशल धर्म आहेत.

कुठल्याही दिव्य, मोठ्या उद्दिष्टाशिवाय हे आयुष्य घालवणे म्हणजे भयंकर पापच होय. चित्ताच्या आधारानेच घट्ट राहून तुला चित्ताला वश करावे लागेल. संयमी व बुद्धीमान भिख्खू शीलाच्या आधारे तृष्णेला नष्ट करतो.

मी तुला या प्रवासात सहाय्य करेन. पण लक्षात ठेव, मी मार्गदाता आहे. मोक्षदाता नव्हे. वाऱ्याचा मित्र असलेला अग्नी ज्याप्रमाणे कितीही इंधन मिळाले तरी संतुष्ट होत नाही, तसे मानवी मन सदा अतृप्तच असते. गाण्यावर लुब्ध होऊन हरिणी जाळ्यात फसते. तेजावर भाळून पतंग अग्नीत झेप घेतो. आमिषाला भुलून मासा लोखंडाचा गळ गिळतो. सर्व ऐहिक सुखे फक्त दु:खच देतात. झाडाला आग लागली असता त्यावर पक्षी राहू शकत नाहीत. जिथे वासना असते तिथे सत्य राहू शकत नाही. दिवस असो वा रात्र, ऋतु कोणताही असो, परिस्थिती कशीही असो आपल्या कर्माचे परिणाम टाळणे अशक्य आहे.

म्हणून फक्त सत्कर्मच करावीत. जे आपण पेरतो तेच आपणाला मिळते.

प्रवज्जा घेण्यासाठी वय वर्षे वीस असणे आवश्यक आहे. तुझे वय योग्य आहे ना?

मात्या-पित्याची अनुमती तू घेतली आहेस की नाही?

अहिंसकाने-सुलक्षणेने मान डोलावली.

तथागत पुन्हा उत्कलवर्णाशी बोलू लागले, "घराचे छप्पर शाबूत नसले म्हणजे पावसाचे पाणी आत येते व घर गळू लागते. त्याचप्रमाणे आपल्या कामवासनांवर आपला ताबा नसला की त्या सर्व चांगल्या संकल्पांना पोखरून काढतात. चांगले, वाईट यांची नेहमी पारख करावी. चांगल्याच्याच संगतीत रहावे. सडलेले मांस हाती घेतल्यावर व टाकून दिल्यावरही हाताला दुर्गंधीच येते. सुगंधी दव्य हाती घेतल्यावर देहही सुगंधित होतो. म्हणून नेहमी सज्जनाच्या संगतीत रहावे. संशयी, तापट, हेकेखोर, भांडण्याची प्रवृत्ती असणाऱ्या लोकांना दूरच ठेवावे.

खरा भिख्खू कोण असतो? ते ऐक, जटा वाढवणे, त्याला वडाचा चीक लावणे, वल्कल नेसणे, विहारात राहणे, दगडावर झोपणे, पदमासन घालणे ही भिख्खूची बाह्य लक्षणे आहेत. जो कलह करत नाही, हत्या करत नाही, युद्धांस प्रवृत्त होत नाही, ज्याला विजयाची इच्छा नसते, जो सगळ्या जगाविषयी सदिच्छा बाळगतो, द्वेष, तिरस्कार करत नाही. तो खरा भिख्खू. शरीर आत्म्याचा फक्त पोषाख आहे. हिंसा, असत्य भाषण, उत्तेजक पेय पिणे, कामपूर्तिसाठी

मिथ्याचार हा अधम्म आहे."

उत्पलवर्णाने एकाग्र चित्ताने व प्रमुदित मनाने सर्व ग्रहण केले. त्याच दिवशी संध्याकाळी खेमा, प्रजापती या प्रमुख भिख्खुणींच्या उपस्थितीत तथागतांनी उत्पलवर्णेला स्वत: दीक्षा दिली. त्यापूर्वी तिचे केशवपन केल्या गेले. तिला काषायवस्त्रे मिळाली. दीक्षा देतेवेळी पंचशीलांचा सहर्ष स्वीकार उत्पलवर्णेने केल्याची घोषणा संघाने केली.

उपसंपदा घेतांना तिला संघाचे नियम पुन्हा सांगितल्या गेले. यानंतर आयुष्यात तिला माला, गंध विलेपन, उच्च शयनासन, नृत्य-गीत इ. पासून अलिप्त रहावयाचे होते. चीवर, सुई-धागा, पाणी गाळण्याचा कपडा, भिक्षापात्र इतक्याच वस्तू ती आता जवळ बाळगू शकत होती. केशवपन केलेली, भिख्खूणीचे कपडे घातलेली उत्पलवर्णा तथागतांसमोर उभी राहिली. कालपर्यंत निरूद्देश असलेल्या तिच्या आयुष्याला स्थिर विचारांचं कोंदण लाभलं होतं. सैरभैर भरकटणाऱ्या चित्ताला प्रगाढ शांतता लाभली होती. इथे ती सुरक्षितही होती. तथागत ध्यानाला बसले. ती शांत भावमुद्रा पाहून उत्पलवर्णेला भर ग्रीष्मात कोणी मायेचं छत्र घेऊन उभे आहे असेच वाटले. त्यांना पाहून काठोकाठ भरून पावणाऱ्या पाण्याच्या पात्राप्रमाणे ती इतकी भावविभोर झाली की न राहवून तथागतांच्या पायाशी पडली. भगवंतांनी तिचे सांत्वन केले. आई-वडिलांना निरोप देण्यास सांगितले.

साश्रुपुर्ण नेत्रांनीच तिने त्यांना प्रणाम केला. आता ती उत्पलवर्णा नव्हती. भिख्खूणी होती. मुलीच्या आयुष्याची परवड होण्यापेक्षा अहिंसकाला, सुलक्षणेला जेतवनात जे घडले त्यात आनंद होता. कशीबशी स्वत:च्या मनाची समजुत घालत, तिला भिख्खुणीच्या रुपात स्वीकारत ते निघून गेले.

त्यांच्या पालख्या दिसेनाशा होईपर्यंत उत्पलवर्णा एकटक तिकडे बघत होती. कोल्ह्या-लांडग्याच्या तावडीतून निघून ती आता एका नव्या, तेजस्वी अध्यायाला सुरवात करणार होती. आता बाहेरच्या जगाशी तिचा संबंध येणार नव्हता.

सुरवातीला कठीण गेले. पण लवकरच ती रूळली. जात्याच बुद्धिमान असल्याने तथागतांच्या म्हणण्याचा अर्थ तिला पटकन कळत असे. सूर्यादयाच्याही आधी ईतर शिष्या उठण्यापूर्वीच उत्पलवर्णा उठत असे. ध्यानाला बसत असे. भिक्षापात्रात मिळालेली भिक्षा ग्रहण करून ती आपल्या कुटीत दिव्याची ज्योत प्रज्वलित करून ठेवत असे. त्या ज्योतीकडे तान-न-तास एकटक पाही. श्वासांवर तिचे आता उत्तम नियंत्रण असे. बाह्य सर्व विचारांवरून तिने आपले मन प्रवृत्त केले. एक

वेगळेच तेज तिच्या चेहऱ्यावर दिसू लागले. जाणारे-येणारे भिख्खू-भिख्खूणी तिच्याशी अत्यंत आदराने बोलत. तथागतांनी तिला बरेच ज्ञान दिले. काही दिवसांनी तथागत जेतवनातून इतर ठिकाणी निघून गेले. इतर बौद्ध भिख्खू तिच्यासारखी साधना आपल्याला जमावी म्हणून धडपडत. परिव्रज्या, उपसंपदा प्राप्त उत्पलवर्णा आता लवकरच अर्हता पदाला पोचू शकणारी अशी बुद्धांची प्रथम शिष्या ठरणार होती. साऱ्या जेतवनाला या आंतरिक सौंदर्याने झळकणाऱ्या कन्येचा अभिमान होता. सर्व काही सुरळीत चालले होते.

अचानक एक दिवस मात्र वेगळाच उजाडला. नंद हा उत्पलवर्णेचा दूरचा मामे-भाऊ होता. नगरवधू होण्याऐवजी तिने संन्यास घेतला आहे हे कळल्यावर चरफडणाऱ्या अनेक पुरूषांपैकी तो एक होता. खरे तर नंद विवाहीत होता. नंदाचे तिच्यावर प्रेम किंचितही नव्हते. पण आकर्षक, कमनीय देह असणारी ही तरूणी एकदा तरी आपल्याला प्राप्त झाली पाहिजे ही सुप्त वासना त्याच्या मनात होती.

माघातले थंडीचे दिवस होते. हीच अघोरी वासना मनात घेऊन तो जेतवनात आला. पहाटेची वेळ होती. अजून उजाडायचे होते. सर्व महिला-भिख्खू कुटीत गाढ झोपल्या होत्या. नित्य सवयीप्रमाणे उत्पलवर्णा उठली. स्नानाला नदीवर गेली. नंद तेव्हाच तिच्या खोलीत लपून बसला. काषायवस्त्रधारी उत्पलवर्णा कुटीत आली व ध्यानस्थ बसली. पण काहीतरी गडबड आहे हे तिच्या अंतर्मनाने ताडले. ती डोळे उघडणार तोच नंदाने तिचे तोंड दाबले व तो तिच्यावर जबरदस्ती करू लागला. तिच्यासाठी हा फारच मोठा धक्का होता. तो तिचा दूरचा का होईना मामेभाऊ असूनही त्याच्यासाठी ती फक्त मादी होती. ती धडपडू लागली. उत्पलवर्णेने त्याला जोर एकटवून ढकलले. फक्त भिक्षेवर जगणारी असूनही तिच्या कृष शरीरात विलक्षण उर्जा संचारली होती. उत्पलवर्णाने त्याचे केस पकडले आणि कुटी बाहेर खेचत त्याला आणले. नंद मोठ्या ओरडू लागला. भिख्खू-भिख्खूणी सर्व जमले. तिच्या मदतीसाठी मोठा जथ्थाच धावला. पण उत्पलवर्णाने सगळ्यांना थांबवले. गोलाकार सर्व उभे राहिले. आता तो पळून जाऊ शकत नव्हता. तो गयावया करू लागला. हा सर्व शिष्यगण आहे. तथागत तिथे नाही, हे पाहून त्याची हिम्मत वाढली. "उत्पलवर्णा, ऐक माझे. हा संन्यास सोड. इथे तुझे सौंदर्य काळवंडत चालले आहे. पण या केशवपन रुपात आणि काषायवस्त्रातही तू सुंदर दिसतेस. तुझा देह किती आकर्षक आहे याची तुला कल्पना नाही. मी तुला माझी राणी करेन. तू कशाला स्वत:ला इथे कष्टवत आहेस. मी स्वत: तुझी सेवा करेन. पटराणी बनवेन तुला."

उत्पलवर्णा काहीच बोलली नाही. शालवृक्षाखाली ध्यानस्थ बसली. "पट्टराणी करेन तुला," तिच्या कानात शब्द घुमू लागले. सर्व इतिहासाची पुनरावृत्ती झाली. पुन्हा त्याच शारीरिक सौंदर्याचा उल्लेख! देहावरची घाटदार वळणे... तिला आलेली पत्रे, चौकाचौकात तिच्या सौंदर्यावर भाळलेले तरुण... आपापसांत भांडणारे राजपुत्र... तिच्या सहवासाच्या प्राप्तीच्या इच्छेने लागलेली बोली... रक्तपाताची भाषा करणारे तरूण... त्रस्त आई-वडीत... आणि नगरवधू म्हणून घोषणा करण्यासाठी अधीर पंचायत सभा. आपण भिख्खूणी झालो नसतो तर कदाचित आपल्याला रोज नव्या प्रसंगाला... छे दुर्दैवी शय्यासोबतीसाठी भाग पडले असते.

लांडग्या-कोल्ह्याची वृत्ती असणाऱ्या पुरूषी (स्त्रीलोलुप) सत्तेची तिला मनस्वी चोड आली. या सर्वांचा प्रतिनिधी म्हणूनच नंद तिच्यासमोर होता. तिने त्याच्याकडे पाहिले. एकटक बराच वेळ ती पाहत होती.

तथागतांचे तेज आठवले.त्यांचे शब्द आठवले. "वासना या अनंत असतात. त्याला सहस्त्र जिव्हा असतात." त्या वासनांचा प्रतिकात्मक वारसाच तिच्यासमोर होता. ती एकटीच त्या नराधमाशी सामना करण्यास समर्थ होती.

"नंदा, हे सौंदर्य आता पुर्वीचे क्षणभंगुर, सुखलोलुप, दुबळे सौंदय्र राहिलेले नाही. हे तेज:पुंज साधनेने कमावलेले सौंदर्य आहे. तुझ्या सारख्या पाप्याची विखारी नजर जाळून टाकण्याचे सामर्थ्य माझ्यात आहे. तुझ्यासारख्या इंद्रियलोलुप पुरुषांमुळे रोज हजारो स्त्रियांचे आयुष्य

नरकापेक्षा कमी नसते. प्रत्येक स्त्रीला सन्मानाने, स्वाभिमानाने जगण्याचा हक्क आहे. आपल्या कुटुंबावर तिचे प्रेम असतेच. पतीला सुद्धा ती आई प्रमाणे माया देते. तिला सर्वच मायेची माणसे हवी असतात. पण तुझ्यासारखे चांडाळ तिला नगरवधू बनण्यास भाग पाडतात. कशाही पेक्षा जास्त प्रिय कोणत्याही स्त्रीला काय असते माहित आहे का तुला नंदा? तिचे स्त्रीत्व हेच तिच्यासाठी महत्वाचे आहे. बाकी सारे व्यर्थ. या स्त्रीत्वाचा थोडा सुद्धा अविनय नको. तुझ्या सारख्या अधम प्रवृत्तीच्या माणसाने आमच्यावर टाकलेली वाईट नजर सुद्धा आम्हाला चालत नाही."

तिने श्वास घेतला, "नंदा, आज तू फार मोठा अपराध केला आहेस याला क्षमा नाही. तू नागिणीच्या शेपटीवर पाय ठेवला आहेस. माझ्यावर बलात्काराचा प्रयत्न म्हणजे अखंड स्त्री-जातीचाच अपमान आहे. माझ्या सौंदर्याची जाहीर चर्चा तुझ्या सारख्यांनी नगरा-नगरात चौका चौकात केली. आता माझ्या आजच्या सामर्थ्याची पण करतील. आत्मिक सौंदर्याच्या सामर्थ्याने मी अंतर्बाह्य उजळून निघाले आहे नंदा. मी आता एक प्रखर विद्युल्लता आहे. तुला भस्मसात केल्याशिवाय राहणार नाही."

नंदाने तिच्याकडे उपहासाने पाहिले. एक कृष भिख्खुणी माझे काय बिघडवणार? असा भाव त्याच्या चेहऱ्यावर होता. तो कुत्सित हसला. उत्पलवर्णा त्याच्याकडे एकटक बघत राहिली. बराच वेळ ती पाहत होती. तिच्या नजरेतले तेज त्याला सहन होईला. भरथंडीत माघ महिन्यात ती विलक्षण गोष्ट घडली. लाकडांची राशी अचानक पेटावी तसे नंदाचे शरीर आपोआप पेटले. नंद ओरडू लागला. कोणाला काही कळायच्या आतच त्याचा कोळसा झाला.

जेतवनात ही वार्ता वाऱ्यासारखी पसरली. बुद्धांचे सर्व शिष्य तिथे जमा झाले. जो तो चांगली शिक्षा घडले असेच म्हणू लागला.

उत्पलवर्णा आता अर्हत पदाला पोचली होती. तथागतांनी तशी घोषणा करणे फक्त आता बाकी होते. सर्व तिच्यापुढे नतमस्तक झाले. आंतरिक सौंदर्याचा विजय झाला होता. शाश्वत सौंदर्याचा खरा अर्थ आज जेतवनाला कळाला होता. सर्वजण प्रार्थना स्थळावर जमले.

बुद्धं शरणं गच्छामि।
धम्मं शरणं गच्छामि।
संघं शरणं गच्छामि।

उगवत्या सूर्याचा रंग नि भिख्खु संघाचा काषाय रंग आता एकच झाला होता... शाश्वत सत्याकडे जाणारा!

**- श्रेया अभिजित सरनाईक,** पुसद यवतमाळ.

लेखिका संस्कृत आणि इंग्रजी विषयाच्या अध्यापिका आहेत तसेच
त्यांचे अनेक कविता संग्रह, कथा सग्रह प्रकाशित झाले आहेत.

*****

# गर्व से कहो, हम हिंदु हैं !

अगदी सुरुवातीपासून ते आतापर्यंत हिंदू म्हंटले कि सर्वांचे कान टवकारतात, हिंदू या एका शब्दपासून राजकारण खेळल्या जातं आणि राजकारण बिघडवल्या सुद्धा जातं, मात्र " गर्व से कहो हम हिंदू है " असे स्वामी विवेकानंद का म्हणाले असावेत ? स्वामी विवेकानंद तर कुठल्या धर्माच्या विरोधात नव्हते त्यांचे अस्तित्व त्यांचे विचार संपूर्ण विश्वाने आत्मसात केले आहेत. हिंदू धर्म हाचं जगाच्या पाठीवर एकमेव असा धर्म आहे जो शांततेचा संदेश देतो, हिंदू धर्म स्वतःहून कधीही आक्रमण करत नाही, हिंदू धर्म कोणत्याही धर्माची कधीही खिल्ली उडवत नाही, इतिहास साक्ष आहे अगदी श्री रामापासून, श्री कृष्णासून ते छत्रपती शिवाजी महाराजांपर्यंत कधीचं आपण कोणाच्या जागा जमिनी हडपण्यासाठी लढलो नाही आहोत. फक्त आम्ही जेथे राहतो शेती करतो ती जमीन ते राज्य आमचं आहे यासाठी मात्र प्राण जरी गेला तरीही चालेल ही आमच्या धर्माची शिकवण आहे. स्वहक्कासाठी लढणे हे हिंदू धर्म शिकवतो,हिंदू धर्मात कोणी धर्माविषयी वाईट जरी बोललं तरीही त्याला धर्मातून काढून टाकण्यात येत नाही, नास्तिक असो अथवा कोणीही त्याच्यावर जोर जबरदस्ती करण्याचा अधिकार आपला नाही तो त्याच्या इच्छेने जगू शकतो तो सुद्धा हिंदूचं आहे, इतकं पावित्र्य आणि व्यक्ती मुल्यांचा आदर करणारा जर कोणता धर्म असेल तर तो हिंदू धर्म आहे. आम्ही स्वतःहून कधीही पाकिस्तान वर हल्ला चढवत नाही मात्र उत्तराला प्रतिउत्तर देतो ही आमच्या हिंदुधर्माची शिकवण आहे. जगाच्या पाठीवर तसा हिंदूंसाठी असणारा एकमेव देश म्हणजे हिंदुस्थान आहे आणि स्वतःच्या वाट्यातील थोडा तुकडा वेगळा होऊन ज्यास आपण पाकिस्तान म्हणतो असा अन्याय झालेला हिंदू त्याचं जखमेवर सतत मीठ चोळतांना मात्र कधीचं नाही दिसत. भूतकाळ मागे सोडून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणारा देश आज हिंदुस्थान आहे. रावणाचा वध केल्यावर प्रभू श्री राम म्हणतात जोपर्यंत त्याच्यात प्राण होते तोवर तो आपला शत्रू होता आता केवळ ते एक मृतदेह आहे, आणि शत्रुवर सुद्धा अंत्यसंस्कार करण्याची शिकवण ही आम्हाला आमच्या धर्माने दिलेली आहे, हिंदू हा वाहत्या पाण्यासारखा आहे निर्मळ, कोमल. हिंदू धर्म हाचं केवळ असा एक धर्म आहे ज्या धर्मात प्रत्येक व्यक्तीला आपल्या इच्छेने जगण्याचा अधिकार आहे, संविधानाचे जर पालन करतांना कोणता धर्म दिसत असेल तर तो केवळ हिंदुधर्म दिसतो. कारण हिंदुधर्म कधीही जबरदस्ती नाही करत की प्रत्येक महिलेने टिकली लावलीचं पाहिजे, प्रत्येक पुरुषाने रोज देवाची पूजा केलीचं पाहिजे,जो हिंदूधर्माला शिव्या देतो त्याला सुद्धा धर्मातून काढून नाही टाकल्या जात. जर अहिंसा कायम ठेवायची असेल तर हिंसेला रोखण्याकरिता हातात शस्त्र उचलावे लागतात ही सुद्धा आमच्या हिंदू धर्माची शिकवण आहे. हिंदुत्व हे राष्ट्रीयत्व आहे. हिंदूधर्म प्रेम वाटतो, आणि शास्त्रासोबत शस्त्राचा सुद्धा परिचय देतो. म्हणून प्रत्येक वेळी स्वामी विवेकानंद यांचे शब्द माझ्या कानी गुंजतात गर्व से कहो हम हिंदू है. आणि मन सुद्धा प्रसन्न होतं आणि मुखातून शब्द बाहेर पडू लागतात हा मे हिंदू हू और मुझे इस बात का गर्व है.

भारत माता की जय.

**- अभिषेक म. पत्की,** अकोला.

लेखक हे व्यस्थापन विषयात पदयूत्तर असून इतिहास विषयाचे अभ्यासक आहेत.

*****

# कोकणातील बदलते पर्यावरण.

पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे कोकणातील पाच जिल्हे. प्रत्येक जिल्ह्यातील नैसर्गिक साधन संपदा ही काही तुरळक अपवाद वगळता सारखीच मात्र, मुंबई महानगराच्या लगत असलेला ठाणे जिल्हा आणि त्याला लागूनच असलेला आदिवासी बहुल असलेला पालघर जिल्हा यात झपाट्याने शहरीकरण होत आहे. यामुळे आपलं कोकणीपण हरवून जात आहे. साहाजिकच त्याचे पर्यावरण द्रुष्टीनेही मोठे नुकसान झाले आहे हे नाकारता येणार नाही.पश्चिमेला स्वच्छ निळाशार पाण्याचा अरेबियन समुद्र आणि जेव्हा जेव्हा जागतिक स्तरावर ग्लोबल वॉर्मिंग या महत्त्वाच्या विषयावर सयुक्त राष्ट्रसंघात गांभीर्याने चर्चा होते तेव्हा ज्या पश्चिम घाटाचा आणि सर्वांगसुंदर सह्याद्री पट्याचा नेहमीच उल्लेख होत असतो.

कोकण ही केरळसारखीचं सर्वाथाने देवभूमी आहे. हिरवीगर्द झाडी, सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातून वाहणाऱ्या नद्या, टुमदार कौलारू घरे, त्या घरांकडे जाणाऱ्या वळणावळणाच्या लालमातीच्या पायवाटा, पर्यटकांना आकर्षित करणारे स्वच्छ समुद्रकिनारे, काही भागात आढळणाऱ्या दुर्मिळ प्रजाती, रंगीबेरंगी फुलपाखरे, औषधी वनस्पती, कोकणी मेवा, कोणत्याही पर्यटकांना आणि खवय्यांना त्यांच्या जीभेचे चोचले पुरवणारा अस्सल मालवणी मस्याहार, रंगीबेरंगी फुलपाखरांच्या तीनशेहून जास्त प्रजाती, जैवविविधता आणि वनसंपदेने परिपूर्ण असलेला हा कोकण पट्यातील पर्यावरण गेल्या सुमारे तीस वर्षापासून बदलत आहे. १९९० नंतर कोकणातील राजकारण झपाट्याने बदलत गेले. सत्तेची समीकरण आणि ती मिळवण्यासाठीचे मार्गही बदलले. सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता हे समीकरण अधोरेखित झाले.. राजकीय मंडळीनी भूमाफियांना हाताशी धरून कोकणातील हजारो एकर मोक्याच्या ठिकाणी असलेल्या जागा कवडीमोलाने विकत घेऊन तर काही जागा या राजकीय वरदहस्ताने आणि महसूल यंत्रणेच्या सहकार्याने बळकावल्या.उदरनिर्वाहासाठी वर्षानुवर्षे मुंबई मायानगरीत स्थायिक झालेला चाकरमानी हा शिमगोत्सवला किंवा गणपतीला गावी येत असे त्यामुळे त्यांच्या नावावर असलेल्या जमीनीसुध्दा खोटी कागदपत्रे करून परस्पर विकल्या गेल्या अशी अनेक प्रकरणे आहेत. भूमाफियांनी नंतर आपली नजर वळवली ती मायनिंगकडे. निसर्ग ओरबाडून कोट्यवधी रूपये सहज मिळतात हे जेव्हा क्लीक झालं तेव्हा मायनिंग लॉबी सक्रिय झाली. अर्थात हे सगळं राजकीय नेते, भूमाफियां आणि मायनिंग दलाल यांच्या संगनमताने होत आहे. राजकीय पक्ष आणि नेते तसेच त्यांनी पोसलेल्या कार्यकर्त्यांच्या झुंडी यांना निवडणुकीसाठी मायनिंग कंपन्यांकडून पैसा दिला जाऊ लागला. जो पक्ष सत्तेवर असेल त्याचे टक्केवारी जास्त... आणि यातूनच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग हा भौगोलिक द्रुष्ट्या अतिशय छोटा पण नैसर्गिक द्रुष्टीने सुजलाम् सुजलाम् अशा दोडामार्ग तालुक्यातील कळणे या गावाला मायनिंग कंपनीने विळखा घातला. सह्याद्रीच्या कुशीत वसलेला हा सुंदर डोंगर मायनिंग लॉबीने पोखरायला सुरुवात केली. सुरूवातीला गावातील लोकांनी विरोध केला. मोठा संघर्ष झाला. त्यामध्ये एका कामगाराचा मृत्यू झाला. अशावेळी कळणे गावं वाचलं पाहिजे म्हणून ज्यानी विरोध केला होता असे काहीजण जेलमध्ये गेले. दरम्यान यासाठी त्यावेळचा सत्ताधारी पक्ष सोडून काही विरोधी पक्ष व सामाजिक कार्यकर्त्यांनी "मायनिंग चलेजाव फोरमची स्थापना केली. ज्याचा निमंत्रक मी होतो आणि सातत्याने सत्यासाठी संघर्ष करणारे जेष्ठ समाजवादी नेते स्व. गोपाळराव दुखंडे होते.. काही काळानंतर या फोरममधले सगळे गळाले.. शेवटी मी आणि दुखंडे सरच राहिलो. मायनिंग लॉबी कडून राजकीय पक्षानां मिळणारा पैसा यामुळे गावकऱ्यांचा लढा क्षीण झाला... आणि बघता बघता कळणे गावं या मायनिंगमुळे उध्वस्त झाल. गावातील विहिरीचं पाणी दुषीत झाल. आंबा, काजू, नारळ, सुपारी सारख्या बागा संपल्या ज्याच्यावर रोजीरोटी होती ते लोक उघड्यावर पडले.

संपूर्ण जगातील पर्यटक ज्या सर्वांगसुंदर गोव्यात पर्यटनाची मजा लुटण्यासाठी येतात तो गोवा सुध्दा खाण व्यवसायामुळे बेचिराख होत आहे हे कुठेतरी कायदेशीर रित्या थांबवून पर्यावरणाचं जतन केल पाहिजे यासाठी गोव्यातील

पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आणि यातूनच गोवा सरकारला झक मारत गोव्यातील खाण व्यवसायावर बंदी आणावी लागली. कोकणात असे पर्यावरणाचा नाश करणारे प्रकल्प नको म्हणून जेव्हा व्यापक चळवळ सुरू झाली त्यावेळी महाराष्ट्र सरकारला नाईलाजाने पश्चिम घाटाच्या संवर्धनासाठी जेष्ठ व श्रेष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधवराव गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली माधव गाडगीळ समितीची स्थापना केली. गाडगीळ समितीने आपला ग्राऊंड रिपोर्ट तयार केला व शासनाला सादर केला ज्यामध्ये

जैवविविधतेने संपन्न असा हा सह्याद्री पट्टा पर्यावरण द्रुष्टीने संवेदनशील म्हणून जाहीर करावा अशी शिफारस केली. यालाही मायनिंग व राजकीय दलालांनी विरोध केला. राजकर्त्यांना पर्यावरणाचे काही देणघेणं लागत नाही. निवडणूका जिंकण्यासाठी अशा मार्गातून फक्त पैसा लागतो.. आणि याच पैशातून राजकीय झुंडी पोसायच्या असतात. त्यामुळे पर्यावरण आणि मानवसृष्टीसह सर्व जीवसृष्टी वाचवणारा हा गाडगीळ समीतीचा  महत्त्वाचा निर्णय सरकारने मायनिंग ला ॅबीच्या दडपणाखाली बासनात गुंडाळून ठेवून पुन्हा यावर पुनरावलोकन करण्यासाठी कस्तुरी रंजन समिती नेमली... दोडामार्ग तालुक्यातील डिंगणे,असनिये  सारखी ग्रामीण पर्यटनाला अनुकुल असलेली गावही शासनाने मायनिंग साठी प्रस्तावित केली होती. सावंतवाडी शहराला गेली कित्येक वर्षे गुरूत्वाकर्षण च्या आधारे स्वच्छ पाणी पुरवठा करणारी बीन खर्चाची संस्थान कालीन फार जुनी अशी पाणीपुरवठा योजना ज्या केसरी फणसवडे येथे कार्यरत आहेत तो एक हजार एकरचा भाग मायनिंग कंपनीला देण्याचा घाट एका राजकीय दलालाने घातला होता. या भागाचीही  पहाणी गाडगीळ सरानीं केली आणि त्या लोकप्रतिनिधीला आमच्या समक्ष खडसावले होते. काही पर्यावरण प्रेमींनी विरोध केल्याने आंबोली घाटाच्या पायथ्याशी असलेला हा भाग वाचला.

धाकोरे - आजगांव येथेही औष्णिक प्रकल्पाचा प्रयत्न झाला. तेव्हासुद्धा त्या पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी एकजुटीने विरोध केला तसेच निवृत्त न्यायमूर्ती कोळसेपाटील यांच्या उपस्थितीत गावातील लोकांचे मतदान घेतलं त्यावेळी संपूर्ण गावाने या प्रस्तावित प्रकल्पाच्या विरोधात मतदान केल.एक कार्यकर्ता म्हणून या संपूर्ण प्रक्रियेत मी सहभागी होतो. रत्नागिरी जिल्ह्यातील औष्णिक प्रकल्प असो, रिफायनरी असो, पालघर जिल्ह्यातील वाढवणं बंदराचा विषय असो कोकणातील जनता आता हळूहळू कोकणातील पर्यावरण आणि निसर्ग टिकवण्यासाठी आता संघर्ष करु लागला आहे. कोकणातील निसर्ग ओरबडणाऱ्या आणि कोकणचा नैसर्गिक नाश करणाऱ्या भूमाफियानां आणि राजकीय दलालानां आता यापुढे थारा देता नये असा निश्चय कोकणातील जनता करू लागली आहे. उशीरा का होईना कोकणातील "रानमाणूस " आता जागा झालेला असून तो कोकणातील पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी संघर्षाच्या भूमिकेत आहे. कोकणातील राजकीय आणि सामाजिक पर्यावरण तर नासलेलचं आहे पण जीवसृष्टीला मुक्त श्वास घेण्यासाठी पर्यावरण जपले पाहिजे नाहीतर पुढची पिढी आपल्याला माफ करणार नाही. कोरोना काळात आॅक्सीजन साठी व जीव वाचवण्यासाठी वणवण करावी लागली हे आपणं अनुभवलं आहे. भविष्यात मुंबई, बेंगलोर, कलकत्ता सारख्या महानगरात आॅक्सीजनच्या सिलेंडरची जशी दुकाने आहेत तशी दुकाने जर कोकणात नको असतील आणि ती पाळी आपल्यावर येता नये असे वाटत असेल तर कोकणी माणासानी एकजुटीने याचा विरोध केला पाहिजे आणि त्या द्रुष्टीने काही सकारात्मक घडत आहे हे माझ्या सारख्या कार्यकर्त्यांसाठी आशादायक गोष्ट आहे.

**- ॲड. नकुल पार्सेकर,** सिंधुदुर्ग.
लेखक हे सामाजिक कार्यकर्ते असून,
सिंधुदुर्ग पर्यटन व्यावसायिक महासंघाचे सचिव आहेत.

*****

# राष्ट्रीय सौर दिनदर्शिका.

राष्ट्रीय दिनदर्शिका व प्रसार मंचाचे कार्य – राष्ट्रीय प्रतीके असलेल्या यादीत " राष्ट्रीय दिनदर्शिका " हे प्रतिक भारत सरकारने मान्य केलेले आहे. राष्ट्रीय दिनदर्शिका या राष्ट्रीय अस्मिताचा व आतापर्यंत उपेक्षित विषयाचा सर्वांना परिचय व्हावा व दैनंदिन व्यवहारात, शासकीय कामकाजात जास्तीत जास्त उपयोग व्हावा या विशिष्ट उद्देशाने प्रसार व प्रचार करण्यासाठी छ. संभाजीनगर शहरात राष्ट्रीय सौर दिनांक २० फाल्गुन शके १९३५ ( इ.स.दि. ११ मार्च २०२१४ ) या रोजी राष्ट्रीय दिनदर्शिका प्रसार मंचाची स्थापना झाली. धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे रीतसर नोंदणी केली. धर्मादाय आयुक्ताकडून नोंदणी क्र. एफ - २१००५ (A) दिनांक २० फाल्गुन शके १९३५ (११/०३/२०१४) प्रमाणपत्र मिळाले. त्याचप्रमाणे संस्थेला ८०G प्रमाणपत्र मिळाले आहे. त्याचा क्र :- (Tech/८०G/७४ A/२०१६-१७/५०३७ ) .

ही सौर दिनदर्शिका म्हणजे सूर्याच्या भ्रमणावर आधारित अशी राष्ट्रीय दिनदर्शिका आहे. ही कालगणना सुर्याधारित आहे. दिनांक २२ मार्च ला सूर्य विषुववृत्तावर येत असतो आणि त्या दिवशी १२ तासाचा दिवस व १२ तासाची रात्र अशी एकूण २४ तासाची समसमान वाटणी केलेली आहे. ग्रेगोरीअन दिनदर्शिका १ जानेवारी पासून सुरु होते तर राष्ट्रीय दिनदर्शिका २२ मार्चपासून सुरु होते. दिनदर्शिकेत चैत्र, वैशाख अशी जी संस्कृत महिन्यांची रचना राष्ट्रीय दिनदर्शिकेत आहे, त्या रचनेला न्यासाने मान्यता दिलेली आहे. या दिनदर्शिकेत ५ महिने हे ३१ दिवसांचे ( वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्र ) असतात तर चैत्र महिना ३० दिवसांचा, लीप इयर आले तर ३१ दिवसांचा असतो. उर्वरित ६ महिने हे ३० दिवसांचे असतात. (अश्विन, कार्तिक, अग्रहायण, पौष, माघ, फाल्गुन ). सर्व महिन्यांची नवे ही नक्षत्रावरून देण्यात आलेली आहेत. जसे की चित्रा नक्षत्र चैत्र, विशाखा नक्षत्र वैशाख व इतर. कुठल्याही महिन्याचे नाव हे वैयक्तिक नावावरून दिलेले नाही. खगोल शास्त्रावर आधारित ही नावे असल्याने सर्वांना सहज कळू शकते.

स्थापनेच्या दिवशी प्रसार मंचाचे ७ सदस्य होते. सध्या सदस्यांची संख्या ३४८ आहे. मंचाचे कार्य सध्या २ राज्यात चालू आहे. राष्ट्रीय दिनदर्शिकेचा रोजच्या व्यवहारात उपयोग केला जावा यासाठी प्रसार मंच तर्फे सर्व राज्यांशी पत्रव्यवहार केला गेला. सातत्याने पाठपुरावा केला गेला. त्याचा फायदा असा झाला की, महाराष्ट्र शिक्षण संचालन, महाराष्ट्र शिक्षण खात्याद्वारे १५/०६/२०१५ या दिवशी परिपत्र क्र-जाक्र/स्वीस/अशि/टेक्र.१०५/२०१५-१६ जारी केलेले आहे. या परिपत्रकात सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक ) जि.प. यांनी राष्ट्रीय दिनांकाचा वापर करावा असा आदेश दिलेला आहे. गोवा सरकारने राष्ट्रीय सौर दिनांक ०५ पौष १९३८ (२६/१२/२०१६) परिपत्रक क्रमांक ०२/०१/२०१६ GAD H दि २६/१२/२०१६ काढून सर्वांनी राष्ट्रीय दिनदर्शिकेचा पत्र व्यवहारात वापर करावा तसेच जन्म दाखला, दस्तावेज लिहिताना राष्ट्रीय दिनदर्शिकेचा उपयोग केला जावा असे परिपत्रकात लिहिलेले आहे. भारतातील सर्व राज्यात वर्ग दुसरीच्या गणित या पुस्तकात भारतीय महिन्यंची नावे समाविष्ट केलेली आहे. केंद्रीय सरकारी कार्यालयात दरवर्षी सुट्ट्यांची यादी राष्ट्रीय दिनदर्शिके नुसार छापली जाते.

सतत केलेला पाठपुरावा नियमित पत्रव्यवहार व वैयक्तिक गाठी भेटी याचा परिणाम आशादायक झाला. महानगरपालिका, वर्तमानपत्र, बँक, शाळा यामधून राष्ट्रीय दिनदर्शिकेचा पत्र वापर सुरु झाला.

दैनिक हिंदुस्थान, अमरावती, या दैनिकार सर्व पानावर तर देवगिरी तरुण भारत याच्या पहिल्या पानावर राष्ट्रीय दिनांकाचा उल्लेख असतो .या शिवाय दै.सकाळ, दै. लोकसत्ता, दै. म. टा. आदि वृत्तपत्रामध्ये दिनविशेष मध्ये भारतीय सौर दिनांकाचा उल्लेख नियमितपणे करतात.

आर्य चाणक्य विद्याधाम, छ.संभाजीनगर या शाळेत विद्यार्थ्यांचा वाढदिवस भारतीय सौर दिनांकाप्रमाणे साजरा केला जातो.

भारतीय स्टेट बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, देवगिरी नागरी सहकारी बँक लि., जनता सहकारी बँक लि., भाग्यलक्ष्मी बँक नांदेड (महिला संचलित), जनता सहकारी बँक (बोरीवली मुंबई), अकोला अर्बन को ऑप बँक लि., यवतमाळ अर्बन को ऑप बँक लि., आदर्श सहकारी पत संस्था, आदर्श महिला नागरी बँक व अन्य, यांची दिनदर्शिका भारतीय सौर दिनांकासह प्रकाशित केली जाते.

देवगिरी नागरी सह. बँकेच्या काही शाखांमध्ये "भारतीय सौर" दिनांक असलेले चेक स्वीकारले जातील असे फलक लावलेले आहेत. शिक्षण क्षेत्रात कार्यरत भारतीय शिक्षण मंडळ, महाराष्ट्र ही संस्था सर्व पत्रव्यवहारात भारतीय सौर दिनांकाचा वापर करते.

राष्ट्रीय दिनदर्शिकेचा रोजच्या कामात वापर व्हावा, यासाठी शहरातील विविध बँकांना मंचातर्फे पत्रे देण्यात आले. आवश्यक त्या ठिकाणी वैयक्तिक भेटून दिनदर्शिकेविषयी माहिती देण्यात आलेली आहे.

भारतीय रिजर्व बँक यांनी सर्व बँकांनी राष्ट्रीय दिनदर्शिकेचा दैनंदिन व्यवहारात वापर करावा व राष्ट्रीय दिनांक असलेले धनादेश स्वीकारले जावे यासाठी परिपत्रक –BDO/NO/LEG/BC २१.९.७.००६/१२-१३

दि ०२/०७/२०१२ काढलेले आहे. भारतीय रिजर्व बँकेत परिपत्रक क्र DBODNO/Leg/८७६२/०९.०७.२०१३-१३ द्वारे बँकेत सौर दिनदर्शिकेचा वापर करावा असे आय.बी.ए. ला कळवले आहे. यावर कार्यवाही करताना आय.बी.ए. ने परिपत्रक क्र CIR/RB/६५४७ दि ०७/०१/२०१३ द्वारे बँकेच्या उच्चपदस्थ अधिका-यांना व्यवहारात दिनदर्शिकेचा वापर करावा असे कळवले आहे. या परिपत्रकाचा संबंध घेऊन BOM, BOB, Janata Sahakari, Deutsche Bank, Axis Bank, ICICI Bank यांनी आपल्या सर्व शाखांना या बाबत सूचित केलेलं आहे.

मंचाचे सदस्य श्री श्रीपाद बाम्भोरीकर यांनी राष्ट्रीय सौर दिनांक असलेला धनादेश "वोडाफोन"ने न स्वीकारल्यामुळे कंपनी विरुद्ध ठाणे जिल्हा ग्राहक न्यायालयात तक्रार नोंदवली होती. (तक्रार क्र १३४/२०१५/THANE APEAL NO.१६ of २०१६ ) दि. २०/०४/२०१८ या दिवशी तक्रारीचा निर्णय श्री बाम्भोरीकरांच्या बाजूने लागला. न्यायालयात आपण लढाई जिंकलेलो आहे. याशिवाय एखाद्या बँकेकडून राष्ट्रीय सौर दिनांक असलेला धनादेश "Incomplete Date" किंवा "अयोग्य दिनांक " याकारणामुळे परत आला तर मंचातर्फे बँकेशि पत्रव्यवहार केला जातो व बँकेने लावलेला दंड वसूल केला जातो. मनात कुठलीही शंका न ठेवता सर्वांनी राष्ट्रीय सौर दिनांकाचा वापर करावा.

राष्ट्रीय दिनदर्शिकेबाबत औदासिन्य - राष्ट्रीय दिनदर्शिकेची अनभिज्ञता, परिचय करून न घेणे, जागरूकता नसणे याचा परिणाम म्हणून दिनदर्शिका न वाचण्याची मानसिकता झाली आहे. इंग्रजी दिनदर्शिका वापरण्याची आम्हाला इतकी सवय झाली आहे की, राष्ट्रीय दिनदर्शिका वापरणे आम्हाला गैसोयीचे झाले आहे. त्याचा आपण कधी अभ्यास करत नाही, काय आहे हे माहित करून घेत नाही ? एक प्रकारचा मानसिक आळस आलेला आहे असे जाणवते. राष्ट्रीय ध्वज, राष्ट्रगीत अन्य राष्ट्रीय प्रतीकाबाबत आपण फार जागरूक आहोत. अन्य प्रतीकांचा आपण रोजच्या जीवनात वापर सुरु केलेला आहे, त्यांना आपलेसे केले आहे जसे की फुट, इंच, मैल या ऐवजी सेंटीमीटर, मीटर, किलोमीटर हे शब्द अन् त्याचा वापर आपल्या सर्वांच्या अंगवळणी पडला आहे. मग फक्त राष्ट्रीय दिनदर्शिका वापरण्यास आपण का कमी पडत आहोत ? याचा विचार आपल्या सारख्या सूज्ञ नागरिकांनी करायला हवा. आपण कुठे कमी पडत आहोत ? आपल्याला या संदर्भात काही करता येईल का ? याचा विचार जर सर्वांनी मनापासून केला तर अन्य प्रतीकांप्रमाणे या प्रतीकाचा प्रगति आलेख नक्कीच चढत जाईल.सौर दिनदर्शिका ही आजची नसून पुरातन काळापासून हिला वैभवशाली संपदा लाभलेली आहे. पण आपल्यावर काही गोष्टींचा असा पगडा पडलेला आहे की, आपण त्यातून बाहेर पडायलाच तयार नाही. खगोलशास्त्रावर आधारित दिनदर्शिका न वापरता ग्रेगोरीअन दिनदर्शिका वापरतो.


महाराष्ट्र व गुजरात राज्यात प्रसार मंचाद्वारे दरवर्षी राष्ट्रीय दिनदर्शिका छापण्यात येते व दिनदर्शिकेचे विवरण सर्व राज्यात केले जाते. दिनदर्शिके विषयी दिनदर्शिकेत हिंदी व इंग्रजी भाषेत माहिती दिलेली असते. "AUSPI BHARATIYA SAUR INDIAN LANGUAGES" असे मोबिले ॲप तयार केलेले आहे व ते सर्व राज्यात प्रचलीत भाषेत उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे "AUSPI WATCH CALENDER" हे ॲप तयार केलेले असून यात इसवी सन ०००१ ते ९९९९ या वर्षापर्यंतच्यासर्व माहितीसाठी दिनदर्शिका तयार केलेली आहे, तसेच कॉम्पुटर स्कीनवर घेण्यासाठी " सौर सेटअप " हे ॲप आहे. या ॲप द्वारे तारखेचे परिवर्तन "VICE-VERSA" करून मिळते. प्रसार मंचाने स्वत:ची एक वेबसाईट निर्माण केलेली आहे. ज्यात दिनदर्शिके संबंधी सर्व माहिती मिळू शकते. "वेबसाईट www.rdpm.in"

आम्ही आणि आमचे देशातील सर्व कार्यकर्ते प्रसार अन् प्रचाराची धुरा सांभाळीत आहोत. आजपर्यंत आपले सहकार्य लाभले आहे. या यज्ञकुंडात आपण प्रत्येकाने आपापल्या परीने आहुती दिली तर लवकरच राष्ट्रीय दिनदर्शिकेला परमोच्च स्थान मिळेल अशी आशा आहे.

**- नारायण पांडव,** छ. संभाजी नगर.

लेखक हे सेवा निवृत्त बँक कर्मचारी असून राष्ट्रीय दिनदर्शिका प्रसार मंचाचे अध्यक्ष आहेत.

*****



# भारतीय स्त्रीवाद.

स्त्रीवादाची सुरुवात १९६० नंतर मोठ्या प्रमाणात झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात, पुरुष युद्धावर गेले तेव्हा, स्त्रियांनी सगळ्या नागरीसुविधा सांभाळल्या; म्हणजे एखादं किराण्याचं दुकान असेल, दूध केंद्र असेल वगैरे वगैरे. घर सांभाळून, आपण बाहेरची कामे करू शकतो, हे कळल्यामुळे आत्मसाक्षात्कार झाल्यागत स्त्रियांमध्ये आत्मभान आणि आत्मतेज आले.आपल्या क्षमतांची जाणीव झाली.

पाश्चात्य स्त्रीवाद हा प्रतिक्रियावादी, व्यक्तिवादी होता.' मला मुक्ती हवी आहे''अशी त्याकाळी पाश्चात्य स्त्री चळवळीची मागणी होती. कारण त्याकाळी स्त्री मुक्ती  हा शब्द प्रचलित होता, पण मुक्ती कशापासून? मला लग्न नको, मुल  नको, घर नको. (घरकाम स्त्रियांचा सगळा वेळ खाऊन टाकतो.) पुरुष शत्रू आहेत, त्यांनी आम्हाला प्रगतीच्या संधी दिल्या नाहीत. अशा प्रकारची मांडणी केल्या गेली. सिमाॅन दि बुवा ,बेटी फ्रीडन, केट मिलेट यांची स्त्रीवादाची मांडणी भारतीय मनाला पटणारी नव्हती. १९७५ ते १९८५ या महिला दशकात पाश्चात्य विचारांनी प्रेरित ,स्त्री चळवळ जोरात होती, पण भारतात ती रुजली नाही. स्त्रीप्रश्न सर्व जगभर सारखेच असले तरीही ; भाषा, प्रांत, स्थलकाल, परिस्थितीनुसार आणि धर्मानुसार ते वेगळे सुद्धा आहेत. स्त्रिया काही मूल जन्माला घालणारे यंत्र नाही, किंवा कुटुंब संस्था स्त्रियांवर अन्याय करते ,हे विचार सर्वसामान्य भारतीय स्त्रियांना झेपणारे नव्हते. त्यामुळे हे काहीतरी पाश्चात्य  खूळ आहे, असे महिलांना वाटायला लागले. म्हणून पाश्चात्य स्त्रीवाद भारतात फारसा रुजला नाही.

फेमिनाईन मिस्टिक (स्त्रीत्वाचे गुढ) हे पुस्तक १९६३ यावर्षी लिहिल्या गेले. त्यापूर्वीच भारतात भारतात १८८२ साली ,स्त्री पुरुष तुलना   हा निबंध ताराबाई शिंदे यांनी लिहिला होता. पुरुषसत्ताक, पुरुषप्रधान, ,पितृवंशीय, पितृस्थानिय समाजव्यवस्थेची, कुटुंबव्यवस्थेची त्यांनी चिकित्सा केली. पण खूप दिवस ताराबाई शिंदे आणि त्यांचा निबंध दुर्लक्षित राहिला. त्याआधी १८४८ मध्ये महात्मा फुल्यांनी मुलींसाठी पहिली शाळा काढली. सेवासदन, शारदासदन, मातृसेवासंघ यासारख्या संस्थांची निर्मिती महाराष्ट्रात झाली. संपूर्ण भारतात अशाच प्रकारच्या महिलांच्या अनेक संस्था निर्माण झाल्यात.

भारतात तर स्त्री विरुद्ध पुरुष हा वर्गसंघर्ष कधीच नव्हता. भारतातल्या महिला, पुरुषांच्या ऋणी आहेत. भारतात महिला विषयक सुधारणांची सुरुवात स्त्रीदास्यविमोचनाची चळवळ  म्हणून झाली. भारतातील पुरुष आपल्या अवतीभवती वावरणाऱ्या स्त्रियांची अवस्था पहात असत. बहिण, भावजय, मुलगी, या नात्याने तिच्याशी संबंधित असत. त्यामुळे त्यांनी कळवळून स्त्रियांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला. राजा राममोहन राय यांच्यामुळे सतीबंदीचा कायदा आला. महात्मा फुलेंनी केशवपणाच्या विरुद्ध न्हाव्यांचा संप घडवून आणला, त्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृह  काढले. फुले, कर्वे ,आगरकर ही नावे भारतीय महिलांसाठी प्रातःस्मरणीय आहेत. कर्वे यांची एसएनडीटी युनिव्हर्सिटी, भारतातली महिलांसाठीची पहिली युनिव्हर्सिटी आहे. त्यांच्या अनाथबालिकाश्रमाने कितीतरी महिलांना आत्मनिर्भर केले. आगरकरांनी तर स्त्रियांचे कपडेसुद्धा कसे असावेत याचा बारकाईने विचार केला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला राज्यघटना देऊन, महिलांना समान संधी ,सामाजिक न्याय, स्त्रीपुरुषसमानता   निर्माण केली. घटनेतील कलम १४, कलम १५ आणि कलम २१ स्त्रियांना आत्मसन्मान, संधीची समानता देऊन गेला.

भारतीय दर्शनात स्त्री आणि पुरुष द्विदल धान्याप्रमाणे आहेत, सारखेच महत्त्व असणारे, जणू समाजरुपी पक्षाचे स्त्री आणि पुरुष हे दोन पंख आहेत.दोन्ही पंख सारख्याच ताकदीचे आणि निरोगी असतील तर आणि तरच समाजरुपी पक्षी उंचउडू शकेल.अर्धनारीनटेश्वराची मूर्ती याच संकल्पनेची द्योतक आहे. स्त्री आणि पुरुष नैसर्गिकदृष्ट्या, जीवशास्त्रीय दृष्टिकोनातून वेगळे आहेत.त्यांची बलस्थानं आणि मर्यादा वेगळ्या आहेत. टेस्टेस्टेरॉन या हार्मोनमुळे पुरुष आक्रमक असतात ,तर इस्ट्रोजन आणि प्रोजेस्टेराॅन हार्मोन्समुळे स्त्रिया बालसंगोपन जास्त चांगल्यारीतीने करू शकतात. हे दोन वेगवेगळ्या

ग्रहांवरून आले असले (मेन आर फ्रॉम दी मार्स ॲण्ड वुमेन आर फ्रॉम व्हीनस -बाय जॉन ग्रे) तरीही त्यांना राहायचे मात्र एकाच ग्रहावर आहे. शांततापूर्ण सहजीवनासाठी थोडे थोडे बदल आणि तडजोड दोघांनीही करणं आवश्यक आहे. कारण दोघं मिळून एक कुटुंब तयार करणार असतात. कुटुंबातली स्त्री सक्षम असेल, तर समाज सक्षम होईल, समाज सक्षम असेल तर राष्ट्र बलवान होईल. कुटुंब ही राष्ट्र जीवनाची पहिली पायरी आहे. वंशसातत्यासाठी एकाचवेळी दोघांचीही उपस्थिती आवश्यक आहे. दोघेही अपूर्णांक आहेत. एकमेकांमधल्या उणिवा भरून काढत, दोघं मिळून पूर्णांक होणार असतात. म्हणून स्त्री पुरुष समानता म्हणजे पुरुषांची बरोबरी करणं नव्हे, पुरुष करतात ते श्रेष्ठ आणि तसंच करणं नव्हे, तर स्त्रीपुरुषसमानता म्हणजे परस्परपूरकता. परस्परपूरक, परस्परावलंबी आणि परस्परपोषक नातं.दोघांच्याही भूमिका कुटुंबात, समाजजीवनात आणि राष्ट्रजीवनात महत्त्वाच्या आहेत असे भारतीय स्त्रीवाद समजतो. फेमिनिझम नव्हे तर फॅमिलीइझम भारतात जास्त रुजलेलं आहे. भारतातील कुटुंब हे व्यक्तीनिर्माणाचं, राष्ट्रीय चारित्र्याची निर्मिती करण्याचं, उत्कृष्ट मानवी संसाधन निर्माण करण्याचं एक महत्त्वाचं केंद्र आहे. पाश्चात्य देशात अठरा वर्षानंतर मुलं वेगळी राहतात .स्वतःचं शिक्षण ,नोकरी, लग्न, स्थिरस्थावर होणं हे त्यांना स्वतःच्या भरोशावर करावं लागतं .भारतात मुलांची शिक्षणं, नोकरी लागेपर्यंत त्यांना पोसणं, त्यांचं लग्न जमवून देणं, लग्नानंतरही त्यांच्यासाठी सपोर्ट सिस्टीम तयार करून देणं, नातवंडांची देखभाल करणं इत्यादी अनेक कामं आईवडील करीत असतात, आणि त्यामुळे भारतीय मुलंमुली आपल्या करिअरवर लक्ष केंद्रित करू शकतात.म्हणून भारतातील मुलं अनेक मोठमोठ्या कंपन्यांच्या सीईओपदी आढळतात. कुटुंबसंस्था पाठीशी असल्यामुळे त्यांची प्रगती जास्त होते. त्यांचा खूपसा भार त्यांचे आई-वडील उचलतात. कुटुंबसंस्था ही सक्षम ,सुदृढ असेल तर मुलं जास्ती प्रगती करतात हे लक्षात येतं, आणि म्हणून फेमिनिझमच्या ऐवजी फॅमिलीइझम भारतात जास्त रुजला.

भारतीय स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांची अस्मिता जागृत करणे ,स्त्रीला तिच्या अधिकारांची जाणीव करून देणे ,तिच्या सर्वांगीण विकासात मदत करणे, तिच्या समस्या सोडवायला मदत करणे. यासाठी तिला तीन प्रकारच्या समानता प्रदान करणे.

१. संधीची समानता - सर्व प्रकारच्या विकासाच्या संधी, ज्या पुरुषाला उपलब्ध आहेत, त्या स्त्रियांनासुद्धा उपलब्ध असणे.

२. सन्मानाची समानता - स्त्रीच्या आत्मसन्मानाची बूज राखल्या गेली पाहिजे.,"* मला अमक्यातमक्याकडे दिली*, हे खटकूसुद्धा नये इतकी भाषासुद्धा पुरुषसत्ताक झालेली आहे. अनेक गोष्टी जेंडरन्युट्रल कराव्या लागतील. त्यात भाषेचासुद्धा समावेश आहे .

३. संधीची, श्रमाची आणि जबाबदारीची समानता. घर नावाच्या संकल्पनेत कालसुसंगत बदल करणे आणि घरकाम सगळ्यांनी मिळून करणे, किंबहुना घर हे सर्वांचं आहे ,त्यामुळे सर्वांनी त्यात आपापलं योगदान देणं अपेक्षित आहे. स्त्री-पुरुषांचं मैत्रीचं नातं अपेक्षित आहे. बायको सखी ,सहचरी असणं अपेक्षित आहे.अनुगामीनी नव्हे .

अहं ब्रह्मास्मि,,तत् त्वं असी, मीच ब्रह्म आहे, ते तूच आहे, हे भारतीय दर्शनात म्हटलेलं आहे.सर्व चराचरात ईश्वर भरलेला आहे. प्रल्हादासाठी तर तो खांबातूनही प्रगटला. आत्मा एकच आहे. चलअचलात ईश्वर पाहणारं भारतीय दर्शन, भारतीय तत्त्वज्ञान स्त्रियांना कमी लेखेल? त्यांचं अस्तित्व, कर्तृत्व विचारातच घेतलं जाणार नाही हे शक्यच नाही. मधल्याकाळात प्रत्येक देशात कधी ना कधी अंधारयुग आलेलं आहे.त्यातूनच तर रेनायसन्सची सुरुवात झाली. परकीय आक्रमणामुळे आणि गुलामगिरीमुळे स्त्रियांबद्दलच्या चुकीच्या धारणा, कल्पना, गैरसमज रुजले असावेत. जसे की- स्त्री म्हणजे नरकाचे द्वार, मोक्ष मार्गातील धोंड, बायकांची अक्कल चुली पुरतीच, बैल मारावा ताशी आणि बायको मारावी दर तिसऱ्या दिशी ह्या सगळ्या म्हणी आणि वाक्प्रचार म्हणजे गैरसमजुतींचा अतिशयोक्त प्रकार आहे. हां! तरीही एक प्रश्न उरतोच! थियरी म्हणून, तत्त्वज्ञान म्हणून,स्त्रीपुरुष समानता मान्य असली तरी, प्रत्यक्ष व्यवहारात, प्रॅक्टिकल मध्ये ती दिसत

नाही.त्यासाठी दोघांनीही प्रयत्न करावे लागतील. पुरुषांनी स्वावलंबन शिकावं लागेल, तर स्त्रियांनी स्त्रीदाक्षिण्याची अपेक्षा सोडणं, स्त्रीत्वाचा बाऊ करून, काही फायदे पदरात पाडून घेणं बंद करावं लागेल. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, तर जास्त जबाबदारीने वागणं .हक्कांबद्दल बोलताना कर्तव्याचीही जाण ठेवणं, इत्यादी गोष्टी आवर्जून कराव्या लागतील.

सेक्स आणि जेंडर मधला फरक लक्षात घेऊन त्यावर काम करावे लागेल. स्त्री-पुरुषांच्या साचेबंद प्रतिमा तोडाव्या लागतील. या स्टिरिओटायपिंगमुळे दोघांनाही त्रास होतो ,त्याचे दुष्परिणाम दोघांनाही भोगावे लागतात. सेक्स जीवशास्त्रीय आहे, तुम्ही मुलगा किंवा मुलगी म्हणून जन्माला येता, पण संस्कृती आणि समाज तुम्हाला एका विशिष्ट पठडीत तयार करतो, एका चौकटीत बसवायचा प्रयत्न करतो. दोघांसाठीही वागण्याबोलण्याचे नियम वेगवेगळे असतात. दोघांसाठीही आचारसंहिता वेगळी असते. हे जे संस्कृतीनं आणि समाजानं घडवणं आहे ते म्हणजे जेंडर. भारतीय स्त्रीवाद रुजण्यासाठी आणि खऱ्या अर्थानं समानता प्रस्थापित होण्यासाठी इथे काम करण्याची गरज आहे. मुलाला गाडी, बंदुका, खेळणी म्हणून देतात, तर मुलीला बाहुली आणि खेळभांडी. म्हणजे आयुष्यभर त्यांना काय करायचं आहे हे आपण लहानपणीच त्यांच्या मनावर ठसवतो. उलट करायला काय हरकत आहे? म्हणजे मुलाला बाहुली ,खेळभांडी घेऊन दिली तर तो काळजी करणं शिकेल, घरकाम शिकेल. एखादा मुलगा रडत असेल तर रडतोस का मुलीसारखा असे म्हणून आपण त्याला भावना प्रदर्शित करायला बंदी घालतो. त्यामुळे पुरुषांना आयुष्यभर भावना व्यक्त करताना त्रास होतो. मनातलं न बोलल्यामुळे, भावना सतत दाबल्यामुळे पुरुषांमध्ये हार्ट अटॅकचे प्रमाण जास्त आहे, तर आपण मुलींना सांगतो - मोठ्यानं बोलायचं नाही, दणादण पावलं टाकीत चालायचं नाही,दबून राहायचं, याचा दुष्परिणाम म्हणजे मुली सासरी नको तितका छळ सहन करतात ,कायम दबलेल्या राहतात.

ज्यावेळी समाज निर्माण झाला त्यावेळी मासिकपाळी, गर्भारपण, बाळंतपण, बालसंगोपन , यामुळे स्त्री घरात बांधल्या गेली. पुरुष घराचा पोशिंदा, शिकारी होता. त्यामुळे तो शिकारीसाठी दूर दूर जात असे. कमावून आणण्याची त्याची जबाबदारी होती, पण आता काळ बदललेला आहे. मानवाने निसर्गावर थोडाफार विजय मिळवला आहे . त्यामुळे स्त्रियांची वारंवारच्या गर्भारपणापासून आणि बाळंतपणापासून सुटका झाली. त्यामुळे तिचा वावर सर्व क्षेत्रात वाढला. त्यामुळे हजारो वर्षांपूर्वीची श्रमविभागणी आणि स्त्री-पुरुषांच्या साचेबंद प्रतिमा यापुढे चालणार नाहीत.

भारतीय दर्शनात स्त्रियांना समानतेची वागणूक आणि स्वातंत्र्य आहे ,परिपूर्ण विकासाची संधी आहे. भारतीय स्त्रीवाद हा प्रतिक्रियावादी नाही, व्यक्तीकेंद्री नाही, तर कुटुंबकेंद्री, समाजकेंद्री आणि समन्वयवादी आहे. सर्व जगात भारतीय माणसं उच्च स्थानावर दिसतात, कारण कुटुंब त्यांच्या मागे असतं.

भारतीय स्त्रीवाद खालील तत्वांवर आधारित आहे.

१. " सर्वे भवंतू सुखिन: ..", हा विश्वकल्याणाचा मंत्र आहे .

२. "सर्व विश्व एकरूप झालेले आहे. सृष्टी हे त्या एकरूपतेचे ,चैतन्यतत्वाचे एक रूप आहे. सबंध विश्व एकमेकांशी जोडलेले, एकमेकांना पूरक ,तसेच परस्परावलंबी आहे. .स्त्रीपुरुषसमानतेमध्ये तसेच कुटुंब,समाज, राष्ट्र, या सर्वांमध्ये हे तत्व विराजमान झालेले आहे.

३. याच जीवनदर्शनाच्या आधारावर मूल्यव्यवस्था उभी केलेली आहे. त्यातून त्याग, सेवा, पुरुषार्थ ,सद्भाव यामुळे समाज स्वस्थ आणि सुसंवादी समाजाची निर्मिती होते.

४. याच आधारावर समाजाचे व्यवहार चालतात, परंतु त्यामध्ये मूल्याधिष्ठीत आणि कालानुरूप बदलदेखील घडून येतो. समाज परिवर्तनशील आहे आणि परिवर्तनाची क्षमतादेखील समाजामध्ये आहे.-

५.  सृष्टीमध्ये विविधता आहे आणि ती सर्वांनाच स्वीकार्य आहे. भारतात आणि संपूर्ण विश्वातदेखील विविधता आहे. भारतीय लोक तिचा आदर करतात.

६.  मनुष्य हा एक सामाजिक प्राणी आहे. समूहात राहून आनंद घेणे हा त्याचा स्वभाव आहे .माणूस एकटाच राहू शकत नाही. माणूस एक बेट नाही. माणसामाणसांमध्ये आंतरक्रिया होतच असतात. म्हणून समाजाच्या हितामध्येच माणसाचं हित सामावलेलं आहे ,आणि माणसाच्या हितामध्ये समाजाचं हित सामावलेलं आहे.

**- माधुरी साकुळकर,** नागपूर.

लेखिका सामाजिक कार्यकर्ता असून वक्ता व सामाजिक विषयाच्या अभ्यासक आहेत.

# माय मराठीची विजयी पताका.

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी...
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी...
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी...
एवढ्या जगात माय मानतो मराठी...

कविवर्य सुरेश भट यांनी  माय मराठीचे महात्म्य आपल्या कवितेतुन सुरेख वर्णन केले आहे. मराठीला अभिजीत भाषेचा दर्जा मिळाल्याने माय मराठीला ज्ञानभाषा म्हणून जगाच्या पटलावर स्थापन करण्याची जबाबदारी सर्व मराठी भाषिकांची आहे. मराठी भाषेला आभिजात भाषेचा दर्जा मिळावा, ही महाराष्ट्रातील १३ कोटी जनतेची मागणी ६ दशकांनंतर मान्य झाली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठीसह भारतातील पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला. मराठी मन हर्षित झाले आहे. या निर्णयाचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे. त्यामुळे आता मराठीसह पाली, आसामी, प्राकृत आणि बंगाली भाषेलाही अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. देशात अभिजात भाषेचा दर्जा असलेल्या भाषांची संख्या आता ११ झाली आहे.

मराठी भाषेला मोठा इतिहास असून तब्बल दीड ते दोन हजार वर्षांच्या प्राचीन इतिहासाचे पुरावे मराठीत सापडतात. माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी महाराष्ट्राच्या स्थापनेपासून प्रयत्न केले गेले. यासाठी गेल्या १० वर्षांपासून सतत सर्वच स्तरातून पाठपुरावा केला जात होता. त्याला अखेर यश आले आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी २०१३ मध्ये रंगनाथ पठारे समितीने आपला अहवाल दिला होता.  याआधी भारतामध्ये ६ भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला होता. यामध्ये तामिळ, संस्कृत, कन्नड, तेलुगू, मल्ल्याळम आणि उडिया या भाषांचा समावेश आहे. मराठी अभिजात दर्जा मिळवणारी सातवी भाषा ठरली आहे. २००४ मध्ये देशात तामिळ ही अभिजात भाषेचा दर्जा मिळवणारी पहिली भाषा ठरली. त्यानंतर २००५ मध्ये संस्कृत, २००८ मध्ये कन्नड आणि २०१३ मध्ये तेलुगू आणि मल्याळम तर २०१४ मध्ये उडिया भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला गेला. आभिजात भाषेचा दर्जा मिळण्याकरिता संबंधित भाषेच्या साहित्याचा इतिहास हा दीड ते दोन हजार वर्षे प्राचीन असणे आवश्यक आहे. त्या भाषेचं साहित्य प्राचीन आणि मौल्यवान असायला हवं. ती भाषा कोणत्याही भाषेतून निर्माण झालेली नसावी. प्राचीन भाषेचे स्वरुप हे वर्तमान भाषेपासून वेगळं असणे आवश्यक आहे. ती भाषा प्राचीन आणि त्या भाषेचे साहित्य उच्च असावे, प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रुप यांचा गाभा कायम असावा. मराठी भाषेतील ग्रंथसंपदेचे पुरावे बाराव्या–तेराव्या शतकापासून आढळतात.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी संशोधन व अभ्यास करून पुरावे एकत्रित करण्यासाठी व प्रस्ताव तयार करण्यासाठी राज्य शासनाने दिनांक १० जानेवारी, २०१२ रोजी अभिजात मराठी भाषा समितीची स्थापना केली होती. समितीला १८ जून, २०१२, १४ ऑगस्ट, २०१२ व १२ मार्च, २०१३ रोजी मुदतवाढ देऊन ३१ मे, २०१३ पर्यंत अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी केंद्र शासनाच्या अटी व शर्ती विचारात घेऊन प्रस्ताव तयार करून तो शासनाच्या मान्यतेने केंद्र शासनास सादर करण्यासाठी व त्याचा केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी नेमण्यात आलेल्या या समितीच्या एकूण ७ बैठका घेण्यात आल्या. विविध मान्यवर भाषातज्ञ, साहित्य संस्था आणि भाषाविषयक काम करणारे कार्यकर्ते व नागरिक यांच्या भेटी-गाठी घेऊन त्यांची याबाबतची मते जाणून घेतली. आवश्यक ते सर्व संदर्भ ग्रंथ मिळवून त्यांचे सखोल वाचन करण्यात आले. सर्व विद्यापीठे, साहित्य संस्था, अखिल भारतीय साहित्य महामंडळ व राज्यातील मान्यवर साहित्यिक यांना पत्रे लिहून त्यांच्याकडून सूचना मागविण्यात आल्या. प्रसार माध्यमांमधून या विषयाबाबतचे पुरावे आणि साहित्य समितीकडे पाठविण्याचे जाहीर आवाहन करण्यात

आले. त्याला खूप मोठा प्रतिसाद मिळाला. विविध वाहिन्यांनी या विषयावर चर्चात्मक कार्यक्रम सादर करून याबाबत जनमताचा कौल घेतला. राज्यभरातील संशोधक, अभ्यासक, नागरिक आणि विद्यार्थी यांनी सुद्धा यामध्ये आपले भरीव योगदान दिले .

केंद्र सरकार अथवा महाराष्ट्र सरकार नेहमीच मराठीच्या विकास व संवर्धनाचे निर्णय घेत आहेत. ०८ सप्टेंबर २०२१ रोजी रिद्धपुर येथे केंद्र सरकार द्वारा वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी मराठी भाषा आणि तत्त्वज्ञान अध्ययन केंद्र सुरू करण्यात आले. गेल्या तीन वर्षपासून या केंद्रचा विस्तार होता आहे. महाराष्ट्रात एक मराठी भाषेचे विद्यापीठ स्थापन व्हावे, ही गेल्या कित्येक वर्षापासून असलेली मागणी अखेर मागील वर्षी पूर्ण झाली. महाराष्ट्र सरकार ने २०२३ च्या राज्याच्या बजेट मध्ये अमरावती जिल्ह्यातील रिद्धपुर येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा केली व २०० कोटी रुपयांचे आर्थिक अनुदान सुद्धा मंजूर केले. विद्यापीठाला अकादमिक व प्रशासनिक विस्तार देण्यासाठी मराठीचे जेष्ठ साहित्यक व महानुभाव साहित्याचे अभ्यासक डॉ अविनाश आवलगावकार यांची मराठी भाषा विद्यापीठाच्या प्रथम कुलगुरुपदी ०३ सप्टेंबर २०२४ रोजी नियुक्ती केली आहे. मराठी भाषेच्या विकास व संवर्धना करीता मुंबईच्या चर्नीरोडवरील जवाहर बाल भवन येथे मराठी भाषा भवनाचे भूमिपुजन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १४ आक्टोंबर २०२४ रोजी केले आहे. यावरून हे स्पष्ट होते की केंद्र व राज्य सरकार मराठी भाषेच्या विकास व संवर्धना विषयी किती गंभीर आहेत.

आभिजात भाषेचा दर्जा ज्या भाषांना दिला जातो त्या भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून संबंधित राज्याला भरीव अनुदान मिळते. भाषेचा विकास, ग्रंथ साहित्य आणि संशोधनासाठी याचा लाभ होतो. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर भाषा गौरवली जाते. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने या भाषेतील विद्वानांसाठी दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार दिल्या जातात. अभिजात भाषेच्या अभ्यासासाठी व उत्कृष्टतेसाठी केंद्र देखील स्थापन करण्यात येते. देशातील सर्व विद्यापीठात अभिजात भाषेसाठी अध्यासन केंद्र स्थापन केलं जातं. अभिजात दर्जा मिळालेल्या भाषांसाठी पायाभूत संस्थांसाठी अर्थसहाय्य दिलं जातं. या भाषेच्या संशोधन प्रकल्पांना पाठबळ देण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. या भाषेतील बोलींचा अभ्यास-संशोधन व साहित्य संग्रहासाठी प्रोत्साहन मिळतं. या भाषेतील प्राचीन ग्रंथ अनुवादासाठी प्रयत्न होतात. त्याचबरोबर ग्रंथालये, संस्था, संशोधकांना केंद्राकडून भरीव मदत मिळते. महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालयांना सशक्त करणे आदि कार्य भाषेच्या विकासासाठी केले जाते. येत्या काळात मराठी भाषेच्या विकास व संवर्धना करीता मोठी आर्थिक तरतूद केंद्र सरकारकडून केली जाईल. रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. मराठी भाषेतील ज्ञानसंपदा वाढेल व आपली भाषा ज्ञानभाषा होण्यास मदत मिळेल. महाराष्ट्र शासनाने याच वर्षी राज्याचे मराठी भाषा धोरण जाहीर केले आहे. मराठी भाषा ज्ञानभाषा रोजगाराची, व साहित्याची, उद्योगाची जागतिक भाषा व्हावी यासाठी भाषा धोरणात अनेक मुद्दे समाविष्ट केले आहेत. आगामी २५ वर्षांसाठी हे धोरण असणार आहे. राज्याचे मराठी भाषा धोरण आणि केंद्र सरकारने मराठीला दिलेला अभिजात भाषेचा दर्जा, यामुळे मराठीला सुगीचे दिवस आले आहेत. मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्याने मराठीचा विस्तार व संवर्धन तर होईल पण या प्रक्रियेत मराठी भाषिकांची भूमिका अतिशय महत्त्वाची राहणार आहे.

मराठीला अगाध साहित्यसंपदा लाभली आहे. मराठी ही महाराष्ट्राची केवळ भाषाच नाही तर ही या राज्याची एक संस्कृती व अस्मिता देखील आहे. दरवर्षी आपण 27 फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन तर ०१ मे रोजी महाराष्ट्र दिनी मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा करतो. त्यामुळे वर्षातुन दोन दिवस का होईना आपल्याला माय मराठीचे स्मरण होते. आपल्याला मराठी भाषेचा विकास व संवर्धन करायचे असेल तर आपण मराठीतच बोलण्याचा व लिहिण्याचा आग्रह धरला पाहिजे. कुठल्याही भाषेच्या संवर्धनाचा हा पहिला टप्पा मानल्या जातो. अनेक राज्य आपल्या प्रादेशिक भाषेचा पुरस्कार

करतात. आपण मराठीसाठी हा प्रयत्न करतो का? हा आपल्या करीता चिंतनचा विषय आहे. वर्तमानात मराठी मातृभाषा असणार्यांची संख्या तब्बल दहा कोटींच्या पर्यंत गेली आहे. मात्र तरीही आपण आपल्या दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर किती करतो? हा एक विचारणीय प्रश्न आहे. कोकणी, अहिराणी, वारली, वर्हाडी, ठाकरी, कातकरी, आगरी, कुणबी, खानदेशी, मालवणी, आगरी अशा अनेक बोलीभाषा मराठीत आहेत. या बोलीभाषेचाही विकास झाला पाहिजे. भाषेच्या विकासासाठी त्या भाषेतुनच शिक्षण देणे खूप महत्वाचे आहे. याकरीता मराठी शाळा बंद न होवु देणे, मराठी शाळेचा दर्जा सुधारणे व मराठी शिकणार्या विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्र सरकार द्वारा सरकारी कामकाजात मराठी भाषेचा प्रयोग आता अनिवार्य करण्यात आला आहे. त्यानुसार आता सरकारी अधिकारी, कर्मचार्यांना सरकारी कामकाज करताना मराठीत लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे. सरकारी नावे मराठीत असावीत, अभ्यास गट, समित्यांनी त्यांचे अहवाल मराठीतूनच द्यावेत, सर्व सरकारी योजनांची नावं मराठीत द्यावीत, जेष्ठ अधिकार्यांनी बैठकांमध्ये, सभामध्ये मराठीतून भाषणे करावी, मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय मराठीतून द्यावेत, सरकारी जाहिराती, निविदा, माहितीचा अधिकार, आपले सरकार, ई- निविदा इत्यादी ऑनलाईन सेवा मराठी भाषेतच उपलब्ध करुन द्याव्यात अशा प्रकारच्या सूचना सरकारी अध्यादेशात समाविष्ट आहेत. आज डिजिटल युगात मराठीला जागतिक स्तरावर विस्तार करण्याची उत्तम संधी निर्माण झाल्या आहेत. आज संगणकावरील युनिकोड भाषेमुळे मराठी लिहीणे, वाचणे अधिक सहज व सोपे झाले आहे. संगणकावर मराठीतून सर्व प्रकारचा पत्रव्यवहार, माहितीची साठवणूक, हिशेब ठेवण्याची सुविधा उपलब्ध आहे. मराठी-इंग्रजी शब्दकोश, इंटरनेटच्या महाजालावर उपलब्ध आहे. मराठी वर्तमानपत्रे इंटरनेटच्या माध्यमातून जगातल्या कुठल्याही कोपर्यात आता वाचता येतात. मराठी साहित्याच्या अनेक वेबसाइट्स आज इंटरनेटवर उपलब्ध आहेत. मराठी विश्वकोशाचे सगळे खंड संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. वेब, ब्लॉग, रेडिओ यांमुळे कुणालाही आपल्या मातृभाषेत अभिव्यक्त होण्याची संधी आहे. संवादाच्या दृष्टिने इंटरनेटने मुळे 'जग एक खेड झाले' असे आपण म्हणतो, हे खरे असले तरी जागतिक स्तरावर आपल्या माय मराठीची विजयी पताका फडकविण्याची जबाबदारी देखील आपल्या माय मराठीच्या भूमिपुत्रांचीच आहे .

संदर्भ -


1) अभिजात मराठी भाषा समिती अहवाल-2013, महाराष्ट्र शासन, पृष्ठ क्र. 02-04.

2) 'मराठी भाषेचे महत्त्व व अस्तित्व' वैभव मोहन पाटील- आमची नवी मुंबई, पोर्टल, 27 फेब्रुवारी 2021



**- प्रा. डॉ. राजेश लेहकपुरे.**

लेखक हे महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ,
वर्धा येथे जनसंवाद विभागात सहयोगी प्राध्यापक आहेत.


*****

# नेदरलँडस्‌मधील दिपोत्सव...

द हेग, नेदरलॅंडस दिवाळी जवळ आली आहे आणि मागील सात वर्षाप्रमाणे यंदाहि आम्ही नेदरलँड मध्येच आहे. येथे नियमित दिनक्रम आहे. माझे घर स्वच्छ करण्यासाठी मी विकएंडलाच वेळ काढते, कोर्टामुळे विकडेज बिझी असतात. दिवाळी फराळ, मिठाई बनवणे अजुन बाकी आहे. ईथे भारतीय स्रिया फराळ घरी बनवून देतात. कौतुक वाटतं या स्रियाचं, नवऱ्याच्या जॉबसाठी आपलं भारतातील करीयर, आपल्या मैत्रिणी, आई वडिल सगळं सोडुन पुन्हा परदेशी स्थलांतरीत होऊन नविन ऊद्योग सुरू करायचा हेखरंच वाटत तितक सोप नसत. खरंच स्रि शक्तीच दर्शन हे प्रत्येक घरामध्ये होत. असतं. मग भारताच्या बाहेर आपले मित्रमंडळी, कार्यालयातील सहकारीच आपला परिवार असतो. मी माझ्या शेजाऱ्यांना आणि ऑाफिस मधील लोकांना छोट्या भेटवस्तू आणि फराळ देण्याची परंपरा सुरू केली आहे. तसेच नेदरलँड मधील हिंदू समुदाय सुध्दा मोठ्या उत्साहाने दिवाळी साजरी करतो. ज्यामध्ये दिवे लावणे, घरे रांगोळ्यांनी सजवणे आणि सामूहिक सांस्कृतिक कार्यक्रम, संगीत आणि नृत्य सादरीकरण आयोजित करणे समाविष्ट आहे. नेदरलँड्‌समधील सुरीनामी आणि इंडोनेशियन समुदायांद्वारे देखील दिवाळी साजरी केली जाते. ज्यांच्या स्वतःच्या विशिष्ट परंपरा आणि प्रथा आहेत. तसेच नेदरलॅंडस मधील हिंदु मंदिरामध्ये तर विशेष पुजेंच आयोजन केलं जात. जसे, आम्सटरडॅममधील श्रीराधाकृष्ण मंदिर, हे मंदिर भगवान कृष्ण आणि राधा यांना समर्पित आहे. हेनेदरलँडमधील सर्वात जुन्या आणि सर्वात मोठ्या हिंदू मंदिरांपैकी एक आहे. तसेच विष्णूमंदिर: हेमंदिर नेदरलॅंडसमधील अलमेर या शहरात आहे, सुंदर वास्तुकला आणि सुरेख कोरीव कामांसाठी हे मंदिर ओळखले जाते. या बर्षीसुध्दा नेदरलँडमधील ॲमस्टेलवीन या शहरामध्येदिवाळी सण २०२४ ची सुरुवात दुपारच्या सुमारास शॉपिंग सेंटरमधून उत्सवाच्या मैदानात एका उत्सवी संगीत कार्यक्रमासह होईल, जिथे पारंपारिक उद्घाटन समारंभ होईल. ॲमस्टेलवीनच्या सिटी स्क्वेअरवरील एका विशाल आणि रंगीबेरंगी मंडपात हा कार्यक्रम होईल. दिवसभर तरुण आणि वृद्धांसाठी नृत्य आणि संगीताचा कार्यक्रम, तसेच सर्वप्रकारच्या भारतीय वस्तू आणि स्वादिष्ट पदार्थांसह बाजारपेठ असेल. नेत्रदीपक फटाक्यांच्या प्रदर्शनासह दिवाळी सणाची सांगता होईल. द हेग, ॲमस्टरडॅम, ॲमस्टेलवीन ई. मधील दिवाळी उत्सव हा नेदरलँड्‌समधील भारतीय समुदायाला एकत्र आणण्यासाठी भारतीय थीमवर आधारित असलेला कार्यक्रम असतो ! ज्यामध्ये भारतीय पाककला, अस्सल भारतीय मिठाई , भारतीय खरेदीचा अनुभव जसेकी हस्तकला भारतीय शाल, भिन्न भारतीय पोशाख, दागिने आणि भारतीय संगीतमय कला सादरीकरण यावर विशेष भर दिला जातो. तसेच या दरम्यान ॲमस्टरडॅम, रॉटरडॅम, डेल्फ आणि आजूबाजूच्या परिसरातील सर्वात प्रसिद्ध भारतीय रेस्टॉरटं ्समध्ये भारतातील प्रत्येक प्रदेशातील स्वादिष्ट पदार्थ दिले जातील. दिवाळी दरम्यान नेदरलॅंडस मध्ये साजरे करणाऱ्या समुहीक कार्यक्रमानद्वारे आणलेली शांतता आणि लोकांमधील प्रेम हेखरंच तुम्ही जगभरात जाणवू शकतात. मी आशा करतेकी प्रकाशाचा हा सण तुम्हाला सुध्दा शांती, समृद्धी, यश, आरोग्य आणि भरपूर प्रेम आणि आनंद घेऊन येईल. दिवाळीच्या शुभेच्छा !

**- सौ. प्रणिता अद्वैत देशपांडे,** द हेग, नेदरलँडस.
लेखिका वकील, पत्रकार आहेत.
द हेग, नेदरलॅंडस येथील भारतीय दूतावासात कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्यरत होत्या.
सध्या आतर्राष्ट्रीय फौजदारी न्यायालय द हेग, नेदरलॅंडस येथे कार्यरत आहेत.
ई मेल-advpranita@gmail.com.

*****

# नैतिकतेची ढासळती वीण,
# शाळा आणि विद्यार्थांचे बदलते आयाम.

आजच्या आधुनिक युगात तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे मानवी जीवनातील विविध क्षेत्रांवर परिणाम होत आहे. विशेषतः शिक्षण क्षेत्रातही याचे प्रभाव जाणवतात. मुलांच्या शिक्षणात तंत्रज्ञानाची घुसखोरी वाढत असतानाच नैतिक मूल्ये आणि चारित्र्य घडवण्याच्या दृष्टीने शाळांचे महत्व अधोरेखित होते. तथापि, अलीकडील काळात शाळांमध्ये मुलांच्या नैतिक मूल्यांचा विसर पडत असल्याचे चिंताजनक चित्र उभरून येत आहे. हा विसर आपल्या समाजावर गंभीर परिणाम करू शकतो हे नक्कीच.

नैतिक मूल्ये म्हणजे समाजात राहण्याचे आचारसंहिता, सद्गुण, आणि सामाजिक जबाबदाऱ्या पाळण्याच्या विचारांची शिकवण. माणूस सामाजिक प्राणी असल्यामुळे त्याला समाजात राहण्यासाठी काही नियमांचं पालन करणे गरजेचं असतं. सत्य, प्रामाणिकता, अहिंसा, सहनशीलता, शिस्त, आदरभाव, समर्पण, आणि सेवाभाव हे काही प्रमुख नैतिक मूल्ये आहेत. शाळांमध्ये मुलांना केवळ शैक्षणिक ज्ञान देणं पुरेसं नसतं, त्यांना नैतिकतेचं महत्व समजावणं अत्यंत आवश्यक आहे. कारण, शिक्षण केवळ करिअर निर्माण करण्यासाठी नव्हे, तर उत्तम व्यक्तिमत्व निर्माण करण्यासाठीही असतं. पूर्वीच्या काळात शाळांना फक्त शिक्षणाचे केंद्र मानले जात नव्हते, तर तेथे मुलांच्या चारित्र्य आणि नैतिकतेचा विकासही तितकाचं महत्वाचां मानला जात असे. शिक्षक केवळ विषय शिकविणारे नसून, ते शिष्यांचे आदर्श होते. त्यांच्या वर्तनातून आणि उपदेशातून मुलांवर नैतिकता बिंबवली जात असे. शाळांमध्ये सकाळच्या प्रार्थनेतून, सुसंस्कारांच्या गोष्टीतून, वर्तनाच्या नियमांद्वारे, आणि शाळेतील विविध उपक्रमांद्वारे मुलांना योग्य मार्ग दाखवला जात असे. आता पण ते होत आहे मात्र त्यात ती ओढ किंवा जाणीव दिसत नाही. उपक्रम दिला आहे कशीबशी जबाबदारी पार पाडली जाते. पण त्या उपक्रमाचं महत्त्व खोलवर रुजवल जात नाही. आणि त्यात भर म्हणजे

**तंत्रज्ञान आणि आधुनिक शिक्षणाचा वाढता प्रभाव -**

शिक्षणप्रणालीत प्रचंड बदल करत आहेत. शिक्षकांचे मार्गदर्शन कमी आणि तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन अधिक होत चालले आहे. ऑनलाईन शिक्षण, मोबाईल ॲप्स, इंटरनेटद्वारे माहिती मिळवणे या गोष्टींनी मुलांच्या विचारांवर आणि वर्तनावर परिणाम होऊ लागला आहे. तंत्रज्ञानाने शिकण्याचे साधन सुलभ केले आहे, परंतु त्याचसोबत नैतिकतेचा विसर पडल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. मुलं स्वतःच्या करिअरवर अधिक लक्ष केंद्रित करतात, परंतु चारित्र्याच्या विकासाकडे दुर्लक्ष करीत आहेत. आधुनिक समाजात मुलं तंत्रज्ञानाच्या अति वापरामुळे भावनिकदृष्ट्या आणि मानसिकदृष्ट्या कमी मजबूत होत चालली आहेत. त्यांच्यात एकोपा, संवेदनशीलता, आणि समाजाबद्दल आदर यांचा अभाव दिसून येतो. शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या वर्तनावर लक्ष देणे कमी झाले आहे. त्यांना चांगले गुण मिळविण्यावर अधिक जोर दिला जातो, परंतु नैतिक मूल्यांचे महत्व समजावले जात नाही. स्पर्धात्मक वातावरणामुळे आजची शिक्षणप्रणाली मुलांना केवळ परीक्षा आणि स्पर्धेत उत्तीर्ण होण्यासाठी तयार करते. स्पर्धेमुळे नैतिकतेचा विचार कमी होतो. गुण मिळवण्यासाठी कोणत्याही मार्गाने यश मिळवणे हा दृष्टिकोन निर्माण होतो. अनेकदा हे यश अप्रामाणिक मार्गाने साधले जाते, ज्यामुळे मुलांमध्ये प्रामाणिकपणाचा अभाव निर्माण होतो. शाळांमध्ये शिक्षकांचं काम आता केवळ परीक्षेची तयारी करण्यापुरतं मर्यादित होत चाललं आहे. शाळेत मुलांच्या वर्तणुकीकडे लक्ष देण्याचे प्रमाण कमी झाले आहे. शिक्षकांना आणि शिक्षण संस्थांना मुलांच्या परिणामकारकतेवर अधिक जोर द्यावा लागतो, ज्यामुळे नैतिकतेच्या शिकवणुकीसाठी वेळच उरत नाही. आणि त्यात भर म्हणजे आजच्या मुलांवर माध्यमांचा मोठा प्रभाव पडत आहे. चित्रपट, टीव्ही शो, सोशल मीडियावर मुलांना आकर्षक वाटणाऱ्या अनेक गोष्टी वास्तवातून दूर आणि अनेकदा नैतिकतेच्या विरुद्ध असतात. त्यात दाखवलेल्या आकर्षक

जीवनशैलीमुळे मुलं चुकीच्या मूल्यांवर विश्वास ठेवू लागतात. पलाक सुध्दा कधी कधी आपल्या मुलांच्या शैक्षणिक यशावर अधिक भर देतात. त्यामुळे ते मुलांच्या नैतिक विकासाकडे दुर्लक्ष करतात. अनेकदा मुलांच्या चुकीच्या वर्तनाचे समर्थन करणे, त्यांच्या चुका दुर्लक्षित करणे अशा गोष्टी त्यांना अनाहूतपणे नैतिकतेपासून दूर करण्यास भाग पाडतात. आपल्या हे लक्षात का येत नाही आहे की तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर मुलांच्या नैतिक मूल्यांवर नकारात्मक परिणाम करतो. मोबाइल, इंटरनेट, आणि समाजमाध्यमांचा वापर मुलांना समाजापासून दूर करत आहे. समाजातील इतरांशी असणारी नाती, आदरभाव, आणि सहकार्याची भावना कमी होत आहे. मुलं वर्चुअल दुनियेत जास्त रमली असल्यामुळे प्रत्यक्ष जीवनातील नैतिक मूल्यांचा विसर पडत आहे. आणि अशी मुलं खर आयुष्य कधी जगातच नाही ते फक्त आभासी जगात रमतात.

नैतिक मूल्यांचा विसर पुन्हा रोखण्यासाठी शिक्षण क्षेत्रात आणि समाजात काही सकारात्मक बदल करण्याची गरज आहे. शाळांमध्ये नैतिक शिक्षणासाठी स्वतंत्र वेळ आणि कोर्स असावा. मुलांना गोष्टींमधून, कार्यशाळांमधून, आणि चर्चा सत्रांमधून नैतिक मूल्य शिकवले जावे. शाळेतील विविध उपक्रम, सामाजिक जबाबदारीची उदाहरणे यांचा मुलांवर चांगला परिणाम होईल. पालकांनी मुलांच्या शिक्षणासोबत त्यांच्या चारित्र्याची आणि वर्तनाची काळजी घेतली पाहिजे. मुलांना आदर्श मूल्य शिकवणे, त्यांचं योग्य मार्गदर्शन करणं हे पालकांचं मुख्य काम आहे. त्यांनी मुलांच्या चुकीच्या वर्तनाचं समर्थन न करता त्यांना योग्य मार्ग दाखवावा. सोबतच तंत्रज्ञानाचा योग्य आणि मर्यादित वापर कसा करावा हे मुलांना शिकवणे आवश्यक आहे. समाजाशी संबंध, सामंजस्य, आणि एकोप्याचं महत्व त्यांना समजावलं पाहिजे. प्रत्यक्षात येणाऱ्या अनुभवांना महत्त्व दिलं पाहिजे. मुलांवर माध्यमांचा होणारा परिणाम लक्षात घेऊन त्यांना योग्य गोष्टी पाहण्याची सवय लावावी. समाजमाध्यमांचा सकारात्मक वापर कसा करावा हे शिकवावं. चुकीच्या जीवनशैलीपासून दूर राहण्याचं महत्व मुलांना शिकवणं आवश्यक आहे. शिक्षकांनी केवळ शिक्षण देण्याचं काम न करता मुलांच्या नैतिक विकासाकडेही लक्ष दिलं पाहिजे. त्यांच्या मार्गदर्शनातून मुलांना समाजात योग्य आचारधर्म, सहानुभूती, आणि शिस्त शिकवली जावी. काही सामाजिक संस्था या साठी कामं करतात त्यांना संपर्क साधावा त्या संस्था योग्य ते मार्गदर्शन मुलांना करतात.

शाळेतील मुलं आणि नैतिक मूल्य यातील पडत चालेला विसर हा गंभीर चिंतेचा विषय आहे. समाजाच्या आणि देशाच्या भविष्यावर या विसराचा मोठा परिणाम होऊ शकतो. शिक्षणाच्या माध्यमातून केवळ ज्ञान नाही तर नैतिकतेची शिकवण देणं अत्यंत आवश्यक आहे. पालक, शिक्षक, आणि समाजाने एकत्र येऊन मुलांच्या नैतिक विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत. नैतिक मूल्ये शिकवूनच मुलांना एक उत्तम, जबाबदार आणि सज्जन नागरिक बनवता येईल. आणि ती काळाची गरज आहे.

**- पल्लवी चिकारे-पळसकर,** नागपूर

लेखिका चाइल्ड डेवलपमेंट या विषयाच्या अभ्यासक असून फूटपाथ शाळा,
"चाइल्ड ए चेंज मेकर" या प्रोजेक्ट अंतर्गत कार्यरत आहेत.

*****

# उद्योजकतेचे स्वप्न बघा.

उद्योजक हा केव्हाही आपला उद्योग करू शकतो. परंतु लहानपणापासून जर उद्योजकतेची आवड असली आणि आपण बघितलेले स्वप्न साकार करण्यासाठी जर आपण त्या स्वप्नाच्या मागे धावलो, मेहनत घेतली तर पाहिलेले स्वप्न पूर्ण होऊ शकते. उद्योग जर तुम्हाला करायचा असेल तर तो तरुणपणी केलेला अगदी योग्य. म्हणजे आपण सुरुवातीलाच कमी वयामध्ये आपला सुरू केलेला व्यवसाय हा आपण चांगल्या पद्धतीने वाढवू शकतो. व्यवसायामध्ये दोन गोष्टीला आपल्याला प्राधान्य द्यावे लागेल एक म्हणजे चिकाटी आणि दुसरं म्हणजे हिम्मत. आजपर्यंत जे ही व्यावसायिक जेही उद्योजक मोठे झाले त्यांचे जर तुम्ही सुरुवातीचे दिवस बघितले तर फार कठीण काळ बघितलेला आहे , आणि त्यांनी मेहनत फार घेतलेली आहे. त्यांनी अपयश सुद्धा बघितलेले आपल्याला जाणवेल. पण अपयशाला खचून न जाता, मेहनतीला न घाबरता त्यांनी सतत प्रयत्न केलेले दिसतात. अपयश ही यशाची पहिली पायरी आहे अस आपण म्हणतो, ते शंभर टक्के खरं आहे. अपयश आल्याशिवाय माणूस व्यवसाय करू शकत नाही. व्यवसायामध्ये जर चिकाटी असली तर एक ना एक दिवस आपण सुरू केलेला उद्योग हा एका उंच शिखरावर पोहोचल्याशिवाय राहणार नाही. मी तर सांगेल की आजच्या युवा पिढीने नोकरीपेक्षा उत्कृष्ट उद्योजक बना. जेणेकरून आपण तळागाळातील लोकांना काहीतरी काम देऊ शकू आणि हिम्मत असली की कोणतीही गोष्ट कठीण नाही. पैसा कसा उभा करायचा कुठून आणायचा यासाठी चांगलं नियोजन जर केलं तर आपल्याला व्यवसायामध्ये यश शंभर टक्के मिळेल.  व्यवसायामध्ये अनेक उदाहरण आहेत. टाटा, बिर्ला, अंबानी, मसाला किंग धनंजय दातार असे अनेक उद्योजक आहेत की ज्यांनी आपला व्यवसाय कष्टाने , चिकाटीने सुरू केला आणि पाहिलेले स्वप्न पूर्ण केले. यांच्या जीवनविषयी जर आपण पहिले तर त्यांच्या कडून प्रेरणा घेऊन आपल्याला सुद्धा उद्योग करावा वाटेल यात शंका नाही. मी आपणास तरुणांना एकच सांगेल नोकरी केल्यापेक्षा नोकरी देणारे व्हा.

आज आपल्या भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी साहेब यांनी तरुणांसाठी वेगवेगळ्या योजना सुरू केल्या आहेत. त्यांना यातून युवा भारत घडवायचा आहे. त्यांनी मागील दहा वर्षाच्या काळात युवकांसाठी नव नवीन योजना सुरू केल्या.  त्यांच्या डोळ्यासमोर फक्त एकच उद्दिष्ट आहे की आजचा युवक हा सक्षम झाला पाहिजे. मुद्रा लोन, स्टार्ट अप इंडिया, अशा या योजनांतून उद्योग उभारण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्जासाठी उपाययोजना केले आहेत. अगदी नाममात्र कागदपत्रे यासाठी लागतात, जेणेकरून युवकांना नवउद्योजकांना याचा फायदा होईल. खरोखरच गेल्या दहा वर्षांमध्ये अनेक युवकांनी याचा फायदा सुद्धा घेतला आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये शिक्षणामध्ये सुद्धा खूप क्रांती झाली आहे. नव नवीन अभ्यासक्रम तयार करून यातून एक चांगली पिढी निर्माण व्हावी आणि यातूनच आपल्या भारतातच नवे नवे उद्योग नव नवीन शोध लागावे आणि त्याची उत्पादन सुद्धा आपल्या देशात व्हावे यासाठी केंद्र सरकारकडून विविध उपाय योजना अमलात आणले आहेत. यातून आपणास एकच गोष्ट सांगावीशी वाटते ती म्हणजे उद्योगाकडून विकासाकडे कसे जावे आणि आपला देश सुद्धा कसा विकसित होईल याकडे लक्ष द्यावे.

**- अभय खेडकर,** वाशिम.

लेखक उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार आहेत.

*****

# माती व पाणी आपल्या समृध्दीचा आधार.

माती व पाणी आपल्या समृद्धीचा आधार राहलेला आहे, सुजलाम् सुफलाम् म्हणविणाऱ्या आपल्या देशात आजही पिण्याच्या पाण्यासाठी मैलोंगत चालावे लागते नद्यांचा मृत्यू होतो, मृदजल कमी होते विहीरीतील पाणी खोलवर जाते, मातीतील सेंद्रिय कर्ब झपाट्याने कमी होणे, दरवर्षी वाढणारी पाणी टंचाई हे सर्व बदललेला निसर्ग व त्याचा चुकीच्या पद्धतीने झालेले वापर (नियोजन ) होय.

महाराष्ट्राचा ८१% पेक्षा जास्त भूभाग (बेसॉल्ट ) नावाच्या खडकाने व्यापला असून जमीनित वेगाने पाणी मुरण्याला मर्यादा आहेत. परंतु ३५ ते ४८ दिवसात पडणारा पाऊस पाच प्रकारे यायचा १. रिमझिम, रिमझिम. २४ तासात १ चौरस मीटर मध्ये १ ते ६ लिटर पडायचा २. बारीक धारेचा ६ ते १५ लिटर पडायचा ३. मोठ्या धारेचा पाऊस १५ ते ३० लिटर पडायचा ४. मुसळधार पाऊस ३० ते १०० लिटर प्रती चौरस मिटरमध्ये चोवीस तासात ५. वादळी पाऊस १०० लिटरपेक्षा जास्त पडायचा २४ तासात १ चौरस मिटर मध्ये पडायचा. त्यामुळे ७२% पाणी नैसरीक रित्या जमिनीत मुरायचे, २२% सिंचणसाठी पुरवलेल्या पाण्यातून, २% तलाव व कालव्यातील पाझर, ४% भूजल संवर्धनासाठी केलेले प्रयत्न. परंतु आता पाऊस पुष्कळच लहरी झाला. पावसाळ्यात आठ, दहा दिवस उशिरा येणे आपण समजू शकतो परंतु महिना दोन महीने उशिरा येणे जास्तच अस्वस्थ करणारे आहे. कुठे तो ९४० मी.मी. एकाच दिवशी पडतो तर कुठे काहीच नाही, आणि पाण्याचे विभाजन होऊन साधारणत वेगवेगळ्या प्रदेशानुसार ४७% पाऊस वाहून जातो, २५% पावसाचे वाष्पीभवन होते, १७% भूपरुष्टवरील पाणी (मातीतील ओलावा), ११% जमिनीत मूरते. या पद्धतीने विभाजन होते.

आम्ही आमच्या मर्जीचे राजे झालोत.

पाणी जमिनीत कासवाच्या गतीने मुरते आणि आपण त्याला सस्याच्या गतीने बाहेर काढत आहेत. १००० फुटावरून वेगाने पाणी काढणारे पंप उपलब्ध झालेले आहेत. त्यामुळे रामायणाच्या काळापासून मुरलेले पाणी उपासण्याला आम्ही धन्यता मानायला लागलो. अधिक उत्पादनाच्या हव्यासापोटी मातीला प्रदूषित केल्या गेले. त्यामुळे मातीतील मृदजल (ओलावा) कमी व्हायला लागला , व भुजलाचा अमाप उपसा व्हायला लागला. सोबत मातीचा समतोल बिघडला, सुपीक माती आमच्या पासून दूर जायला लागली कारण आम्ही आमच्या मर्जिचे राजे झालोत.

पाणी तलावात नाही पृथ्वीच्या पोटात असायला हवे.

भूपरुष्टवरील पाणी थांबवून, धरणे बांधून शेतीला पाणी देण्याचा खटाटोप कोट्यावधि रुपये खर्चून केला गेला, धरणाखाली शेकडो एकर सुपीक जमीन सुद्धा गेली. शहरांना पाणी पुरवठ्या करिता त्याचा उपयोग झाला, आकडेवारी सांगते की जेवढे सिंचन भुजालद्वारे (विहिरी) द्वारे झाले तेवढे धरणाच्या द्वारे होऊ शकले नाही, उलट भूपरुष्टवरील पाण्याचे होणारे वाष्पीभवन ही मोठी समस्या उभी राहिली. त्यामुळे पाणी धरणात नाही तर धरतीच्या पोटात असणे गरजेचे आहे. आणि हीच नैसर्गिक व्यवस्था आहे.

मिट्टी से हमारा ध्यान हट गया

विदर्भाच्या मातीमध्ये ऑर्गनिक कार्बन चे प्रमाण दिवसेंदिवस कमी व्हायला लागले. माती आजारी व्हायला लागली, माती मध्ये पाणी थांबत नाही, कारण मातीला परत करण्याची आमची तयारी नाही, एकल पीक पद्धती, रासायनिक खत, रासायनिक किटक नाशके, तन नाशके व पाण्याचा अतिरिक्त वापर यामुळे माती सुपीक होण्याऐवजी आजारी व्हायला लागली. त्यामुळे जमिनीतिल सुष्म जीव, रासायनिक भौतिक गुणधर्मात बदल व्हायला लागला.

सामान्य लोकांपर्यंत ज्ञान पोहचत नाही.

ग्रामीण भागामध्ये एक धारणा रुजलेली आहे की, जमिनीच्या आत खूप पाणी आहे, म्हणून १०० फुटावरील बोअर आता १००० फुटापर्यंत व्हायला लागले आहेत, विहिरी नवीन साधनांच्या द्वारे खोलवर व्हायला लागल्या. परंतु खोल पर्यन्त पाषाण असल्यामुळे हातात पाण्या ऐवजी निरश्याच जास्त हाती येते, त्यातून वाढणारा कर्जबाजारीपणा, मानसिक नैराश्य व शेतकरी आत्महत्या, होतांना दिसतात. त्यातून सुटका होण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांपर्यंत हे ज्ञान सोप करून सांगणे गरजेचे आहे. व त्याला चळवळीचे स्वरूप येणे आवश्यक आहे.

वाष्पीभवन थांबवणे गरजेचे आहे.

एक महिना जनिनीतील ओलावा/ मृदजल टिकवून ठेवण्यासाठी त्याचे वाष्पीभवन थांबविले पाहिजे. वाष्पीभवन थांबवण्यासाठी आकचहयादण हा महत्वाचा उपाय आहे. आकचयादण हिरवळीच्या खतापासून शेतात निघणाऱ्या तनापासून, पिकांच्या अवशेषयापासून उत्तम होऊ शकते, दोन पावसात खंड पडल्यास मृदजल जमीनितच राहत असल्याने वनस्पतिंन्ना मुळावाटे ओलावा उपलब्ध असतो.

मृदजल एक विशिष्ट पातळीच्या खाली गेले तर पिकांना ओलीत करावे लागेल. विदर्भात कालवे बारमाही नाही , त्यामुळे विहीरीतून पाणि उपसून ओलीत केल्यास भुजलाचा साठा कमी होतो. म्हणून मृदजलाचे महत्व सोप्या पद्धतीने सांगणे, सोबत सेंद्रिय पद्धतीवर विशेष भर देऊन, क्रॉप पॅटर्न निश्चित करून लोकांचा सहभाग गरजेचा आहे.

जिथे जिथ जैविक शेती तिथे पाण्याची पातळी वर आली.

जैविक शेतीमध्ये सर्वांच्या जगण्याचा अधिकार मान्य केला जातो. इथे सहजीवन महत्वाचे असते . मातीचे आरोग्य सुधारण्यासाठी जमिनीतील जीवसृष्टी सहाय्यता करत असते. सूक्ष्मजीव, बुरशी, सुतकृमि, गांडूळ, मुंग्या, माकोडे, फुलपाखरे, बेडके, मध्यमाश्या, पक्षी इत्यादि माती समृद्ध करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. फक्त त्यांच्या प्रयत्नात येणारे अडथळे निर्माण होतात. एरव्ही माती हे सर्वात मोठे पाणी साठवण्याचे भंडार आहे. हे सर्वानीच मान्य केलेले आहे. जैविक शेतीमुळे पाणी पातळीत भरपूर वाढ होते याचे अनेक दाखले देता येतील.

वॉटर बजेट

वॉटर बजेट शिवाय आताचा प्रवास अंधारात चालल्या सारखा आहे, उपलब्ध पाण्याचा अंदाज नसल्यास खर्चाचा अंदाज लागणे कठीण आहे, त्यासाठी गाव पातळीवर प्रतेक गावात दोन,तीन पर्जन्यमापक पाणलोट नीहाय असावे. आपल्या गाव क्षेत्रावर पडलेला पाऊस, वाहून गेलेला पाऊस, अडवलेला पाऊस, वाष्पीभवन, भूजल साठा, मृदजल याचे अंदाजपत्रक, लोक सहभागातून तयार करून दर्शनीय ठिकाणी लावून व गावसभेमद्धे पिकपद्धतीचे नियोजन, कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची लागवड व ठिबक, तुषार सारख्या साधनांचा उपयोग करणे, यासाठी ग्रामससभेतून एकत्रित रित्या निर्णय घेणे गरजेचे आहे. यातूनच जल संपन्न गाव निर्माण होऊ शकते.

**- पवन मिश्रा,** वाशिम.

लेखक हे जैविक शेती अभ्यासक असून प्रयोगशील शेतकरी आहेत.

*****

# निसर्ग समृध्द अलिबाग... प्रवास वर्णन.

प्रवास म्हटलं की माझ्यासाठी आनंदाची पर्वणीच जणू, त्यातही समुद्र ठिकाणी, निसर्गाच्या सानिध्यात म्हणजे सोने पे सुहागा, दुधात साखर म्हणतात तसंच काहीसं, तशी ही माझी समुद्रकिनारी जाण्याची पहिलीच वेळ नव्हती मात्र यावेळी मी एकल प्रवासी होते. एकट्याने प्रवासाला जाणे म्हणजे स्वतःला शोधता येते स्वतःला भेटता येते. लिखाणाचा छंद असणाऱ्या माझ्यासारखीला ही पर्वणीच असते. आपण आपल्यात खोल खोल उतरत मनाच्या तळाशी जाता येतं. स्वतःचं परीक्षण करण्याची स्वतःला जोखण्याची संधी असते.

प्रवासाचा दिवस उगवला ट्रेन जलद धीमी होत तिचे गंतव्य गाठायला आपल्या रुळावरून धावत होती. एक एक स्टेशन मागे पडत होतं. एकल प्रवासी म्हटलं की असंख्य विचार डोक्यात सुरू असतात, आपण आपल्याशीच बोलत असतो. डोक्यात असंख्य विचारांच काहूर माजलं होतं आणि ट्रेन मध्येच थांबत, मध्येच गती घेत होती तेव्हा गाण्यांच्या दोन ओळी सहजच आठवल्या, चाल तीच होती शब्द मात्र वेगळे होते गाडी खरच इतक्या धिम्या गतीने पुढे सरकत होती की शेवटी दोन ओळी ओठावर आल्याच नागपूर से निकली गाडी पुणे चली होल्ले होल्ले, इतकी ती धिम्या गतीने चालली होती.

पुण्यात माझ्या मैत्रिणीकडे मी निघाले होते तिच्याकडील लग्न आटोपून पुढे मी अलिबागच्या समुद्रकिनारी जाण्याचे ठरवले. पूण्याहून खूप सार्या बस अलिबाग साठी उपलब्ध असतात. पुण्याहून  अलिबागला जाण्यासाठी साधारण चार साडेचार तास लागतात. मला माझ्या मुलाने शिवशाहीचे रिझर्वेशन करून दिल्याने गर्दी असूनही मला आरामात जायला मिळाले. कोकणात जाणारा रस्ताच निसर्ग सौंदर्यांने नटलेला आहे तर कोकण किती सुंदर असावं याची कल्पना येऊ लागते. घाटदार वळणा वळणाचे रस्ते, मनातील स्वप्नांच्या उंच मनोऱ्यांसारखे उंचच उंच डोंगर, खोल खोल दऱ्या, त्यातून निघणाऱ्या धूक्याच्या वाफा, धुक्याच्या गडद पडद्यातून डोकावणारे सूर्यकिरण, घनदाट, निबीड जंगलातून येणाऱ्या कोवळ्या उन्हाची तिरीप हे सगळं मनाच्या कॅमेऱ्यात बंदिस्त करून घेत होते,असे अप्रतिम निसर्ग सौंदर्य न्याहाळत मन, नजरेतून हळूच सुटून दृष्टीच्या टप्प्यातून दूरवरून फिरून येत होतं. हलकेच मनाच्या तालातून एक गीत नाचत बाहेर आलं,पंछी बनू उडती फिरू मस्त गगन मे,आज मैं आजाद हूं दुनिया के चमन में. पुणे बरेच मागे पडले होते, निसर्ग सौंदर्यात आता नारळी पोफळीची झाडे चार चांद लावत होती म्हणजे आता अलिबाग फार काही दूर नव्हतं.

अलिबागला पोहोचता पोहोचता उन्हे उतरत आली होती. संध्याराणी पृथ्वीवर अवतरीत व्हायला तयार झाली होती. मी पाच वाजताच्या दरम्यान अलिबाग मध्ये पोहोचले. स्टँड जवळच मी जिच्याकडे उतरणार होते त्या माझ्या मैत्रिणीचे प्रणिताचे घर आहे ती मला घ्यायला आली होती. तिच्यासोबत तिच्या घरी गेले,तिथे तिने मला राहायला स्वतंत्र खोली देऊ केली सर्व सोयींनी सज्ज अशी ती खोली होती, मी फ्रेश होऊन येईपर्यंत तिने मस्त गरमागरम वाफाळता चहा आणि नाश्त्याला मस्त गरमागरम उपमा आणला होता. दिवसभरात जेवण न झाल्यामुळे भूक पण दणकून लागली होती तो चविष्ट उपमा बघून पोटातले कावळे जरा जास्तच इकडून तिकडे उडत होते वरून गरमागरम चहा, पोट मन आणि रसना तिघेही तृप्त झाले. सूर्यास्ताची वेळ झाल्यामुळे मी पटकन तयार झाले कारण मला सूर्यास्त बघायचा होता ती आणि मी समुद्राच्या दिशेने निघालो,तिच्या घरापासून समुद्र पंधरा-वीस मिनिटांच्या अंतरावर होता. चालत चालत जाता येत होतं आम्ही चालतच गेलो मुद्दामच,जेणेकरून सकाळच्या सूर्योदयासाठी मला रस्ता लक्षात राहावा म्हणून.

जसजसे समुद्राजवळ पोहोचू लागलो तसतसा समुद्रावरून फिरून येणारा वारा भोवती पिंगा घालू लागला होता. समुद्राची गाज ऐकू येऊ लागली होती,समुद्रावर पोचलो तेव्हा सूर्य अस्तास जाण्याच्या तयारीत होता. रविराज इथून जाऊन निशा राणीला भेटायला आतुर झाला होता. हलकेच संध्या छाया दाटून आली होती. मी किनाऱ्यावर बसून सूर्यास्ताची सर्व स्थित्यंतरे आपल्या नजरेत साठविण्याचा  प्रयत्न करत होते. समुद्राची गाज आणि लाटांचा साज, भिरभिरणारा समीर,

अस्तास जाणारा रवी, जणू संगीत संध्याच सुरू होती समुद्रकिनारी,माणसांनी फुललेला समुद्रकिनारा, हास्यांचा कल्लोळ, सागरातील लाटांप्रमाणे जणू माणसाच्या आनंदालाही आलेले उधाण, आणि निसर्गरम्य सागरी किनारा, असे अद्भुत दृश्य दृष्टिगोचर होत होते.

ओहोटी असल्याने हळूहळू तरंगत येणारी लाट वाऱ्याच्या अश्वावर आरुढ होऊन येत होती .हळूहळू डौलात येणारी लाट सोबतच तिच्या दिमितीला छोट्या छोट्या वलयांचे तरंग म्हणजे सैन्य भासत होते, जणू देवसेना आपल्या सैन्यासह सफरीवर निघाली होती. मावळतीच्या सूर्याची किरणे तिच्या ललाटी मुकुटा समान भासमान होत होती. सफरीला गेलेली लाटांची राणी आपल्या वाळूच्या महाली विसावली. सूर्य अस्तास जाता जाता काळोखाने साम्राज्य पसरवले

आणि त्या तमातून मार्गक्रमण करीत शशीराज पृथ्वीवर अवतरले. लाटांची राणी पुन्हा आपल्या वालूकामय महालातून डोकावली आणि शशी राजा संगे पुन्हा रात्रीच्या सफरीला निघाली.शशीकीरणात तिचे मुख कमल जणू मोतियांप्रमाणे भासत होते. हे सर्व नजारे मी सागर किनाऱ्यावरील धक्क्यावर बसून न्याहाळत होते. ह्या सर्व घटनेचे साक्षीदार म्हणून मी आणि शुक्रतारा तिथे हजर होतो. शुक्रतारा सूर्यास्ताच्या लालेलाल आसमानातून हळूच डोकावला आणि आम्ही घरी जायला निघालो.आता ओढ होती ती दुसऱ्या दिवशी उगवणाऱ्या सूर्योदयाची.

दुसऱ्या दिवशी पहाटेच पाच वाजता उठले आणि तयार होऊन समुद्रावर जायला निघाले. सकाळी मला एकटीला जायचे होते कारण माझ्या मैत्रिणीचे फूड कॉर्नर असल्यामुळे ती माझ्यासोबत येऊ शकत नव्हती. हळूहळू जसजसे मी समुद्राजवळ जाऊ लागले तसा समुद्राच्या उधाण लाटांचा आवाज आणि सैरभैर वारा अंगाला झोंबू लागला होता. रात्रीची भरती अजून ओसरलेली नव्हती,मी समुद्रावर पोहोचेपर्यंत तांबड फाकलं होतं मात्र रविराज अजून आले नव्हते उषे ची लाली मात्र सगळीकडे पसरली होती. लवकरच सूर्योदय होणार होता, गडद धूक्याच्या शालीतून तप्त सूर्याचा गोळा क्षितिजाच्या घट्ट लकिरेतून किती सहज वर येतो, तो सोन्याचा सूर्यरुपी लाव्हा वर येताना त्याच्या कला मनाला मोहात पाडतात, सागराच्या जलात दिसणारे सूर्याचे प्रतिबिंब, प्राची वर पसरलेली उषेची गोड लाल लाली प्रेमात पाडते.कले कलेने प्रखर होत जाणारा सूर्य उगवण्याआधी नजरेला नजर भिडवू देतो,प्रखर होताना जणू स्वत:भोवती त्याच्या दिव्य तेज किरणांचे जाळे सभोवती गुंडाळून घेतो आणि त्याच्याकडे बघणे दुर्लभ करतो. हळूहळू सागर तरंग हेलकावताना सूर्याची किरणे त्यांच्या अंगा खांद्यावर खेळताना किती विलोभनीय वाटतं म्हणून सांगू,जणू सूर्याची पिल्ले आपल्या आप्तांच्या अंगावर खेळून हूडदंग करीत आहेत असे वाटते.

आता समुद्राचे पाणी पूर्ण ओसरून ओहोटी लागली होती आणि कुलाबा किल्ल्या पर्यंतचा रस्ता दिसू लागला होता. किल्ल्यापर्यंत आता चालत जाता येत होतं तसे मी पण किल्ल्याकडे जायला निघाले. कुलाबा हा किल्ला अलिबाग जवळील कुलाबा येथे आहे, हा किल्ला जलदुर्ग प्रकारातील असून अरबी समुद्रामध्ये अष्टागर किनारपट्टीवर वसलेला आहे. या किल्ल्याला किल्ला ई कुलाबा असे देखील संबोधले जाते. हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांनी इसवी सन १६५२ मध्ये बांधला होता. महाराजांच्या आरमारातील हा एक महत्त्वाचा किल्ला होता.किल्ल्याची उंची २५ फूट असून हा किनाऱ्यापासून दोन किलोमीटर अंतरावर आहे. समुद्रामध्ये चारही बाजूंनी पाण्याने वेढलेला हा ऐतिहासिक किल्ला पर्यटकांना आकर्षित करतो.

कुलाबा किल्ल्यावर बरीचशी ठिकाणं पाहण्यासारखी आहेत, त्यात मुख्य दरवाजा, गोड्या पाण्याचा तलाव, अंधारावाव, देवी गुलबाई मंदिर, गणेश मंदिर, वाडा, कान्होजी घुमटी, सर्जेकोट इत्यादी ठिकाणं पाहायला मिळतात. अर्थात शेकडो वर्षात काही ठिकाणांची बरीच पडझड झालेली आहे मात्र अवशेष बाकी आहेत ज्यामुळे इतिहासाला उजाळा मिळतो. तिथूनच आजूबाजूला बरेच समुद्रकिनारे बघता येतात जसे की अक्षी बीच, वर्सोली बीच, नागाव बीच, रेवदंडा बीच, कीहीम

बीच, मांडवा बीच,काशीद बीच हे सर्व समुद्र किनारे पण आपण एक एक दिवस जाऊन बघून येऊ शकतो.

आता किल्ल्यावरून परतायची वेळ झाली होती, किल्ल्यावरून परत येताना भुकेची जाणीव झाली, पोटात कावळे उडू लागले होते,खूप जबरदस्त भूक लागली होती.येताना वाटेत डोंगरे वाचनालय होते तिथे जाऊन आले, हे वाचनालय खूप शांत आहे इथे मुलं मुली अभ्यासाला येतात,खूप सारी पुस्तके पाहून तहानभूक हरपली होती मात्र वेळेचे बंधन असल्याने नाईलाजाने निघावं लागलं. वाटेतच हिराकोट तलाव होता तो देखील पाहता आला. आता मात्र भूक जोरावर होती मैत्रिणीकडे गेले,तसे तिने माझे आवडते तांदळाचे घावन आणि खोबऱ्याची चटणी करून ठेवली होती. गरमागरम घावन आणि चटणी अप्रतिम अशी चव होती. रसना तृप्त झाली आणि मन सुद्धा. घावणे हा तेथील पारंपारिक पदार्थ आहे जो फक्त तिथे जाऊनच खावा. तिथे मिळणारे कमळाच्या कचरू,मशाळी केळी, चारोळी इतकी बारीक बोरे, ताडगोळे हे सर्व जिन्नस खाण्याची मज्जा काही औरच.

माझा अलिबाग मधील दिवस संपला होता परतीच्या प्रवासाची वेळ झाली होती. अलिबाग ते पुणे असा परतीचा प्रवास सुरू झाला. पुण्याहून दुसऱ्या दिवशी माझी नागपूर साठी ट्रेन असल्याने मनात असूनही मला अलिबाग मध्ये जास्त थांबता आले नाही. शेवटी चालना हाही एक निसर्ग नियमच आहे कुठून तरी कुठेतरी जावंच लागतं. प्रवास अगदी झकास झाला होता. वेगवेगळी प्रेक्षणीय ठिकाण बघण्याचे अनुभव, तेथील खाद्य संस्कृती, निसर्ग,स्थानिक माणसांचे अनुभव, एकंदरीत प्रवास हा व्यक्तीला समृद्ध करून जातो ऐतिहासिक, नैसर्गिक समृद्धीची जाणीव , आपल्या आयुष्याच्या शिदोरीत जमा होत असते. आणि ते जगताना आपण स्वतः, आणि दुसऱ्यांना सांगताना, इतर व्यक्ती सुद्धा समृद्ध होत राहतात. असा हा माझा एकल प्रवास नागपूरला येऊन सफल संपूर्ण झाला.

**- निता प्रकाश,** नागपूर.

लेखिका ललित साहित्य, कथा, कविता या विषयात लेखन करतात.

*****

# लघुकथा-'ती'.

हिरव्याबुंद डेरेदार चाफ्याच्या झाडाखाली ती बसली होती. शेजारचे आंब्याचे झाड छण छण आवाज करत एकसारखे किणकिणत होते. संध्याकाळ झालीच होती. पाखरं येऊन बसली असणार त्या झाडावर. झाड यावेळेला फार किलबिलतं. तिला तो नाद आवडायचा. जीव एकवटून ती तो आवाज ऐकत बसायची.

फांदीफांदीतून येणाऱ्या त्या ध्वनीलहरी इतक्या सुरेल होत्या की तिला त्यासाठी वेगळी नजर उचलून झाडाकडे बघावे लागतच नसे. हं, त्यावेळी तिची नजर गढली असे समोरच्या हिरव्यागार पानांच्या जाईवर.

संध्याकाळ जसजशी गडद होत जाई तसतशी जाईच्या फुलांची सौम्य शुभ्रता खुलून दिसे. कळ्या-सुमनांनी फुललेली जाई उजळून येई. वरचा चाफा जसा श्रावणाच्या उन्हात राजसबिंडा लखलखता दिसे तशीच ही जाई सायंकाळी शालीन अनुपम भासे. निसर्गाच्या या विविध अविष्कारात ती हरवून जाई. तिला तिच्या एकटेपणाचा विसर पडे. दिवसभर मनात उठणाऱ्या अनेक विचार तरंगांना ती कवितेच्या रुपात वहीवर उतरवून घेई.

परवाच तिची कविता जिल्ह्यातून प्रकाशित होणाऱ्या स्त्री मासिकात छापून आली होती. असे काव्यबिव्य लिहिणे विशेषतः मुलीबाळींनी अण्णांना - तिच्या वडिलांना पसंत नव्हते. म्हणून तिने त्या मासिकाची प्रत तिच्या मैत्रिणीच्या पत्त्यावर मागवली होती. मैत्रिणीचे वडील पुरोगामी विचारसरणीचे होते. ब्रिटिशांना हाकलायला जितके प्रयत्न करता येईल तितके ते करत.

या उलट तिचे वडील भित्रे, आपल्या आपल्या चौकटीत नाकासमोर राहणारे सरळ. इंग्रजांच्या दरबारात इमानेइतबारे नोकरी करत. कुटुंब पोसत. कधी स्वातंत्र्याच्या चळवळीत उतरले नाही की देशासाठी घरदार फुकुन बसले नाहीत.

"मलाही वाटतं हो देश स्वतंत्र व्हावा पण इंग्रजांची पकड ढिली करण्याची ताकद आपल्यात नाही", असे ते मित्रमंडळीत बोलून दाखवत.

पत्नी त्यांच्या, सासुसासऱ्यांच्या आज्ञेत खालमानेने राहिली.

रितीभातीप्रमाणे तिचेही अकराव्या वर्षीच लग्न करण्यात आले. वयात यायची असल्याने तोवर माहेरीच ठेवायचे ठरले. झालं, तिचा अल्लडपणा कायम राहिला पण अण्णांनी डोळे काढले की ती दबकत चालत घरात गुडूप व्हायची. हे काय? पैंजण वाजायला नको. कंकण हलायला नको. पदर ढळायला नको. आपल्याच घरात इतके निर्बंध ? "आपल्याच?" अण्णांनी जोरात विचारले होते.

ती चमकलीच होती. अण्णांच्या स्वरात अधिकच कोरडेपणा होता का? विवाह झाल्यानंतर हे घर आपले राहिले नाही. आपण इथे उपरेच ही भावना मग खोलवर ठसठसायला लागली. ती आक्रसल्यासारखी झाली. कानकोंडली राहू लागली.

नवीन लग्न करून आलेल्या भावजयी जितक्या मोकळेपणाने वावरत तितकेही तिला जमेना. जरा जोरात हसली की अण्णा रोखून बघायचे. आई कसनुसे स्मित करत तिला झाकून घ्यायची.

घराचे हे बदललेले स्वरूप तिला झेपेना. ज्या वास्तुत ती जन्मली, वाढली तिथेच ती खुंटावी? विवाहानंतर कन्या इतकी परकी होते ? सासरहून मूळ येण्यासाठी अण्णांचे सतत दाराशी तिष्ठत असणे तिला साहवेना. घर सोडायची इच्छा नव्हती पण अण्णांच्या बदलेल्या वागणुकीमुळे सासरी चालले जावे असेच वाटत राही.

तिकडे काय गौडबंगाल सुरू होते देव जाणे. ती ऋतुमती झाल्यावर वारंवार निरोप पाठवूनही तिला घ्यायला सासरची मंडळी येईना तेव्हा दादा नि काका नेमकी काय गोम आहे म्हणून थेट तिकडे बघायलाच गेले.

त्यावेळी तिचा वर देशसेवेसाठी घरातून निघून क्रांतिकारकांच्या टोळीत सामील झाल्याची बाब समोर आली आणि

माहेर गंभीर झाले. मुलगी अशीच सधवा एकटी इकडे राहणार की कधीतरी विधवा झाली म्हणून खबर येईल अन् हिचे जीवन उद्धवस्थ होणार हीच चिंता सगळ्यांना लागून राहिली होती.

तिचा पती घरात असो वा नसो पण तिला जनरीतीप्रमाणे सासरी न्यावे यासाठी अण्णा नातेवाईकांकडून त्या पक्षावर दबाव टाकत होते. तिचे सासरे मुलगाच नाहीतर सुनेला ठेवून काय करू म्हणत हात झटकत होते. केवळ काही विधींनी तिला ना इकडची ठेवले ना तिकडची.

अण्णांच्या तीक्ष्ण नजरेने ती काचून गेली होती. आईही भावजयींची वरवर, बाळंतपणात गुंतली होती. ती खऱ्या अर्थाने एकाकी पडली. खिन्न झाली. कुढत राहू लागली.

अशाच निरुत्साही मनस्थितीत तिला चाफ्याचे झाड सापडले. मागच्या अंगणातील आपल्याच चाफ्याच्या झाडाकडे ती नव्याने नवलाने बघू लागली. प्रत्येक ऋतूतील त्याचे विभ्रम तिला वेडावू लागले. हळूहळू झाडाचे फुल पान तिच्याशी बोलू लागले. तिला संवाद साधायला सुखाचा सोबती मिळाला.

भिंतीवर रेललेली जाईही त्यांच्यात मिसळली. सुखदुःखाचे काही बोलू लागली. तिघांची गट्टी जमली. त्यात झाडावरच्या पाखरांची भर पडली. काळ्या पांढऱ्या पंखांचा खंड्या, कोकीळ, मैना, राघू, वटवटे, चिमण्या, भारद्वाज सारे तिचे मन रमवू लागले. एकांतातील त्या अनोख्या जगात ती फुलू लागली. तिच्यातील कवित्व बहरले. आता तिला मनोरंजनासाठी ना कुणाची मदत लागत ना कुणाची तीव्र नजर टोचत. निसर्गाच्या सानिध्यात तिची ती तिला सापडली.

अण्णा दुष्ट होते अशातला भाग नाही. ते चारचौघांसारखे समाजाच्या सर्वसाधारण विचारसरणीचे कैदी होते. लग्न झाले आता सासरी जावे अशी त्यांची पांढरपेशी निखळ अपेक्षा होती. त्यात वावगे काही नव्हते. सासरची मंडळी न्यायला तयार नाही यात तिचा दोष नव्हता.

नवरा संसारसुख अनुभवण्याआधीच देशासाठी ब्रह्मचारी झाला यात तिच्या होकार नकाराचा प्रश्नच नव्हता. अण्णांनी जसे तिला 'गृहीत' धरले होते तसेच नवऱ्यानेही तिची 'संमती' समजून तिला सोडून दिले होते. यात तिच्या मनाचा, स्त्रीसुलभ भावनेचा कुठेच उल्लेख नव्हता.

काळजात उठणारे हे वादळ तिची फार नासधूस करायचे. ती बेजार, अनुत्तरित व्हायची. आजूबाजूच्या मैत्रिणींचे संसार बघून जीव नकोसा व्हायचा. नष्ट करायचाही भाव यायचा पण त्याचवेळी आसपासच्या निसर्गशक्तीने तिला सावरले. जगवले. तगवले. आतले काहूर शमवायला ती कविता करू लागली.

खुळ्यासारखी तासनतास लिहू लागली. अण्णा आले की पुढ्यातील परडीत कवितांची वही लपवू लागली. आईला सगळे माहिती होते. ती बिचारी जमेल तशी तिला सांभाळत रहायची पण शेवटी आईही परस्वाधीन. अण्णांच्या परवानगीशिवाय गंजलेला खिळाही हलवायची आईला मुभा नव्हती.

आई तिच्या कवितांना वहीच्या पानातच दडवायला सांगायची. नको प्रसिद्ध करू म्हणायची. खूप दबून दबून राहिल्यावर शेवटी तिच्या मनानेच उचल खाल्ली. आईलाही न सांगता तिने टोपणनाव धारण करून कविता प्रकाशित केली. 'जाई चाफेकर' नावाने तिची कविता जेव्हा मासिकाच्या मधोमध छापून आली तेव्हा किती हर्षाने नाचली ती. चाफ्याला, जाईला बिलगली ती. या कवितांनीच तिच्या घाबऱ्या मनाला 'नवऱ्याने टाकलेली' या कुत्सित टोमण्यातून अलगद तारले. स्वप्न पहात तरंगत ठेवले.

मैत्रिणीचे वडील धीर द्यायचे. पुढचे शिक्षण घे, नर्सिंगचा अभ्यासक्रम कर म्हणून प्रोत्साहन द्यायचे. ती अण्णांच्या भीतीने थबकायची. अण्णांना आवडणार नाही म्हणून पदोपदी स्वतःला रोखायची. असेच दिवस व्यतीत व्हायचे. पण सगळेच दिवस सारखेच नसतात.

हिवाळ्यातल्या थंडगार सोनसकाळी ती पूजेसाठी हार करत असताना सणसणीत बातमी आली.

पूर्ण घर हादरून गेले. जो तो तिच्याकडे बघू लागला.

फिरंग्यांच्या क्लबवर हल्ला चढवतांना पकडल्या गेलेल्या तिच्या नवऱ्याला डोक्यात गोळी लागून त्याचा मृत्यू झाला होता. तीही उंबऱ्याशी अडखळली. धप्पकन कवितांच्या वहीजवळ जाऊन पडली.

डोळे काठोकाठ भरून आले पण हुंदका फुटेना.

उपचार म्हणून तिला सासरी नेण्यात आले. अंत्यविधी उरकले. चौदावा दिवस व शुद्धी झाल्यावर अण्णांनी परत निघायचा विषय काढला. आता तर मुलगाच नाही म्हंटल्यावर ते तिला कशाला ठेवून घेणार हे उमजून अण्णांनी त्या लोकांना तसा कुठलाच आग्रह न करता कुटुंबाला सामान बांधायला सांगितले. रात्र उलटली की पहाटेच निघायचे होते. खटला तयार करून ठेवला होता. जाजम पसरवून झाले होते.

तिच्यासाठी ती रात्र वैऱ्याची ठरली. लाल आलवणातील आजेसासूबाईंनी तिच्या केशवपनाचा जोरकस मुद्दा मांडला. विधवांना आवश्यक आहे म्हणाल्यात. भावना काबूत राहतात. उचंबळत नाही. आपली हद्द समजते. अण्णा काय थोरामोठ्यांच्या हो ला हो लावणारे. कधीच नाही म्हणून नाराजी ओढवून घेत नसे. आई मात्र थरथर कापायला लागली. भावजयी भेदरून गेल्या. तिच्या मानसिक धक्क्यात अधिकच भर पडली. मती सुन्न झाली. बैलगाडीतून ती परत आली तेव्हा पांढऱ्या पदराखालचे तिचे डोके खुरटलेले होते. डोळ्यात आसू गोठलेले. जाईच्या नाजूक वेलीने जवळ घेताच घळाघळा रडली ती. चाफ्याजवळ स्फुंदली ती. अण्णांनी टरटर उदास डोळ्यांनी पाहिले ते व काही न बोलता  विषण्णपणे निघून गेले.

"तिचे भोग आहे ते, तिला भोगावेच लागणार", तिच्या मैत्रिणीच्या वडीलांजवळ अण्णा बोलले.

"कसले भोग हो? जरा बुद्धीचा वापर करा. तिला कर्व्यांच्या शाळेत घाला, पुढचे आयुष्य तरी आपल्या मर्जीने जगू द्या", मैत्रिणीचे वडील कडाडले. त्यावर दोन्ही हात जोडून त्यांना नमस्कार करत अण्णांनी बोलणेच छाटले.

तिच्या आत मात्र कर्व्यांची शाळा, कर्व्यांची शाळा हा शब्द नाचत राहिला. तेवत राहिला. वाटाड्यासारखा वाट दाखवत राहिला. भादरलेल्या डोक्यावरून नकळत हात फिरवताना शिशिर ऋतूत पानगळ झालेली झाडं समोर आली. पानगळीचा मौसम सरल्यावर उघडीबोडखी झाडं पुन्हा नव्याने तल्लखीत होतात. हिरवे अंग धरतात. नव पालवीने, कळ्या-फुलांनी बहरतात. मग आपणच का असे हातपाय गाळून बसायचे? नामोहरम, नाउमेद व्हायचे?

तिने अंधाऱ्या कोपऱ्यावरच्या खुंटीला लटकलेल्या पिशवीतील चुरगाळलेला कागद काढला. पुण्याच्या कर्वे शाळेचा व महिला वसतीगृहाचा पत्ता होता त्यात. कवितांचे मानधन म्हणून मिळालेले काही पैसेही. या भांडवलावर ती आरामात पुण्याला पोहचू शकणार होती. तिथे कामधाम करून उपजीवेकेपुरते कमवू शकत होती. अशांत अनिश्चित मनस्थितीतच ती निजलेल्या आईजवळ गेली.

"काय गं?" आई एकदम धसकलीच. आजकाल आईच खूप दचकायला लागली. तिच्या मनाने टिपले. क्षणभर निश्चय डळमळाला. आईची करुणा आली. आईसाठी थांबावेसे वाटले.

थांबणे म्हणजे जिवंतपणी मरण पुन्हा. अंतहीन काळोखात खितपत पडणे पुन्हा. एकच तर जन्म मिळालाय. का नाही योग्य पध्द्तीने जगावा ?

तिने आईला मनातले सांगितले.

"नाही नाही नाही नाही" आई नकारार्थी मान डोलवत राहिली. तिला खूप शपथा घातल्या. अण्णांचा, दादाचा धाक दाखवला. स्वतःच्या छिन्न हृदयाविषयी न बोलता अण्णांना वाईट वाटेल म्हणाली.

"मला नाही वाईट वाटले?" आपले दोनचार अति आखूड केस हातात धरत तिने विचारले.

आई चूप झाली. ओढलेल्या भीषण डोळ्यांनी बघू लागली. तिचे मन आईला कळत होते पण मातृहृदय एकट्यादुकट्या तरुण मुलीला दूरदेशी पाठवायला राजी नव्हते. इथे कशीही राहील पण नजरेसमोर सुरक्षित तर राहील.

"नाही आई इथे माझी तडफड तडफड होतेय. मी नाही जगू शकणार असे" ती आक्रंदत म्हणाली.

आईचे अंतःकरण द्रवले. आईने तिच्या सुकलेल्या गालावरून मायेने हात फिरवला.

बालपणापासून जोपासत असलेल्या भीतीला ओलांडत जड अंत:करणाने आई हळूच उद्गारली, "बरं जा बाळा ".

**- जयश्री दाणी,** नागपुर.

लेखिका ललित साहित्याच्या अनेक पुरस्काराने सन्मानित असून,
त्यांच्या अनेक कथा, कादंबरी आणि कविता संग्रह प्रकाशित झाल्या आहेत.

*****

# धर्मनिष्ठा दाखवीत अहिल्यादेवींना केला हिंदू सांस्कृतीचा जिर्णोध्दार.

आपली भारतभूमी एकेकाळी सर्वार्थाने संपन्न भूमी होती. ही संपन्नता केवळ आर्थिक नव्हती तर आपल्या देशात कला, साहित्य आणि विद्या यांनीही उत्कर्ष गाठला होता. एक सुसस्कृत राष्ट्राजीवन याभूमीत जीवन जगत होते. पण सन ७११ मध्ये मुहम्मद बिन कासिम याने भारतावर आक्रमण केल्यानंतर एक एक राज्य इस्लामी वरवंटयाखाली भरडल्या जात होते. हिंदवी स्वराज्य स्थापन होण्याआधी जवळपास १००० वर्षाचा इतिहास हा संघर्षाचा इतिहास राहिलेला आहे. हिंदू समजाने त्याग, बलिदान आणि मोठ्या धैर्याने या इस्लामी आक्रमणाचा प्रतिकार केला आहे.

या आक्रमकांनी आर्थिक लूट तर केलीच यासोबतच अनेक मंदिरांची नासधूस केली हे सर्वश्रूत आहे.

उदयपूर, जोधपुर, जयपूर या परिसरातील मार्च १६७९ ते ऑगस्ट १६८० या कलावधीत जवळपास ३०० हून अधिक मंदिरे औरंगजेब बादशाहच्या हुकूमावरून पडण्यात आले. याची नोंद " मआरीसर – इ – आलमगिरी " याग्रंथात दिली आहे. औरंगजेब च्या काळात १७०५ मध्ये महाराष्ट्रचे दैवत असणारे पंढरपूर च्या विठोबाचे मंदिर पडले होते. तुळजापूर चे मंदिर पाडले. नालंदा येथील ग्रंथालय जाळले गेले. त्यामध्ये जवळपास २ लाख ग्रंथ होते. जामध्ये हजारो वर्षाचे ज्ञान साठवलेले होते. बौद्ध मूर्ति पडल्या गेल्या, विहार नष्ट केले, हजारो मंदिरे पाडली, सुंदर वास्तु, मूर्त्यांचा विनाश केला गेला. नंतर मराठ्यांचा प्रभाव वाढत गेला तेव्हा या विनाशाला ब्रेक लागला. पुनर्बांधणी सुरू झाली. पुढे अहिल्यादेवी होळकरांचे मोठे योगादान या कार्यात आहे. काशी विश्‍वनाथ, सोमनाथ, परळी वैजनाथ, घृष्णेश्‍वर आदि मंदिरांचा त्यांनी जिर्णोध्यर केला. श्रीओंकारेश्‍वर, श्रीभीमाशंकर या ठिकाणी त्यांनी धर्मशाळा,घाट,मंदिरे बांधली. राज्यातील आणि राज्याबाहेरील हिंदू मंदिरांची पुर्बनधणी केली, धर्मशाळा बांधल्या. आणि विशेष म्हणजे हे सर्व करताना त्यांनी राजकीय खजिन्यातून हा न करता स्व:तच्या पैशातून हे धर्म कार्य त्यांनी केले आहे. धर्मनिष्टा दाखवीत अहिल्यादेविणे हिंदू धर्माचा जिर्णोधार केला असेच म्हणावे लागेल.

जनतेकडून करस्वरूपात आलेले पैसे स्वतःसाठी महाल बांधण्यात न खर्च करता, त्यांनी त्या माध्यमातून रस्ते, तलाव, बांधण्याला प्राधान्य दिले. तसेच त्यांनी काही ठिकाणी आश्रमशाळा बांधल्या तर काही ठिकाणी अन्नछत्र सुरू केले. काही मंदिरांसाठी त्यांनी घाट बांधून दिले आहेत. काही ठिकाणी कुंडे बांधून दिली आहेत.

देशभरातील बारा ज्योतिर्लिंग व इतर मंदिरांच्या जीर्णोद्धाराचे काम त्यांनी हाती घेतले आणि ते पूर्ण देखील केलं. श्रीनगर, हरिद्वार, केदारनाथ, बद्रीनाथ, ऋषिकेश, प्रयाग, वाराणसी, नैमिषारण्य, पुरी, रामेश्वरम, सोमनाथ, नाशिक, ओंकारेश्वर, महाबळेश्वर, पुणे, इंदूर, श्रीशैलम, उडीपी, गोकर्ण, काठमांडू इत्यादी ठिकाणी मंदिरे बांधली. अहिल्यादेवीनी प्राथमिक स्तरावर शिव मंदिराचा जीर्णोद्धार केला.

**अहिल्यादेवींचा काशी-विश्वनाथच्या मंदिरात हातभार**

देशावर मुस्लिम आक्रमकांचे संकट असताना, हिंदू धर्मातील मानबिंदू पुन्हा उभारण्याचे काम अहिल्याबाईंनी हाती घेतले होते. याचे सर्वात चांगले उदाहरण म्हणजे काशी-विश्वनाथ मंदिर. मूळ नष्ट झालेल्या मंदिराच्या पुनर्बांधणीचे स्वप्न अनेक मराठा राज्यकर्त्यांनी पाहिले होते. परंतु, ते सत्यात उतरवण्याचे श्रेय अहिल्यादेवी होळकर यांना जाते.

१८ एप्रिल १६६९ रोजी मुस्लिम शासक औरंगजेबाने काशी-विश्वनाथचे मंदिर पाडण्याचा आदेश दिला होता. मुघलसम्राट औरंगजेबाच्या स्पष्ट आदेशानुसार, काशी-विश्वनाथ धाम, हिंदूंच्या पवित्र तीर्थक्षेत्रांपैकी एक, लुटले गेले,आणि

पाडले गेले. १६६९ मध्ये ही श्रद्धास्थान ज्ञानवापी मशिदीत रूपांतरित केले गेले. पण अहिल्याबाईंनी या मशीदी शेजारीच नवे भव्य मंदिर उभारले. काशीचे मुख्य आकर्षण म्हणून प्रसिद्ध असलेला 'मणिकर्णिका घाट' बांधला. पुढे शीख राजा रणजीतसिंह यांनी या मंदिराच्या शिखरावर सोन्याचा पत्रा चढवला.

**सोमनाथ**

१७८३ साली अहिल्यादेवी यांनी सोमनाथच्या शिव मंदिराचा जीर्णोद्धार केला. अहिल्याबाईंनी बांधलेले मंदिर आता 'जुने सोमनाथ' किंवा 'अहिल्यादेवी मंदिर' म्हणून ओळखले जाते आणि मुख्य सोमनाथ मंदिरापासून सुमारे २०० मीटर अंतरावर आहे.

**विष्णुपद मंदिर, गया, बिहार.**

हे नगारा शैलीत बांधलेले हिंदू मंदिर आहे. हे १२०४ मध्ये आहुका आणि मन्युका नावाच्या दोन स्थानिक व्यापाऱ्यांनी बांधले होते. हे वैद्यनाथ रूपात भगवान शिवाला समर्पित आहे.

अहिल्यादेवी होळकर यांचा ग्रंथसंग्रह

अहिल्याबाईंचा ग्रंथसंग्रह मोठा आणि दुर्मिळ होता. त्यात निर्णयसिंधू, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मधुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणि, वाल्मीकि रामायण, पद्मपुराण, श्रावणमास माहात्म्य इत्यादी ग्रंथाच्या हस्तलिखित प्रती होत्या.

**गंगा नदी**

हिंदू धर्म ग्रंथानुसार गंगा नदीला विशेष महत्त्व आहे. हिंदूंनी पवित्र मानलेली नदी प्राचीन ग्रंथ आणि कलेमध्ये देवी गंगा म्हणून अवतरली आहे. गंगा नदीचे पाणी पवित्र मानले जाते, धार्मिक स्नान हा हिंदू तीर्थक्षेत्राचा अविभाज्य भाग आहे. हे पाणी, ज्याला आदरपूर्वक गंगाजल म्हटले जाते, हिंदू मंदिरांमध्ये केल्या जाणाऱ्या विविध पूजांमध्ये देखील वापरले जात असे. गंगेचे महत्व समजून, अहिल्याबाईंनी, गंगेच्या उगमाचे म्हणजेच 'गंगोत्री'चे पाणी भारत भारतातील सर्व मंदिरांपर्यंत अगदी केरळ, तामिळनाडू व कर्नाटक पर्यंत पोहोचवण्याची सोय केली,.

**बांधकाम कामावर एक नजर -**

१. द्वारकेत पूजागृह बांधले.

२. रामेश्वरममध्ये राधाकृष्ण मंदिर, धर्मशाळा आणि विहिरी बांधल्या.

३. जगन्नाथपुरीत रामचंद्र मंदिर, धर्मशाळा आणि विहिरी बांधल्या.

४. ओंकारेश्वरातील ममलेश्वर आणि त्र्यंबकेश्वर मंदिरांचा जीर्णोद्धार करून, शिवाचा चांदीचा मुखवटा मिळाला.

५. अयोध्येत राम मंदिर, चेताराम मंदिर, भैरव मंदिर, नागेश्वर मंदिर आणि इतर मंदिरे बांधली. शरयू घाट बांधला.

६. चिंतामण गणपती, जनार्दन मंदिर, लीला पुरुषोत्तम बालाजी मंदिर, घाट, तलाव, धर्मशाळा आणि पायऱ्या उज्जैनमध्ये बांधल्या गेल्या.

७. चित्रकूटमध्ये श्री राम आणि इतर चार मूर्तींची स्थापना केली.

८. नाथद्वारामध्ये मंदिर, धर्मशाळा, विहीर आणि तलाव बांधले.

९. बेरूळ (कर्नाटक) येथे गणपती, पांडुरंग, जलेश्वर, खंडोबा, तीर्थराजा आणि अग्निची मंदिरे बांधली.

१०. प्रयागमध्ये विष्णू मंदिर, धर्मशाळा इत्यादी बांधले.

११. नाशिकमध्ये श्री राम मंदिर, गोरा महादेव मंदिर आणि धर्मशाळा बांधली.

१२. गयामध्ये श्री विष्णुपद मंदिर आणि सभा मंडप बांधला.

१३. पुष्करमध्ये श्री विष्णू मंदिर, घाट आणि धर्मशाळा बांधली.

१४. त्र्यंबकेश्वरमध्ये दोन मंदिरे व एक तलाव बांधला.

१५. गंगोत्रीमध्ये विश्वनाथ, केदारनाथ, अन्नपूर्णा, भैवर मंदिरे आणि सहा धर्मशाळा बांधल्या.

त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे या पवित्र स्थळांच्या स्थापत्य वारशाचे पुनरुज्जीवन आणि जतन करण्यात मदत झाली. आज भारतात हिंदू धर्म आणि मंदिर अजूनही अस्तित्वात आहेत, या मध्ये अहिल्यादेवींचा खूप मौल्यवान वाटा आहे.

**- सौ.पल्लवी कुलकर्णी,** अकोला.

लेखिका सामाजिक कार्यकर्त्या असून संत गाडगेबाबा
अमरावती विद्यापीठाच्या राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य आहेत.

*****

सारंग बानगांवकर : 7588793897

श्री गुरुमाऊली
खादी भंडार



नवरात्री उत्सवानिमित्य
१५ टक्के डिस्काऊंट

मोदी कुर्ता, हाफ शर्ट. फुल शर्ट,
पैजामा पठाणी कुर्ता, बंगाली शर्ट, टि-शर्ट

महाविर फोटो स्टुडीओ जवळ वर्धमान प्लाझा शॉप नं ९ पहिला माळा, कारंजा

# शेतकऱ्यांच्या चळवळीला हवी नवी दिशा

भारतात स्वातंत्र्योत्तर काळा पुरता विचार करायचा झाल्यास शरद जोशिंचे नाव घेतल्या शिवाय शेतकरी चळवळी संबंधिची चर्चा पुढे जाऊ शकत नाही. एका दाण्याचे हजार दाणे हजार दाणे करणारा भारतीय शेतकरी दारिद्र्याचे, दैन्याचे जीवन का जगतोय याचा शोध घेण्यासाठी आपले सर्वार्थाने समृद्ध आयुष्य उधळून लावणारा हा शेतकरी योद्धा.शेतकऱ्यांचे जीवन, त्यांचे प्रश्न समजून घ्यायचे असतील तर आपले पोट शेतीवर असावे म्हणून सुखासीन आयुष्याचा त्याग करत कोरडवाहू शेतीत प्रयोग करणारा स्वतंत्र भारतातील सत्यशोधक, सत्याग्रही म्हणून शरद जोशी व शेतकरी संघटनेचा उल्लेख अनिवार्य आहे. अर्थशास्त्री म्हणून प्रत्यक्ष प्रयोगा नंतर शेतकऱ्यांच्या दुःखाचे, दारिद्र्याचे, कर्जबाजारी पणाचे कारण समजून घेऊन अखंड प्रवास, प्रयास, अभ्यास, आंदोलन शरद जोशीनी महाराष्ट्रातून उभारले त्याची धग पुढे देशभर पसरली.

सूट, सबसिडीचे नाही काम, भीक नको हवे घामाचे दाम, शेतकऱ्यांचे मरण हेच सरकारचे धोरण ह्या सारख्या घोषणा त्यांनी शेतीच्या अर्थशास्त्रातून आंदोलनात उतरवल्या. शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे, कर्जबाजारीपणाचे कारण शेतमालाचे भाव नियंत्रित ठेवण्याच्या सरकारी धोरणात आहे. हे त्यांनी सप्रमाण सिद्ध केले.वेळोवेळी शेतमालाचे भाव पाडून सरकार शेतकऱ्यांना उणे सबसिडी देते म्हणून शेतकरी सरकारचे देणे नाही तर सरकारकडून घेणे लागतो हे पुराव्यासह सिद्ध करून दाखवल्याने आपले खरे दुःख शरद जोशी मांडतोय म्हणून लाखोंच्या संख्येने शेतकरी त्यांच्या एका आवाजात आंदोलनात उतरायचे. शेतकऱ्यांच्या त्या आंदोलनाला अनेक शेतकऱ्यांच्या हौतात्म्याची त्यांच्या रक्ताची किनार आहे. लाठीचार्ज, तुरुंगावास हे तर नित्याचेच.

कम्युनिस्ट विचारांनी रशियाचा पाडाव झाला अन पाठोपाठ जगभरातून कम्युनिसम मागे पडले. अनेक देश खुल्या विचारांनी, खुल्या अर्थकारणाने प्रगतीची नवी शिखरे गाठत आहेत. आमच्या देशात मात्र शेतमालाचे भाव पाडण्यासाठी 1951 पासूनच संविधानात असंख्य बिघाड करून अनेक कायदे बनवले गेले त्यातील 154 कायदे आजही शेतमालाच्या किंमती कमी ठेवण्यासाठी वापरले जातात. मूळ संविधानात परिशिष्ट घुसडवून न्यायबंदी करण्यात आली. या सर्वांचा अतिशय प्रतिकूल परिणाम शेती आणि शेतकऱ्यांवर झाला. लाखो शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्यात आज ही शेतकऱ्यांना कर्जाच्या चक्रव्युहातून बाहेर पडता येत नाही. शरद जोशी म्हणायचे शेतीची बाजारपेठा खुल्या असत्या, भाव पाडण्याची धोरणे नसती तर मी आंदोलने करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या कंपनीज बनवल्या असत्या. शेतीमध्ये तंत्रज्ञान, भांडवल, गुंतवणूक, संरचना उभारून शेतमालाच्या ग्रेडिंग, पॅकेजिंग, ब्रँडिंग, प्रोसेसिंग, मार्केटिंग, रिटेलिंग असे असंख्य उद्योग उभे केले असते.आज स्वातंत्र्याची 75 वर्षे उलटून गेल्यानंतर देशात लोकशाही अधिक प्रगल्भ व्हायला हवी. शेतकऱ्यांना स्वातंत्र्य व पाठबळ मिळायला हवे तरच वाढत्या तरुणाईच्या हातांना, मेंदूंना काम मिळून देशापुढील बेरोजगारीची समस्या दूर होऊ शकते.

कापूस योग्य भावांअभावी शेतकऱ्यांच्या घरांत पडून आहे, कावरा झालाय, अंग खाजवतेय पण भाव  नाही.हे चित्र अनेकदा पाहून झालेय.सोयाबीन चे भाव चार  हजारांच्या पुढे सरकत नाहीत,उत्पादन खर्च भरून निघत नाही.निर्यात बंदी मुळे हंगामात कांदा मातीमोल झालेला पाहिला कधी टोमॅटो तोडून बाजारात विकायला आणायला ही परवडला नाही, कुठे पत्ताकोबी वर रोटाव्हेटर फिरवले गेलेय तर कुठे  फ्लॉवर मध्ये गुरे फिरविली गेलीत.

हे आपण पाहतोय.स्वातंत्र्याच्या अमृतकाळात खरे तर हे आंदोलन चर्चा, वादविवाद व त्यातून मार्ग खुले करणे या दिशेने जायला हवे. त्यासाठी सरकारांनी संवादाची, धोरणांची दालने खुली करण्याची गरज आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू ही घोषणा याच संवादा अभावी हवेत विरून गेलीय.

अधिकाधिक जनसंख्येला शेतीत गुंतवून त्यांच्याकडून कमीत कमी भावांत शेतमाल खरेदी करण्याच्या उद्देशाने शेतीचे तुकडे पाडले गेलेत. उत्पादन खर्च भरून निघू नये शेतकरी आपल्या दोन, किंवा अधिक मुलांसाठी अधिक ची शेती घेऊ शकला नाही.आज आपल्या आजूबाजूला 90%अल्पभूधारक शेतकरी आहेत. शेतमालाला भाव नसल्याने व "विकायला शिल्लक जमीन नसल्याने" आत्महत्या करताहेत.

संवादाच्या अभावातून व धोरणातील विसंगतीमुळे सरकार ला नवे कृषी कायदे मागे घ्यावे लागले. आज पुन्हा एकदा शेतकऱ्यांसाठी तंत्रज्ञान, बाजारपेठा, भांडवल, गुंतवणूक, संरचना व पाठबळाची गरज आहे. त्या साठी चर्चा, वादविवाद, विचारांचे आदान, प्रदान, दबाव गट तयार करणे या सारख्या रचनात्मक आंदोलनाची देशाला गरज आहे.

सरकारांनी सुद्धा संवाद व धोरणात्मक प्रामाणिकता दाखवायला हवी. तसे न दिसल्यास मटपेटीतून सरकारांना उत्तर मिळेल अशी जागृती शेतकरी समाजात होणे गरजेचे आहे.

जीवन मरणाच्या संघर्षासोबत शेतकऱ्यांची  आपली एक विचारप्रक्रिया,मूल्यमापन निरंतर सुरु असते. शेतकऱ्यांच्या या चिंतन प्रक्रियेला एका दिशेने संघटित करण्याची, त्यांना रचनात्मक आंदोलन देऊन दबाव गट तयार करण्याची आज गरज आहे.एका आवाजात लाखो शेतकरी आंदोलनात उतरवणाऱ्या शरद जोशिंचा जातीवादी राजकारण्यांनी राजकारणात अजिबात टिकाव लागू दिला नाही. शेतकरी संघटनांनी राजकारण्यांच्या खिंडीत बेमालूम पणे अडकण्या पेक्षा आपला देशव्यापी दबाव गट उभा करण्याची आज गरज आहे.

आज हवामानातील बदलाच्या व वाढत्या किडिंच्या पार्शवभूमी वर शेतकऱ्यांना आधुनिक बीज तंत्रज्ञान वापरण्याची मोकळीक हवी आहे.तंत्रज्ञानाने उत्पादन कदाचित वाढेल, उत्पादन खर्च ही कमी होईल पण शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा मुद्दा शेतमालाच्या भावांभोवतीच फिरतो हे ही  विसरून चालणार नाही.जगात उपलब्ध हवे ते तंत्रज्ञान वापरण्याचे, तपासून पाहण्याचे स्वातंत्र्य मात्र शेतकऱ्यांना हवे.

सरकार ला जर अर्ध्या अधिक जनसंख्येला फुकट किंवा अत्यल्प दरांत खाऊ घालायचे आहे तर त्यांच्या लेखी शेतमालाच्या भावाचा अन मालाच्या गुणवत्तेचा प्रश्न  तसाच निकाली निघालेला आहे. किसान सन्मान निधीचे दोन हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात टाकावे, कर्जमाफी, पीकविमा, अतिवृष्टी, कोरडा दुष्काळ आदीच्या नुकसान भरपाई साठी शेतकऱ्यांना आपल्यामागे फिरायला,हेलपाटे मारायला लावावे एवढेच काय ते शेतकऱ्यांच्या नशीबी सरकारने लिहून ठेवले आहे.

शेतमालाचे भाव पाडून शेतकऱ्यांसाठी मोठमोठ्या घोषणा करत आपल्या मत पेटीचे राजकारण शाबूत ठेवावे हाच काय तो राजकीय उद्योग!

आज राजकीय व्यवस्थेने शेतकऱ्यांना सर्वच बाजूनी हतबल व आपल्या मागे फिरायला मजबूर केले आहे. एकिकडे शेतीत उत्पादन खर्च भरून निघत नाही तर दुसरीकडे सेवाक्षेत्रातील श्रीमंतीचा ताण शेतकऱ्यांवर पडतो आहे.शेतमालाच्या बाजारात अगतिक झालेल्या शेतकऱ्यांच्या तरुण मुलांना एकतर लग्नाला मुलगी द्यायला कुणी तयार होत नाही किंवा आपल्या पुढच्या पिढीसाठी आपण काहीच करू शकणार नाही या भीतीने त्याची लग्न करण्याची मनापासून हिम्मत होत नाहीय हे दुर्दैवी असले तरी सत्य आहे.

शेतमालाला "भाव" मिळू द्यावे ही उच्चारायला अगदी साधी गोष्ट व्यवस्थेने शेतकऱ्यांना पिढ्या न पिढ्या नाकारली.

शेतकरी संघटनेचे प्रणेते शरद जोशी यांनी स्वतंत्र भारतातील सर्वात अशक्य वाटणारे ऐतिहासिक कर्तृत्व शेतकरी संघटनेची उभारणी ही शेतमालाला "रास्त भाव " या एक कलमी कार्यक्रमावर केली होती. लाखो शेतकऱ्यांमध्ये आत्मभान जागवणारी ही शेतकरी संघटनेची ही प्रचंड ईमारत शेतमालाला "रास्त भाव " या एका खांबावर दिमाखात उभी आहे .

"शेतमालाला रास्त भाव" या एकाच विचाराच्या धाग्यात शेतकऱ्यांच्या सुखाने, सन्मानाने जगण्याच्या मार्गाचे महावस्त्र शेतकरी संघटनेच्या विचार आणि कार्यपद्धतीने विणले आहे . या एकाच विचाराच्या धाग्याच्या महावस्त्रात मानवी आयुष्याच्या सर्वच अंगांची गुणवत्ता वाढवण्याची क्षमता बघायला मिळते . मानवी आयुष्यात निवडीच्या स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावून आयुष्याची व एकंदर समाजाची, राष्ट्राची गुणवत्ता वाढावी हे मोठे तत्वज्ञान व एकंदर दारिद्र्याच्या प्रश्नाचे उत्तर शेतमालाचे "भाव " या संकल्पनेत दडलेले आहे हे नव्या पिढीला समजावणे आज गरजेचे आहे. शेतमालाचे भाव या एका संकल्पनेत अर्थवाद आहे, मानवता वाद आहे, स्त्रियांच्या, बालकांच्या प्रश्नांची उत्तरे आहेत, निरंतर विकासाचा विचार आहे. आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, उद्योग, रोजगार, कायदा, सुव्यवस्था, न्याय, संरक्षण या साऱ्या साऱ्या मानवी प्रेरणाची उत्तरे आहेत. ते स्वतः समजावून घेणे, लक्षात ठेवणे व नव्या पिढीपर्यंत पोहचवणे ही जबाबदारी पेलणारी डोकी मात्र वाढवायला हवीत.

आज शेतकरी आंदोलनांचे फ़ार्स आजूबाजूला दिसत असले तरी ते शेतकऱ्यांमध्ये आश्वासकता आणि विश्वास मात्र निर्माण करू शकत नसल्याचे चित्र दिसते याचे कारण म्हणजे आंदोलनामागे ठोस विचार, तत्वज्ञान व प्रश्नाचे उत्तर शोधण्याची भूक असण्यापेक्षा प्रसिद्धीची हाव व हवा च दिसत असल्याचे दुर्दैवाने बऱ्याच पहायला मिळते.

शेतमालाला रास्त भाव, हवे ते तंत्रज्ञान निवडण्याचे स्वातंत्र्य, व्यवस्थेने पिढ्या न पिढ्या गारद केलेल्या शेतकऱ्यांसाठी मार्षल प्लॅन ज्या मध्ये संपूर्ण कर्जमुक्ती, वीज बिल मुक्ती, रस्ते, शेतरस्ते, गोदामे, वाळवण गृहे, शीतगृहे, प्रक्रिया उद्योगाचे जाळे, आज कांदा, नाशवंत भाजीपाला, फळे आदी साठी निर्जली करण, पेस्ट बनवणे, गर बनवणे या सारखे दीर्घकाळ साठवणुकीचे व रास्त भाव मिळवण्याचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत. ते मार्ग चोखाळायला शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीचा भांडवली पत पुरवठा, भाव पडलेले असतांना चांगल्या दर्जाचे शेतमाल तारण व साठवणूक व्यवस्था, वायदे बाजारातील भावांवर दहा टक्के सबसिडी शेतकऱ्यांना हवी आहे. होय शेतकऱ्यांना सावरण्या साठी नियंत्रणमुक्त बाजारा सोबतच तंत्रज्ञान, संरचना, साठवणूक,भांडवली पतपुरवठा, तारण व्यवस्था व वायदे बाजारातील भावांवर दहा अधिक सबसिडी हवी आहे. तर च शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी होऊ लागेल.

देशात व जगात विविध ठिकाणी विकेंद्रित झालेल्या अतिरिक्त उत्पादना च्या पार्श्व भूमीवर आज महाराष्ट्रात कांद्याच्या भावाचा प्रश्न पेटलेला आहे. शेतमाल नियंत्रित ठेवण्याच्या धोरणांनी आम्ही जागतिक बाजारात आमचा हिस्सा चाळीस टक्क्यावरून आठ टक्क्यावर आणून ठेवला आहे. कांद्या मध्ये साठवणूक, प्रक्रिया, व सरकार निर्मित समस्येचे निराकरण सरकार नेच रास्त भावाचे सूत्र जुळवण्यासाठी विकत घेतलेला कांदा नष्ट करण्याशिवाय तूर्तास तरी पर्याय नाही.

शरद जोशिंच्या आंदोलनामध्ये वरकरणी रेल रोको, रास्ता रोको, गावबंदी सारखी शस्त्रे दिसत असली तरी ते स्वतंत्र भारतातील सर्वात मोठे अहिंसात्मक व देशातील सर्जक शक्तीच्या स्वातंत्र्याचा, सन्मानाने जगण्याचा मार्ग प्रशस्त करणारे रचनात्मक आंदोलन होते. शेतकरी आंदोलनात सृजनाच्या रचनात्मक तेची हीच अपेक्षा पुढच्या काळात असेल. सर्जकांच्या स्वातंत्र्याचे शिवार फुलण्यासाठी काही बियांना यापुढे ही स्वतःला मातीत गाडून घ्यावे लागेल त्या बियांमध्ये चळवळीमधला "मी" ही असावा.बी हवेत डोलू लागले तर कणीस मात्र फुलणार नाही.शेतकऱ्यांच्या आयुष्यात सुखाचे, समृद्धीचे रंग येवोत याच दिवाळी च्या शुभकामना!

**- डॉ. नीलेश पाटील,** अकोला.

लेखक हे शेतकरी संघटना युवा आघाडी चे विदर्भ प्रमुख असून प्रयोगशील शेतकरी आहेत.

*****

# पालखी महामार्ग, भक्तिमार्ग राज्य शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प.

महाराष्ट्र शासनाने हाती घेतलेला पालखी महामार्गाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प महत्त्वपूर्ण आहे आणि या प्रकल्पामुळे पश्चिम महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिक विकासालाही चालना मिळेल. या प्रकल्पामध्ये कोणकोणत्या रस्त्यांची तसेच अन्य कोणती कामे व सुविधा प्रस्तावित आहेत, या विषयीचे सविस्तर विवेचन या प्रकरणात केले आहे.

महाराष्ट्रातील वारीचे महत्त्व आणि बारी ज्या मार्गाने जाते, त्या मार्गातील वारकऱ्यांच्या प्रवासाची सुकरता या गोष्टी लक्षात घेऊन राज्य शासनाने पालखी महामार्ग विकास हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची या प्रकल्पात महत्त्वाची भूमिका राहिली आहे. भाविकांसाठीची सुरक्षा आणि सुविधा या गोष्टी लक्षात घेऊन हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. सन २०२१ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या प्रकल्पाची पायाभरणी झाली. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या आणि संपूर्ण महाराष्ट्रामध्ये समृद्धीचा प्रभाव निर्माण करण्याच्या देवेंद्र फडणवीस यांच्या दृष्टिकोनाशी हा प्रकल्प सुसंगत असाच आहे.

**दोन मार्गांचे नियोजन**

संत ज्ञानेश्वर पालखी मार्ग हा आळंदी ते पंढरपूर असा असेल. हा मार्ग २३४ किलोमीटरचा आहे. तर संत तुकाराम महाराज पालखी मार्ग देहू ते पंढरपूर असा असेल. हा मार्ग १३६ किलोमीटरचा आहे. हे दोन्ही मार्ग प्रशस्त बनवले जाणार आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाच्या (एनएच ९६५) पाच विभागांचे चौपदरीकरण केले जाणार आहे. हा मार्ग सहा पॅकेजचा आहे. तर श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गाच्या (एनएच ९६५ जी) तीन विभागांचे चौपदरीकरण होणार आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर दिवेघाट ते मोहोळ अशा २२१ किलोमीटरचे चौपदरीकरण केले जाईल. तर संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर पाटस ते तोंडले बोंडले अशा १३० किलोमीटरचे चौपदरीकरण करण्यात येईल. या दोन्ही मार्गांवर वारकऱ्यांसाठी पदपथ बांधले जाणार आहेत. या प्रकल्पासाठी अनुक्रमे ६ हजार ६९० कोटी आणि ४ हजार ४०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च येणार आहे.

संत तुकाराम महाराज पालखी मार्ग हा - (राष्ट्रीय महामार्ग - ९६५ जी) १३० किलोमीटरचा लांबीचा महामार्ग पुणे जिल्ह्यातील पाटस बारामती- इंदापूर - अकलूज बॉडलेपर्यंत विकसित करण्यात येत आहे. या मार्गावर एकूण ११ पालखी स्थळे असून वारकऱ्यांच्या सोयीसाठी या सर्व ठिकाणी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. या पालखी मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात येत आहे. तसेच आवश्यक त्या ठिकाणी महाराष्ट्रातील संत-महात्म्यांची शिल्पे, भित्तिचित्रे, अभंगवाणी आर्दीसह मार्गाचे सौंदर्याकरण करण्यात येईल. त्यामुळे मार्गाच्या सौंदर्यात भर पडेल. तसेच वारकऱ्यांना वारीच्या दरम्यान या मार्गात उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सुविधांचाही फायदा होईल. पालखी मार्गावर विशिष्ट प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात येणार असून यामध्ये विशेषतः चंदन, तुळशी, इतर सुगंधित वृक्षांबरोबरच वड, कडुनिंब, पिंपळ, चिंच या सावली देणाऱ्या तसेच वनौषधी वृक्षांची लागवड करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत रस्त्याच्या मध्यात ५७,२०० आणि दोन्ही बाजूस मिळून १८,८४० वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. दिवे घाट ते मोहोळ या २२१ किलोमीटरच्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाच्या चौपदरीकरणासाठी अंदाजे ६,६९० कोटी रुपये तर संत तुकाराम पालखी मार्गाच्या पाटस ते तोंडले- बोंडले या १३० किलोमीटरच्या चौपदरीकरणासाठी ४,४०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यामध्ये म्हसवड - पिलीव - पंढरपूर (एनएच ५३८ ई), पंढरपूर सांगोला (एनएच ९६५ सी), एनएच ५६१ ए वरील टेंभूर्णी-पंढरपूर भाग आणि एनएच ५६१ ए वरील पंढरपूर - मंगळवेढा - उमडी या भागांचा समावेश आहे.

या राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूला पालखीसाठी समर्पित पदपथ बांधले जातील, ज्यामुळे भाविकांना त्रासमुक्त आणि सुरक्षित रस्ता मिळेल. मोहोळ - वाखरी, वाखरी खुडूस, खुडूस धरमपुरी, धरमपुरी - लोणंद आणि लोणंद ते दिवेघाट या पाच टप्प्यांत दिवेघाट ते मोहोळ या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाच्या सुमारे २२१ किलोमीटरच्या चौपदरीकरणासाठी ६,६९० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. संत तुकाराम महाराज पालखी मार्गाचा १३० किलोमीटरचा रस्ता पाटस ते बारामती, बारामती ते इंदापूर आणि इंदापूर ते तोंडले या तीन टप्प्यांत चौपदरी करण्यात येणार आहे, ज्यासाठी सुमारे ४,४०० कोटी रुपये खर्च होणार आहेत. महामार्ग प्रकल्पांमध्ये २२३ किलोमीटरपेक्षा जास्त पूर्ण झालेले आणि अपग्रेड केलेले रस्ते प्रकल्प देखील समाविष्ट आहेत. पंढरपूरला जोडण्यासाठी विविध राष्ट्रीय महामार्गावर १,१८० कोटींचा खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पांमध्ये म्हसवड पिलीव पंढरपूर (एनएच ५४८ ई), कुर्दुवाडी - पंढरपूर (एनएच ९६५ सी), पंढरपूर- सांगोला (एनएच ९६५ सी), एनएच ५६१ ए चा टेंभुर्णी पंढरपूर विभाग आणि एनएच ५६१ ए चा पंढरपूर - मंगळवेढा- उमदी विभाग यांचा समावेश आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग - (एनएच ९८५) मोहोळ ते वाखरी रस्त्याचे चौपदरीकरण पॅकेज एकमध्ये केले जाईल. या रस्त्याची लांबी ४४.७० किलोमीटर असून त्यासाठीचा खर्च १,४३८ कोटी रुपये आहे. वाखरी ते खुडूस रस्त्याचे चौपदरीकरण पॅकेज दोनमध्ये केले जाईल. या रस्त्याची लांबी ३३.१० किलोमीटर असून त्यासाठीचा खर्च ९७९ कोटी रुपये आहे. खुडूस ते धर्मपुरी रस्त्याचे चौपदरीकरण पॅकेज तीनमध्ये केले जाईल. या रस्त्याची लांबी ३०.२० किलोमीटर असून त्यासाठीचा खर्च ११५४ कोटी रुपये आहे. धर्मपुरी ते लोणंद रस्त्याचे चौपदरीकरण पॅकेज चारमध्ये केले जाईल. या रस्त्याची लांबी ४९.४० किलोमीटर असून त्यासाठीचा खर्च १,४१२ कोटी रुपये आहे. लोणंद ते दिवेघाट रस्त्याचे चौपदरीकरण पॅकेज पाचमध्ये केले जाईल. या रस्त्याची लांबी ५४.५० किलोमीटर असून त्यासाठीचा खर्च १,७१० कोटी रुपये आहे.

संत तुकाराम महाराज पालखी मार्ग (एनएच ९८५ जी) पाटस ते बारामती दरम्यानच्या रस्त्याचे चौपदरीकरण (पॅकेज १) रस्त्याची लांबी ४१.३६ किलोमीटर, खर्च १,३४३ कोटी रुपये. बारामती ते इंदापूर रस्त्याचे चौपदरीकरण (पॅकेज दोन) रस्त्याची लांबी ४२.१३ किलोमीटर, खर्च १४७१ कोटी रुपये. इंदापूर ते तोंडले रस्त्याचे चौपदरीकरण (पॅकेज तीन) - रस्त्याची लांबी ४६.७० किलोमीटर, खर्च १६०१ कोटी रुपये. पंढरपूरला जोडणाऱ्या रस्त्यांच्या रुंदीकरणाची कामेही याच



प्रकल्पाद्वारे झाली आहेत. म्हसवड- पिलीव पंढरपूर रत्याचा पुनर्विकास आणि उन्नतीकरण रस्त्याची लांबी ५३.०८ किलोमीटर, खर्च २६३ कोटी रुपये. कुर्दुवाडी ते पंढरपूर रस्त्याचा पुनर्विकास आणि उन्नतीकरण रस्त्याची लांबी ४८.३७ किलोमीटर, खर्च २१२ कोटी रुपये. पंढरपूर ते सांगोला रस्त्याचा पुनर्विकास आणि उन्नतीकरण - रस्त्याची लांबी ३१.१५ किलोमीटर, खर्च १७७ कोटी रुपये. टेंभूर्णी ते पंढरपूर रस्त्याचे उन्नतीकरण रस्त्याची लांबी ३६.१९ किलोमीटर, खर्च ११२ कोटी रुपये. पंढरपूर मंगळवेढा उमदी रस्त्याचे उन्नतीकरण - रस्त्याची लांबी ५४.३३ किलोमीटर, खर्च ४२२ कोटी रुपये.

**प्रकल्पाचे अनेक फायदे**

राज्य शासनाने हाती घेतलेल्या या प्रकल्पाचे अनेक फायदे वारीतील वारकऱ्यांना होणार आहेत. विठ्ठल भक्तांसाठी मार्गाच्या दोन्ही बाजूंनी सुरक्षित आणि चालण्यासाठी अतिशय सुलभ पदपथ तयार करण्यात होणार आहेत. पालखी मार्ग पंढरपूर आणि पुणे यांची आधुनिक चौपदरी राष्ट्रीय महामार्ग याद्वारे जोडणी केली जाणार आहे. सासवड, लोणंद, फलटण, नातेपुते, माळशिरस, पंढरपूर, बारामती, बावडा, अकलूज आणि श्रीपूर - बोरगाव येथे दाट लोकवस्तीसाठी बाह्यवळण मार्ग केले जातील. पुणे ते पंढरपूर प्रवासाच्या बेळेत या मार्गामुळे दोन तासांची बचत होईल. प्रदूषणात घट होईल. कृषी माल आणि स्थानिक उत्पादने मोठ्या बाजारपेठेत जाण्यासाठी सुलम मार्गाची उपलब्धता होईल. सातारा, कोल्हापूर, सांगली, विजापूर, मराठवाडा विभाग आणि उत्तर महाराष्ट्रातून पंढरपूरला येणाऱ्या भाविकांना या महामार्गाचा मोठा लाभ होईल. एकप्रकारे हा महामार्ग भगवान विष्ठुलाच्या भक्तांच्या सेवेबरोबरच या संपूर्ण पवित्र प्रदेशाच्या विकासाचे माध्यम देखील बनेल, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंढरपूरमध्ये राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांच्या पायाभरणी समारंभात केले होते. पश्चिम महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिक विकासाला या महामार्ग प्रकल्पामुळे चालना मिळेल.

**- साभार - शैलेश घाटपांडे**

यांच्या " निर्मल वारी अभियान " या पुस्तकातून.

*****

## दुबार पेरणी.

वान महागा मोलाचे,
घेवूनिया पेरणीला.
केली पेरणी शेतात,
हात जोडले धरणीला.

इवलसा आला कोंब,
खाते ती गोगलगाय.
आले संकट कुठून,
तिला नसताना पाय.

उभे संकट दारात,
उन्हा तान्हात राबून.
केली दुबार पेरणी,
शिळा छातीवर ठेवून.

गेला कोरडा श्रावण,
पाणी तोंडचे पळाले.
वाट पाहून पावसा,
हात पाय रे  गळाले.

कशीतरी आली सुगी,
स्वप्न माझे विसरले.
भाव हे सोयाबिनचे,
बाजारात घसरले.

सरकारी व्यवस्थेला,
कधी येईल कळून.
शेती बेभरवश्याची,
बळी जातोय मरून.

**- दत्ता वालेकर.**
विक्रम फोटो स्टुडिओ, घाटनांदूर, अंबाजोगाई, जि.बीड.

## विरहाचा ढग फुटलेला (वृत्त-उद्धव).

पाऊस असा कोसळतो
वाराही उधाणलेला,
काहूर मनाला छळतो
विरहाचा ढग फुटलेला

वादळात भरकटलेले
मन होई सैरावैरा,
अंदाज कशाचा न कळे
घोंघावत वादळ वारा

ह्रदयातून दरवाजाची
फडफडती आर्तऽ कवाडे
मिणमिणते जीवन ज्योती
संदेश अभद्री धाडे

या जगण्यामधली इच्छा
संपली अशी का वाटे?
आधारच विसकटलेला
संभ्रमात काळिज फाटे

परतीच्या वाटेवरती
ना सोबत उरले नाते,
प्रेमाची भरती सरता
सारेच संपले होते

वेदना मनातुन बोले
हा प्रवास संपत आला,
काळोखी क्षितिजावरती
प्रेमाचा सूर्य बुडाला

**- विजो (विजय जोशी).**

# दिव्य दिपावली.

लक्ष लक्ष दीप प्रज्वल
आसमंतास  उजळतील
दीपावलीचे पर्व पावन
तम मनातील क्षालतील...१

आगमन दिपोत्सवाचे होता
सकल तिमीराचा होईल अंत
उत्सव व्हावा मनामनांचा
फुलावे हास्य, नुरावी खंत...२

कुंद कळ्या त्या आनंदाच्या
सजाव्या जीवन वेलीवरी
गंधीत होईल जगत मनाचे
साद घाल त्या अलगद हसरी...३

पणत्यांच्या लखलखाटाने
पुनव भासे अवसयामिनी
पूजन जरी हे विष्णूप्रियेचे
आदरावी जीवनसंगिनी... ४

कन्यारुपी लक्ष्मींचाही
बाळगावा अभिमान
मग अपुली वा परकी ती
मनी ठेवा मानसन्मान... ५

प्रकाशाने लख्ख व्हावी
सकल अंतरांची दालने
काळोखाची शाल फेकून
प्रितीसागर व्हावी लोचने...६

दिव्यप्रकाशात चिंब व्हावे
मनी जन्मगवीरा निरागसता
स्वार्थ,असुया विरुन जाव्या
गंधाळून जावी मानवता ...७

**- शिल्पा म. वाघमारे.**
स. अ. जि. प. प्रा. मराठी कन्या शाळा, बार्शीटाकळी. जि अकोला.





दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ
THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL
Regd.No.YML/BNK/114
मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 - Phone : 07232 - 244241, 243703, 237442
E-mail : ho_adm@yavatmalurbanbank.com - Website : www.yavatmalurbanbank.com
ISO 9001:2015& ISO 27001:2013 CERTIFIED BANK
बँकेचे सभासद,ठेवीदार,
ग्राहक व हितचिंतक यांना
शुभ दिपावली
कर्जाचे
अत्यंत माफक
व्याज दर
8.25%*
पासुन सुरू
* नियम व अटी लागू
आम्ही जपतो
वारसा
विश्वासाचा
| डॉ. नितीन खर्चे अध्यक्ष | अजिंदरसिंह चावला उपाध्यक्ष | श्रीधर कोहरे मुख्य कार्यकारी अधिकारी
संचालक - श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री.आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री.प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री.संजय चिंतामणराव डेहणकर,
श्री.प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड.श्री.प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री.गोवर्धन दयाराम राठोड, श्री.परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ.श्री.महेश दामोधर सारोळकर,
श्री.वसंता रामजी सुपारे, श्री.संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ.शिला राजेश्वर निवल, श्री.प्रविण पांडुरंग खांदवे (तज्ञ संचालक),
श्री.पियुष कैलासचंद्र खेतान (तज्ञ संचालक)